
# झेपावे दक्षिणेकडे

१९९८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
ग्रं. क्र. ७५०



REFBK-0017207

सौ. मुक्ता केणेकर



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0017207

# झेपावे दक्षिणेकडे

सौ. मुक्ता केणेकर

युवा प्रकाशन संस्था - कल्याण.

C सौ. मुक्ता केणेकर

●

**प्रथमावृत्ति**
४ डिसेंबर १९६८

●

**प्रकाशक**
मनोरमाबाई गांगल
युवा प्रकाशन संस्था,
७ भिडे कॉलनी,
कल्याण.

●

**मुखपृष्ठ**
रामकृष्ण कारेकर

●

**मुद्रक**
हरी. कृ. देशमुख,
सुभाष मुद्रणालय,
२५०/१२ शनिवार पेठ,
पुणे २.

●

**एकमेव विक्रेतें**
युनिव्हर्सल बुक एजन्सी,
टिळक चौक, कल्याण.

● ●

**मूल्य आठ रुपये**

# प्रस्तावना

माझे एक परिचित चारीधाम यात्रेसाठीं गेले. परतल्यावर मी विचारलें, कशी झाली यात्रा ? एका क्षणाचाही विलंब न लावता तोंड वांकडें करून ते बोलले, अगदी वाईट ! वाहनांची सोय धड झाली नाहीं, आणि मुख्य म्हणजे भोजनाची व्यवस्था हवी तशी नव्हती !

नंतर माझे मन उगाचच खंतावत राहिलें. त्यांची ही अशी अव्यवस्था झाली म्हणून नव्हे, तर बापडा विनाकारण तीर्थयात्रेस गेला म्हणून. घरीं राहून चवीचें जेवता, तर तो अधिक सुखी झाला असता !

प्रवासांत अडचणी तर सर्वत्रच येतात. पोटांतले पाणी न डहुळतांनाचा प्रवास म्हणजे अंथरुणावर झोंपल्यावर जागृतीपासून निद्रावस्थेपर्यंतचा. एरवीं पर्यटण म्हटलें, की आपत्तींशी झगडावेंच लागतें. म्हणून प्रवासाला निघण्यांपूर्वीच आपण तो कशासाठीं पत्करला आहे, हें विचार करून ठरविले पाहिजे. त्या लक्षाकडे चित्त केंद्रित केलें की मग अडचणींचीं तमा उरत नाहीं, आणि फारसें इकडे तिकडेही लक्ष जात नाहीं.

सौ. मुक्ता केणेकर दक्षिणेंतील तीर्थांच्या प्रवासासाठीं निघाल्या, त्यावेळीं आपण हे प्रस्थान किंनिमित्य ठेवीत आहोंत, याची त्यांना पुरती जाणीव होती. या सर्व प्रवासवर्णनामध्यें गाडींत जागा बरी मिळाली वा न मिळाली, बससाठीं रखडावें लागले, इत्यादि तक्रारींचा आढळ कुठेंही व्हायचा नाहीं. ज्या दैवतांविषयीं इतकीं वर्षे परोपरीचे आइकलें होतें, क्वचित् कधीं ज्यांच्याविषयींचीं

वर्णनें वाचलीं होती, ज्यांचे डोळेभरी दर्शन घडावें, असा निदिध्यास लागला होता, त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग येतांच उचंबळून आलेलें ऋजू मन इथें पानोपानीं, ओळी ओळींतून भेटेल. एका संस्कारसंपन्न, सश्रद्ध, भावाकुल महिलेच्या चित्तावर रामेश्वराच्या, मीनाक्षीच्या, व्यंकटेशाच्या दर्शनामुळें जे अमिट ठसे उमटले, ते मर्मस्पर्शी भाषेंत इथे शब्दांकित झालेले आढळतील. एक दर्शन घडतांक्षणीं त्यासारखेच पूर्वदृष्ट दृश्य अन्तःकरणाच्या पटावर रेखित व्हावें, त्या क्षणीं जसे अष्टसात्विक भाव मोहरले होते, तसेच ते याही वेळीं मोहरून यावेत, आणि मग त्या त्या दृश्यांची मानसपूजा मांडूं बसावें, असेंही कितीएक स्थळीं घडलें आहे.

मुख्य उल्लेख केला पाहिजे, तो सौ. केणेकरांच्या संस्कृतप्रचुर भाषेचा. इतरत्र कदाचित् ती हवीशी नकोशी झाली असती. पण इथें ही जी पार्थिव-पूजा करायला त्या उद्युक्त झाल्या आहेत, तींत तर जसें हिमालयांतून धावणारें अमर्याद गंगाजळ मातुश्रीच्या भल्या प्रचंड पात्रांत सामावून जाऊन गोमटें दिसावें, तशी हीच भाषा अत्यंत समर्पक भासते.

"झेंपावे दक्षिणेकडे" वाचीत असता वारंवार स्मरण होतें. पं. महादेव-शास्त्री जोश्यांच्या "तीर्थरूप महाराष्ट्रा" चें. हेच सौ. मुक्ता केणेकरांचें मोठें यश आहे.

इति

गोपाळ नीळकण्ठ दाण्डेकर

श्री वैकुंठ विरक्ताय
स्वामिपुष्करिणी तटे ।
रमया रममाणाय
वेङ्कटेशाय मङ्गलम् –

सौ. मुक्ता

# गोपुरांच्या वाटेवर-

संध्याकाळ झाकाळून आली होती. सूर्यदेव दुसऱ्या दुनियेच्या प्रवासाची बांधाबांध करून क्षितिजाच्या प्लॅटफॉर्मवर उभा होता. चार दोन ढग रंगीत पागोटी घालून निरोप देण्यासाठी अवती भवती रेंगाळत होते. नारळीच्या झावळ्या दारातूनच निरोप देणाऱ्या मर्यादशील गृहिणीप्रमाणे ' लवकर यायचं' जपून राहयचं 'चा अभिनय करीत होत्या. स्टेशनवरचा गोंधळ नि धांदल उभी करणारे पक्षी झाडाझाडावरून चिवचिवत होते.

त्या राहिलेल्या रंगीबेरंगी प्रकाशात आपल्या अंगची शिल्पलेणी घेऊन एक उंच उंच गोपूर साऱ्या दुनियेच्या उंचीना वेडावीत, त्या घरादारांच्या पसाऱ्यात उन्नत मस्तक उभं होतं. ते त्या दिवशी गोपुराचं मला घडलेलं प्रथम दर्शन.

धान्यानं टिच्चून भरलेल्या कणसासारखी चहुअंगी शिल्पांची दाटीवाटी ल्यायलेली अकरा मजल्याची नि समृद्धीच्या सुवर्णकलशांनी नटलेली ती प्रचंड इमारत त्यानंतर ठिकठिकाणी बघितली. मंदिराच्या वास्तुसुबत्तेची आणि वैभवाची कल्पना देणारा, विशालत्वाचा तो पहिला प्रतिहारी विसरला गेला नाही. कारण त्याच्या द्वारे जे बघायचं ते दिसू शकलं !

त्या गोपुरदर्शनासारखंच माझ्या पहिल्या वहिल्या प्रवासवर्णनाचं झालं आहे ' जीवन विकास ' या श्री रामकृष्ण आश्रमाच्या मासिक पत्रिकेनं त्याला पहिला प्रसिद्धीचा प्रकाश दिला आणि केवळ तिच्याच प्रोत्साहनाने मग हा इतका विस्तार जन्माला आला.

' जसं दिसलं, तसं लिहिलं ' असं नमूद करणं काहीसं धारिष्टयाचं होईल. ' जेवढं दिसलं, जेवढं उमगलं नि जसं लिहिता आलं, तसं ' लिहिलं आहे. त्यातल्या उणीवा आणि पुनरुक्ति आदींचे दोष माझ्यासाठी सुरक्षित ठेवूनही असं म्हणावसं वाटतं की, या लिहिण्याला तथाकथित साहित्यिक कस लावणे अभिप्रेत नाही. रुचकर पदार्थांचे सेवन झाल्यानंतरची सुरस तृप्ती वेड्या वाकड्या आवाजात ढेकर देत बोलते. तसं पाहिल्या फिरल्याच्या समाधानाची ही पहिली तृप्ती ज्यावेळी जे सुचलं, तसं सांगत बोलत गेली. क्षमतेच्या मर्यादांचं उल्लंघनही त्यामुळे घडलं की काय अशी काळजीही वाटली नाही.

काही ठिकाणं तर जीवाला अशी जडून गेली की, वेळी असं वाटायचं की वाटण्या-लिहिण्याचे हे कृत्रिम बंध दूर सारावेत, शब्दांचे, अभिव्यक्तींचे पाश झुगारून द्यावेत आणि या दृश्यापेक्षा थोडं मोठं व्हावं नि त्या साऱ्यांना कवेत घेऊन म्हणावं, हे सगळं माझं आहे. हे कोरलेले दगड, गोपुरांची ही सोनेरी उंची, हे निळे पर्वत, वाहणाऱ्या नद्यांचे हे क्षीण रुपेरी प्रवाह, कन्यातीर्थावर फुलणारी गुलाबी प्रभात नि सांजवात लावून जाणारी सिंधुरी संध्या, नित्य हिरवं प्रसवणारी ही विविध छटांची अन्नपूर्णा, नि हे सारं वैभव घेऊन सौभाग्य मण्डित असलेली ही आई भारती माझी आहे. इथली ही तांबडी माती नि शस्यश्यामल प्रस्तर माझे आहेत. मला यांची ओढ आहे आणि यानाही माझी माया आहे.

त्याच ओढीनं काही लिहिलं गेलं आहे. नव्हे ते लिहायला त्या मायेनं मला भाग पाडलं आहे. श्रद्धेय स्वामी शिवतत्वानंदानी जीवनविकासाची प्रेरणा मागे सतत उभी करून हे घडवून आणलं आहे. त्यांचे आणि ठायी ठायी मिळालेल्या थोरा मोठ्यांच्या आशीर्वादांचं ऋण मी कुठल्या शब्दात व्यक्त करू ?

श्री आप्पाजी ( गो. नी. दा. ) हे माझ्या संसारातलं आणखी एक श्रद्धेचं ठिकाण आणि हिण्डणं-फिरणं म्हणजे जीवन ही तर त्याची श्रद्धा. त्यानी त्यातल्या त्यात मला चार शब्द लिहिले हे त्याच्या अहैतुकी प्रेमाचंच लक्षण नव्हे का ? पण त्यांचे आभार मानणं म्हणजे त्यांचा रागच ओढवून घेणं आहे.

या सगळ्या 'झेपे' मागे आणखी एक महत्त्वाची प्रेरणा होती. तिच्या आधाराचं बोट धरून नजर एवढं सारं भिरभिरली. तो आधार तर जीवा-भावाचा. जीवन सौभाग्यवंत करणारा, तीर्थरूप भासणारा, पण कृतज्ञतेचेही शब्द गोठवणारा, साऱ्या औपचारिकते पलिकडचा. त्याचं केवळ श्रद्धापूर्वक स्मरण.

अखेर या पुस्तकासाठीं आणि त्याच्या आकर्षकतेसाठीं परिश्रमाची बाजी लावणारे श्री आण्णासाहेब गांगल आणि अन्य कलाकार व कारागिर यांचे कृतज्ञता पूर्वक आभार !

डोंबिवली दत्तजयंति शके १८९० सौ. मुक्ता केणेकर

१

# " स्वामीपुष्करिणीतटे "

मद्रास एक्सप्रेसने बोरीबंदर सोडले आणि नकळतच समाधानाचा निःश्वास मी टाकला. आमच्या संकल्पाला गिरीच्या व्यंकोबाची अनुमति मिळाली होती. आज आम्ही प्रवासाला निघालो होतो. इतक्या दिवसांच्या इच्छेला आता मूर्त-स्वरूप मिळणार होते. रोजची आठची घाई थोडे दिवस दृष्टीआड होणार होती. रोजच्या आखीव दिनक्रमांत अडकलेले मनाचे पाखरू स्वच्छंदाने भराऱ्या मारणार होते. नवीन प्रदेश पाहायला मिळणार होता. अनुभवात भर पडणार होती. नाविन्याचा आनंद लुटायला मिळणार होता. औत्सुक्य होते, हुरहुर होती आणि यात्रा सुफळ संपूर्ण होईल की नाही म्हणून थोडीशी भीतिही होती. ह्या विविध भावनांसहित आमचा प्रवास सुरू झाला होता.

दौडपर्यंत मराठी मुलुख अनेक वेळा डोळ्याखालून गेल्यामुळे बाहेर पाहण्याचे विशेष औत्सुक्य नव्हते. रात्र आली आणि तिने पापण्या अलगद बंद केल्या. जाग आली ती विशिष्ट ' काऽफी, काऽफी'च्या हेलानेच. मग कॉफी-इडलीचा समाचार घेऊन ताजेतवाने झालो. नजर बाहेरचा वेध घेऊ लागली. महाराष्ट्र सोडून आम्हाला अपरिचित अशा आंध्र प्रांतांतून गाडी धावत

होती. महाराष्ट्र काय किंवा आंध्र काय तिला सारखेच, नित्यनेमाचे. तिची तीच लय कायम होती. अनोळखी स्टेशने मागे पडत होती. लक्षपूर्वक ऐकले तरीहि भाषेचा अर्थबोध होत नव्हता. गाडी रणरणत्या उन्हातून तापत पळत होती. वाटेत तुंगभद्रेचे विशाल दर्शन झाले. सागराशी स्पर्धा करणारे तिचे हे भव्य रूप स्तिमित करणारे होते.

रेनिगुंटा जंक्शनने आमचा गाडीप्रवास पूर्ण झाल्याची सूचना दिली. काही दिवसांपुरती तिची आणि आमची संगत तुटणार होती. तिला रामराम करून आम्ही पुढच्या प्रवासाला सिद्ध झालो. आमचे सारे लक्ष व्यंकटाद्रीवर, वास्तव्य करीत असलेल्या व्यंकटरमणाकडे लागले होते. तो मनोमन सारखे बोलावीत होता. मन तर केव्हाच त्याच्या चरणाशी जाऊन पोहोचले होते. पण शरीराला मात्र प्रवासाचे दिव्य केल्याशिवाय त्याचे दर्शन घडणार नव्हते.

बसने तिरुपती स्टँडवर आलो, आणि 'तिरुपती ते तिरुमलै देवस्थानम्' च्या बसची वाट पाहात राहिलो. संध्याकाळचा अंधुक प्रकाश रेंगाळत होता. तिरुपतीच्या गोविंदराजस्वामी मंदिराची उंच गोपुरे माझ्याकडे कधी येणार म्हणून विचारत होती. दूरच्या पर्वतांवरील सर्पासारखी वळणे घेत जाणारी वाट तिच्या कडेला असलेले दिव्याचे खांब व विजेच्या रोषणाईने नटलेली गोपुरे लवकर या म्हणून घाई करत होती. बसनेहि मग फार वेळ तिष्ठत ठेवले नाही. लवकरच तिकीट, लगेज वगैरे सोपस्कार होऊन बस मार्गाला लागली. जाताना तिरुपती शहराचे थोडेफार दर्शन तिने घडवले. ओळीने लागलेली भांड्यांची ती मोठमोठी दुकाने पाहून स्त्रीस्वभावानुसार आपण काय खरेदी करायची त्याची छोटीशी यादी मी मनात तयार केली. थोड्याच वेळात तिरुपती शहर मागे पडले. नागरी जीवनाचे एकेक मानचिन्ह दृष्टीआड होत होते. बस निसर्गाच्या कुशीत शिरत होती. चांदोमामा आपुलकीची साथ देत होता, त्यामुळे निसर्गाचे चमत्कार बघायला मदत होत होती. वाटेतल्या चौदा मैलांच्या घाटातले पर्वतांचे भव्य नि रौद्र स्वरूप बघताना नेत्रांची त्रेधातिरपीट उडत होती. 'यू' (U) आकाराची वळणे कुठे घेऊन जात आहेत ते कळतच नव्हते. प्रतिक्षणी तिरुपती शहर खोलखोल जात होते, धूसर होत होते. आपण त्यापासून खूप लांब आणि उंच उंच जात आहोत याची जाणीव

होत होती. एकामागून एक शिखरे पार करताना स्वर्गांतहि असेच जावे लागत असेल काय अशी एक कल्पना मनात आली. पण दूरवर तिरुमालचे दिवे दिसू लागले आणि आपण पृथ्वीवरच आहोत याची सत्यता पटली. रात्री तिरुमालला पोहोचल्यानंतर प्रथम राहण्याची व्यवस्था केली. झालेल्या श्रमांनी आणि थंडीने नकळत निद्रेच्या कुशीत सोडले.

पहाटे उठवले व्यंकटरमणाच्या 'सुप्रभातम्' ने. घाई घाईने आम्ही बाहेर पडलो. पंचपंच उषःकाल होत होता. दिव्यांच्या संगतीत रात्रभर सुस्त पडलेल्या रस्त्यांना आता जाग येऊ लागली होती. तिरुपतीहून एखाददुसरी बस आल्याचा आवाज ऐकू येत होता. स्वामीपुष्करिणीच्या घाटावरून स्नान-मंत्राचा घोष वाढत होता. चहुबाजूच्या विद्यूत्योजनेमुळे विविध कोनांतून आगळेच तेज प्राप्त झालेल्या व्यंकटेशाच्या मंदिरावरील सुवर्णकलश मनाला काही वेगळाच आनंद देत होता. स्वामीपुष्करिणींत स्नान करण्यासाठी केव्हा-तरी स्वर्गातून आलेल्या देवकन्या आपले सुवर्णकलश एका रांगेत ठेवून स्वामी-दर्शनाच्या सोहळयात सहभागी झाल्या असाव्यात आणि जणु तेच कलश-कौतुक शिरी वागवून सुशोभित होणारी ती गोपुरे अद्यापहि त्याच धन्यतेत उभी असल्यासारखी वाटत होती, भाविकांना आवाहन करत होती. त्यांच्या त्या लोभस आवाहनाने आणि व्यंकटरमणाच्या दर्शनाच्या अनिवार लोभाने आमचीहि पावले वेग घेत होती.

मंदिराच्या काळयाशार पाषाणाच्या प्राकारात सडासमार्जन केले होते. अठ्ठावीसशे फूट उंचीवर असलेल्या या ठिकाणी एरव्हीहि भासणारी कडा-क्याची थंडी येथे अधिकच गार होत होती. एवढया गारठयातही स्वामी-पुष्करिणीवरून स्नान करून ओलेत्याने धर्मदर्शनास येणाऱ्या निष्ठावंतांची गर्दी वाढत होती. स्वामीचे गर्भागार अद्याप बंद होते. भक्तांचा तो कन-वाळू कृपाळू अजूनहि गुलाबी पहाटेच्या साखरझोपेत होता. त्याचे गुणानुवाद गाऊन त्याला हळुवारपणे जागृत करण्याचे प्रयत्न मंदिरपुरोहित करीत होते. त्यांच्या त्या 'सुप्रभातम् स्तोत्रम्'चे मंजुमधुर स्वर मंदिराच्या कानाकोपऱ्यांत प्रतिध्वनित होऊन वातावरणात वलयांकित नादब्रह्म निर्माण करीत होते. त्यांच्या उद्‌भोधनातील प्रेमळ आग्रही भाव श्रीचरणी निवेदन करीत होते की 'हे रामा, हे कृष्णा, हे श्रीहरी ऊठ. आता निद्रा पुरे झाली. पूर्वेकडे सिंदुरी

प्रभात पातली आहे. दिनमणीची प्रसादचिन्हे प्रकट होत आहेत. कृष्णांबर हलके हलके उजळत आहे. त्वदनुरक्तीचा अरुणिमा त्यावर उमटत आहे. तुझे चरण प्रक्षाळण्यासाठी आणि तुझे श्रीमुख निहाळण्यासाठी हा भक्तवृंद तुझ्या दारी केव्हाचा तिष्ठतो आहे. आता ऊठ. अधिक विलंब लावू नकोस.' पुरोहित जणु तिथल्या वस्तुस्थितीचेच वर्णन गात होते. प्राकाराच्या कुठल्या तरी कोपऱ्यात प्रभुदर्शनासाठी तिष्ठत असलेले माझे मन मंदस्वरात गुण-गुणत होते--

" सहस्रदीपें दीप कैसी प्रकाशली प्रभा । उजळल्या दशदिशा गगना आलीसे शोभा ।। काकडआरती माझ्या कृष्णा सभागिया । चराचर मोहरले तुझी मूर्ति पहाया ।। "

ह्या ओळींच्या अनुषंगाने माझे मन निघाले. माझी परवानगीही न घेता निघाले. आणि ज्याला दर्शनासाठी मुक्तद्वार होऊन रोकडा लाभ झाला त्या विष्णुदास नाम्याला हाती काकडा घेतलेला पाहण्यासाठी गेले. खरेच पढर-पूरला हे असेच असते. अशीच काळोखी प्रभात असते. दर्शनार्थी आणि भगवद्-भक्त यांच्या जयजयकार-कोलाहलाने अवघे राऊळ निनादून जाते. 'वासुदेऽव हरी'च्या गर्जना गरुडपाराला उराउरी भेटून परत येतात. " रंगमंडपी महा-द्वारी झालीसे दाटी । मन उतावेळ रुप पहावया दृष्टी ।।" असे होत असते. मग सुरू होतात नगाऱ्यांच्या घनगंभीर गर्जना. सनईच्या मंजुमधुर स्वर-मालिका लालित्य शोधत त्यातून फिरू लागतात. आणि अशा वेळी सुरू होते काकडआरती. साऱ्यांच्या मुखांतून पांडुरंगास उठण्याविषयीची आर्जवे बोलू लागतात एकाकार होऊन " उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला । वैष्णवांचा मेळा गरुडपारी दाटला ।।" ज्या आर्जवासाठी आणि ज्या भक्तिप्रेमाच्या पुरात अवगाहन करण्यासाठी पुंडलिकाला साक्षी ठेऊन श्रीहरी भीमातीरी तिष्ठत आहे त्याच प्रतिष्ठेने वैकुंठापासून विरक्त झालेला हा व्यंकटरमणदेखील असाच ह्या पुण्यपुष्करिणीतटी विसावला आहे. त्याला मंदिरपुरोहित साद घालत होते--" श्रीवेंकटाचलपते तव सुप्रभातम्." किती रमणीय साम्य होते ते. प्रांत भिन्न होता, भाषा, वर्ण संस्कार, रूढि, क्वचित् धारणादेखील भिन्न होत्या. तरीही त्या पुण्यसलिला चंद्रभागेचे भक्तिजल या स्वामीपुष्करणीत लहरत होते.

पुरोहितांचे 'सुप्रभातम्' संपत आले होते. 'व्यंकटेश मंगलाशासनम्'चे "श्रीवैकुण्ठविरक्ताय स्वामी पुष्करिणीतटे। रमया रममाणाय वेंकटेशाय मंगलम् ॥" चालू होते. वैकुंठाहून विरक्त होऊन इतक्या दूर आणि इतक्या उंचीवर आपले लीलाक्षेत्र विस्तारणाऱ्याला पाहण्यासाठी खूप लांबून आलेल्या आमची पावले अधीरपणे त्याच्या महाद्वाराकडें पडत होती. त्या औत्सुक्याच्या भरांत सोनपत्र्याने मढवलेले प्रचंड दरवाजे, भला थोरला उंबरठा आणि विस्तीर्ण प्राकार ओलांडून आम्ही त्या सुवर्णवेदीजवळ आणि सुवर्णस्तंभाजवळ केव्हा येऊन पोहचलो ते कळले देखील नाही. सुस्नात असलेल्या दर्शनोत्सुकांच्या रांगेत जेव्हा आम्ही उभे राहिलो तेव्हा वातावरणात कर्पुरगंध रेंगाळत होता. मोठमोठ्या दीपपात्रांतून जळत असलेल्या तुपाच्या वातींचा सुगंधही त्यात मिसळला होता. 'व्यंकटरमणा गोविंदा'च्या हलक्या जयध्वनीबरोबर आम्ही पुढे पुढे सरकत होतो. धडधडत्या आणि हुरहुरत्या हृदयाबरोबर डोळेहि दर्शनाच्या अपार लालसेने स्फुरत होते. पाय शरीराला घेऊन जाण्याची घाई करत होते. मन तर अद्यापहि अगोचर असलेल्या त्या व्यंकटनायकाच्या अपार सौंदर्य-राशिस्वरूपाला भेटभेटून परतत होते. सर्व इंद्रियाची धणी पुरवणारा तो सुमंगल क्षण आता अगदीच समीप आहे, असे समोर उभे ठाकलेले सुरेख सुगठित अंगाचे जयविजय सांगत होते. तांब्याच्या त्या भव्य मूर्ति मनोज्ञभाव धारण करून अगदी एकाच अवस्थेत गर्भद्वाराच्या दो बाजूस उभ्या होत्या. त्यांच्या दर्शनाने पुढे होणाऱ्या अपूर्व अशा दर्शनसौंदर्याचा किंचित् साक्षात्कार होत होता. आता मात्र उत्कंठा मासळीसारखी उसळी घेत होती. शिजपर्यंत तिला अवकाश होता. थंड होईपर्यंत थांबणे तिला सर्वथैव अशक्य होते.

तरीहीं एक घंटिकाद्वार पार करायचे राहिले होते. रांग हळूहळू पुढे सरकत होती. मोठमोठ्या विद्युद्दीपांचा झगझगाट आता दूर राहिला होता. एक सुंदर मुखमंडलाची, नेटकी शरीराकृति असलेली कास्यधातूची दीपलक्ष्मी हाती भला मोठा दीप घेऊन भगवद्दर्शनाचा आमचा मार्ग उजळत होती. घंटिकाद्वार उल्लंघून आत प्रविष्ट झालो; तशी व्यंकटेशाची नयनमनोहर छबि दृष्टीसमोर विलसू लागली. दर्शन घेऊन पुढे जाणाऱ्या भाविकांच्या हातावर पुजारी चरणतीर्थ घालत होता आणि दुसरा पुजारी व्यंकटेशचरण-पादुकांचे मुकुटाकारपात्र प्रत्येकाच्या मस्तकावर ठेवत होता. संपूर्ण दर्शनसुख

उपभोगलेला तो भाविक त्याच करबद्ध अवस्थेत पुन:पुन्हा मागे वळून पुढे सरकत होता. आम्हीही पुढे सरकत होतो. पाय पुढे सरकत असले तरी डोळे मात्र त्या मूर्तीवर खिळून राहिले होते. ज्याच्या रूप-सौंदर्य-गुणकीर्तीच्या दरवळाने येथपर्यंत खेचून आणले होते त्याच्या अलौकिक सौंदर्यराशि आम्ही डोळेभरून पाहत होतो. मस्तकी गोमेदादि नवरत्ने जडविलेला स्वर्णकिरीट धारण केलेले, मुखमंडलाच्या श्यामलतेवर नेत्रकमळे झाकाळून टाकणारे कर्पूरचंदन चर्चिलेले, श्रीवक्षावर श्रीदेवी आणि भूदेवी यांसमवेत भूषणभूत असे श्रीवत्सलांछन धारण केलेले, दो हाती रत्नजडित शंखचक्र घेतलेले आणि अंगावरचा तीळही न दिसेल एवढे मणिकांचनयुक्त अलंकार ल्यायलेले ध्यान पाहिले. सोन्याचे कवच असलेल्या अभयकरावर पद्म कोरलेले होते आणि गदेसाठी खाली आलेल्या हातावर अनेक कंकणांबरोबर सोन्याचे नागबंधन शोभायमान होत होते. सारे काही सोन्याचेच. सुवर्ण त्याच्या रूपसंपदेला लोभावून त्याच्याभोवती एक कांतियुक्त वलय निर्माण करत होते. विविध रंगाआकारांच्या पुष्पाची रचना त्या सुवर्णरागाशी जणू चढाओढच करत होती. आकर्षक रंगसंगती असलेली, जाड जाड दंडाची एक पुष्पमाळा त्याच्या मुकुटकलशावरून निघून स्कंधानजिकच्या शंखचक्रावर अंमळ विसावताना किंचित व्यंकट होऊन पुढे समचरणावरी समांतर रुळत होती. पण त्या कुठल्याहि लाडीगोडीला महत्त्व न देता त्याचे सातफुटी कृष्णप्रस्तराचे देखणे ध्यान सुवर्णकमलावर समचरणी उभे राहून दो बाजूंच्या (झगमगणाऱ्या) दीपप्रकाशात आपले आगळेच झळाळणारे सौंदर्य प्रस्फुटित करीत होते.

वस्तुत: दर्शन हा दृष्टीचा विषय असूनही सर्व इंद्रियांनाच जणु आनंदाचा मोहोर येत होता. 'रूपी गुंतलेले लोचन' तेथून यत्किंचितहि हालण्यास तयार नव्हते. हात मंत्रमुग्धासारखे आपोआप जुळले गेले होते आणि त्या दर्शन-सुखाच्या असह्य भाराखाली मधुवेदना सहन करत असलेले अंत:करण आठवत होते. ज्ञानदेवाने घेतलेले विठ्ठलाचे दर्शनसुख—"पांडुरंगकांती दिव्य तेज झळकति रत्नकीळ फांकती प्रभा ।। अगणित लावण्य तेज पुंजाळले । न वर्णवे तेथीची शोभा ।।" खरोखरच त्या तेजाच्या गाभ्याला एकटक बघणेहि अशक्य होत होते, तर त्याची शोभा कशी वर्णावी.

नेत्र गहिवरले. बाहु स्फुरण पावले. पायात आतुरता आली. मस्तक नम्र झाले. हातावर मिळालेले कर्पूरगंधित चरणतीर्थ ग्रहण केले, आणि परत त्याच करबद्ध अवस्थेत बाहेर आलो, एखाद्या संमोहनास्त्रांतून सुटून यावे तसे.

दर्शन झाल्यावर प्रदक्षिणा आलीच. केवळ वैकुंठएकादशीच्या दिवशी मुक्तद्वार असलेली प्रदक्षणा आम्हाला घालता येणे शक्य नव्हते. आम्ही विमानप्रदक्षिणेस सुरवात केली. एव्हाना रविराजाचा उदय झाला होता. त्याच्या किरणांनी त्या सुवर्णकलशाला काही वेगळीच शोभा आली होती. मंदिराचे ऐश्वर्य आमच्या आश्चर्याला आवाहन करीत होते. रोजचा नैवेद्य तयार करणारी पाकशाळा, जवळची निर्माल्य विसर्जन करतात ती विहीर पाहून आम्ही पुढे सरकलो. सोन्याचांदीने मढवलेली मयूर, हंस, अश्व, गजादि वाहने आणि अनेक पालख्या, शिबिका पाहून नजर दिपून गेली. जागोजाग अपार वैभवाची साक्ष मिळत होती. प्रदक्षिणा संपली आणि हुंडीपाशीं येऊन पोहोचलो.

उखळीच्या आकाराची किंचित मळकट कपडयाने लपेटलेली ही हुंडी म्हणजे एक वैशिष्टयपूर्ण दानपात्र आहे. अन्य तीर्थक्षेत्री असणारा पुरोहित-पंडयांचा त्रास इथे नसल्यामुळे भाविकाच्या तनमनधनाची क्षती येथे अजिबात होत नाही. भाविकाला देवापुढे समर्पण करावयाचे ते सारे ह्याच एकमेव हुंडीत. त्याचाहि आग्रह नाही. तरीहि पहारेकऱ्याच्या संगतीत असलेली ही हुंडी पै-पैशापासून सोन्याचांदीच्या अलंकारापर्यंत आलेले गुप्त दान साठवत असते. ह्या हुंडीविषयी एक कथा सांगितली जाते.

रामावतारात रावणाच्या अशोकवनात मायावी सीता होती. खरी सीता तर श्रीरामाच्या हृदयातच होती. शेवटी सारे मंगल झाल्यावर प्रभूंनी त्या प्रतिकृतीला विचारले, ' मी तुझे काय प्रिय करू ते सांग.' 'पुढल्या अवतारात आपणच माझे खरेखुरे प्रियकर व्हा' असे तिने मागितले. कलियुगी व्यंकटेश अवतारात तुझी कामना पूर्ण होईल असा भगवंतांनी आशीर्वाद दिला. संकेता-प्रमाणे तिने आकाशराजाच्या पोटी पद्मावती नावाने जन्म घेतला. रोम-रोमी पद्माशी साम्य असणाऱ्या ह्या पद्मावतीचा विवाह भगवान व्यंकटेशाशी होणार हेही ठरले. कृष्णाचे विवाहमंगल पाहायला मिळाले नाही म्हणून अतृप्त असलेल्या यशोदामाईने म्हणजे कलियुगीच्या बकुलावति नावाच्या

वृद्धेने मध्यस्थी करून ते सारें जुळवून आणले. लग्नाच्या दोन्ही बाजू तोलामोलाच्या हव्यातच. चौलसम्राट आकाशराजाने एकुलत्या एक कन्यादानाची थाटाची तयारी केली. भगवंताची लक्ष्मी तर रुसून गेलेली, तेव्हा ब्रह्मदेवाने कुबेराकडे मध्यस्थी करून त्याला धनको व्हायला सांगितले, आणि त्याची सव्याज फेड होण्यासाठी हुंडीचा अवलंब केला. भगवंताने भक्तांची मनोवांछिते पुरवायची आणि भक्ताने आपल्या ऐपतीप्रमाणे हुंडीत दान करून भगवंताचे ऋण फेडायचे ही जनसाधारण श्रद्धा आजपर्यंत त्या हुंडीमधून अपार द्रव्यसंचय करीत आहे.

त्यानंतर आमचे लक्ष वेधले रंगमंडपाने. नानाविध शिल्पांच्या दाटीवाटीने हा मंडप भरून गेला होता. येथे सगळे दरबारी सोपस्कार होतात. सोन्याच्या शिबिकेतून श्रीनिवासमूर्ति आणली जाते. तिच्यासमोर पुरोहित तिथिग्रहनक्षत्रादि पंचांग सांगतो. ' देवस्थानम् प्रबंधसमिती'चा प्रतिनिधी आयव्यय आणि इतर महत्त्वाचे तपशील निवेदन करतो. रंगमंडपासमोर सुवर्णवेदीच्या उजव्या अंगाला मोगल सेनानी राजा तोडरमल राण्यांसह हात जोडून उभा असलेला दिसला. त्याच्या अंगावरचा तो मोगली वेष आणि जोडलेले त्याचे हात त्या तांब्याच्या मूर्तितूनहि मौजेचे वाटत होते. सिंहद्वाराच्या आजूबाजूला पत्न्यांसहित कृष्णदेवराय, वेंकटपतिराय इत्यादींच्या मूर्ति शोभत होत्या.


देवाच्या द्वारी विसावण्यासाठी खाली बसलो. खालची सुशीतल फरसबंदी मोठी सुखद वाटत होती. सहज आजूबाजूला लक्ष गेले. दूरवर पसरलेल्या मोठ्या फरसबंदीच्या या प्रांगणात कुठेहि केरकचरा नव्हता. प्रमादाच्या निमित्ताने अन्नाची असंख्य भांडी इकडून तिकडे जात असतांना, प्रसाद वाटला जात असतांना स्वच्छता कायम होती. त्यासाठी ' देवस्थानम्'चा नोकरवर्ग ' सतत ओणवा होत होता.

जागेवरून नमस्कार करून सिंहद्वारातून बाहेर पडलो. आता स्वामीपुष्करिणीकडे जायचे होते. श्रीनिवासाच्या क्रीडेसाठी तिरुमालचे भूवैकुंठ करण्याकरिता गरुडाने खास ही पुष्पकरणी वैकुंठाहून आणली. जुन्या काळच्या पक्क्या बांधणीच्या ऐसपेस आकाराच्या कुंडात ही स्थिति आहे. अनेक पुण्यतीर्थांना घेऊन अनेक भाविकांचे पाप हरण करीत आहे. मध्यभागी एक छोटासा दगडी

मंडप आहे. उंच गोपुराच्या अकरा सुवर्णकलशांबरोबर त्याचेहि सुरम्य प्रतिबिंब पुष्करणीत पडते. मोठे सुरेख दिसते ते. वैकुंठ चतुर्दशीला 'स्वामी' पुष्करिणीकडे स्नानासाठी सोनपालखीतून येतात. तेव्हा पुष्करिणीचा उत्साह काठी लावलेल्या दीपशोभेतून उजळूं लागतो. स्वामी मंडपामधे विसावून जलक्रीडेसाठी शृंगारलेल्या नौकेतून जलविहार करतात तेव्हा दिव्याचे प्रतिबिंब हाती घेतलेली पुष्करिणीची प्रत्येक लहर आपल्या स्वामीला 'जयदेऽव जयऽदेव' करते. त्या छोटया मुक्कामातहि आम्हांला रमणीय दीपोत्सव पाहायल-मिळाला.

पुष्करिणीला उजवी घालून पश्चिम किनाऱ्याच्या कोपऱ्यातले श्रीवराह-स्वामीचे मंदिर पाहिले. खरे म्हणजे तिरुमालचे मूळचे मालक वराहस्वामी. व्यंकटेश्वर हे त्यांचे आश्रित. तेव्हा पहिला मान, पहिले दर्शन, पहिला नैवेद्य त्यांना, मग व्यंकटेशाला. वैकुंठापासून विरक्त होऊन, वैकुंठपीठाचा त्याग करून व्यंकटेश येथे का आले, वराहस्वामींजवळ त्यांना आश्रय का मागावा लागला ह्याचा एक मनोरंजक संदर्भ व्यंकटेश पुराणात मिळतो.

सत्ययुगांत भागीरथीच्या पवित्र तीरावर कश्यपादि ऋषींनी यज्ञ करायचे ठरवले. यज्ञाच्या अग्रपूजेपासून तो यज्ञफलापर्यंतचा मान कुणाला द्यावा म्हणून नारदाच्या कलागतीने प्रारंभींच त्यांच्यात मतभेद झाला. कुणी ब्रह्म-देवास, कुणी शंकरास तर कुणी वैकुंठपति श्रीहरीला श्रेष्ठ समजून त्याला हा मान द्यावा असे म्हणू लागले. अखेर त्या तिन्ही देवतांची श्रेष्ठता आज-मावण्यासाठी भृगुऋषींची नियुक्ति झाली. भृगुऋषि सत्यलोक कैलासाहून आंबटतोंड करून क्षीरसागरी आले. शेषशय्येवर लक्ष्मीकडून पदसंवाहन करून घेत असलेला विष्णु त्यांना दिसला. जगत्कल्याणाचे कर्तव्य त्यागून हा खुशाल पहुडला आहे असे पाहिल्यावर आधीच चिडलेल्या मुनींनी विष्णूच्या श्रीवत्स-वक्षावर लाथ मारली. क्रोधाविष्ट न होता श्रीविष्णूने उलट त्यांच्याच पायाला विशेष इजा तर झाली नाहीना असे म्हणून कळवळ्याने तो पाय दाबण्यास सुरवात केली. इकडे मुनींच्या तप्त हृदयावर शांतरसाच्या धारा वर्षल्या आणि त्यात विष्णुदेवतेच्या श्रेष्ठत्वाचे कोंभ स्फुरले. हे इथपर्यंत ठीक झाले होते. पण जिथे हा लत्ताप्रहार झाला ती जागा श्रीवत्सवक्ष म्हणजे साक्षात् लक्ष्मीचे निवासस्थान होती. तिला आपला अपमान सहन झाला नाही. उलट



श्रीपतीने आपल्या वर्मावर लाथ मारणाऱ्याचा अनुनयच केला म्हणून रागावून रुसून ती क्षीरसागर, वैकुंठपति, वैकुंठ या सर्वांचा त्याग करून करवीर क्षेत्री आली. तीच ही कोल्हापूरची अंबाबाई. झाले; श्रेष्ठत्व मिळाले पण श्री रुसून गेली. आता त्या श्रीविहीन परमेश्वराला वैकुंठ कटकवत झाले. आणि एके दिवशी वैकुंठविरक्त झालेला श्रीनिवास भूदेवीसहित तिरुमालचे राज्य करणाऱ्या वराहस्वामीजवळ आला. आश्रय मागितला. भूमिगत राहीन म्हणाला. वराहस्वामींनी अट घातली, लपून राहायचे असेल तर लपून रहा, पण पाहा हो एकदा प्रकट झालास तर मात्र येथून हालता येणार नाही. मग मात्र इथेच राहायला हवे, भक्तकामकल्पद्रुम होऊन दर्शनाला येणाऱ्या भक्तांच्या धणी पुरवायला हव्या. व्यंकटेशाने हे मानले. पुढे ब्रह्माशिवाच्या करणीमुळे त्याला प्रकट व्हावे लागले. आणि भक्तांचे आर्तहि पुरवावे लागले. वराह

मंदिराच्या मंडपातून दृगोचर होणारा व्यंकटेशाचा सुवर्णकलश ' माझा तो स्वामी आजहि तेच करीत आहे ' असेच जणु सांगत होता.

व्यंकटेशाचे हे निवासस्थान केवळ भाविकालाच नव्हे तर खऱ्या कलासक्तालाही तितक्याच आपुलकीने आकर्षित करते. सप्तशैलावर वसलेले हे तिरुमाल किंवा तिरुमलै म्हणजे हिलस्टेशनच आहे. इतक्या उंचीवर येऊनहि समोर दिसणारी उत्तुंग शिखरे, अधूनमधून दृष्टिगोचर होणारे श्वेतफेनिल जलप्रपात, हरिततृणाच्या सस्यशामलतेने बहरून गेलेले आसमंत ही सर्वच डोळ्यांना मोठे सुख देतात, अंत:करणाला उल्हासित करून प्रभुदर्शनाची उत्सुकता जागृत करतात. खऱ्या रसिकाने निसर्गाने इतस्ततः सुसज्जित केलेले हे हिरवे सौंदर्य डोळाभरी पाहावे. मन प्रसन्न करून इकडेतिकडे हिंडतफिरत त्याचा मनसोक्त उपभोग घ्यावा. ' आकाशगंगा पापविनाशनम् ' सारखी निसर्गसौंदर्याने विनटलेली स्वयंभू तीर्थे, आसपास असलेल्या प्रचंड वृक्षराजी शोभेत भर घालत आहेत. पुत्रप्राप्तीसाठी ह्याच आकाशगंगेजवळ अंजनीने तपश्चर्या केली. आकाशगंगेच्याच तीन घागरी पाण्याने रोज व्यंकटेशाचे स्नान होते.

तिरुमालला येऊन चार दिवस झाले होते. व्यंकटरमणाच्या छत्रछायेखाली काही अननुभूत अनुभवायला मिळत होते. त्यांत समाधान होते. तृप्ति होती, आनंद होता, .... पण तरी आम्हालां ते क्षणभंगुर होते. रजेचा एक एक दिवस कमी होत होता. नेहमीच्या व्यवहाराच्या चौकटीत बसावे लागणार होते. व्यंकटेशाचा, त्याने मांडलेल्या निसर्गप्रदर्शनाचा, ऐश्वर्याचा निरोप घ्यावाच लागणार होता.

आमची बस जेव्हा तिरुपतीला निघाली तेव्हा निरोप देण्यासाठी जरतारी पगड्या घातलेल्या वाडवडिलांसारखी सुवर्णशीर्ष गोपुरे उभी होती. उंच उंच नारळीच्या झावळ्या आपल्या अवखळ हालचालीनी आम्हाला निरोप देताना म्हणत होत्या ' पुनरागमनायच ! '

——

## २

# आकाशाशी जडलें नातें

अगदी कालच सूर्यकिरणांच्या उठावात दिपवून टाक णारी गोपुरं आणि शत सूर्याचा झळाळ आपल्या ठायी दाखवणारा स्वर्णकलश आज आम्ही निघताना पावसाच्या अमृतवर्षावात न्हाऊन निघत होता. काळचासावळ्या मेघांनी अवघी तिरुमलै कोंडून घातली होती. सगळीकडून पाऊस पाण्याच्या निर्मळ दुधाळ धारा खळाळत होत्या. आजूबाजूने वरून खालून पाणीच पाणी वहात होतं. रोजच्या प्रमाणे आकाशगंगेचं तीन घागरी पाणी आज व्यंकटेशाला नको होतं. जणू त्याला हवं होतं स्वर्गंगेच शुद्धोदक, वैकुंठीच शंखोदक, ब्रह्मलोकींचं गायत्री जल, कैलासीच्या दुग्धधवल धारा. आज त्याला एकट्याला अभिषेक नको होता. त्याच्या त्या आनंदनिलयातल्या सर्व साम्राज्य ऐश्वर्यासह तो आज यथेच्छ नहात होता. पर्जन्याच्या अविरत धारा 'मधुक्षिरंति बिंदव' ' च्या मंत्रोच्चारासह त्याला न्हाऊ घालीत होत्या. नजर वेधून घेणारं ते दृश्य पांढरे धुक्याचे ढग मधूनच आडोसा धरीत क्षणैक दृष्टिआड करीत होते. मनातला आनंद पाण्यासारखा उचंबळत फेसाळत होता. अशा त्या मधुर स्नान सुखात गुंतलेल्या सुमधुर श्रीहरीला नमस्कार केला. स्वर्णकलशाच्या

मुकुटांनी उन्नत शीर्ष झालेल्या गोपुरांना नमस्कार केला. 'पुनरा गमनायच' म्हणून अवखळ हालचालींनी सांगणाऱ्या ओलेत्या नारळीच्या झावळ्यांचा निरोप घेतला आणि निघालो.

बस तिरुमलै उतरू लागली. वळणामागे वळणं जाऊ लागली. बसच्या जाण्या येण्याच्या वळणावळणात सफाई होती. रस्ता प्रशस्त होता पण ढगांची दाटी होती. सगळं आसमंत दुधी काचेच्या आडून पाहिल्यागत अस्पष्ट होतं. सोईच्या वनचरांना आपल्या उबेत घेऊन वृक्षवल्ली दरडी दरडीवर निथळत होत्या. पर्वतांच्या उंच कडा, अवघड वळचणी मधून पाण्याचे लोट वहात होते. कधी मधी बसच्या माथ्यावरही त्या धारांचा मारा होत होता. पांढऱ्या शुभ्र दुधासारखे चमकत्या रजत स्त्रोताप्रमाणे वाहणाऱ्या त्या चहूबाजूच्या क्षीरधारा अवकाश मिळेल तशा एकाकार होत होत्या. त्यांचा बनलेला प्रचंड जलौघ रोरोंचा भयंकर आवाज करीत थेट खाली विस्तीर्ण दरीत वेगुमान झेप घेत होता. 'यथोदकं दुर्गे वृष्टि पर्वतेषु विधावति।' जलशरांच्या या युद्धात असल्या प्रचंड धवधव्यांचा आवाज युद्धाच्या नगाऱ्यासारखा वाटत होता. बसनं वळण घेतलं की पुढचा जेमतेम पंचवीस तीस फूट रस्ता दिसत होता. एरव्ही मुक्काम अदृश्य होता. वाट केवळ पावलापावलावर अद्‌भुत कोड्यासारखी उलगडत होती. सगळा प्रवास अगदी भयंकर नसला तरी अद्‌भूत होता.

बसनं एक वळण घेतलं आणि धुमधार पावसात बेबंद भिजत असलेली तिरुपति नगरी दिसायला लागली. प्रत्यक्ष वरुणानं जणू त्याच्या जलविहारासाठी पर्जन्यधारांनी विणलेलं, जलमौक्तिकांच्या झालरींनी सुशोभीत केलेलं छत्र धरलं होतं. तर इथे त्याच्या छायाछत्राखालीही त्याचीच कृपा धुमधार वर्षत होती. तिरुपति नगरी चिंब चिंब ओली निथळत होती. पाऊस एवढा होता पण कुठे व्यत्यय येईल असे काही नव्हतं पुढची बस पकडायची होती. आकाशराजाच्या घरी जायचं होतं. श्रीहरीच्या श्वशुरगृही जाऊन त्याची पराप्रेयसी बघायची होती. भगवती पद्मावतीचं दर्शन घ्यायचं होतं. त्याच्या चरणापासून निघालेले ते जलस्त्रोत मार्गाची शोभा वाढवीत होते. त्यांच्या साक्षीनं श्रीहरीला नमस्कार केला नि म्हटलं.

"आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेव नमस्कारं केशवं प्रतिगच्छति ।।"

बस तिरुच्चान्रकडे धावत होती. पावसाची झड जरा मंदावली होती. तिरुपति शहरापासून पाच एक मैलावर हे ठिकाण आहे. पूर्वीची चौलसम्राट आकाशराजाची ही राजधानी. आता जेमतेम हजारपाचशे घरांची वस्ती होऊन राहिली आहे. पद्मावतीच्या मंदिराचं गोपूर दुरून दिसतं. जवळ जवळ जावं तसं गावाच्या पार्श्वभूमीवर ते अधिकच खुलून दिसतं. मंदिर पूर्वाभिमुख आणि तिरुपतिला पाठमोरं असं आहे.

मंदिराला लागून मागच्या बाजूला सुरेखशी पुष्करिणी बांधून काढली आहे. तिला नाव आहे पद्मसरोवर. अद्यापही कमळाच्या श्वेत पुष्पांची वस्ती आहे त्यात. त्यांच्याच कुण्या भाग्यवती पद्मिनीच्या पोटी एका सुरेख पद्मकळीचा जन्म झाला. संतानोत्सुक आकाशराजाच्या घरी त्या कळीचा विकास झाला. पद्मावती या नावानं ती त्या लौकिक पित्याच्या घरी वाढली. याच गावाच्या माती पाण्याशी फुलाझाडांशी खेळत एक दिवस इथेच बोहोल्यावर चढली. आणि देवदेवतांच्या साक्षीनं त्या परब्रह्म परमेश्वराच्या गळ्यात वरमाला घालून कृतार्थ झाली. चौल सम्राटानं थाटानं कन्यादान केलं. तर वरपक्षानं समृद्धीचे सात पर्वत उभे करून वधूचं स्वागत केलं. वरातीनंतर लक्ष्मीनं लक्ष्मीपूजन करण्याचा गमतीचा सोहळाही कदाचित् झाला असेल.

लग्न झालं. सगळे थाट झाले. पण संसार मांडायला अवकाश कुठे ? तिकडे कुबेराच्या ऋणाचा तगादा सुरू झाला आणि ते फेडण्यासाठी वैष्णव-वीरांच्या रांगा लागल्या. त्यात वेंकटेश्वर संपूर्ण वेढून गेला. आणि वधूवरा-मधे पाच मैल लांब अन् तीन हजार फूट उंचीचं अंतर निर्माण झालं. ते आजही तसंच आहे. तो तसाच त्या गर्दीत गुंतलेला भक्तासाठी उभाच्या उभा आहे आणि ही त्याची भुवनेश्वरी पितृगृही त्याची वाट बघत आज वर्षानु-वर्षे तिष्ठत बसली आहे. तिचंच दर्शन आता घ्यायचं होतं.

पद्मतीर्थाला उजवी घालून मंदिराकडे वळलो तर साऱ्या वाटा जत्रेतल्या दुकानांनी गच्च भरल्या होत्या. विविध रंगांच्या कुंकवाचीं दुकानं, विशेष नजरेंत भरत होती. खणानारळांची दुकानं, फुलाहारांची दुकानं खेळण्यांची आणि प्रसादांची एक का अनेक. संमेलनच ते. आम्ही आवश्यक ती पूजा सामुग्री घेतली आणि गोपुरद्वारातून आंत शिरलो.

चहू अंगच्या विस्तीर्ण औरस चौरस कोटाच्या प्रांगणात इतर तीन छोट्याशा मंदिराबरोबर पद्मावतीचं मंदिर होतं. छोटासाच पण टुमदार

मंडप त्याच्यापुढे होता. गर्भद्वाराच्या समोर ऐन मंडपात सुवर्णमंडित वेदी आणि छतातून वर गेलेला सुवर्णमंडित गरुडखांब होता.

आम्ही गेलो त्या दिवशी त्या गरुड खांबावर जरतारी हळद पिवळा ध्वज पुष्पमालिकेसह फडफडत होता. ती तिथे होणाऱ्या उत्सवाची निशाणी होती. भगवतीच्या मंडपाशेजारी उत्सवमंडप सजला होता. वेगवेगळ्या देवतांचे आणि द्वाररक्षकांचे पुतळे खांबोखांबी उभे केले होते. पांढरे चांदवे नक्षत्र-वेलीच्या नक्षीसह ताणले गेले होते. आंब्याच्या टहाळ्या, नारळी सुपारीच्या झावळ्या आणि केळकमळीच्या कळ्यांना घेऊन केळ्यांचे लोंगर लोंबवीत लेकुरवाळ्या केळी हिरवी शोभा मिरवीत होत्या. अशी सारी गोड गडबड अगदी अनायसे बघायला मिळत होती.

आम्ही दर्शनाच्या रांगेत उभे होतो. देवीचे गर्भागार बंद होते. रांगांच्या मागच्या बाजूच्या छोट्या मंडपात स्नानाची सिद्धता चालली होती. रुंद ऐसपैस चौरंग मांडला होता. भोवती चांदीचे सजल कलश नागवेलीची, आंब्याची पानं आणि श्रीफळ ठेवून हारींनी मांडली होती. चांदीच्या घंघाळा-तून उनपाण्याच्या वाफा निघत होत्या. सौभाग्य द्रव्यांनी ताटं भरली होती. माळा गजऱ्यांनी दुरड्या गच्च भरल्या होत्या. मन पुढचा सोहळा बघायला अधासल्यागत झालं. होत. झालं. वाजत्री सुरू झाली. मृदंगाच्या कडकडाटावर नागस्वर बोलू लागला. आणि दहापाच ब्रह्मवृंदाच्या वेदवाणीबरोबर महा लक्ष्मीची उत्सवमूर्ति त्या चौरंगावर विराजमान झाली

पद्मावतीचा कल्याणमहोत्सव चालू झाला होता. त्यावेळचा तो दिव्य प्रसंग न दिसल्यामुळे बेचैन झालेली आम्ही माणस आमच्या कल्पनेप्रमाणे पद्मावतीच्या उत्सवमूर्तिवर संस्कार करून लग्नाचा सोहळा परत नजरेपुढे आणण्याचा यत्न करीत होतो. अशा त्या कल्याणउत्सवाचा पहिला दिवस होता. भगवती आज फिरून एकदा चिरंजीव सौभाग्य कांक्षिणीच्या थाटांत नहाण्यासाठी म्हणून आमच्या समोरच्या चांदीच्या चौरंगावर विराजमान झाली. आज तिला हळद लागायची होती. गळ्यात अगदी एकच एक दागिना. मळकट हळदीचं आडवस्त्र लेवून ती बसली. वेदघोष चालू होते. प्रतिकात्मक सोहळे सुरू झाले. देवीला सुगंधी तेलात माखलं. नंतर तिचा स्नानसोहळा वेदमंत्राच्या ऋचामधून आणि नागस्वराच्या मधुर लयीत सुरू झाला. शुद्धो-

दक झाले. अंगमर्दन झाले. आगरूचंदनचूर्णाचे उटणे झाले. मग औक्षण. त्याच ओलेत्या अवस्थेत दुग्धकदळीफळाचा अल्पोपहार झाला. वाटलेली हळद देवीच्या अंगाला लावली–तोंडाला लावली. आणि फिरून स्नान सुरू झाले.

सप्तगंगाचे कलश एकामागून एक देवीच्या मुकुटावर स्कंधावर सर्वांगावर रिते होऊं लागले. गंगेच यमुनेचैव गोदावरी सरस्वती । नर्मदा सिंधु कावेरी या सगळया लोकमाता कलशा कलशातून प्रकट झाल्या. मग पचामृताचे स्नान



दुधाचे घट, दह्याचे घट, धृताचे घट, मधाचे घट आणि संपूर्ण घटभर ओतलेली शर्करा आतून देवीला न्हाऊ घालताहेत. कधी हिमशीखरासारखी तर कधी सह्यपर्वतासारखी तिची आकृति दिसतेय. बघता बघता मन कौतुकानं भरून येतंय.

पंचामृतानं माखलेलं देवीचं शरीर, तिचं इवलंस मुखमण्डल अतृप्त नेत्री साठवून घ्यावसं वाटलं. तिच्या त्या दर्शनाला देखिल विघुरल्या पारदर्शक घृताचा मुलायम स्नेहस्पर्श आहे. पंचामृताचा स्वाद आहे. आगरुचंदनाचा गंध आहे. ओल्या हरिद्रेचा रंग आहे आणि नागस्वरातली हृदय हलवणारी मीड आहे असं वाटलं !

मग उष्णोदकाची घंगाळी पुढे सरसावली. रुप्याचे तांबे ते कर्पूरगंधित ऊन-पाणी देवीच्या अंगावर सांडू लागली. पंचामृतात भिजलेली देवीची मुद्रा परत पूर्वस्वरूपी यायला लागली. देवी परत स्वच्छ झाली तरी त्या आडवस्त्रात मधूनच दहीदूध साचून राहिलं आहे. नुकतीच हिमवर्षा होऊन गेलेल्या शिखरा-सारखी दिसते आहे ती. पुरोहितांनी आणखी एक कौतुक केलं. हत्तीच्या सोंडे-सारखी आणि गंडस्थळाच्या आकाराची चांदीची अर्घ्यपात्रे आणली. आणि त्यातून चोहोबाजूंनी ते गरम पाणी तिच्या मस्तकावर सोडलं. जणू चार बाजूचे चार श्वेत गज आपल्या सोंडेत पाणी आणून महालक्ष्मीच्या मुकुटावर सोडताहेत. अपूर्व केवळ अपूर्व देखावा. एकूण पूजा ' षोडशोपचारे ' असते हे मी बघितलं आहे. परंतु इथे स्नानाचेच सोळा प्रकार झाले की ! नंतर सहस्त्रछिद्रांचं एक चाळणीवजा पात्र आणून तिच्या मस्तकावर धरलं सर्वांनी उच्च स्वरात वेद घोष करीत त्या पात्रात पाणी ओतायला सुरवात केली. आणि खाली महालक्ष्मीला सहस्रधारांचा अभिषेक होऊ लागला. पाण्याच्या नाजूक कलावतू धारा चोहोकडून देवीवर सांडू लागल्या.

तिरूपतिहून निघताना भूदेवी कशी नाहात होती त्याचं स्मरण झालं. इथे त्याच वातावरणात चांदीच्या चौरंगावर वसलेली श्रीदेवी देखील तशीच शतशत धारांनी न्हाऊन निघत होती. कितीतरी वेळ त्या सहस्रधारा तिच्यावर सांडत राहिल्या. मी आनंदातिशयानं डोळे मिटले.

माझ्या चित्चक्षुपुढे मृण्मयी भूदेवी दुधात न्हाऊ लागली. ग्रीष्माच्या कडक उन्हाचं पिवळं पारव नेसून ती वर्षेच्या वर्षावात बागडते आहे. अंगाखांद्यावरून अमृताचे ओघळ वाहताहेत. तापलेल्या मृत्तिकेच उटणं केलय. मृद्‌गंधाची धुंदी उभी करून त्याच्या आड ती नाहते आहे. नहाणं आटोपून चोहोबाजूच्या सुस्नात सौंदर्याची प्रतिबिंब दाखवणाऱ्या पाण-आरश्यांच्या न्हाणी घरातून निथळत ठिबकत ती श्वेतमेघमालिकांनी सजलेल्या निळ्या गगनाच्या महाली प्रवेश करते. तिथे तिच्यासाठी शरदानं हरित तृणाचं मऊ मखमली महावस्त्र ठेवलं आहे. ते ती उलगडते. अंगावर चांदण्याची खडी, किनारीला चकोर-तलगांची वेलबुट्टी आणि पदराला दीपावलीच्या दीपज्योतीच्या पीतअरुण रंगाच्या झगमगत्या कुयऱ्या अशी शारदीयेची ती चंद्रकळा तिच्या प्रसन्नतेन डवरल्या तनूवर खुलून दिसते.

शरदाच्या प्रसादचंद्रम्याची झाली आहे मस्तकावर टपोरी बिंदी. अशी सुरेख साजसज्जा, असं रसरसतं सौंदर्य ती हेमंताच्या आरश्यात न्याहाळत आहे. शिशिराच्या सुशोभित समृद्धीनं ती आपली अंगभूषणं ल्यायली आहे. आता तिचं न्हाणं लेणं संपलं आहे. तेवढ्यात आम्रपुष्पांची मंजिरी घेऊन नव-कमलदळांच्या पाकळ्या घेऊन, नवनिर्मितीचे तुरेदार गुच्छ घेऊन, नवोन्मेषाची कोवळी अरुणिमा देवीच्या सौभाग्यशृंगारासाठी घेऊन ऋतुराज वसंत धावत येतो आहे. त्याच्या हाती ग्रीष्माचं सुगंधी धूपदान आहे. अनेकानेक नाजुक उपायनं, विलेपनं तो देवीला समर्पण करतो आहे. अशोक पुष्पांचा रंग पावलं रंगवण्यासाठी त्यानं काढून आणला आहे. मदनाच्या सप्तशरातून सप्तरंगी पुष्पांच्या माळा त्यानं देवीसाठी आणल्या आहेत. अंगरागाच्या सुगंधी शिडकाव्या-साठी श्रीनगरीच्या केशराचा फुलोरा आणला आहे तर लता पल्लवांच्या साजासाठी मलयाचलावरून ललितलवंगलताही आणल्या आहेत. अशी सारी सोनकळा सवे घेऊन वसंत जणू कोकिलपंचमात विविध द्विजराजांच्या श्रुति-मधुर स्वरात अलिकुलांचा षड्ज घोळवित तिचं रंजन करतो आहे !

बाहेरची गजबज शांत झाल्यामुळे माझं ते स्वप्न तुटलं. बघितलं तर पद्मा-वती भोवती पडदे लागले होते. आणि तिच्या अंगावरून उतरलेली हळद चंदन प्रसाद म्हणून वाटली जात आहे. मी चटकन् हात पुढे करून माझा वाटा घेतला. रांग पुढे चालू लागली मंदिराची दारं उघडी होऊन दर्शनाची वाट मोकळी झाली होती. सुदैवानं गर्दी थोडी होती. थोड्याच वेळात आम्ही तिच्या पुढ्यात जाऊन उभे राहिलो. कमी आधिक प्रमाणात तिचा तोच थाट होता. जो तिच्या स्वामींनी स्वामीपुष्करिणीच्या तीरावर आम्हाला दाखवला होता.

गुलाबी शालू नेसून सुवर्णकमलावर ती बसली होती. अंगात किनरवापी भर्जरी कंचुकी ल्यायली होती. अंगा खांद्यावर हातात आणि दंडावर भरगच्च मणिरत्नाची आभूषणं तर गळ्यात कित्येक सोनपुतळ्याची माळ तिनं घातली होती. काळ्या तुकतुकीत मुखमंडलावर मुकुटाच्या महिरपीखाली कुंकवाचा मळवट शोभत होता. भृकुटीची धनुकली चमकदार हिऱ्यांत नटवली होती. दोन्ही नासिकापुटांत नवरत्नांचे जडाव होते. रत्नजडीत उभट मुकुटाचे

मकरकलश उभय स्कंधी विसावले होते. वरच्या दोन हातात सुवर्ण कलिका होत्या. पुढच्या दोन हातांपैकी डावा हात वरदमुद्रा दाखवत होता तर उजवा व्यकंटेशाप्रमाणेच पादपद्मांकडे संकेत करत होता. जणू सांगत होता,

"सुख दु:खा सम लेखूनि हे पद नित आठवी ।
हृदयांतरी आतुर हो या चरणा साठवी ।। "

असं सोन्यामोत्यानं लहडलेलं पुष्पभारानं सजलेलं पद्मावतीचं कृष्णसौंदर्य बघून घेतलं. सोन्याच्या कमानदार प्रभावळीत नीलमालयम्च्या सुरंगी वळणात हे स्वरूप भारीच उठून दिसतं. तिचं दर्शन घेतलं, चरणामृत ग्रहण केलं. तिने दिलेली कदंब मालिका केसांत माळली. डोळे परत तिची मूर्ति न्याहाळू लागले. प्रपत्तिकारांनी तिचं वर्णन 'तीत जगत्त्रयाची स्वामिनी आहे. व्यंकटपतीची ती पराप्रेयसी आहे. त्यांच्या वक्षस्थलावर तिचा नित्य निवास आहे आणि त्यांना रमविणारी ती त्यांची प्रियारसिका आहे असं म्हणून नमस्कार करून म्हटलं आहे,

"पद्मालंकृत पाणि पल्लवयुगां पद्मासनास्थां श्रियं ।
वात्सल्यादि गुणोज्वलां भगवतीं वंदे जगन्मातरम् ।।"

जगन्मातेच्या या आटोपशीर मंदिरातच पूर्वी व्यंकटेशाचाही निवास होता. सप्तशैलावरचं ते ठिकाण त्यावेळी भारीच दुस्तर होतं. तसं व्यंकटेशाचं आनंदनिलय हे निवासस्थान इ. स. पूर्वी राजा तोंडमानानं बांधलं म्हणतात. पण इ. स. ८२६ मध्ये पद्मावतीचं हे मंदिर बांधल्यापासून श्रीनिवासमूर्तिची इथेच पूजाअर्चा होऊ लागली. नंतर सुमारे इ. स. ९६० मध्ये आळवंदार भक्तांनी तो श्रीविग्रह उचलून तिरुमालैवर मूळस्थानी नेला. आणि पुढे रामानुज परंपरांनी पूजाविधी आणि उत्सवादि संस्कारांनी त्याची सेवा चालवली.

पण व्यंकटेश तिकडे गेले आणि त्याबरोबर सगळा थाट, सगळी शोभा, सारी श्री त्यांच्याबरोबरच गेली. या विरहिणीजवळ आता आहे फक्त चुन्याच्या रंगात रंगलेला प्रचंड परकोट. आणि जेमतेम अंगापुरते लेणे नेसणे. पण तरीही आकाशाशी जडलेल्या नात्यांचे आहेवभाव मुखी दाखवित ती इथे विलसत आहे. तिनं या क्षेत्राला भारीच महत्त्व आणलं आहे. भगवान शुक महामुनींनी इथंच तिच्या पायाशी बसून तप केलं म्हणतात.


तिचा प्रसाद घेऊन तिरुच्यानूर सोडलं. अधिक रहावं असं मनात असूनही सोडावं लागलं. आकाशातलं सरसर शिरवं जाऊन आता लख्ख ऊन पडलं होतं.

आता बघायचे ते गोविंदराज ! विमानासहित दहा मजल्यांचे आणि अकरा कलशांचे ते भव्य गोपूर ओलांडून आत शिरलो तो मंदिराचा विस्तिर्णपणा लक्षांत आला. तीन कोटांच्या आत निजमंदिर होते. मधल्या प्रांगणात अवतीभवती श्रीकृष्णाचं रामानुजांचं, तिरुमलनंबी, वेदान्तदेशिक, आणि मनवाल महामुनि आदि भक्तश्रेष्ठांची मंदिरं आहेत. हे सगळं मंदिर श्रीमत्स्वामी रामानुजांनी बांधलं. रामानुजाचं प्रभावी व्यक्तिमत्व त्यावेळी ही मंदिरच काय पण बलाढ्य राजसत्तासुद्धां नियंत्रित ठेवत होतं. सबंध तिरुपति नगरीचे ते एकेकाळी अनभिषिक सम्राट होते. सबंध नगर त्याच्या व्यवस्थेखाली होतं म्हणतात.

ज्यावेळी शैव वैष्णवातून अग्नि जात नव्हता अशावेळी हा वैष्णव वीर उदयाला आला. तिरुमलै मंदिराभोवतीचं शंका कुशंकांचं सारं जळमट त्यानं झाडून टाकलं आणि ते वैष्णव संस्थान म्हणून निश्चित केलं. तिथल्या ठिकाणांची डागडुजी केली. आनंदनिलय हा कळस नीट केला. काही भाग नव्यानं बांधला. भगवंताला कर्पूराचा उर्ध्वत्रिपुंड्र सुरू केला. त्याच्या गळ्यामधे पद्मावतीची मूर्ति असलेला हार घालण्याची प्रथा सुरू केली आणि सारे सोपस्कार वैखानस आगमाच्या व्यवस्थेनुसार करून दिले. आजही ते तेव्हापासून असेच चालू आहेत.

यावेळी युद्धांत आलेल्या पराजयामुळे चिदंबरम्चा शैव चौल राजा नगरीत असलेल्या गोविंदराजमूर्तिला समुद्रात फेकून द्यायला निघाला. रामानुजांनी त्याला रोखल आणि गोविंदराजांची ती विशाल प्रतिमा चिदंबरमूहून ते तिरुपतिस घेऊन आले. पुढे यादवराजांनी त्यांच्या आज्ञेप्रमाणे आणि दिग्दर्शनाप्रमाणे तिच्यासाठी विशाल मंदीर बांधलं. रामानुजांनी त्यात स्वहस्ते गोविंदराजांची प्राणप्रतिष्ठा केली. आणि आपण तेथे सेवा पूजा करीत राहिले. अद्यापही रामानुज सांप्रदायाच्या आठ धर्मपीठामधे तिरुपति हे धर्मपीठ प्रमुख आहे. तेच हे गोविंदराज पेरूमाळ मंदिर.

मंदिराच्या आत अंडाललक्ष्मीमंदिरासमवेत शयनरत श्रीहरीचं निजमंदिर आहे. आम्ही आत प्रवेश केला तो शेषशायी भगवंताची ती भव्य मूर्ति दृष्टीस पडली. शेषाच्या छत्राखाली श्रीहरी गाढ झोपले आहेत असलं ते दृश्य मोठं मनोज्ञ वाटलं. नाभिकमलातून ब्रह्मकमल वर आलं आहे तर पदकमलाशी सलगी करीत कमलजा कमला बसली आहे. सोबत भूदेवी आणि इतर मुनीश्रेष्ठ करबद्ध अवस्थेत बसून आहेत. श्रीहरीनं पिवळा पितांबर कसला आहे. मस्तकीच्या भव्य मुकुटाखाली प्रशस्त भालपट्टावर रामानंदी त्रिपुंड्रात केशराची उर्ध्वरेखा शोभून राहिली आहे. नेत्र योगमुद्रा दाखवीत झाकाळले आहेत. दागदागिन्यांचं भरगच्च ऐश्वर्य आणि ताज्या फुलमाळांचा सुरेख पुष्पराग तसाच अंगावर ठेवून तो निद्रिस्त आहे. उशाखाली एक हिरण्यमय



पात्र आहे. त्या खाली कुठलं सत्य दडवलं आहे हे बघायचं तर व्यंकटेशाला किंवा त्याला लग्नापायी ऋणको करणाऱ्या कुबेरालाच विचारावं लागेल. व्यंकटेशाच्या लग्नासाठी एवढी धनसंपत्ति कुबेरानं आणली की त्याची मोजदाद करण्याचं अवघड काम गोविंदराजांनाच म्हणून केवळ दिलं गेलं. त्यांनी ते सगळं धन मापानं मोजायला सुरवात केली. पण मोजून मोजून किती मोजणार ते ! शेवटी ते थकले, दमले आणि तसेच ते पात्र उशाशी घेऊन ते जरा आडवे झाले ते आजपर्यंत.

मी मनातच त्याचा जयजयकार करीत दर्शन घेतलं. हो उगाच झोप मोडायची त्यांची. मग त्यांच्या अंडालप्रियेच्या मंदिरात दाखल झालो. ती मात्र दर्शनार्थींना भेटण्यासाठी दक्षतेनं उभी होती. सगळे यथोचित शृंगार लेणी

लेवून ती उभी होती. छोटयाश्या मुकुटामागून तिची तिपेडी वेणी सुवर्णफुले माळून छानदार गोंडें लोबंवीत खांद्यावरून पुढे रूळत होती. एका हाती वरद मुद्रेंच वायन आहे तर दुसरा किंचित डाव्या अंगी झुकलेल्या दक्षिण अंगाशी सहजसंवाद करीत आहे. अशा त्या श्रीरंगप्रेयसीला, दक्षपत्नीला मनोभावे नमस्कार करून गोविंदराज पेरूमाळ मागे टाकले.

इथं तशी अनेक मंदिरं आहेत. तिरुमलैच्या वाटेवर पांडुरंगाचंही मंदिर आहे. पण अगदी छोटं. भाविकांच्या सूक्ष्म दृष्टीतूनही निसटणारं असं आहे. मग भेटलो कोदंडराजस्वामींना. आर्यावार्तातून सुहृदांचा आणि राजसिंहासनाचा त्याग करून इतक्या दुरवर येऊन दक्षिण पंथातले सारे धर्ममार्ग निष्कंटक करण्यासाठी ज्यांनी आपल्या प्रिय पत्नीचीही बाजी लावली त्या रघुकुल भूषणाची आठवण द्रविड संस्कृति कशी विसरेल ? तिरुपतितही त्या रघूपतिचे अति सुंदर मंदिर आहे. कोदंडधारी रामस्वामी, बंधु लक्ष्मण आणि वामांगी जनकलली वैदेही घेऊन कृष्णप्रस्तरातल्या भव्य श्रीविग्रहात दर्शन देत आहेत. या मूर्ति त्यांच्या अंतरंग भक्ताने म्हणजे जांबूवंताने स्थापन केल्या आहेत म्हणे. म्हणूनही हे आगळेच कौतुक. मंदिर छोटेसेच पण सुघड आहे. पुढे खूप मोठसं अंगण आहे. स्वच्छ फरसबंदीच. उजव्या अंगाला ' तोमाळसेवेसाठी ' एक छोटीशी पुष्पवाटिका लावली आहे. मधे छोटी पुष्करिणीही आहे. रामस्वामींच्या पायाजवळच्या त्या सुशीतळ प्रांगणात बसलं की समोर दिसते ती तिरुमलैपदयात्रेची नागमोडी वाट. उंच ठिकाणी बांधलेलं पहिलं गोपुर बघून माणूस चटकन् तिकडे बोट दाखवतो, पण रात्री हीच वाट जेव्हा दीपनलिकांना संगे घेऊन चढत जाते, तेव्हा तिचं सर्पाकार वळण आणि वरचं दीपज्योतिंनी सजवलेलं गोपुर बघून भाविक म्हणतो, "खरच व्यंकोबा शेपाचलावर रहातो. "

त्या सीतापति रामभद्राला नमस्कार करून पुढे झालो. तिरुपतित देवस्थानानं बांधलेल्या अनेक शैक्षणिक इमारती, हॉस्पीटल्स्, इत्यादिच्या भव्य रचना बघितल्या ' व्यंकटेश्वर ओरिअेन्टल रिसर्च ' ' प्रायमरी स्कूल ' अनाथालय ' व्यंकटेश्वर कॉलेज ' ' मेडिकल कॉलेज ' ' आयुर्वेदिक महाविद्यालय ' 'संस्कृत महाविद्यालय' 'वस्तुसंग्रहालय' इत्यादि अनेक व्याप बघितले. व्यंकटेशाला कधी काळी अर्पण केलेल्या श्रद्धावंताच्या फुलपाकळ्याचा हा केवढा मोठा

वगिचा झाला आहे असं वाटलं. समुद्रातून कधी काळी घेतलेलं पाणी आता जसं केवढयातरी वैभवानं वर्षाव करत आहे तसच हे सारं तिरुपतीचं आणि त्या व्यंकटेश्वर स्वामीचं आहे.

परत मुक्कामाकडे येताना कपिलतीर्थ लागलं. एरव्हीही खूप उंचावरून ही मोठी धार खाली उडी घेत असते. अन् तेव्हा तर पाणकळपाचाच भर होता. खूप खूप वरून त्याची रुपेरी धार खाली कोसळत होती. महाभयंकर आवाज होत होता. कडेकडेला जिथे धारेची तीव्रता कमी होती तिथे पर्वतात रोवलेल्या साखळ्यांना धरून भाविक स्नान करीत होते. त्यांना न्हाऊ घालून पाणी पुढच्या कुंडात सरकत होतं आणि नंतर गुप्ततेनं अन्यत्र मार्गी लागत होतं. आजूबाजूचा प्राकार व्यवस्थित बांधलेला होता. कपिलेश्वर महादेवाचं मंदिर काणवरच होतं. हेच एकुलतं एक शिवमंदिर संबंध तिरुपतिमधलं. चहूबाजूंनी सुदर्शनचक्राच्या खुणा बसवल्या आहेत. त्यामुळे हे सुदर्शनक्षेत्र म्हणूनही नावाजलं जातं. इतरही अनेक छोटीमोठी मंदिर इथं आहेत. पण पाण्याचा हा प्रचंड प्रवाह नि त्याची ती कोसळण्याची बेधडक तऱ्हा बघून मन त्याच्याबरोबर आनंदानं वहावतं. तिरुमलैवरून तो व्यंकटेशाचं दर्शन घेऊन जलदीनं निघाला आहे. मुखानं त्याचा जयजयकार करीत तो जणू म्हणत आहे,

" विना वेंकटेशं न नाथो न नाथः । सदा वेंकटेशं स्मरामि स्मरामि ॥

हरे वेंकटेश प्रसीद प्रसीद । प्रिय व्यंकटेश प्रयच्छ प्रयच्छ ॥

आणि त्याच्याभोवती असलेला सुस्नात जनसमुदाय वर शिखराकडे बघत बाहू उभारून म्हणतो आहे, " सर्व लोक निवासाय श्रीनिवासाय मंगलम् "

—

# ३

# अतिमधुरा मदुरा

रांगणारे मूल अचानक एके दिवशी उभे राहू पाहते आणि पुढे सरकण्यासाठी उत्कट उत्साहाने झेप घेते. त्यात ते सफल होते. प्रगतीचे त्याच्या एक नवे दालन त्याच्यासाठी उघडे होते. नव्या भविष्याचा अविष्कार त्याच्या पुढे उभा राहतो आणि त्या आनंदात ते प्रतिक्षणी नवी झेप घेते. तसेच आमचे काहीसे झाले होते.

तिरुपतीच्या व्यंकटेशाने त्या अनोळखी दूरवरच्या प्रांतांत अत्यंत कृपाळूपणे नितान्त रमणीय निसर्ग आणि स्तिमित करणारे ऐश्वर्य भरीला घालून आमचा पाहुणचार केला. आपली 'कंदर्पदर्पहर सुंदर दिव्यमूर्ति' दाखवून कृतार्थ केले होते. दृष्टीच्या अस्तित्वाला साफल्य लाभले होते; त्यात तृप्ति होती पण चिरतृप्ति नव्हती. मन अधिक आणखी पुढे ढकलत होते. काहीतरी असेच भव्य दिव्य बघण्याची तीव्र इच्छा प्राप्त परिस्थितीवर मात करण्याचे धाडस देत होती. अचानक एके दिवशी घरात उत्साहाचे वारे वाहू लागले, आवश्यक प्रवासी चिजा ठरलेल्या जागी थोडा संकोच करून पण व्यवस्थित बसू लागल्या. आणि आम्ही आमच्या मनाला जोजावू लागलो, —" चलो मन अब मदुरा की ओर."

पहाटे रायचूर निघून गेले आणि थोड्याच अवकाशात सकाळच्या स्वर्ण-किरणात आंध्रप्रदेशाची अनोखी दृश्ये दिसू लागली. वर नितळ निळे आकाश, खाली हिरवी वनश्री, विशाल सरितापात्रे, गुलाबी पांढऱ्या रेतीवर किंचित् चमकणारी पाण्याची क्षीण रेषा आणि दूर सुदूर जाऊन परत निकट येणाऱ्या तांबड्यालाल दगडाच्या विविधाकृतींच्या शैलमालिका--एक एक भाग दिल्लीच्या लाल किल्ल्याची बरोबरी करणारा. प्रत्येक वस्तू आमच्या कुतूहलाला हलवून तिच्याकडे बघण्याचे आवाहन करीत होती जणु. आम्ही आमच्या उत्साहाला आनंदात माखून त्यांना म्हणत होतो, " होयरे होय ! किती रम्य आहात तुम्ही; पण लबाडांनों, आम्ही तुम्हाला एकवार पाहिले आहे ! "

मद्रास यायला संध्याकाळ झाली. पुढचा प्रवास ' मीटर गेज ' ने करायचा होता. वेळ थोडा होता. पण त्या आईने आमचा सर्व भार घेतला होता. तिच्या वात्सल्याचा पालव आम्हाला बोलावीत होता. आणि सुटली आमची गाडी ' इग्मोर ' स्टेशनावरून. मंद फिकट चंद्रिका प्रकृतीला अनाहताचा हल्लरू गात होती, तर गाडीच्या मांडीवर आम्ही आंदुळले जात होतो आणि सर्वांगांना सुखवीत वाऱ्याची सुगंधी लहर अजून झोपले की नाही म्हणून हळूच चोरटेपणी पाहून जात होती.

आज जगदंबेचे दर्शन होणार या सुखद जाणिवेने जाग आली. क्षितिजावर तांवडे फुटण्याच्या तयारीत होते. गाडीची तीच नेहमीची लय चालू होती. कां कुणास ठाऊक, मला केव्हातरी लहानपणी पाहिलेल्या खेड्यातल्या पहाटेच उठून जात्याच्या पाळीवर बसून विठ्ठलाच्या गोड ओव्या म्हणत दळण दळणाऱ्या साळूमाळूंची आठवण झाली. आठ वाजले तरी आमचे बहुतेक सहप्रवासी निद्रानंदात निमग्न होते. पण आमचे कुटुंब मात्र मदुरेच्या विलंबाने बेचैन झाले होते. तिथे आम्हाला उतरायला कुठे मिळणार आहे ? दोन दिवसांच्या प्रवासाने अवघडलेल्या अंगाला कुठे दिलासा मिळणार आहे ? खाण्यापिण्याची काय व्यवस्था केली जाणार आहे ?--कशाकशाची फिकीर नव्हती. त्या भव्य दिव्याच्या दर्शनाच्या ओढीने आमचे मन गोपुरशिखरांच्याहि वर उसळत होते. संध्याकाळच्या पाखराप्रमाणे आमची उत्सुकता आईच्या कळसाभोवती भिरभिरत होती आणि त्याच्या [illegible] [illegible]ला. स्टेशनच्या

बाहेर पडतो न पडतो तोच आमची छोटी ललिता ओरडली,—" आई ते पाहा." मी बघितलं तो काय ? लांबवर मीनाक्षीचं ते उंच उत्तुंग गोपूर माझ्या स्वप्नातल्या सगळ्या रंगीबेरंगी कल्पनांना घेऊन उभं आहे. खरंच तिथंच मन हरखलं !

आणि खरोखरीच जेव्हा त्या गोपुरापुढे आम्ही उभे राहिलो तेव्हा दृष्टी विस्फारित झाली. आईसाठी तिच्या लेकरांनी उभारलेलं ते रंगीबेरंगी कौतुक पाहिलं आणि हृदय भरून आलं. तिनेच दिलेल्या वैभवाची तिच्याभोवती पखरण करणाऱ्या तिच्या मुलांविषयी आदर वाटला. आणि त्यांच्या त्या कल्पनांचा विस्मय वाटला की ज्या चारी बाजूंनी हे रंगीबेरंगी पिसारे फुलवून, उभारून उत्तुंग गगनालाही वेडावीत आईभोवती फेर धरीत नाचल्या. अक्षरशः हजारो कलाकृतींनी भरलेली नि रंगाच्या जादूने भारलेली ती गोपुरे म्हणजे तत्कालीन कलाकारांनी आपल्या भाविक मनाला दिलेली दिव्य स्फूर्ति होय यात शंका नाही. हल्लीच्या वास्तवतेच्या कल्पनांनी भरकटलेल्या अवास्तव जगतात आणि नास्तिकतेच्या समुद्रात बुद्धिभेदाच्या गटांगळ्या खाणाऱ्या सामान्य मनुष्यासाठी उभारलेले हे दिव्य दीपस्तंभ होत. खरंच कोण नतमस्तक होणार नाही इथे. ' दिव्यत्वाची इथे प्रचीति ' नाही म्हणणारा कोण भेटेल इथे ! खरे म्हणजे मीनाक्षीच्या कलावंत सुपुत्रांनी ह्या मंदिरगोपुराद्वारे तिची रंगलेण्यांची पूजा बांधली आहे. पण गोपुरातून भारावून आत सरकताना मात्र असे वाटत होते की आईच्या दर्शनासाठी येणाऱ्या दूरस्थ मुलांच्या स्वागतासाठी, तिनेच हा खटाटोप केला आहे.

आत शिरताक्षणीच सुबकशी पुष्करिणी डोळ्यात भरली. पक्क्या नि रेखीव बांधणीची ही पुष्करिणीच स्वनामधन्य सुवर्णकमल सरोवर आहे असे कळले. देहूच्या पुण्यसलिला इंद्रायणीने तुकोबाचे अभंगवाङ्मय तारले तर इथे या पुष्करणीत पंचमवेद म्हणून विख्यात पावलेले, द्राविड कविपुंगव श्री. तिरुवलुवाराचे ' तिरुकुरल ' तारले. सामान्य कुळात जन्माला येऊन वेदांसारखी रचना करणारा आणि ती सुद्धा देववाणीतून न करता एतद्देशियांच्या भाषेत करणारा म्हणून त्याच्या कर्तृत्वाचे सोने कस लावून पाहण्यासाठी या इथेच गंगार्पण करण्यात आले. पण,

"मदीयो यं त्यागः समुचितमिदं नो तव शिवे
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति !"

म्हणून आईजवळ धरणे धरून बसणाऱ्या तिच्या सुपुत्राला का ती वत्सल माता दूर लोटणार आहे ? इथे तिने असेच कौतुक केले. ते तिरुवलुवारच्या निंदकांनी टवाळांनी परिक्षकांनी वा त्याच्याविषयी सहानुभुति असणाऱ्यांनीही पाहिले. आणि ते म्हणजे त्या जगन्मातेने तिरुवळुवाराचे पृथ्वीमोलाचे ते वाङ्मयधन एका सुवर्णकमलात घालून पाण्यावर पाठवून दिले. नंतर जन्‌सागराने त्याला उरी-शिरी धरले. अद्यापहि सरोवराच्या काठीच्या ओवऱ्या तिरुकुरलाच्या अध्यायांनी रंगलेल्या आहेत. बाजूला कविश्रेष्ठाची शांत, संयत नि स्नेह स्रवणारी मुद्रा असलेली मूर्ति स्थापित आहे.

या सगळ्या गोष्टी आम्ही बघत होतों. प्रदर्शकाने सांगितलेलेहि लक्षात ठेवत होतो. पण आम्हाला घाई होती दर्शनाची. सूर्यकिरणांची कोवळीक केव्हाच संपली होती. सरोवराच्या पाण्यातले गूढ निळेपण विरले होते नि फिकट हिरवेपण सूर्यकिरणांत न्हाऊन लकाकत होते. त्या मायानगरीत आईचा सुवर्णकळस आता जवळ दिसत होता. " ते दुसरे शिखर कुणाचे हो ?"–मी सहजगत्या विचारले नि उत्तर मिळाले,–"ते ना ? ते सुंदरेश्वराचे ?" म्हणजे सौभाग्यासहीत सौभाग्यवतीचे दर्शन मिळायचे होते. पण प्रत्यक्षात ते अधिक दूर होते. इथे सगळेच अद्‌भूत. अगदी कठीण कोडयासारखे––पावलापावलाने उलगडणारे !

पुढे गेलो तर पुष्पाच्या संमिश्र धुंद सुवासाने मन बहरून गेले. स्त्रीजात फुलवेडी खरी. मीनाक्षीच्या पूजनासाठी इथे विविध रंगांच्या, आकारांच्या प्रकारांच्या फुलांच्या माळांचा केवढा तरी मोठा बाजार भरलेला होता. खण-नारळ-कुंकु-उदबत्ती-कापुर-केळी फुलांच्या माळा आणि स्वकोशातले कृतज्ञतेने बाहेर पडणारे द्रव्य ह्या अष्टमांगलिक द्रव्यांनी तिची पूजा करायची आम्ही ही सगळी उपायने एका नाजूक दुरडीत भरून घेतली नि मग मात्र मनांतली दर्शनोत्कंठा माळेतल्या गुलाबासारखी घमघमूं लागली. इथली फुलं विलक्षण सुगंधाने ओसंडत असतात. खरं तर इथल्या सगळ्या गोष्टी विलक्षण वैचित्र्याने नटलेल्या असतात आणि त्यांना भिरभिरत पाहणाऱ्या नवख्या नजरा अधीर अचंब्याने उंचबळत असतात.

विचाराच्या तंद्रीत, औत्सुक्याच्या या मायानगरीत किती फिरलो कुणास ठाऊक, पण सहज समोर पाहिले आणि गणपतीचे दर्शन घडले. महागणपतीच तो. एकूण मंदिराच्या विशालपणाची संपादित आवृत्तीच. चांदीच्या कवचाने अलंकृत पण स्वच्छ आकृति. नेटके दर्शन, घवघवीत मुखमंडल, सायुध हात, वक्र शुंडादंड आणि वज्रासनाची प्रतिष्ठा. मी हात तर जोडलेच होते, पण का कुणास ठाऊक, अगदी नकळत ज्ञानदेवाच्या भाषेत मी त्याला पाहू लागले. स्वगत प्रार्थनेच्या मंद्र स्वरात सांद्र स्वरलहरी आल्या—

" अकार चरणयुगुल उकार उदरविशाल ।
मकार महामंडल मस्तकाकारे ।। "

शिवपरिवारातल्या ह्या पहिल्याच प्रतिनिधीचे दर्शन घेतले. अमूर्तातून मूर्तत्वात आलेल्या स्वरूपाचा साक्षात्कार घेऊन पुढे सरकलो. आता जगदंबेचं दर्शन. वस्तुत: देवाचं दर्शन आधी. पण इथे पहिला मान मीनाक्षीचा, मग सुंदरेश्वराचा. गर्भागाराच्या बाहेर हातांतले पूजासाहित्य सांभाळीत उभे राहिलो. स्त्रीपुरुष विभागले गेले. रांगेबरोबर पावलापावलाने आमचं सुफलीतच जणू पुढे सरकू लागलं. पुरुषांनी उत्तरीय वस्त्र उतरून ठेवायचं, मगच त्यांना दर्शनाधिकार. एकेक महाप्रकार मागे जाऊ लागले. दर्शनाच्या रांगेत उभं राहिलं की मन पुढच्या दर्शनासाठी उत्सुक असतं. भोवतालच्या पवित्र वातावरणाचं बुद्धीवर दडपण असतं. जगातला विखुरलेला भाविकपणा, देवभोळेपण, किंवा देवपिसे इथे एकत्र आल्यासारखें, केंद्रित झाल्यासारखे वाटत असते. पुढे तर सगळयांना जायचे असते. प्रभुदर्शनासाठी तर सगळेच हपापले असतात. पण असे कितीतरी चेहरे मी नेहमी बघत आले आहे की ते दर्शनाच्या रांगेतच, दर्शन होण्यापूर्वीच आनंदात रंगून गेले आहेत जणू आपली आराध्या अखंडपणे आपल्यासमोर विराजमान आहे आणि तिची स्तुतिस्तोत्रे गाता गाता अगदी "न पुरे ही घणी' असे होऊन राहिले आहे. असे पाहिले की मति कुंठित होते. त्या रेटारेटीत देखील कुणाची अधीरता उतू जाताना दिसते. कुणाचे ओठ स्फुरत असतात, हृदयातला उमाळा शब्दस्वरूप घेऊन बाहेर उसळतो. कुणाचे त्या प्रेमभेटीच्या आनंदाने " प्रेमे पाझरती लोचन " असे होते. तर दर्शनाच्या अनिवार आनंदाने क्षणिकच का होईना पण कुणाची संज्ञा बधीर होते. लेकराने आईसाठी टाहो फोडावा.

तसा फक्त 'आई आई' टाहो बाहेर पडतो आणि एवढं सगळं पाहून मग माझं मन माझ्याकडे वळून विचारात " आपलं काय ? " प्रश्न अनुत्तरित रा हतो रांग पुढे सरकते आहे. मन उत्साहानं म्हणत, प्रत्यक्ष भगवत्पूज्यपादांना जिनं मोहविलं तिचं

" उद्यद्भानु-सहस्त्रकोटिसदृशां केयूरहारोज्ज्वलां
बिम्वोष्ठीं स्मितदन्तपङ्क्तिरुचिरां पीताम्बरालङ्-कृताम ।"

अस ते भव्य दिव्य परम मंगलकारक गोड स्वरूप आता बघायला मिळणार.

द्वारपालिका असलेलं दार केव्हाच मागे गेलं. नि दूरवरच्या क्षीण प्रकाशांत मीनाक्षीची मुकुटप्रभा दिसते आहे. नारळ फोडले जात आहेत. खणाकेळीची वायन ठेवली जात आहेत. कापुरांच्या ज्योति देवीच्या सर्वांगाचं सौभाग्या-लंकारांसह दर्शन घडवीत विरून जात आहेत. माझं मन मोठ्या विलक्षण भाराखाली दबलं आहे. मी त्या अद्‌भुततेचं दर्शन घेतलं आहे. जिच्या माया-बाजारात मी एवढी हिंडले-फिरले—कुणास ठाऊक अद्याप मला अज्ञात अजून किती आहे--ती त्या साऱ्या ऐश्वर्याची एकमेव स्वामिनी मी आज डोळाभरी पाहणार आहे.

श्रीमंताच्या वाड्या—वैभवांत खुशाल फिरून येता येते. पण जेव्हा त्या वैभवाच्या स्वामीची गाठ पडण्याची संधि येते तेव्हा मनावर कुठले तरी अवघड साकडे पडते. संकोचाचे भारी दडपण पडते. तसेच झाले होते माझे. पण जवळ अगदी समोर मीनाक्षीची सुंदर मूर्ति विलसू लागली. सुरेख—नाजुक—कोमल. माझ्या मनाला माझ्या शब्दज्ञानाची मर्यादा जाणवली. जिच्या वैभवाचा बोलबाला प्रत्यक्ष दृग्गोचर झाला तिचं हे इवलाले स्वरूप पाहून मी चकितच झाले. मघाचा तो जगदंबेचा जयजयकार, 'आई आई'चा टाहो माझ्या कानात घुमत होता. नि माझ्याही मनात मीनाक्षीची जी स्वप्नमूर्ति तयार झाली होती तिला ह्या वास्तवतेने धक्का दिला. हिच्या प्रभावाने मी मनांतून केव्हापासून नकळत विनम्र होत आले होते. पण प्रत्यक्ष तिला पाहिले मात्र, मनाचा पोक गेला, दडपण गेलं, संकोच गेला नि जवळीक निर्माण झाली. विलक्षण आपुलकी वाटू लागली. इथे जगदंबेनं सखीस्वरूप घेतलं आहे. नववधूचं लीलालाघव दाखवलं आहे. तारुण्यांतली तपःपूत लावण्याची

नव्हाळी दाखवली आहे. तकतकीत काळ्याशार प्रस्तरात केवढे देखणेपण असू शकते याची मला तोवरी कल्पना नव्हती. मी अधाशीपणाने तिचे ते विलोभनीय सौंदर्य डोळ्यांनी टिपत होते.

भर्जरी गर्द हिरवे जाड अन् जड काठापदराचे पाटव पांघुरलेली; तशीच भर्जरी पण सुवर्णातून केशर उधळणारी उत्तरीया कंचुकी ल्यायलेली; अंगाखांद्यावर थोडकेच पण ठळकठळक मणिकांचनाचे अलंकार; मस्तकी गोपुराकार स्वर्णमय मुकुट; दंडावरचे रत्नजडित बाजूबंद; नागबंध; हातात सोन्याची वलये, रत्नाची कांकणे, कमरेला कमरबंद; नि त्या बहुमूल्य वस्त्राच्या भरजरी काठाला सतत रुळत ठेवणाऱ्या सुकुमार पावलांत नाजुक मण्यांचे घोस जडवलेली ती पैंजणे—एवढं सगळं पाहिलं. खरोखर अपूर्व शोभा एवढेच वर्णन करावे लागेल. उजव्या हाती मोठ्या रसिकपणे कमलकलिका धारण केली आहे तर डावा हात ' अभयकर, बनून आपल्या बाजूला किंचित् झुकलेल्या कमरेला जवळीक देऊन वस्त्रवेष्टित दक्षिणांगाशी सुसंवाद करीत खाली आला आहे. इथे तिच्या लावण्यावर सगळ्या ज्येष्ठ श्रेष्ठ पुष्पराशींनी शरणागति पत्करली आहे. विविध रंगांच्या फुलांची एक सुरेखशी माळ उत्तरीय वस्त्रासारखी गळ्यामागून निघून वक्षावर किंचित् विसावून पुढे कमरपट्याच्या घोसदार पदकाभोवती महिरप घालून समांतर चरणापर्यंत रुळत आहे. दक्षिण स्कंधावर एक पोपट आहे—वस्त्रालंकाराचाच. मीनाक्षीच्या बिंबाधरोष्ठांत आपलं प्रतिबिंब निहाळीत कसा नीटस बसला आहे. कपाळावरच्या भृकुटीत हिरे जडवले आहेत नि त्या मधोमध रेखले आहे सौभाग्यकुंकुम. रंगीबेरंगी सुगंधी फुलांची आणि जाड दंडाची ' नील मालय ' तिच्या प्रभावळीच्या कलाकुसरीचा आधार घेत तिच्याशी खेळीमेळी करत आहे. आणि प्रभावळीच्या पिवळ्याधमक सोन्याचे उन्ह तिच्यावर पडले आहे. त्यात तिच्या श्रीमुखावरचे कृष्णपक्षी चांदणे मंद उजळून निघत आहे. असं हे सोन्याचं जडवलेलं सौभाग्य पाहिलं !

वस्तुत: गिरिराज हिमाद्रीची नंदिनी ही हिमगौरी; त्या कर्पूरगौर सुंदरेश्वराची ही भार्या. कसे सोनसळी सौंदर्य अपेक्षित होते हिचे. पण दक्षिणेत जन्मली आणि दाक्षिणात्य झाली. त्यातहि सुंदरेश्वराआधी भावाचे नाते

जोडले नारायणाशी. त्याचा वर्ण क्षीरसागराचा तर ही त्यानल्या गूढ कृष्ण-वर्णाची. तो काळ्यासावळ्या, धीरगंभीर आभाळासारखा तर ही नीटस-नाजुक. पण पारदर्शक चंद्ररेखेसारखी.

महाभारतातल्या कृष्णेसारखा हिचाहि जन्म अग्निशिखामधून. तिच्याप्रमाणे हीही राजकन्या. पांड्यांचा राजकुळातल्या मलयध्वजाच्या तपश्चर्येला मिळालेलं पसायदान. प्रथम लाडकी राजकन्या. मग लोकमान्य राजप्रतिनिधि आणि पेरुमाळसुंदरराज यांच्या हस्ते कदबवृक्षाला साक्षी ठेवून सुंदरेश्वराशी परिणय. असा तिचा जीवनपट भराभरा डोळ्यासमोरून सरकून गेला. अद्यापहि सौभाग्याच्या निकट तशीच त्या प्रतिष्ठेने, शालीनपणाने नृत्याविष्काराची मोहक मुद्रा दाखवीत ती उभी आहे. मीनाकृति नेत्र मात्र तृप्तीने, समाधानाने व धन्यतेने झाकाळले आहेत. माझ्याच मनातल्या गुणकीर्तनाने मी मोहरले. पुरोहिताने शेष नैवेद्य, एक सुवकशी वेणी नि गुलाबाचा हार दिला-हातावरचे चरणोदक मुखात टाकून माघारी वळले. पण जाताना अभावितपणे मनाशीच तिचा निरोप घेतला–" येते हं, सखी !"

(मग सुंदरेश्वराच्या आधी दर्शन होते ते नटराजाचे. शिव साधाभोळा, विरागी, वैरागी, स्मशान निवासी, भूतप्रेतांचा स्वामी अशी त्याची प्रसिद्धि असली तरी खटास खट, प्रेमळास प्रेमळ, आर्तांचा त्राता हाही तोच आहे. इथे तर प्रत्यक्ष जीवनसंगिनीचाच सहवास. मग काय ? तिचा सौम्य अभिनयाविष्कार तर याचा उल्हास तांडवनृत्यांतून फुटून राहत आहे. राधामाधवाप्रमाणेच हे मीनाक्षीसुंदरेश्वरदेखील मोठे रसिक जोडपे दिसले. नृत्याभिनयाची जुगलबंदीच इथे आकाराला आली आहे. 'वास्तविक तांडवातील ही नटराज-मुद्रा हे दक्षिणेतले वैशिष्टयच आहे) चिदंबरम्ला प्रमुख नटराजमूर्ति आहे. डावा पाय वर उचललेला, उभय कर त्याच्याशी समांतर येऊन स्वस्तिक मुद्रा दर्शवीत असलेले, असे हे ध्यान आहे. आणि ते तसेच असते. पण इथे मात्र विशेषांतले विशेष हे की पांड्य राजा राजशेखर ह्या रसिकभक्ताच्या इच्छेसाठी त्याने उजवा पाय अधांतरी घेतला आहे. जणु त्याच्या कलासक्ततेची दाद घेतली आणि त्याच्या प्रेमाधिकाराची पावती त्याला दिली !

शिव–मीनाक्षीचरित्राचे अनेक प्रसंग कोरलेले रंगलेले पाहिले. त्यात नवरसांचे सागर ओतलेले पाहिले. विशेषतः शिवसंघटनेचे प्रतिनिधि म्हणून

वीरभद्र आणि अघोरकाम यांच्या महाभयंकर आणि विकट भाव दाखवणाऱ्या मूर्ति पाहिल्या. पण मीनाक्षीच्या नृत्यनिपुणत्वापुढे हार न जाणाऱ्या शिवाचे ऊर्ध्वपंदविन्यासाचे दगडी नृत्य पाहिले आणि इथे मात्र खरोखरी कारागिरीचा परमोत्कर्ष साधला गेला असे वाटले.

माझ्या तृप्तींची पहिली लाट ओसरली. सुंदरेश्वराचे दर्शन घेतले. लालित्य आणि वैभव यांचे सगळे जरतारी मखर त्याने जणु मीनाक्षीला देऊन टाकले आणि आपल्याजवळ ठेवली मात्र किंचित् वैराग्याची झाक मारणारी धीर-गंभीर वातावरणाची प्रभावळ. नि त्यातच तो खरा शोभत होता.) मग मयूरारूढ कार्तिकेय स्वामी पाहिले. आणि त्या रणरणत्या उन्हात प्राकारप्रदक्षिणा घातली. आपल्याकडच्या तुळशीबागेसारखा इथेहि आधुनिक संसारसाहित्याचा बाजार भरला होता. त्यात केवळ वैचित्र्य होते. पण खिळवून टाकण्याचे सामर्थ्य होते ते सहस्रस्तंभ मंडपात. मयसभाच ती. असंख्य अगणित स्तभ असलेला तो मंडप म्हणजे पूर्वजांच्या शिल्पस्वामित्वाची इंद्रसभाच जणु. नानाविध आकृत्या. एकासारखे दुसरे नाही. दुसऱ्यापेक्षा तिसरे आकर्षक तिसऱ्यापेक्षा चवथे भव्य. दृष्टि विस्फारून जाते. आकृतीआकृतीगणिक विस्मय झपाटतो. कोंडू कोंडू धरिला जीव विलक्षण अभिमानाने न्हाऊन निघतो. हे कर्तृत्व १५ व्या शतकात उभारलं गेलं म्हणे. धन्य आपला देश आणि धन्य ते कारागीर—ज्यांनी हे शिल्प निर्माण केलं, जे शेकडो वर्षांचे उन्हपाऊस सहन करीत अद्याप तसेच अबाधित उभे आहे.

मीनाक्षीच्या या विराट कलाकृतीचा सर्वश्रेष्ठ शिल्पी ठरला राजा तिरुमल-नायक. त्याच्या कर्तृत्वाची साक्ष या मंदिरात आणि( मदुराईच्या परिसरात पुष्कळ ठिकाणी आढळते. त्याच्या दोन्ही राण्यांसह तोहि मूर्तिरूपाने करबद्ध अवस्थेत मीनाक्षीसमोर उभा आहे. )

मीनाक्षीच्या मायाबाजारातून उठून मग त्या तिरुमलनायकाचा महाल पाहिला. फारच प्रचंड ही कलाकृति आहे. जागोजाग त्याच्या रसिकत्वाचे पुरावे कोरून ठेवले आहेत. दक्षिणेत कुठल्याहि नामांकित जागेचा भव्यपणा हा स्थायी भावच असतो जसा. तसा तो ह्या राजमहालालाही लाभला होता. त्याच्या त्या स्तंभांचा आकार, त्याचा विस्तार महिरपीचे छातवरच्या कोरीव कामाचे वेगळालेपण सगळेच काही स्तिमित करणारे होते. त्या सगळ्या

उंचीपुढे माणूस अगदी केवढासासा वाटतो. हल्लीं तेथें मदुराईचे न्यायनिवाड्याचे काम होते. सगळेच काही प्रेक्षणीय आणि मनाला विशालत्वाचा आनंद देणारे. अन् त्याबरोबर त्याच्या लघुत्वाची जाणीव करून देणारे !

त्यानंतर पाहिले ते तपःकुलम्. जशी दक्षिणेत प्रत्येक तीर्थक्षेत्री पुष्करिणी तसेच तपःकुलम्. मोठ्याशा सरोवराच्या मध्यभागी उभारलेले, भोवतालचा कमनीय नि रमणीय निसर्ग दाखवणारे ठिकाण. छोट्याश्या होडीने जायचे, तिथली ती छोटीशीच पण सुबक वास्तु न्याहाळीत, भोवती आवर्जून लावलेल्या बागेतून हिंडायचे, सुंदरशा कारंजाचे जलकण अंगावर झेलायचे, शहारायचे आणि तसेच त्या होडीतून परत फिरायचे की झाले तपःकुलम् पाहून.

हे सगळे पाहिले आणि विश्रामधामांत आलो. गार सावलीत विसावलो. धर्मशाळेच्या राजस्थानी व्यवस्थापकाने आपुलकीने चौकशी केली. आम्ही त्याला खुलवण्यासाठी तिथल्या व्यवस्थेची प्रशंसा केली. यावर तो मोठ्या अभिमानाने म्हणाला, " महाराज ! यह सब एक मारवाडी ही कर सकता है । धन सचय करना उसका धर्म है, परन्तु उसका उचित व्यय करना ही वह सत्कर्म समझता है! " त्याच्या अभिमानाने उंचावलेल्या भिवईला थोडी दर्पोक्तीची धार होती, पण तो म्हणत होता त्यात तथ्यहि होते. आणि पुढच्या प्रवासात त्याच्या म्हणण्याचे प्रत्यंतर आम्हाला येतहि गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच निघून पाहिले तिरुपुरकुंडरम्. जगन्मातेच्या या पराक्रमी पुत्राला नेहमी गडकुंडारच राहायला आवडते. देवसेनेचा सेनापति ना तो गड, कोट हीच त्याची ठिकाणे. बहुतेक सुब्रह्मण्य क्षेत्रे ही अशीच कुठल्यातरी पर्वताच्या पोटी वसलेली आहेत. उघडाबोडका डोंगर तो, पण माणसांनी कसा फुलून गेला होता. काही पर्वणीविशेष होतीसे वाटते. " देव डोंगरी राहतो, यात्रा भक्तांची पाहतो " असे झाले होते. भरभरून बसेस येतजात होत्या शहरापासून पांचसहा मैलांचे अंतर असेल. तसे हे दक्षिण रेल्वेचे स्टेशनही आहेच. पायथ्यापासून पायऱ्या बांधून वर छप्पराचे पक्के बांधकामही केले आहे, म्हणून चढण शीतळ झाली आहे. वर शिवपरिवारांतले सर्वच प्रतिनिधि आपआपल्या लवाजम्यासह हजर आहेत. पण इथले प्रमुख दैवत म्हणजे सुब्रह्मण्यम् किंवा कार्तीकेय स्वामी. थोडेसे अंधारात

आहेत, पण मयुरारूढ मनुष्याकृति अशी त्यांची प्रतिमा आहे. दोन्ही बाजूच्या धडाडणाऱ्या दिव्यांच्या उजेडात तैलाभिषेक झालेले त्यांचे श्यामल स्वरूप तकाकून राहिले होते. हातात चांदीचा शूल होता, आणि ऐट सेनानीचीच होती. जवळचे पूजाद्रव्य दिले, भक्तिभावे नमस्कार केला आणि शेषप्रसाद घेऊन खाली उतरलो.

मदुराईत परत येऊन सुंदरराज पेरुमाळ हे श्रीविष्णुचे मंदिर पाहिले. श्रीदेवी आणि अंडालरंगनायकी यांसाहित त्या लक्ष्मीवल्लभाचे दर्शन घेतले. कार्तिकेयाचे आणि श्रीगणेशाचे हे मातुलगृह–हेही एक मोठे छान ठिकाण आहे.

मीनाक्षी-सुंदरेश्वराचे हे लीलाक्षेत्र बहुतेक पाहून झाले होते. आता पुढील वेध लागला होता. नाही म्हणायला, अनगरमलै बघायची राहिली होती. पण त्याला इलाज नव्हता. दिवस थोडे आणि प्रेक्षणीय फार अशी आमची अवस्था झाली होती. अखेर मोठ्या जड पावलांनी मीनाक्षीचा निरोप घेऊन गाडीत बसलो.

गाडी मदुरेची नागरवस्ती सोडून उघड्यावर आली. परत पारव्या निळ्या क्षितिजावर झाडाझुडपांच्या गर्द नक्षीत गोपुराचे पिसारे उभे राहिले. चित्त-चक्षूंपुढे मीनाक्षीची ती कृष्णशालीनता उभी राहिली. तिचे नववधूचे नाजूक नि लाजरे आर्जव उभे राहिले आणि म्हणाले– ‘ए परत लवकर यायच हं!’ डोळ्यातल्या दाट पाण्याआड मला ती सगळी उंची विरून गेलीसे वाटले. आणि अनावर होऊन मी पलीकडे तोंड फिरवले. पण माझ्या ‘हो, नाही ’ची वाट बघत ती गोपुरे मात्र कितीतरी वेळ दूर दूर जाणाऱ्या माझ्याकडे बघत होती !

---

# ४

# सेतुबन्धे तु रामेशम्

ज्या द्वादश ज्योतिर्लिंगांनी हा सर्व भारतवर्ष आलोकित करून टाकला आहे, भारताचं भावजीवन समृद्ध करून ठेवलं आहे, भारतमातेच्या सुपुत्राला तिच्या भूमिविशिष्ट अंगप्रत्यंगांतून आपुलकी निर्माण करून ठेवली आहे, त्याच्या सामाजिक जीवनांत 'सत्यं, शिवं सुंदरम्' चा त्रिवेणी संगम घडवला आहे त्या उत्स्फूर्त परमसत्तत्त्वाचं, त्या प्रमुख शिवपीठाचं आणि त्या सुंदरतम ज्योतिर्लिंगाचं दर्शन आता घडायचं होतं !

मीनाक्षीच्या उत्तुंग गोपूरशृंगांचा ओढ लावणारा लोभस निरोप घेऊन मन पुढच्या औत्सुक्याच्या भेटीला सिद्ध झालं. वेळ संध्याकाळची. प्रशान्त, शांत. सुखद, शीतल समीर झुळझुळत होता. पण प्रकृति आपलं लीलाकमल क्षणाक्षणानं संकुचित करून घेत होती. आकाशांतल्या गंभीर नीलालयाला नीलमेरूंच्या संगतीत दर्शनीय अरुणिमा लाभला होता. प्रकृतीच्या नववधूसारख्या लाजऱ्या लावण्यावरच्या गूढ कृष्णकेशसंभारांत जणु हलकीशी सिंदूरी रेखा रेखली गेली होती.

किती रम्य दर्शन होतं त्या संध्येचं ! रोजच्या रोज ही संध्याप्रिया युगानुयुगें अशीच उभी असेल, नाही ? त्या शेतांच्या माळावर, त्या मळ्याच्या बांधावर, त्या पाणलोटांच्या मेरेवर ? खरंच ती असा गुलाबी श्रृंगार करून

त्या शेतांच्या बांधावर विसावून सुवर्णकिरणांचे आपले हात भाळी ठेवून कुणाची बरं वाट पाहत असेल ? एका विख्यात हिंदी कवीची सुरेख कल्पना माझ्या मनाच्या अंगणांत भरारी मारून गली—" युगकी संध्या कृषकवधूसी किसका पंथ निहार रही ? "

गाडी उघडा माळ सोडून आभाळाचे विविध रंग ल्यालेल्या पाणलोटांनी वेढलेल्या, हिरव्यागार झुडपांनी झाकलेल्या भातशेतांतून धांवू लागली. मधेच दाट केतकीची गुंतावळ दिसे तर कधी केळीच्या पानांनी उत्सव सुरू केलेला असे. ताड, माड, नारळी, पोफळी तर सासुरवाशिणीच जणु इथल्या. सतत आपल्या कमरा कसून उभ्या शेतापोतांत. शिस्तबद्ध सुरूचे दाट वन म्हणज आणखीन् एक वैशिष्ट्य इथलं.

मानमदुरै स्टेशन मागे पडलं आणि गाडी खाली उतरूं लागली. भारतमातेच्या वाम चरणाच्या टोकाकडे आम्ही सरकूं लागलो. केवढा आनंद झाला म्हणून सांगावं. ' सुटचो ' म्हणून सगळ्या खेळाडूंना संसारात आणि मायेच्या शिवा-शिवीत गुंतवून आपण नामानिराळ्या राहणाऱ्या त्या भोज्याकडेच आम्ही निघालो होतो. त्या शिवालाच शिवायला आम्ही आता धांवत होतो.

बाहेर कांही दिसत नव्हतं. अगदी फिकट चांदणं होतं खरं. पण त्यांत काळोखच अधिक स्पष्ट दिसत होता. गाडी थांबली आणि यात्रिक एकमेकांत कुजबुजू लागले–' रामनाड स्टेशन'. झाली रामचरणांच्या खुणा पटायला सुरवात. मग आले मंडपम्. छोटेसेंच पण महत्त्वाचे स्टेशन. गॅसच्या दिव्याच्या आणि मासळीच्या उग्र दर्पांत वसलेले. पण मातृभूमीचे अखेरचें टोक. त्याच्या पुढे विशाल सागर. परमंगलमांगल्या शस्यश्यामला मातृभूमीचा तो विवाह-सोहळाच मांडलेला वाटतो. मधे मंडपम् आणि पांवन या छोट्या पुरोहितांनी समुद्राच्या जळौधाचा धरला आहे अंतरपाट आणि पलीकडे उभा आहे रामे-श्वर, आपल्या सामर्थ्यानिशी सर्व सागरी श्रीमंती वैभवाला घेऊन.

मंडपम् गेले. गाडी त्या तथाकथित अंतरपाटावरून सरकूं लागली. खाली लोहसेतूचा धनगंभीर नगारा वाजतो आहे. दोन्ही बाजूंनी समुद्राच्या लाटांचे विकट लास्य चालूं आहे. वर घुमटाकार घन आकाश आणि खाली चक्राकार पाणीच पाणी. बस्स, दुसरे कांहीच नाही. मिनिटामागे मिनिट चालले आहे. श्वास अवरुद्ध होत आहेत. बोलण्याची उसंत केव्हाची लंगडीलुळी पडून त्या

निसर्गशिवाचं विकट तांडव अनिमिष बघत आहे. प्रभुदर्शनाची उत्कंठा भवितव्याच्या मायावी काळजीनं झाकाळून उठली आहे. पण त्या बेफाम तांडवाला त्याची जरासुद्धा पर्वा नाही. त्याच्या नृत्याला कुठेहि विरोध नाही. " सर्वेषामविरोधेन " तें चालू आहे. गाडीचा तो भयंकर 'धम्-धम्'चा ताल विलक्षण भयंकर वाटतो आहे. आणि त्या उत्तुंग मृदंगावर त्याचे नाचणें चालूं आहे.

" धिमिद्धिमिद्धिमिध्वनिन्मृदंगतुंगमंगलम्
ध्वनिक्रमः प्रवर्तितः प्रचंडतांडवः शिवः । "

पांबन आले. एका अद्‌भुत स्वप्नानुभूतीची अखेर झाली. मन म्हणत होतें, तुला कांही भव्य दिव्य बघायचें होते ना ! मग आता बावरलीस कशासाठी ? पण ऐवढें गांभीर्यहि पेलवत नाही माणसाला. या पांबनहून धनुष्कोडी आणि रामेश्वर क्षेत्र भिन्नमार्गी झाली आहेत. धनुष्कोडीला उभें राहिले तर तेथली पांढरी वाळू सांगते की इथेच, याच ठिकाणी मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्रांनी सागराची आराधना केली. आणि शेवटीं त्याच्याच विनंतीला मान देऊन आपल्या सवंगड्यांना सांगितलं होतं की " सेतु बांधारे सागरी. " त्याकाळी सेतु किती योजने बांधावा लागला असेल ? पण आता मात्र २६ मैल जलमार्ग ओलांडला की लंकेचं दर्शन घडतं म्हणतात. आम्हीं आपला अंदाजाने लंकेला नमस्कार केला. शिवतांडवलुब्ध, परमशिवभक्त, चौदा चौकड्यांचं राज्य करणाऱ्या त्या भयंकर रावणाची अशोकवाटिका मनांतल्या मनांत उभी केली. त्या अशोकवनांतली शोकमग्न अकलंक सुकुमारी जनकनंदिनी उभी केली. जिच्या अळित्यानं रंगवलेल्या कोमल चरणाघाताने अशोक सर्वांगीं फुलला असता ती स्वतःच एका कोमेजल्या फुलासारखी शोकाकुल अवस्थेत श्रीरामचरणाकडे डोळे लावून बसलेली अशी उभी केली आणि त्या करुणामयीला मनोमन नमस्कार करून परत फिरलों.

रामेश्वरम्‌ला पोहोचायला चांगलीच रात्र झाली होती. सागरी सान्निध्य पदोपदी जाणवत होतें. कोळी, माशांची जाळी, टोपल्या पायाखाली पिवळट रेती ही सतत आढळणारी मंडळी. तसें रामेश्वरम् हें समुद्रमंडळामध्ये एक बेटच आहे. स्टेशन वगैरे चांगलं प्रशस्त, पण साधंच आहे. बाहेर पडलो. यात्रेचं नेहमीच एक वैशिष्ट्य असतं की कुणीतरी परकं जवळ येतं आणि जवळचं असं होतं. तें माहीतगार असलं तरी त्याला माणसांचा सहवास हवा असतो. कुण्या नवख्याला

त्याचं ज्ञान उपयोगी पडलं की त्याला सार्थक झाल्यासारखं वाटतं. इथं आम्हालाहि अशीच सोबत मिळाली. आणि यात्रा, देवदर्शन, तिथलं हिंडण-फिरणं सगळंच कांही सहज सुकर झालं. चांगली जागा वगैरे मिळून रामेश्वरम्च्या भूमीवर अंग विसावलं तेव्हा एक-दीडचा सुमार झाला असेल.

पहाटेचे चार-साडेचार झाले असतील. रामेश्वरांतली रात्र लाटांच्या गजराने जागवली जात होती. पहाटवाऱ्याच्या सुखद लहरी प्रवासाचा शीण घालवून झोपेची नशा वाढवीत होत्या. पण ठरल्याप्रमाणे पांच वाजेपर्यंत मंदिरांत जायचें होतें. इतक्या सकाळीच तिथे होणारी मणिलिंगाची पूजा बघायची होती.

अंधारातच बाहेर पडलो. आणि विजेच्या दिव्यांच्या क्षीण साक्षींत मंदिराची देहली ओलांडली. प्रवेशाच्या पहिल्या चरणापासून तों मंदिराच्या हृदयापर्यंत पोहोचायला पक्कीं पंधरा मिनिटें लागलीं. रामेश्वरांनी सुद्धा स्वतःभोवती स्तंभांचा आणि लांबच लांब ओवऱ्या दालनांचा एक चक्रव्यूहच निर्माण करून घेतला आहे. कोट परकोट यांच्या जंजाळांत माणूस भ्रमून जातो. नवख्या माणसाची तर दमछाकच होते. त्या शिल्पसौंदर्याचं दर्शन घेतांना माणूस चकित होतो. थकित होतो. बरोबरची मंडळी घाई करत होती. शेवटीं बरंचसं चालून आणि वळणावळणानं फिरून आम्ही एका अवाढव्य नंदिकेश्वराजवळ येऊन पोहोचलो. केवढा तो नंदी ? छे ! नंदी कसला. एखादी छोटेखानी इमारतच म्हणावी. खरंच दक्षिणेकडच हें वैशिष्टय म्हणावं का ? की देशाचें तें टोक जितकं अरुंद होत गेलं आहे तितकी तिथल्या माणसांच्या कल्पनाशक्तीची उंची वाढली आहे ? त्यांच्या कलाकुसरीच्या कार्यकर्तृत्वाची रुंदी विस्तारली आहे ? नाहीतर दक्षिणेकडच्या-सारख्या मंदिराच्या इमारतीचा घेर उत्तरेंत एखाद्या ठिकाणीं तरी दिसला असता. एखाद्या गोपुराची उंची उत्तरेंत एखाद्या तरी प्रवेशद्वाराला लाभली असती. राकटशा काळ्या दगडांतहि मऊ मुलायम कला ओतण्याची जिद्द एखाद्या ठिकाणी तरी मिळाली असती. असो.

पण कृष्णप्रस्तरांचं तें देखणेपण आजच्या भक्ताला मंजूर नाहीसं दिसतं. ठिकठिकाणीं चुन्याची रंगसफेती करून आणि गेरूच्या पट्ट्या ओढून ती

मौलिक सुंदरता नाहीशी करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या नंदिकेश्वराचहि कांहीसं असंच झालं आहे. आधुनिक कलाकारांनी त्याला काळ्याचा पांढरा केला आहे. आणि पूर्वजांनी आपली आयुष्याची दौलत उधळून मांडलेल्या या कलात्मकतेचा आजच्या विविध तैलरंगांनी मोजमाप घेण्याचा प्रयत्न झाला आहे. मला तरी तें थोडं विसंगवता टलं·

एक एक महाद्वार उघडलं गेलं. आम्ही गर्भागारांत प्रविष्ट झालो. भगवान् रामेश्वर उद्याप उठले नव्हते. मंदिरांतले मानकरी त्यांना आता उठवण्याच्या सिद्धतेला लागले होते.

सगळीकडे सडासंमार्जन झालं होतं. चंदन उगाळून तयार होतं. पुष्पपत्रीचे करंडे भरले होते. दीपावलींच्या वाती तेल पावून सरश्या होत होत्या. आमच्या मनींमानसीं दाटलेल्या शिवाराधनेच्या उत्कंठा रामनाथस्वामींना 'उत्तिष्ठोत्तिष्ठ' म्हणून हलक्या आवाजांत हांक घालीत होत्या. कुठल्याकुठे आमची कर्मभूमि आणि किती आमच्यामागे संसारव्यापांचा जंजाळ. त्यातून आज सुटून इथे आलो होतों ते त्यांच्या दर्शनाच्या अट्टाहासानेच नव्हे का ?

एकाएकी ऐकूं आल्या मृदंगम्च्या तालांतल्या नागस्वरांच्या स्वरलहरी. तिकडे वळून सर्वांनी नमस्कार केला. ज्या मणिलिंगाचं पूजन बघायला आम्ही आलों होतों तेंच लव्याजन्यासहित आणलं जात होतं. पुरोहित गर्भागाराच्या द्वाराशीं पोहोचतांच दार उघडलं गेलं. संपुष्टांतून तें मणिलिंग बाहेर काढून त्या विशिष्ट स्थंडिलावर ठेवलें गेलें. मी उभी राहून बघूं लागले. मला कांहीच दिसेना. एवढ्यांत वेदऋचांच्या घोषांत त्यावर दुग्धाभिषेक व्हायला लागला. आणि काय आश्चर्य ! त्या दुधाच्या पार्श्वभूमीवर त्या मणिलिंगाचा आकार सलग झाला. संपूर्ण पारदर्शी स्फटिकाचं हें प्रासादिकलिंग आहे. चंदनाचं त्रिपुंड्र लावल्यानंतर फक्त गंधच दिसावं एवढं आरसपानी आहे तें. अवघ्या सात मिनिटांत धूपदीपासह साभिषेक पूजा झाली आणि मंत्रोच्चारांच्या घोषांतच परत तें मणिलिंग त्या संपुष्टांतून माघारीं गेलं.

दर्शनोत्सुकांच्या हातावर चंदनाचा लेप पसायदानासारखा मिळाला. गर्दी पांगली गेली. आम्ही आमच्या जिज्ञासेच्या मागे फिरायला मोकळे झालों.

या मंदिरांत गाइल्या जाणाऱ्या एका गीताचा अर्थ एक बाई सांगत होती

मला. जनकनंदिनी जानकीने तिचें उर्वरित सुखस्वास्थ्य नष्ट करण्यासाठी आलेल्या दुष्टबुद्धि मारीचाला ओळखलं नाही. त्याच्या मायावी आवरणाला ती सुवर्णमृग समजली. मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्र दैवाच्या गतिविधीला जाणू शकले नाहीत. जं घडूं नये तें घडलं. अघटित घडलं. पण अघटित तरी एका दृष्टीनं इष्ट असंच घडलं. कारण त्यामुळेच तर पर्यायाने रामेश्वर महालिंगाची इथे प्रतिष्ठापना झाली.

माझ्या दृष्टीसमोर तो पौराणिक संदर्भ जुळून आला. प्रभूंनी लंकाधिपती रावणाचा पराजय केला आणि देवी वैदेहीला घेऊन ते ऐल आले. त्यांच्यासाठी प्राणाचा सेतु करूं पाहणारा सगळा दळभार बरोबर आला. श्रीरामांनी रावणाला मारलें. तो परदारा परद्रव्यहारक होता. चौदाहि भुवनें त्याच्यामुळे त्राहि त्राहि झालीं होती. रावणाच्या नाशामुळे त्यांना संरक्षण मिळालें होतें. नक्षत्र देवतांना अभय मिळालें होतें. ऋषिमुनींना त्यांच्या यज्ञयागासाठी अष्टदिशा मोकळ्या झाल्या होत्या. ब्रह्मज्ञांना 'उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया' असेंहि झालें होतें पण रावणसुद्धा ब्रह्मकुलोत्पन्न होता. महर्षि पुलस्त्यांचा तो नातू होता. रामाच्या हातून सद्हेतुपूर्वक कां होईना, पण एक ब्रह्महत्या झाली होती. सुकुमारी सीतेने आपल्या सतित्वाच्या सोन्याचा कस अग्निपरिक्षेनं नरांना, वानरांना, राजांना, महाराजांना, ऋषींना, महर्षींना याच ठिकाणीं दाखवला. हो, या ठिकाणाला पूर्वी गंधमादन पर्वत असं नांव होतं !

सीता अकलंक झाली. पण प्रभूंना ब्रह्महत्येच्या लोकाचाराची मर्यादा छळूं लागली. अगस्तींनी सुचवलं की सर्वदाहक हलाहलालाहि पचवूं शकणारे, निष्प्रभ ठरवणारे भगवान शिव असें हें एकच दैवत आहे की जें तुझ्या दोषाला दूर करूं शकेल. म्हणून, हे श्रीरामा, तूं त्याच शिवशंकराला शरण जा. त्याचं ज्योतिर्लिंग येथे स्थापन कर. आणि त्याची विधिवत् पूजा करून दोषमुक्त हो. विभीषणानेहि त्याच गोष्टीचं समर्थन करून म्हटलं, "होय प्रभु. हे करणं उचित असंच होईल. आणि या स्वरूपांत तुमच्या दक्षिणदिग्विजयाचं आणि रावणसंहाराचं चिरंतन स्मारकहि होईल."

प्रभूंनी ती गोष्ट मान्य केली. 'धर्माचें पाळण करणें पाषांड खंडण' हाच तर त्यांच्या अवताराचा हेतु होता. नाहीतर प्रायश्चित्तादि लोकोपचाराचा

त्या पूर्णब्रह्म परमात्म्याचा काय संबंध होता ? श्रद्धेय मैथिलीशरण यांनी म्हटलं आहे

" किसलिए यह खेल प्रभु ने है किया ?
मनुज बनकर मानवी का पय पिया ?
भक्तवत्सलता इसी का नाम है
और वह लोकेश लीलाधाम है ॥"

कामाला सुरुवात झाली. भूमिपूजन झालं. सेतु बांधणारी मंडळी दगड-विटांनी संकल्पित वास्तु आकारांत आणूं लागली. शिवशंकराचं दिव्य लिंग आणण्यासाठी हनुमंताने उत्तरेकडे झेप घेतली. पण त्यांना त्यांचं इच्छित लवकर मिळून ते योग्य वेळीं परतले असते तर औचित्य कसं साधलं असतं रामकथेचं ? हनुमंताला हवें तें शिवलिंग मिळेना. इकडे सगळी सिद्धता होऊन वाट पहाणाऱ्या मंडळीपुढे मुहूर्त टळण्याचं संकट उभं राहिलं. शेवटीं भगवती सीतेनं तो प्रश्न सोडवला. ती उठली. समुद्रसंगमांतल्या सर्व तीर्थांना आवाहून तिने स्नान केलं. अत्यंत शुचिशिव होऊन समुद्राकाठची वालुका



आपल्या नाजूक हातीं घेऊन मंदिराच्या गाभाऱ्यांत तिने शिवलिंगाचा आकार तयार केला. पुरोहितांनी प्रतिष्ठापनेचे विधिपूर्वक मंत्रोच्चार केले आणि रामसेनेने कृतज्ञतापूर्वक शिवराज्यारोहणाचा तो उत्सव हंसून नाचून साजरा केला.

मग कुठे शिवलिंगासहित मारुतीने रामेश्वराच्या रंगभूमीवर प्रवेश केला. त्याला आधीचें सारें कळलें तेव्हा खूप राग आला. श्रीरामांनी त्याला समजावलें, परंतु तो ऐकेना. शेवटी " बरं बाबा, आता हें स्थापन केलेलें शिवलिंग तूं सरकव, म्हणजे या जागेवर तूं आणलेलं शिवलिंग प्रतिष्ठित करूं " अशी सीतामाईंनी परवानगी दिली. मारुतीने आपल्या सर्व सामर्थ्यानिशी त्याला हलविण्याचा प्रयत्न केला. पण तें हाललें नाही. मारुतीचें शरीर मात्र खिळखिळे झालें. शेवटी अगस्ति म्हणाले– " प्रत्यक्ष जगन्मातेने या शिवाला जन्म दिला आहे. तें अगदी सत्यासारखें अबाधित अविचलच राहणार." हनुमंताने सीतामाईचे पाय धरले.

आजच्या रामेश्वराच्या परिवारांत या सगळ्या खुणा मूर्तिबद्ध आहेत. त्याबरोबरच मारुतीने आणलेलें आणि मागाहून स्थापन केलेलें शिवलिंग 'काशीविश्वेश्वर' नाथ, म्हणून प्रसिद्ध आहे. विकलांग हनुमंतहि तसाच उभा आहे.

हें सगळं आठवलं आणि असं वाटायला लागलं की आपण किती भाग्यवान. प्रत्यक्ष प्रभूनी स्थापन केलेलं शिवपीठ आणि सीतामाईंनी वसवलेलं हें ज्योतिर्मय लिंग आपण डोळाभरी बघतों आहोंत. या पार्श्वभूमीवर, हृदयांत अगदी जपून ठेवलेली एक अद्‌भुतरम्य कथा आठवली.

भगवान रामकृष्णांच्या महाप्रयाणानंतर देवी शारदामणि त्यांच्या इच्छेप्रमाणे भारतभ्रमण करीत रामेश्वरक्षेत्रीं आल्या, बरोबर रामकृष्णदेवांचें छायाचित्र घेऊन. अशीं उभयतां दक्षिणापंथी तीर्थयात्रा करत होतीं. रामनाड संस्थानचे त्या काळचे महाराज स्वामीजींचे अनुग्रहित होते. स्वामीजींच्या मातुश्री रामेश्वरम्‌ला येणार म्हणून साहजिकच त्यांनी त्यांच्या स्वागताची उत्तम तयारी केली. मंदिराची सर्व द्वारे स्वागतासाठी उघडी ठेवून लतापल्लवांनी शृंगारलीं. मंदिरप्राकारांत केशरकुंकुमाचें संमार्जन केलें. गुरुमातेच्या

रामेश्वरपूजनासाठी उत्कृष्ट पूजासामुग्रीची सिद्धता केली. सर्व मांगलिक द्रव्यांबरोबर सुवर्णाची विल्वपत्रेंहि तयार ठेवली. शारदादेवी आल्या आणि महाराजांनी आपल्या स्वागतसत्कारांचा त्यांच्यावर वर्षाव केला. जेव्हा शारदामां रामकृष्णांच्या छायाचित्रासमवेत रामेश्वरस्वामींच्या गाभाऱ्याकडे येऊं लागल्या तेव्हा ती सगळी तयारी त्यांच्या पाठोपाठ तेथे येऊन पोहचू लागली.

शारदामां जवळ आल्या. रामेश्वराचा श्रीविग्रह त्यांनी डोळाभरी पाहिला. अनिमिष नेत्रांनी न्याहाळला. त्यांचे नेत्र झाकाळले. वात्सल्याने आईचें अंतःकरण भरून आलें. अष्टसात्त्विक भावांनी अंगी रोमांच दाटले. हळूहळू खाली बसल्या त्या. ओठ प्रस्फुरले आणि हळूच एकच वाक्य तोंडाबाहेर पडलें– ‘त्या वेळी जसा मीं तयार केला–आजहि अगदी तसाच आहेस.’

माझ्या आठवणींनं मला अगदी गुदमरून टाकलें. डोळे वेड्यासारखे भरून आले. आपल्याच उरी हात लावून मीं मनांत म्हटलं, ‘त्रिभुवनमोहिनी, वात्सल्यमयी आई ! तुझ्या चरणांचें कोटी कोटी चुंबन !’

बाकी मंडळी फरशीवर विसावली होती. मी एकटीच देवद्वाराजवळ उभी होतें. आत तऱ्हेतऱ्हेची पूजाअर्चा चाललेली होती. ज्योतीच्या प्रभावळी उजळत होत्या. पूजा-उपकरणांची, मोठमोठ्या अभिषेकपात्रांची दाटीवाटी दिसत होती. आणि बाहेर वेगवेगळ्या प्रकारचे यात्रेकरू गर्दी करत होते. शिवहरे, शिवहरेच्या गर्जना होत होत्या. तर मधेच ‘नमःशिवाय’ची घनगंभीर ललकारी उठत होती. सर्वांचे सर्व पूजाद्रव्य घेऊन तें श्रीचरणी रुज करतांना, लांबून महत्प्रयासाने आणलेलें गंगाजळ रामेश्वरस्वामींच्या लिंगमूर्तीवर चढवतांना मंदिर पुरोहितांची धांवपळ चाललीं होती.

भिन्न वेशांचे, भिन्न प्रांतांचे नि विविध व्यवसायांचे स्त्रीपुरुष, लहानथोर, तडीतापसी, संन्यासी-बैरागी, शैव-वैष्णव, नाना पंथाचे, नाना जातिभेदाचे–सगळ्यांचे सगळे भाविकगण येथे वैचित्र्याने एकत्र आले होतें. उत्तरपथाचा यात्रिक हिमालयाच्या कुशींतून, पश्चिम किनाऱ्याचा यात्रेकरू सोमनाथाचा तर पूर्वेचा भक्त जगन्नाथाचा संदेश घेऊन रामेश्वर भेटी आले होते. मला तर ज्ञानदेवांचा कापडीहि दिसला तिथे. ‘मिळाल्या संत-

मांदीचे रजरेणु वंदिणारा,' 'ॐ नमो शिवा आदि कावडी खांदी' घेणारा आणि 'शीतळ शिवनाम मुखी सेवणारा' कापडी आठवला. 'उत्तरपंथीचे पंढरपुरीचे आम्ही कापडी रे' म्हणून स्वतःची ओळखी करून देणारा, 'समतेच्या कावडीमाजी नामामृत भरले आवडी' म्हणून आपल्या व्यवसायाची आणि 'सुख कोंदले चहुकडे रे' म्हणून स्वतःच्या अवस्थेची ओळख करून देणारा कापडी डोळ्यासमोर उभा राहिला.

भारतांतल्या सगळ्या श्रद्धांचे जलौघ एके ठायीं आल्यासारखे वाटत होते. आणि रामेश्वराच्या चरणांजवळ त्यांचा सुरेख संस्कृतिसंगम झाल्यासारखा दिसत होता. या विशाल भारताच्या सांस्कृतिक जीवनाच्या एकतेचें प्रतीक हा 'हिमवत् रामेश्वरसेतुपर्यंतम्' सार्थ करून दाखवत होता. महिम्नकारांनी म्हटलेंच आहे--

"रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिल नानापथजुषां
नृणाम् एकोऽगम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥"

आता नित्याप्रमाणे मंदिराची परिक्रमा करत त्याचा तो भव्य विस्तार डोळ्याखालून घालायचा होता. सकाळी पाहिलेल्या त्या मोठमोठाल्या ओवऱ्या नि ते विशालकाय स्तंभ बघायचे होते. हें अफाट विस्ताराचें मंदिर १८६५ फूट लांब आणि १६५७ फूट रुंद आहे म्हणतात. प्रत्येक दिशेला एक गोपुर आहे. परंतु तीं अपूर्ण स्वरूपांत आहेत. फक्त पश्चिमेकडचे ७८ फूट उंचीचें गोपुर पूर्णाकारांत आहे. प्रदक्षिणेचे ३ प्राकार आहेत. त्यांच्याभोवती खूप उंचउंच असे पक्क्या बांधणीचे कोट आहेत. गर्भगृहाच्या भोवतीच्या परिक्रमांची दालनें कशीं सुंदर द्राविडी कलांनी नटलेली आहेत. हे प्रत्येक दालन जवळजवळ हजारबाराशे फूट लांबीचें आहे. प्रत्येक स्तंभ इतका भक्कम नि सुदर आहे नी हेच मंदिराचें खरें वैभव आहे, याच्यामुळेच मंदिराला भव्यता आली आहे असं वाटतं. मानवनिर्मित इथलं हे अचाट कर्तृत्व उत्तुंगतेंत आणि भव्यतेंत हिमशिखरांनाहि आव्हान देईल एवढं दैदीप्यमान आहे.

कैक पिढ्यांच हे वास्तुशिल्प 'निर्मिलं' आहे. आणि रामनाड संस्थानाधिपतींनी आपली आयुष्यं खर्ची घालून निर्मितीचं हे काम कुलधर्म-कुलाचारासारखं नेकीने पुढे चालवलं आहे.

सन १३११ तल्या मलिका काफूरच्या स्वारीनंतर प्रमुख प्रमुख मंदिरं, महत्त्वाची भवनं १४१४ मध्ये राजा उदयन याने लंका राजपुत्राच्या साह्याने उभी केली. इथले संस्थानाधिपति उदयन सेतुपाठी, किरणराय दलवइ या सगळ्या सेतुपाठी राजपरिवाराने आपल्या कल्पनांनी आणि ऐश्वर्याने ही सगळी द्राविड स्थापत्यकला सुमारें साडेतीनशे वर्षे आकाराला आणून दक्षिणचं हें अंतिम टोक दैदीप्यमान केले आहे. यांत सेतुपाठींना ज्यांनी साह्य केलें त्यांच्याहि आकृत्या इथे प्रस्तरबद्ध करून जतन केल्या आहेत. दाक्षिणात्य पद्धतीच्या मंदिरासारखे प्रत्येक वैशिष्टच इथे प्रकर्षाने दिसते. रामलिंगस्वामींजवळ सर्वार्थसाधिका शिवा 'पर्वतवर्धिनी' 'अम्मा' या नांवाने उभी आहे. आणि काशीविश्वनाथाबरोबर तीच 'विशालाक्षी अम्मा' म्हणून प्रसिद्धि पावली आहे. पुढे सोनपत्र्याने मढवलेला गरुडस्तंभ आहे. मंदिराच्या प्राकारांत २४ वेगवेगळीं महिमामयी तीर्थे आहेत.

एक गोष्ट मात्र खटकते. हे सगळे निर्माण करणाऱ्यांची लोककल्याणाची भावना समजूं शकते, त्याविषयी कृतज्ञताहि वाटते; पण आज केवळ सार्वजनिक धर्मशाळेइतकीच किंमत त्याला देणाऱ्या आजच्या व्यवस्थेची अकर्मण्यता मात्र समजू शकत नाही. त्या सगळ्या तीर्थकुंडांत स्नान करतांना फक्त आपलं काल्पनिक पाप धुण्याचा भोळ्याभावड्यांचा प्रयत्न असतो. परंतु माती लपेटून तिथल्या तिथेच त्या संकुचित जागेत स्नान करून आपण तें आपले पाप किती लोकांना उपद्रव करण्यासाठी तिथेच ठेवतों हे कुणालाच उमजत नाही. अशा वेळी मन अप्रसन्न होतें. आमच्या कर्मठपणाबरोबरच वैशिष्टचाने आढळणारा आमचा बेपर्वाई मद पाहून विषाद वाटतो.

या पार्श्वभूमिवर ख्रिस्ती प्रार्थनामंदिरं आपल्या नीटनेटकेपणाने, स्वच्छतेने नजरेंने भरतात. सामान्य मनुष्याच्या श्रद्धेला प्रभूच्या सान्निध्यांत नेण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असतें. निरागस लहान लेकरांना प्रभूच्या कृपाछत्राखाली उचित शैक्षणिक संस्कार करण्याची कळवळ ती दाखवतात. प्रभूच्या छायाछत्राखाली आपण सारे भेदभावरहित एकसंघ, एक कुटुंब आहोत असें समजण्यासमजावण्याचा ती अट्टाहास करतात. खरंच आम्हांला हे केव्हा साधणार आहे कुणास ठाऊक ? किमान आम्हांला ही दृष्टि तरी लाभणार आहे की नाही ? कांही सांगतां येत नाही.

विचारांना तसेच हेलकावत ठेवून समुद्रातीरावर आलो. युगानुयुगे लाटांच्या कावडी रामेश्वराच्या चरणीं आणणाऱ्या धवल तुषारांचे हार रामलिंगस्वामींवर उधळणाऱ्या त्या महोदधीला पाहिले. सकाळच्या १०–११ च्या कडक उन्हांत हिरव्या पाचूंचें रानच वाऱ्याच्या झुळकांबरोबर हेलकावत आहे असं वाटत होतं. पांढरपिंगट चमकत्या रेतीशीं किती सुरेख संवादित्व साधले होतें. रंगीबेरंगीं मोत्यांचे वर्ण ल्यायलेली शंखशिपल्यांची खडीहि किती छान छान दिसत होती. आणि समुद्रसंगमाच्या अंथरलेल्या या सुरेख रत्नासनावर समुद्रभिमुख शिष्यवृंदासमवेत आसनस्थ झाले आहेत भगवद्-पूज्यपाद शंकराचार्य. अगदी अलिकडेच हे महत्त्वपूर्ण स्थान तयार झाले आहे. कन्याकुमारीच्या खडकावर जसे स्वामीजी तसे रामेश्वराच्या समुद्र-सौंधावर हे आचार्य शंकर.

त्यानंतर त्या गंधमादन पर्वतक्षेत्रांतल्या रामजानकीच्या अद्याप सांभाळून ठेवलेल्या पावनस्मृति पाहिल्या. रामझरोका, दर्भशयन. शांत आणि शीतळ अशीं हीं ठिकाणं. मनाला कांही वेगळाच उल्हास देतात.

परत रामेश्वराचे दर्शन घेतलें. प्रसाद घेतला आणि निरोप घेतला. गाडी पांबनहून सुटली. पण आता चहुकडे शांति दाटली होती. दर्शनतृप्तीची असेल. लोहसेतु जरा मऊ हाताने धिमिद्धिमि करत होता. तर समुद्र-लहरीच्या संगीतांतून वीणेच्या तरंगतारा झंकृत होत होत्या. मन उन्मन होत होतं, हृदयीच्या रामेश्वराचं स्तवन करीत होतं. "शांतं पद्मासनस्थं शशधरमुकुटम् .. !"

---

५

# श्रीरंगी रंगनाथ

रामेश्वराच्या यात्रेंत लक्षांत राहिले ते पांढऱ्या स्वच्छ वाळूचे ढीग आणि लोहसेतूवरून दणदणत जाणाऱ्या गाडीला वाट करून देणारा तुफान दर्या. प्रभुप्रेमाच्या मार्गीचा फेसाळ साक्षीदार. दर्शनार्थींच्या दर्शनासाठी अंतरींच्या उर्मींनी उचंबळणारा वाटाड्या. ज्या दिवशीं -नव्हे ज्या रात्रीं आम्हीं रामेश्वर सोडलें ती रात्र कुमुदयामिनी होती. साकेतकार म्हणतात,

चारुचंद्रकी चंचल किरणें खेल रही थी जलथल में ।
स्वच्छ चांदनी बिछी हुई है, अवनि और अंबरतल में ।।

त्याप्रमाणे सगळीकडे कसें दुधाळ चांदणें पसरलें होतें. ते पांढऱ्या रेतीचे डोंगर जणु हिमाच्छादित वाटत होते, तर सागर आपल्याच जागीं चंद्रिका दुग्धाने नहात होता. प्रत्येक लाट जणु त्या वर्षावांत बागडत होती. माझ्या मनींची अनामिक भावना अपार आनंदाने थिरकत होती. तिनेहि एक अव्यक्त शरीर धारण केलंसं वाटत होतं. आणि अपार आनंदचंद्रिकेच्या दशकोटी ज्योति तिच्या अंगप्रत्यंगांतून उजळत असल्याशा वाटत होत्या. मी बघत होतें तें त्रयस्थपणें.

चंचला स्नान कर आवे–चंद्रिकापर्व में जैसी ।

उस पावन तन की शोभा आलोकमधुर थी ऐसी ।।

मी माझ्या आनंदोर्मीचें स्वरूप समजूं बघत होतें, तर इकडे गाडी पुढें सरकत होती. तो श्वेतसिक्त पुलिन मागे पडला होता. पण चांदण्यांचं तें रुपेरी स्वप्न आमच्या बरोबर येत होतं. आमच्या वेगानं. आमच्या ओढीनं !

आता कुठे जायचं हा प्रश्नच नव्हता. गाडी नेईल तिकडे, हेंहि तितकंसं खरं नव्हतं. संकल्प उत्पन्न करणाराच आता संकल्पपूर्तीसाठी आम्हांला हातीं धरून नेत होता. तो आपल्या अपार वैभवाचं एक एक दालन, आपल्या महत्तेचं एक एक ठिकाण, आपल्या प्रेमाचं एक एक कपाट उघडून दाखवत होता. त्याच्या कल्पतरूच्या छायेंत इच्छिलें तें प्रत्यक्ष होण्याचें सामर्थ्य असल्याचा प्रत्यय येत होता. आता आमचं लक्ष्य होतं त्रिचनापल्ली.

पहाटे पहाटे त्रिचनापल्लीला पोहोचलों. दक्षिणेंतील पूर्व-पश्चिम बाजूच्या महत्त्वाच्या भागांना रेल्वेच्या जाळ्यांनी सांधणारें खूप मोठें गजबजीचें स्टेशन आहे हें. तिरुची किंवा त्रिच्ची हें त्रिचनापल्लीचं लाडकं नांव. खरं नांव जें आता अस्तित्वांत आहे तें तिरुचिरापल्ली. आपला आब राखीत हें सुबक स्टेशन प्रवाशांच्या मनावर छाप टाकतं.

आम्ही स्टेशनाबाहेर आलों. अद्याप अंधार हटला नव्हता. दिव्यांची ड्यूटी संपली नव्हती. पहाटवारे अंगाला झोंबत होते. प्रथम गाठावयाचें होतें श्रीरंगम्. या त्रिच्ची स्टेशनपासून तें सहा मैल दूर होतें. जवळच्याच बसस्टॉपवर उभे राहिलों. आसेतुहिमाचल पसरलेल्या भगवंताच्या विविध आकृतींनी नटलेल्या विराट स्वरूपाचें दर्शन आता श्रीरगम्मध्ये कुठल्या रूपांत होतें याची उत्सुकता लागली होती. ही उत्कंठा गेले आठ दिवस आम्हांला चैन पडूं देत नव्हती. भुकेच्या वेळीं भुकेची शुद्ध नव्हती. प्रवासाच्या वेळीं होणाऱ्या दगदगीची क्षिती वाटत नव्हती. सगळ्या शरीराची भूकतहान जणु डोळ्यांमधे एकवटली होती. अधिकाधिक बघण्याची लालसा वाढत होती, तृप्तीचें नांवच घेत नव्हती.

बस आली. आम्हांला घेऊन शहराचीं वैशिष्ट्ये दाखवीत कावेरीचा मोठा पूल पार करून ती श्रीरंगम्मधे आली. सामान घेऊन आम्ही नियोजित मुक्कामाकडे चालूं लागलों. श्रीरंगम् अजून त्या पहाटवाऱ्यांत गाढ झोपलं

होतं. ब्रह्मोत्सवाची तयारी ठायीं ठायीं सुरू झाल्यासारखी दिसत होती. श्रीहरीच्या रथोत्सवासाठी ठिकठिकाणीं उंच उंच मंडप घातले होते, नटवले होते.

धर्मशाळेचा दरवाजा ठोठावला. आंत गेल्यावर सामान ठेवून सरळ झोपीं गेलों. सकाळ व्हायला अद्याप एकदीड तास अवकाश होता. आणि प्रवासांत एवढा वेळ कांही कमी महत्त्वाचा नसतो.

जाग आली ती भगवंताच्या गुणानुवादाच्या खडया स्वरांतल्या भजनाने. धर्मशाळेचे राजस्थानी व्यवस्थापक पूजा करीत होते आणि मुखाने नामस्मरण चाललें होतें. आम्ही स्वतःलाच 'उत्तिष्ठोत्तिष्ठ' केलं. प्रातर्विधि, स्नान वगैरे आटोपून बाहेर पडलों. नेहमीप्रमाणे पहिली धाव मंदिराकडे होती. पण जेव्हा का समजलं की आम्ही मंदिरातच होतों, तेव्हा मात्र चकित व्हायला झाल. या गावांत श्रीरंगाचं मंदिर नाही, तर श्रीरंगाच्या मंदिरामध्येच हे सबंध गांव वसलं आहे. यावरून त्या मंदिराच्या आकाराची कल्पना यावी. तव्वल आठ मैल लांबरुंद एवढ्या प्रचंड प्राकारांत हे मंदिर विस्तारलं आहे. दाक्षिणात्य पद्धतीची मंदिराची रचना आहे. एकांत एक असे सात प्राकार आहेत आणि लहान मोठी अठरा गोपुरे आहेत. तिकडे भगवान् व्यंकटेश सप्तशैलावर विराजमान आहे तर इकडे हा श्रीरंगस्वामी सप्तप्राकाराच्या आंत शेषशय्येवर पहुडला आहे !

आम्ही निघालों तेव्हा मंदिरात उत्सवाची गडबड चालू होती, आणि दर्शन बंद होतं. बरोबर आहे. घरांत मंगलकार्याची धांवपळ सुरू झाली की यजमान भेटणं कठीण ! पण अप्रतिहत उत्साह हें त्यानेच दिलेलें वरदान होते. त्याच्या दर्शन सुखाची कोठी लुटताना त्याने बाहेर मांडून ठेवलेल्या त्या बाजारपेठेतल्या दोन मुठीहि आम्हांला बरोबर न्यायाच्या होत्या. म्हणून आम्ही त्या मंदिरांत नगरप्रदक्षिणा करूं लागलो.

त्या सातहि प्राकारांत मोठमोठ्या बाजारपेठा, अनेक धनिकांची वस्ती आणि देवघेवींचा झगमगाट आहे. चवथ्या प्राकारांत लहानमोठ्या दगडी मंडपांसमवेत एक सहस्त्रस्तंभी मंडप आहे. या सगळ्या मंडपांतून उत्कृष्ट कलाकृतींचा नुसता वर्षाव झाला आहे. प्रवासाच्या सुरवातीपासून या दगडी

शिल्पांची ही दुनिया मी बघते आहें. तेच तेंच नजरेला रोज पडत आहे. त्या विशालपणाची, सौंदर्याची आणि अपार मेहनतीची आता अगदी सवय झाली आहे. पण काय सांगावें ! त्यांतले नित्य नाविन्य मात्र संपले नाही, अशी अवस्था आहे. कांही ठिकाणी तर थांबल्याशिवाय, नीट न्याहाळल्या-शिवाय पुढे पाऊलच पडत नाही. हा सगळा उपद्व्याप पाहिला की उगीचच 'डोळा नीर दाटे' असे होतें. वाटतें, या लोकांनी अगदी सैनिकांच्या जिद्दीने लढून आपल्या पिढ्यान्पिढ्यांच्या जीवनांचं अमोलिक धन भरी घालून कशासाठी एवढा आटापिटा केला ? आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी त्यांनी करून ठेवलेला हा अट्टाहास किती अपूर्व आहे याचे दर्शन त्यांतली प्रत्येक आकृति देते. पुरुषाकृतीच्या नेत्रभृकुटीची ठेवण, रमणीच्या नाजूक कमरेची मुलायम लोच आणि एखाद्या सालंकृत अश्वाच्या मानेचा ऐटदार बाक पुढे जाऊंच देत नाहीत. मंदिराचं भूवैकुंठ करून सोडणाऱ्या अशा शिल्पाकृति हजारोंनी नव्हे अक्षरशः लाखोंनी आहेत. आणि खरें तर त्यांच्यामुळेच श्रीरंगम्चे भूवैकुंठ झाले आहे.

हे सगळं बघत माणूस पांचव्या परिक्रमेत येतो. वैष्णवास्त्रांची म्हणजें शंखचक्रांची मंदिरं बघत दक्षिण गोपुराच्या छायेंत असलेल्या गरुडमंडपात विसावतो. नेहमीप्रमाणे मोठा सुवर्णवेष्टित गरुडस्तंभ आणि ध्वजवेदी तिथे आहे. पण समोरच्या उंचशा मंडपात गरुडाची उच मूर्ती आहे. वीरासन घातलेली ही मूर्ति म्हणजे दोन मजली इमारत किंवा वीस फूट उंच असा एक छोटा जयस्तंभच आहे. आत सहावी परिक्रमा. तेथून श्रीरंगाच्या निजमंदिराचे बंद द्वार दिसत होते. आणि सातव्या परिक्रमेत मंदिर अशी एकूण रचना आहे.

गरुड मंडपातील डाव्या बाजूच्या प्राकारामध्ये चंद्रपुष्करिणीजवळ गेलों. छानदार गोलाकार सरोवर आहे हे. भाविक मंडळी दर्शनाआधी इथे स्नान करतात. अगोदर इथल्या तीर्थाचे अवगाहन. मग दर्शनप्रसादाचा लाभ. या पुष्करिणीच्या तीरावर भगवताची सहचारिणीं भगवती महालक्ष्मी वसली आहे. तिचं दर्शन म्हणजे कल्पवृक्षातळीची छाया आहे हे सांगणारा एक वृक्ष आहे आणि त्याचं नांवहि कल्पवृक्ष आहे. श्रीरंगनाथ या उत्सवात जलक्रीडा

करतील ; त्याच्यासाठी जलयात्रा सजवणं चाललं होतं आणि त्या विशाल मंदिरात वसून ती श्रीदेवी जणु सोत्सुक नजरेने देखरेख करत होती. स्त्रिया हळदींकुकवाची वायन वाहत होत्या. खणानारळाने जगदंबेची ओटी भरत होत्या. आणि तोच प्रसाद परत ओटीत घेत होत्या. देवीचं सालंकृत गोड ध्यान मनी साठवून घेतलं. तिला इथे रंगनायकी म्हणतात. रंगनाथाच्या त्या रंगनायिकेचं दर्शन घेतलं. तीर्थप्रसाद घेतला आणि त्या प्राचीन राममंदिरासमोरच्या 'कंब मंडपां' त आलों.

इथे तामिळ कविवर कंबनाला रामायण स्फुरले. इथे वसून त्याने ते समस्तांना ऐकवले. इथल्या वास्तूच्या प्रत्येक भागाने ते ऐकले. तिथल्या मंदिरा मंदिरातून प्रतिध्वनि आला. " धन्य महाकवि कंबन् ! " त्या महामंडपाने ते प्रतिध्वनी साठवले अन् तो स्वतःच 'कंब मंडप' होऊन गेला. तें रामायणहि 'कंब रामायण' ह्या नावांनेच प्रसिद्धि पावले. पण तिरुवल्लुवर कविपुंगवासारखे कविकंबनाचे स्मृतिशिल्प इथे आढळलंनाही.

आता दर्शन घ्यायची घाई झाली. श्रीरंगनाथांनी आम्हाला फार वेळ रेंगाळत ठेवलं होतं. अगदी अर्जुनासारखं. तो विचारा ताटकळत वसून राहिला पायाजवळ. आम्ही मात्र त्या रेंगाळण्यांतहि पुष्कळ साधून घेतलं होतं. अर्जुनाला तो सारथी म्हणून त्या महायुद्धात हवा होता. आमची आपली प्रापंचिक लढाई होती. त्यात फक्त त्याच्या दर्शनसुखाची अवीट अभिलाषा होती.

रांगेत उभे राहिलो. स्वामींचे दर्शन चालू झाले. नेहमीप्रमाणे पावलापावलाने आम्ही त्याच्या निजगृहाकडे चालू लागलो. रांगेच्या या दिव्यांतून कुणी सुटत नव्हता. तो साधु असो का व्यापारी,गृहस्थ असो वा भिकारी, सर्वांनाच त्याच्या दर्शनाची ओढ. त्यांत तिथेच राहणारा असो किंवा हजारो मैल लांबून आलेला असो, प्रेम तेच. त्याला तो तरी, भक्त वत्सल असला तरी काय करणार ? पण या रांगेतल्या उत्कंठेचं महत्त्व मला नेहमी वाटत आलं आहे. पुढच्या साक्षात्काराचं वेगळेपण, दिव्यत्व इथेच साठलेलं असतं. वाहेरचं सगळं हिंडणं, फिरणं, कुतुहूल, जिज्ञासा इथे लोपली असते. वाहेरच्या सगळ्याचं आगळंपण इथे विरून गेलेलं असतं. आणि माणस आपल्या अंतिप

गंतव्याकडेच जणु जाण्यासाठी उभा ठाकतो. मूल बाहेर हवं तर रमेल नाही-तर रमणार नाही. पुढे टाकलेल्या खेळण्याशीं खेळेल नाहीतर नाहीहि खेळणार. पण आईकडे जाण्यासाठी त्याने घेतलेली झेप कोण आवरूं शकणार आहे ? ती झेप मला इथे दिसते. तसलंच अवखळपण मला प्रत्येकाच्या हाल-चालीत प्रकटलेलं दिसतं. मग तो सर्व संगपरित्यागी कां असेना !

गर्भगृहापर्यंत पोहोचलों तो बाहेरचा गोंगाट शांत झाल्यासारखा वाटला. श्रीरंगाची निद्रा भंग होऊ नये म्हणून असेल वा दर्शनसुखाचं आकंठ पान करताना कंठांतून गोंगाट बाहेर पडूंच शकत नसेल म्हणूनही असेल. माझ्या हातीं पूजासहित्य होतं आणि मनांत शिगोशिग भरलेलं श्रद्धा-उत्साहाचं माप. आणि तीच एक खरीखुरी वस्तु होती माझ्याजवळ, त्याला अर्पण करण्याजोगी.

आत पोचलों तशी समोर शेपशय्येवर पहुडलेल्या श्रीरंगांची घनसांवळी मूर्ति दिसू लागली. बाहेरच्या सगळ्या विशालतेच्या मानानं जराशी लहान. पण देहांतल्या हृदयापेक्षा अधिक महत्त्वाची अशी ती मूर्ति पाहिली. पंचमुखी कृष्णशेपानं आपल्या अंगाचं अंथरूण त्याच्यासाठी घातलं आहे आणि वर आपल्या भव्य पांच फणा काढून त्याच्या मुकुटावर छत्र धरलं आहे. नासिकाग्री अर्धोन्मीलित नेत्र आहेत. मुखावर योगनिद्रेचा भाव आहे. त्या निद्रेतहि शंखचक्रगदापद्मादि आयुधं सरसावलेली आहेत. ललाटी गोपीचंदनाचा भव्य त्रिपुंड्र आहे, त्यामध्ये केशरकुंकुमाची उर्ध्वरेखा आहे. मस्तकावर रत्नजडित मुकुट आहे. मकरकलशाकृति कुंडलांनी कर्णसंपुटें झाकून गेलीं आहेत. रुंद जिवणीवरुन ओठावरचं मंदस्मित दृष्ट लावण्याएवढं मधूर आहे. कासे कसिल्या पितांबराचे भर्जरी रुंद काठ शेषाच्या वलयावरून रुळताहेत. श्रीवक्षावर हिऱ्यामाणकांनी जडवलेलं वत्सलांछन उठून दिसत आहे. अंगावरचे, मनगटा-वरचे दंडावरचे सगळे दागिने दाक्षिणात्य ठेवणीचे वैशिष्टच ल्यायलेले आहेत. श्रीदेवी भूदेवीबरोबर पांयापाशी बसली आहे पदसेवा करीत. ज्याच्या भक्तीला भुलन श्रीरंगाचे इथवर यायचं मान्य केलं तो रामभक्त बिभीषणहि इथे आहे. पण त्या सगळ्यामधे बाजूला लावलेल्या दीपप्रकाशात त्याचं तैलाभिषिक्त तप्तकांचनासारखं रसरशीत ध्यान मनाला मोहिनी घालतं.

काळ्या प्रस्तरालाहि देवत्व येण्यासाठी श्रीरंगस्वामींनी त्यावर जी अनुपम

मनोहर कळा आणली होती ती केवळ अवर्णनीय होती. डोळे परत परत त्याच्या शांत मुखमूद्रेकडे, त्याच्या ओठांतल्या त्या सूक्ष्म प्रसन्न स्मितरेखेकडे आकर्षित होऊं लागले. हृदयांत आनंदाचा उमाळा दाटला. भक्तकामकल्पद्रुमासारखा उभा देव ठायीं ठायी पाहिला होता. पण सगळ्यांचीं देणी देऊन, साऱ्यांच्या धणी पुरवून, दमून थकून देव शेषशय्येवर इथे विसावला, झोपला होता. जगदंबेने लगबगीने तीं सुकुमार पाउलं आपल्या अंकीं घेतलीं. तिला तरी हें भाग्य केव्हा मिळायचें ! मी त्या करबद्ध अवस्थेंत कृतार्थ झालें त्याला बघून सगळें बघितलें, त्याला पावून सगळें पावलें, असें मला वाटलें.

अगदी अभावितपणे मी त्याच्या पावलाजवळ सरकलें. मला त्या कृतीचं आजच्याप्रमाणे त्यावेळीहि गोड हसूं आलं होतं. मला त्याच्या पावलावरच्या रेषेंत नाथ बघायचे होते. नाथांच्या प्रतिभेने सगळ्या सतसज्जनांच्या अलंकारांनी पांडुरंगाला सजवलं आणि शेवटीं म्हटलं की " चरणतळी उर्ध्वरेखा। झाला जनार्दनी एका ।। " पांडुरंगाच्या पायाखाली कांही हें बघण्याची सोय नव्हती म्हणून इथे बघूं पाहत होतें. पण " पाया पडू गेले तव पाऊलचि न दिसे ", मग काय दिसणार ? मी गहिंवरून माऊलीच्या शब्दांत म्हणाल्हें, " देखिला देवो ! "

" अनुपम्य मनोहर । कांसे शोभे पितांबर ।
चरणी ब्रीदाचा तोडर । देखिला देवो ।।
योगियाची कासवटी । दावितसे नेत्रपुटी ।
उभा कावेरीच्या तटी । देखिला देवो ।। "

बाहेर आल्यावर पुरोहिताने ओल्या नारळांत केळीं घातलेला प्रसाद हातावर ठेवला. तिथे ओवरीत त्याचा स्वाद घेत बसलों. बसल्याजागी कळमावरचें सुवर्णमंडित श्रीवासुदेवाचें ध्यान दिसत होतें. मन नेहमींच्या संवयीप्रमाणे इतिहासाच्या तपशिलांत शिरलें.

बहुतेक सर्व देवालयं उत्तराभिमुख असतात आणि हा रंगनाथ मात्र दक्षिणाभिमुख कसा ? तो इथे कसा आला ? वस्तुतः दक्षिणभूमि ह्मणजे द्रविडकुलाची. त्यांचें आराध्यदैवत म्हणजे भगवान शंकर. त्यामुळे

दक्षिणेंतली वहुतेक सगळीं तीर्थक्षेत्रें शिवक्षेत्रें आहेत, सुब्रह्मण्यम्‌क्षेत्रें आहेत. तिरुपति क्षेत्राबद्दल सुद्धा इतिहासांत एकमत नाहीं. कुणी तें आधीचें सुब्रह्मण्यम् क्षेत्र आहे असें समजतात. तिरुत्तण्णीच्या सुब्रह्मण्यस्वामीच्या आणि तिरुपतीच्या व्यंकटेशाच्या मूर्तीत विलक्षण साम्य आहे. दोन्ही मूर्तीनी गदेसाठी खाली सोडलेल्या हातांत तिरुत्तण्णीच्या मूर्तीने शूल धारण केला आहे, पण व्यंकटेशाच्या हातांत मात्र गदा वगैरे नाही. इतिहासाचं इतिहासकार जाणोत. भाविकांना तें " वामसव्य भाग, तुका म्हणे एकचि अंग " असें आहे !

हा श्रीरंगाचा श्रीविग्रह स्वतः त्यांनीच तात ब्रह्मदेवाला दिला आणि मनुपुत्र इक्ष्वाकूने त्याला कठोर तपश्चर्येच्या वळावर ब्रह्मदेवापासून प्राप्त केलें. तेव्हापासून श्रीरंग हें इक्ष्वाकु वंशाचें कुलदैवत झालें. दशरथाने अश्वमेध यज्ञ केला. त्यांत चौलसम्राट धर्मवर्मा यालाहि अयोध्येचें निमंत्रण होतें. त्या साऱ्या सोहळ्यांत, धर्म हेंच ज्याचें वर्म आहे त्या धर्मवर्म्याला, फक्त त्या शेषशय्येवर पहुडलेल्या श्रीविष्णूच्या ध्यानाने अधिक प्रभावित केलें. तो परतला, पण त्याला राजैश्वर्य फिकें वाटूं लागलें श्रीरंगप्राप्तीसाठी त्याने कठीण तप केलें. त्याला दृष्टान्त झाला की, ' तप पुरें झालें, मी स्वतःच तुझ्याकडे येणार आहें. ' पुढे रामराज्याभिषेक झाला. लंकाविजयानंतरच्या त्या समारंभांत रामप्रभूंना मदत करणाऱ्या प्रत्येकाचा प्रभु स्वतः परामर्श घेऊं लागले. त्यांत विभीषणाने तोच श्रीविग्रह श्रीरामाजवळ मागितला. त्या उदारांच्या राण्याने आपल्या वचनाच्या मर्यादा जाणणाऱ्या मर्यादापुरुषोत्तमाने विमानासहित श्रीरंगमूर्ति विभीषणाच्या हातीं सोपवली. पण त्याचेहि भानुदासासारखेच झालें. श्रीलंकेंत मूर्ति नेण्यासाठी म्हणून तो सगळा लवाजमा घेऊन कावेरीतीरावर आला. जिथे कावेरीची धार दुभंगून झालेलें एक सुंदरसें मधुवनाचें वेट त्याला दिसलें, तिथे त्याला घडीभर विश्रांति घ्यावीशी वाटली. म्हणून त्याने श्रीरंगमूर्तीला खाली ठेवलें. आपलें नित्यकर्म आवरून तो लंकेत जाण्यासाठी निघाला. पण श्रीरंगस्वामी तेथून उठायला तयार होईनात. त्याने खूप प्रयत्न केले. अनुनयविनय सारं कांही झालं. पण हट्टी रंगनाथ तिथेच हटून बसले. विभीषण फार काकुळती करू लागला, तेव्हा तो दयाघन म्हणाला, " भक्तश्रेष्ठा, तूं लंकेला जा. मी कावेरीच्या परम पुनीत द्वीपांतच राहतो. तसं मी आधी वचन दिलं आहे. मी वचनबद्ध आहे

चौल सम्राटांनी माझ्यासाठी पिढ्यानपिढ्या तपश्चर्या चालवली आहे. तूं



सुखाने लंकेंत राज्य कर. माझी तुझ्याकडे कृपादृष्टि राहावी म्हणून मी लंकेकडेच दक्षिणाभिमुख असा वसतों (म्हणजे पहुडतों). तूं दर्शनला येत जा." विभीषण जड पावलाने लंकेला गेला. आणि हा हट्टी देव तो गेला त्या दिशेला तोंड करून तेव्हापासून इथे असा पहुडला आहे.

त्याच्या या नित्यनिवासामुळे श्रीरंगमंदिर मात्र अष्ट भूवैकुंठांमधे प्रधान वैष्णव पीठ झालें आहे. इथे भगवत्पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यांच्या 'केंवला-द्वैता'ला शह देण्यासाठी 'विशिष्टाद्वैत' तत्त्वज्ञानाची प्रभावी परंपरा निर्माण झाली. भगवान रामानुजाचार्यांनी या तत्त्वप्रवर्तनाचें धुरीणत्व पत्करलें. दक्षिणेकडच्या प्रमुख वैष्णवक्षेत्रांत चालणाऱ्या दैनंदिन कार्यक्रमापासून तो उत्सवादिपर्यंत सगळीकडे आजहि रामानुजांनी घालून दिलेल्या मर्यादा पाळण्यांत येतात. हें श्रीरंगम् क्षेत्र म्हणजे त्यांचें चालतें-बोलतें स्मारकच होय. इथेच जन्मून यमुनाचार्यांच्या परंपरेत प्रविष्ट होऊन तब्बल एकशेवीस वर्षांचे दीर्घ

जीवन त्यांनी व्यतीत केलें. आपल्या सांप्रदायाचीं सारीं सूत्रें त्यांनी इथूनच हालवलीं.

गुरुजनाचाहि अपमान करूं धजणारी कांता त्यागून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली ती ही इथेच. आणि श्रीरंगनाथाचा अनुग्रह मिळवला तोहि इथेच. श्रीरंगाने त्यांच्या सहा प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्यांच्या विद्वत्तेचं कोड पुरवलं.

आजहि लोक शंकराचार्यांनंतर रामानुजाचार्यांचंच नांव घेतात. त्यांना शेषाचा वा लक्ष्मणाचा अवतार समजतात. श्रीरंगम्‌मध्ये राहून त्यांनी आपलें ज्ञानभांडार उघडलें. शास्त्रार्थाच्या सभा चालविल्या. श्रीमत् शंकराचार्यांचे अनुयायी यज्ञमूर्ति यांना त्यांनी इथेच शास्त्रार्थांत पराजित केलं. अनेकानेक विद्वन्मान्य पांडित्यपूर्ण ग्रंथरचना करून त्यांनी अस्तित्वांत असलेल्या तत्कालीन लहानमोठ्या सांप्रदायांची मांदी मेळवली. कैक मठांचें, आचार्यपीठांचें संचालन केलें. प्रथम कर्म, ज्ञान व भक्ति यांचा क्रमपूर्वक समन्वय करून त्यांनी आपलें अलौकिक जीवन संपवलें.

त्यांच्यानंतरहि श्रीरंगम् धर्मपीठाच्या परंपरेंत अनेक ऋषितुल्य संतमहात्मे होऊन गेले. श्रीवेंकटनाथांनी त्यावेळच्या शैव-वैष्णववादाची तीव्रता घालवून हिंदुधर्माच्या उत्कर्षासाठी आपलें जीवन कारणीं लावलें. हे विद्यारण्यांच्या समकालीन होते. सन १३१० मधे मलिक काफूरने दक्षिणेंत स्वारी केली. त्याची झळ श्रीरंगमंदिरालाहि लागली. नाइलाजाने श्रीरंगाचा शेषशायी श्रीविग्रह उचलून तिरुपतीला न्यावा लागला. विजयानगरच्या साम्राज्य-स्थापनेनंतर ती मूर्ति परत स्थापन झाली. पण उत्तरेपेक्षा असे प्रसंग दक्षिणे-कडे अगदी कमी आले.

एवढी प्राचीन परंपरा आणि सर्व भारतामध्ये अतिविशाल असलेलें श्रीरंगम् हें एकच मंदिर आहे की जिथे पूर्वापार चालत आलेलें वैभव आजहि विशेष क्षति न पोहोचलेलें असें बघायला मिळतें. मंदिराच्या प्रचंड तटाबाहेर जवळच श्रीरंगम् स्टेशन आहे. पलीकडे जंबुकेश्वर महादेवाचें सुंदर आणि सुबक देवालय आहे. सभोवतीच्या पंचक्रोशींत श्रीनिवासमंदिर, समयपुरम् मंदिर, आणि ओरैयुर इत्यादि तीर्थक्षेत्रें आपआपल्या परी महिमान्वित आहेत.

श्रीरंगनाथाचा प्रसाद घेतला. शेषसरोवरांतल्या कृष्णकमळासारखी त्याच सुंदर मूर्ति मनांत भरून घेतली. हात जोडून "शांताकारम् भुजगशयनं" म्हणत नमस्कार केला आणि श्रीरंगम्‌चा निरोप घेतला.

पण श्रीरंगम्हून मार्गी लागायच्या आधी त्रिच्ची शहरांत असलेलें विख्यात गणेशमंदिर पाहायचें होतें. वस्तुत: गणेशदर्शनानेच श्रीरंगयात्रेला प्रारंभ करायला हवा होता. पण समय, संधि आणि सोय या त्रिकुटांत माणसाला चालावें लागतें. प्रसंगीं अगदी जवळ येऊनहि, एखाद्या महत्त्वाच्या ठिकाणाविषयी खूप ऐकलेलें असून सुद्धा, पुढच्या सोयीसाठी तें निर्ममपणें सोडून द्यावें लागतें. असें अनेक वेळा घडतें. परत 'याची देहा याची डोळा' तीं ठिकाणी वघणं म्हणजे परत समय, संधि आणि सोय यांचें त्रिकूट आलेंच. असो.

श्रीरंगम्‌मधून बस पकडली आणि तोप्पेकुलम् किंवा तपःकुलम् सरोवराजवळ उतरलों. इथून त्या गणपतीच्या दर्शनासाठी २४० फूट उंच जावं लागतं. मार्गात शिवपार्वतीच्या मंदिराची शोभा बघत श्रीगणेशाच्या भेटीला जायचें. इथे आपल्या भावाप्रमाणे गणपतीनेहि पहाडाचा आश्रय घेतला आहे. मंदिर अगदी छोटें आहे. आंतली मूर्ति मात्र भव्य आहे. त्याला भस्मस्नानाचा उपचार आहे. तेलाचा अभिषेक आहे. दाक्षिणात्यांनी विद्येची ही देवता वालब्रह्मचारी म्हणून मानली आहे. आणि आपल्याकडच्या स्त्रीमुखावलोकनहि निषिद्ध मानणाऱ्या कार्तिक स्वामींना म्हणजेच इकडच्या सुब्रह्मण्य किंवा स्कंद स्वामींना मात्र दोन गृहिणींबरोबर संसार करायला लावला आहे.

त्या महाकाय गणेशाचं दर्शन घेऊन बाहेर आलों. आणि जवळजवळ २४० फूट उंचीवरून त्रिच्चीचं तें विहंगम दृश्य बघूं लागलों. विस्तीर्ण पसरलेल्या नागरीवस्तीच्या ऐन मध्यभागीं उभा असलेला हा गणेशसौध दक्षिणकैलास समजतात. हें 'रॉक टेंपल' पायथ्यापासून वरपर्यंत अनेक देवदेवतांचें दर्शन घडवतें. शिखरावरून सबंध शहराची मांडामांड दाखवतें. वर भिरभिरणाऱ्या वाऱ्याशीं खेळत माणूस ओळखीच्या खुणा आणि त्रिच्चीची आरास न्याहाळूं लागतो.

खाली उतरून रंगीबेरंगी भित्तिचित्रांनी आणि छतचित्रांनी सजविलेलं शिवमंदिर पाहिलं. माता पार्वतीचं इथलं ध्यान अतिसुंदर आणि भावदर्शक

आहे. तिला इंथे 'अम्मा सुगंधिकुतला' म्हणतात. शिवलिंगहि असेंच मोठें आहे आणि तें मंदिराच्या वास्तूबरोबर जागेवरच केलें गेलें असे म्हणतात.

मंडपामध्ये फिरतांना एक सलग चित्रमालिका बघायला मिळाली आणि एक आख्यायिकाहि समजली. एक शिवभक्त वृद्धा लेकीचे दिवस भरत आल्यामुळे लेकीकडे जायला निघाली. पण कावेरीला पूर आला होता. आईच्या पोटांत तुटूं लागलं. तिचं वात्सल्य गलबलूं लागलं. कधी ओसरणार हें पाणी आणि केव्हा जाणार मी पैलतीरी ? उशीर तर होणार नाही ना ? लेक डोळयांत प्राण आणून वाट पाहत असेल ? तिने आपल्या देवतेला हाक घातली, " देवा. माझी आणि माझ्या लेकराची लाज आता तुला ! "

देवाने ती हाक ऐकली. आई अगदी वेळेवर पोचली. लेकीला आनंद झाला. यथाकाल तिची सुटका झाली आणि आईने निरोप घेतला.

आई गेली आणि परत आली. लेकीनें विचारलं. हें काय ?' म्हातारीने पुराची अडचण सांगितली आणि वेळेवर येतां आलं नाही म्हणून ती हळहळली. शेवटी तिला अन् लेकीला कळलं की साक्षात् शिवशंकर आपल्या हाकेला धावून आला–अगदी आईसारखा. अश्रुगद्गद होऊन दोघींनी त्याची स्तुती केली–" त्वमेव माता च पिता त्वमेव ! " म्हणून या शंकराचं नांव आहे 'ता–मनावर' म्हणजेच आई होणारा ईश्वर !

त्या ईश्वराला आम्हीं वंदन केलं आणि स्टेशनकडे कूच केलं. श्रीरंगम्च्या साऱ्या गोड ठिकाणाहून मन परत एकदा विहंगभरारी मारून आलं. परत एकदा श्रीरंगस्वामींना भेटून त्यांच्या कानांत डोकावून हळुवार " वरंय येतो ! ", " आता असो द्यावी दया, तुमच्या लागतसे पाया " म्हणून कुजबुजत्या शब्दांत निरोप घ्यावासा वाटत होता. पण समय, संधि आणि सोय यांच्या त्रितालावर आम्ही पुढच्या ठिकाणाकडे सरकूं लागलों.

———

# ६

# बृहदीश्वर

पहाटे घाईघाई श्रीरंगनाथाचा निरोप घेतला नि तिरुचिरापल्लीला येऊन गाडींत बसलों. सिनेमा-नाटक बघतांना आपण कथावस्तूशीं तन्मय होतो. तिथल्या पात्राशीं एकरूप होतो. तिथल्या वातावरणाशी समरस होतों. एका रंगमंचाशिवाय मागे पुढे आणि आजूबाजूला केवळ अंधार असतो. तसं दख्खनदौलतीच्या या सफरीत आमचं होत होतं. वस्त्रंप्रावरणं बघतांना स्त्रियांना कधी कंटाळा येत नाही. वेगवेगळ्या खाऊच्या लाभांना लहान मुलं सतत लोभावलेली असतात. तसं एकापेक्षा एक विशाल आणि विराट दर्शन होऊन देखील आम्ही आणिकांच्या इच्छेने सतत पुढे ढकललों जात होतों. बघणें–आणि प्रवास करणें एवढ्या दोनच गोष्टी त्या वेळीं आम्हांला दिसत होत्या. बाकी सगळा अंधार आणि अंधार !

स्थानकावर गाडी उभी होती–' तिरुपति एक्सप्रेस ' ! आमचं आवडीचं नांव घेतलेली गाडी. मग उशीर कसला. गाडींत प्रवेश झाला आणि तिने प्रवासाचं शिंग फुंकलं.

वस्तुत: प्रवास करणें रात्रीचें उत्तम. न कळत अंतर कापले जातें. शिण-लेल्या शरीराला विश्रांति मिळते. आणि घरच्यासारखे (तशी सोय झाली

तर) आपल्या गांवांतल्या स्टेशनवरून गाडींत डोळे मिटले की पहाटें डोळे चोळीत पाहुण्यांच्या गांवीं माणूस हजर होतो. पण हें झालं सराइताचं. ज्यांना केवळ प्रवासासाठीच प्रवास करायचा आहे, विविध, विचित्र प्रदेश धांडोळायचा आहे त्यांना गाडींत असं डोळे झाकून कसं चालेल ? केवळ लौकिक पुण्याच्या दृष्टीने अशाप्रकारें डोळे झाकून जे तीर्थयात्रा करून पुण्य जोडीत असतील ते निःसंशय थोर. परंतु हें सर्व करतानांहि मार्गांत प्रभूने विखरून ठेवलेला निसर्ग, हिरव्या सावळ्या वनश्रीतून प्रकट झालेली शस्य-श्यामला मातृभूमीची छबी ज्यांना दिसते ते थोर, विशालदृष्टि, रसिक दर्शनार्थी मला केवळ वंदनीय आहेत. मला त्यांना ' वाट पुसतु ' जायचें आहे. गौरांग महाप्रभूंना सागराच्या निळाईत नीलवर्ण श्यामसुंदराचा साक्षात्कार झाला. मलाहि या सगळ्या निसर्गातून, या सगळ्या नैसर्गिक शिल्पांतून आणि प्रयत्नांच्या शिल्पांनी तयार झालेल्या मंदारांतून त्याची कृपा कोणता रंग धारण करते, कोणता आकार घेते हें बघायचं आहे. तेवढ्यासाठी मी आसुसलेली आहें. म्हणूनच मी हे सगळं सोत्कंठ नजरेने अक्षय बघत आहें !

म्हणून मला आवडतो पहाटेचा प्रवास. उषःकालच्या गुलाबी स्वरांत नट-लेला, गाडीच्या आदितालांत गुंफलेला. गवाक्षाजवळ बसून भुरभुरणारे केस आवरीत, स्पष्ट होत चाललेलं वस्तुजात बघण्यांत किती सौख्य आहे, काय सांगावं ? त्यांतहि अनोळखा प्रांत असावा. गंतव्य स्थान आवडीचं, उत्कंठा वाढवणारं असं असावं. मग तर ' तया सुखा अंतपार नाही ! '--असंच असतं !

तर अशा सुरेख वेळीं आमची गाडी तंजावरला चालली होती. म्हणजे तसं तिला पुढे जायचं होतं. पण आम्हांला तंजावरला उतरवून. प्रवास तसा थोडा होता.

गाडींत तशी विशेष गर्दीहि नव्हती. जी होती ती यात्रेकरूंची नव्हती. तसं पाहिलं तर तंजावर हें मोठमोठे पौराणिक संदर्भप्राप्त तीर्थस्थान नव्हे. अर्थात् पौराणिक संदर्भहि आहेत, तीर्थेहि आहेत, आणि तें क्षेत्रहि आहे. पण दर्शनार्थींची अलोट गर्दी खेचणारे ठिकाण मात्र तें नाही. तंजावर हें शिव-पीठ म्हणून प्रसिद्ध असण्यापेक्षा फार पुरातन कालापासून तें कुठल्या ना

कुठल्या राजघराण्याचं निवासस्थान किंवा राजधानी म्हणून अधिक प्रसिद्ध आहे. आजहि कावेरीच्या तीरावर हे तंजावर शहर शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रवृत्तीचं माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे.

स्टेशनवरून क्लोकरूमचे वगैरे सगळे व्याप उरकून बाहेर पडलो आणि घाईघाईनेच चालूं लागलो. कारण बारा वाजतां मंदिराचीं द्वारें बंद होतात. आम्हांला ते परवडण्यासारखे नव्हतें. जिथे आमचा खरा रोख होता तें प्रथम व्हावें यावर आमचा कटाक्ष होता. तिथे सवडीची सवलत आम्हांला नको होती. म्हणून आम्ही चालत होतों. रस्ता चुकण्याचा प्रश्न नव्हता. दक्षिणेतल्या मंदिरांचीं वैशिष्टयें अशी आहेत की प्रभूचा रस्ता दाखविणारीं दीपस्तंभा-सारखीं उंचउंच गोपुरं त्यांनी अग्रभागी धरली आहेत. कुणाला विचारूं पुसूं नये, सरळ आपलं त्यांच्या रोखाने पुढं निघावं आणि त्यांच्या छत्राखालून परमेश्वराच्या मायेंत शिरावं. महाराष्ट्रासारखे उंच कडेपठारावर बांधलेले किल्ले आणि बुरूज दक्षिणेंत कुठेच नाहीत. पण प्रसंगविशेषीं या गोपुरांनी देखील अशा टेहळ्या बुरुजांचीं कामं फार तत्परतेने केलीं असं म्हणतात.

बृहदीश्वराच्या त्या गोपुरांतून आंत शिरलों. तो आंत विशाल मोकळें मैदान दिसलें. सर्व बाजूंना आपल्याकडच्या तीर्थक्षेत्रांसारख्या पण लांबचलांब ओवऱ्या आणि आजूबाजूच्या छोट्या छोट्या मंदिरांनी घेरलेले बृहदीश्वरांचें विशालकाय आणि उत्तुंग शिखरमंदिर एवढेंच काय तें. एऱ्व्ही सगळा शुक-शुकाट. सगळ्या मदिरांतून गर्दी बघण्याची सवय झालेल्या आम्हांला तें दृश्य अत्यंत वेगळें होतें. अद्यापहि आपल्याकडे कांही हेमाडपंती मदिराच्या वास्तु तग धरून आहेत; पुढे क्वचित तीर्थ आहे आणि आंतला परमेश्वर शाबूत असण्यामुळे तें क्षेत्रहि म्हणायला प्रत्यवाय नसावा; पण पुराणवस्तुसंरक्षक-समितीशिवाय इतर रसिक, भाविक किंवा तत्रस्थ यांना जशी त्याची दाद नसते तसंच इथलं दृश्य दिसलं. नाही म्हणायला देवाला जेवूं घालून स्वतःला जेवायची परवानगी मागण्यासाठी जी कांही दहापांच मानकरी मंडळी तिथे उपस्थित होती तेवढीच काय ती गजबज. बाकी ‘ पाहो तिकडे दिशा ओस ! ’

अर्थात् त्याचा आमच्या उत्साहावर कांही विशेष परिणाम झाला नाही झाली ती फक्त थोडी घाई. कारण त्यांच्या तिथल्या गडबडीनंतर तिथे एकदम वामकुक्षीची शांतता पसरणार होती.

विशेष सायास न करतां आणि रांगांचेंहि दिव्य न करतां आम्ही सरळ बृहदीश्वराच्या गर्भगृहासमोर उभे राहिलो. इतर चिरपरिचित वास्तु-वैशिष्ट्याची विचारपूस करायची होती, पण ती त्याच्या दर्शनानंतर· हिंदींत दर्शनाला साक्षात्कार म्हणतात. म्हणून आधी दर्शन घेतलं. दर्शन कसलं तें ? गर्भगृहांत होता फक्त अंधारच. सर्वेश्वराचीं अनेक प्रसिद्ध ठिकाणं बघितली मी. पण केवळ अपवाद वगळले तर बाकी सगळ्या ठिकाणीं अंधारच कां ? प्रत्यक्ष लिंगविग्रहाची जागा त्या अंधारांतहि खोलच कां? आणि एकूण मंदिराच्या मानाने ती गर्भगृहें एवढीं छोटीं आणि उबट कुबट घाणींनी मलिन कां ?—हें मला अद्यापहि उमगूं शकलं नाही. हजारोंनी त्याचं दर्शन घेतलं तरी त्याची एकान्त समाधि भंगूं नये हा तर त्यामागचा हेतु नसेल ? कांही असो. पण असल्या रूढींना गतानुगतिकतेचीं अक्षम्य पुटं चढून सगळीकडे कशी औदासिन्याची कळा आली आहे.

छोटासा मिणमिणता विजेचा दिवा पुढच्या मंडपांत कसाबसा जळतो आहे· आणि आम्ही डोळे फाडफाडून बृहदीश्वराच्या त्या काळोख्या गाभाऱ्यांत शोध घेत अंदाजाने हात जोडीत आहोंत. हीं वस्तुस्थिति मला ह्या घटके-लाहि बेचैन करते आहे. शेवटीं तामिळ गुरवांना आमची दया आली. आणि ते आरतीसहवर्तमान आंत प्रवेश करते झाले. मग आम्ही पुढे झालों. आणि आमच्या चमत्कारिक कल्पनांच्या अंधारांत बुडालेल्या त्या बृहदाकार भगवंताचें दर्शन घेतलें.

बाहेर मृंदगम्च्या तालावर नागस्वर आभोगी आळवीत होता, तर आंतल्या मंत्रस्वरांत भगवंताला भोग चढवला जात होता. त्याच्या मनांत आम्हांला दर्शन द्यायचें होतें. आम्ही 'शिवराष्ट्रां'तून इतक्या लांब आलो याची त्याला निश्चित जाणीव होती. म्हणून आम्हांला साग्र दर्शन मिळालं. एका प्रचंड शिवलिंगाचं दर्शन आम्हाला घडलं. प्रार्थनेसाठी हात जोडले, पण त्यांत मन ओथंबून येईना. तृप्तता साधेना आणि अंतःकरणाच्या कोपऱ्यांतला तो अंधाराच

सल जाईना. मी व्यथित पण अपराधी भावनेने गहिवरून पुटपुटलें--" माझं श्रद्धाभक्तीचं अतःकरण रितं झालं नाही, पण आज मात्र 'क्षम्यताम् परमेश्वर' ! "

मंदिराच्या बाहेर आलो. ऊन जरा तापलंच होतं. डाव्या बाजूला पार्वतीचं मंदिर आहे. तिथ मात्र सर्वेश्वरीचं सुरेख सालंकृत दर्शन घडलं. विरागी शिवाशीं जन्माचा संबंध जडला म्हणून काय झालं, सौभाग्यवती म्हटलं म्हणजे चारदोन लेणीं, साज पाहिजेतच की. आणि तेवढ्यांनच ती साजरी झाली होती. जातीच्या सुंदरतेला खुलवायला आणखी सौंदर्य कुठून आणायचं ? तिला नमस्कार केला. तिच्या प्रसादातलं अहेव लेणं भाळीं रेखून घेतलं आणि तिच्या छोट्या पण अति सुरेख मंडपांतून बाहेर पडलो. नित्याप्रमाणे शिवपरिवारांतले गणेश व स्कंद हे अन्य दोन सदस्य आपापल्या मंदिरांत दाक्षिणात्या शिल्पाच्या वैभवांत विराजत होते त्यांचेहि दर्शन घेतलें. आणि सबंध प्राकारांत मंदिरप्रदक्षिणा करायच्या आधी एका मोठ्या चौथऱ्यावर असलेल्या अति अवाढव्य नंदिकेश्वराजवळ येऊन विसावलो.

हा नंदिकेश्वर बघून परत रामेश्वरम्‌चा नंदी आठवला. हा नंदीहि खूप मोठ्ठा आहे. अखंड काळ्या पाषाणाचा नंदी त्या उंच चौथऱ्यावर फारच शोभून दिसतो. मंदिराच्या आवारात प्रथम डोळ्यांत भरतो तो हा नंदी. त्याची बसण्याची ऐट आणि अंगावरचा उमदेपणा बघितला की असं वाटतं आताच नगरप्रदक्षिणा करून खाश्या स्वाऱ्यांना आपापल्या स्थानी पोचवून आपल्या नियुक्त ठिकाणीं तो येऊन बसला आहे, आणि आता विचारायचा अवकाश की मंदिराचें माहात्म्य आणि इतिहास तो धडाधडा बोलूं शकेल. अर्थात् त्याची भाषा किती जुनी आणि कुठली असेल कुणास ठाऊक. पण एखादे वेळी त्याला मराठीहि माहीत असण्याची शक्यता आहे. तंजावर आणि आजूबाजूचा प्रदेश सबंध सपाट आहे. साधी टेकडीसुद्धा नाही कुठे ! तब्बल सातशे मण वजनाचा अखंड नंदी थेट चारशे मैलांवरून आणला असं म्हणतात, तें खरं वाटतं. आणि ह्या प्रचंड नंदीकडे बघितलं म्हणजे या मंदिराचा तो वृषभध्वज स्वामी खरोखरच बृहदीश्वर असला पाहिजे याची साक्ष पटते.

नंदीमंडपांतून बृहदीश्वराचा उच कळस दिसत होता. तोहि दाक्षिणात्य पद्धतीशीं मिळताजुळता नव्हता. सगळीकडे एरव्ही गोपुरांची शिखरं तेवढी उंच आहेत. पण इथे मंदिराचें मस्तकहि आकाशाला भिडून गोपुरांच्या उंचीशीं बरोबरी करणारें आहे. खाली सगळी मंदिररचना इतर दक्षिणी पद्धतीप्रमाणें असली तरी वरची कलशरचना त्याला सुसंवादी ठरली आहे. तीमुळे त्यांत एक वेगळेच उठावदार वैशिष्टय निर्माण झालें आहे. गयेच्या बुद्धमंदिरासारखें चहू अंगांनी चढत गेलेल्या या शिखराने आपल्यासोबत अनेक सुरेख शिल्पालंकार वर नेले आहेत. टोकावर जगन्नाथाच्या मंदिरशिखरा-सारखी एक प्रचंड तळी बसवून तिच्यावर सुवर्णकलश प्रतिष्ठित आहे या तळीचं वजन आहे बावीसशे मण. म्हणजे या नंदीच्या तिप्पट. अहो आश्च-र्यम् ! ज्या काळांत आजच्यासारख्या यांत्रिक अवजारांच्या सोयी नव्हत्या त्या काळांत ही एवढी प्रचंड शिळा इतक्या उंच कशी चढवली असेल ? त्या कलशाकडे बघितलं की नजर उतरतां उतरत नाही खाली. उगाच नाही हजार रुपयांच्या नोटेलाहि वेड लावलं या वास्तूने !

इतर मंदिरांसारख्या, अनेक शिवभक्तांनी व शिवगणांनी आणि त्याच्या सहस्त्र नामाच्या लिंगांनी ओवऱ्या नुसत्या गच्च भरून गेल्या आहेत. शिव-महिमेची पेठच जणु चारी बाजूला नटली आहे. माझ्या कल्पनेंत पंढरी उभी राहिली. असं वाटलं की, बृहदीश्वर या उंच शिखरासारखा मध्यभागी कीर्तनाला उभा आहे. त्याचीं दोन्हीं बाळं मृदंगावर बसलीं आहेत. आणि भोवती महाराष्ट्राच्या कृष्णभूमीतून जमा झालेले काळेसावळे वारकरी टाळ-करी होऊन उभे आहेत. मंदिरांतली परमेश्वरी तन्मय झाली आहे. नंदिके-श्वर डोलायला लागला आहे. आणि हजारो टाळांच्या गजरांत पखवाजाच्या ठेक्यावर ' रामकृष्णहऽरी 'चा दणका सुरू झाला आहे. कल्पनाच ती ! तिला पंढरपूर काय किंवा तंजावर काय !

फार वर्षांपूर्वी चौलवंशीय रसिक पण परमशिवभक्त राजा राजशेखर इथे राज्य करीत होता. त्याच्या मनीं आलें की आपण शिवोपासनेचें आपल्या रसिकतेला आणि ऐश्वर्याला साजेलसें स्मारक करावे. त्याने आपल्या देवतेशीं स्वप्नांतरीं गुजगोष्टी केल्या. त्याच्याजवळ त्याचा भव्य लिंगविग्रह

मागितला. त्याला दृष्टान्त झाला कीं तुला हवी असलेली वस्तु नर्मदाप्रवाहांत अमुक ठिकाणीं मिळेल. तिच्या आकारावरून प्राकाराचा संकल्प कर. राजाने नर्मदेंतून तें लिंग बाहेर काढलें. त्याचा तो अवाढव्यपणा बघून त्याला प्रेमभरें आलिंगीत तो म्हणाला असेल, ' हाच माझा स्वामी. हेच माझं स्वप्न-सर्वस्व ! हाच माझा बृहदीश्वर ! '

नंतर त्या बृहदीश्वराला साजेलसें मंदिर आणि दोनशे फूट उंचीचा कळस इत्यादि उभें राहिलें. आता त्याला शोभेलसा नंदी हवा होता. तोहि त्याने असाच स्वप्नदृष्टान्तांतून त्याच्या स्वामीकडे मागितला. आणि चारशे मैल दुरून घडवून इथे आणून बसवला. अशा तऱ्हेने छोटया किल्ल्याच्या राजकारणाच्या राउळाचें, शिवपरिवाराचें देऊळ झालें.



या स्थानाला तसा पौराणिक आधार आहे. हें मूळचें पाराशर क्षेत्र. याच किल्ल्याच्या परिसरांत शिवगंगा सरोवर आहे. यावर पक्के घाट वगैरे बांध-लेले आहेत. तसंच दुसरं एक सरोवर आहे. तिथे पाराशर ऋषींचें ठिकाण

आहे. देवदानवांच्या युद्धांत अमृतप्राप्तीनंतर महर्षि पाराशरांच्या वाट्याला जे अमोलिक बिंदु आले ते त्यांनी लोककल्याणासाठी या सरोवरांत टाकले. म्हणून त्याला आज अमृतवापी किंवा अमृतसरोवर असं म्हणतात. त्याचं पाणीहि कांहीसं कषाय रंगाचं आहे. तें मंदिराच्या एका बाजूला असलं तरी त्याचा महिमा भाविकांच्या दृष्टीने मोठा आहे. त्यालाहि सुरेख घाट, पायऱ्या आहेत.

पूर्वी ही सगळी असुरभूमि होती. आणि त्यांचा अधिपति तंज नांवाचा दानव होता. दैत्यदलनिखंदन करण्याचें कंकण बांधलेल्या श्रीहरीने नीलमेघ पेरुमाळ होऊन त्या सर्वांचा निःपात केला. श्रीहरीच्या हाताने मरणाचें सौभाग्य प्राप्त केलेल्या तजाने मरतां मरतां मागणें मागितलें की हें ठिकाण माझ्या नांवाने महिमान्वित होवो. विष्णूने त्याला तथास्तु म्हटलं. आणि तेव्हापासून हें श्रीक्षेत्र तंजपूर किंवा तामिळमध्ये तंजावूर या नांवाने प्रसिद्धि पावलें. श्रीविष्णूने गौरवलेला धन्य तो तंज आणि बृहदीश्वराने श्रीक्षेत्र केलेलं धन्य ते तंजावूर.

इतकं सगळं होईस्तवर दुपार चांगलीच रणरणूं लागली. मंदिरांतले नागस्वर आणि वादक स्तब्ध झाले. वातावरणहि पेंगुळलें. आम्हांलाहि आमच्या तीर्थप्रसादाची आठवण झाली. तेव्हा जवळच्या एका नगरपालिकेच्या उद्यानांत, करतळी मावेल एवढी भिक्षा विकत घेऊन आम्ही तरुतळीं जाऊन बसलों.

वस्तुतः उद्यान हा प्रकार मुंबईकरांना नवा नाही. त्यांतून आम्हीं बऱ्याच ठिकाणची संग्रहालयें आणि उद्यानें पाहिलीं आहेत. पण आम्हांला विश्रांति देणारे तें उद्यान म्हणजे तजावूर शहराची एक फळलेली फुललेली बखरच होती ही एक अति अभिनव आणि हृद्य कल्पना वाटली मला. ती शहर-वाटिका तजावरचा इतिहास आणि शहराच्या जडणघडणीचा तपशील ठिक-ठिकाणी लावलेल्या पत्रिकांतून आणि स्मरणिकांतून सांगत आहे. ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. ज्याला त्या शहराच्या इतिहासाविषयी आपु-लकी असेल किंवा इतिहास या विषयाची ओढ असेल तो तद्विषयक मार्गाने जाईलहि. पण सामान्य पांथस्थाला किंवा यात्रेकरूला तो ज्या भूमीवर उभा

आहे तिच्याविषयी अत्यंत थोडक्यांत पण माहितीपूर्ण, इतिहाससिद्ध पण मनोरंजक आणि अभिमानाने पूर्ण पण सम्यक् ज्ञान देणारें इतकें सुदर तंत्र मीं बघितलें नव्हतें. तंजावरच्या घडणींतून वेगवेगळ्या संस्कृतींच्या राज्य-कर्त्यांच्या कर्तृत्वाची भर पडली आहे. चोलवंशीयानंतर विजयानगर, नंतर प्रत्येक ठिकाणीं पडझडींनी स्वतःच्या कर्तृत्वाचें कवित्व शिल्लक ठेवणारी मुसलमानी राजवट, नंतर मराठी राजवट आणि शेवटीं अर्थात् ब्रिटिश राजसत्ता. सगळ्यांचे बरेवाईट सस्कार त्या शहरावर झाले असल्याची नोंद उद्यानाच्या त्या बोलक्या आत्मकथेंत आहे. एका दानशूर पारशी बाबाजींनी देखील त्यांत आपला योग्य वांटा उचलल्याची साक्ष आहे.

इतक्या दूरवर येऊन शिवछत्रपतींच्या वडिलांनी तंजावर शहरावर राज-प्रतिनिधित्वाच्या नात्याने मराठ्यांच्या शासनाची ध्वजा रोवली. ती बराच काळ टिकली. आणि त्यांतहि एकापेक्षा एक पराक्रमी, दानशूर आणि लोकवत्सल लोकप्रतिनिधि होऊन गेले ही गोष्ट प्रथम या उद्यानांत समजली. तसं बृह-दीश्वराच्या परिसरांत एक हनुमंताचें मंदिर आहे. त्यांत समर्थांचे अत्यंत जुनें असें मानचित्र लावले आहे. तेव्हापासूनच समर्थांच्या दक्षिणदिग्विजयाची ऐतिहासिक चिन्हं दिसू लागली होती. हिंदवी स्वराज्यासाठी आणि महत राष्ट्रधर्म वाढविण्यासाठी समर्थांचा भगव्या मातीच्या आखाड्यांतला हनुमं-एका हातीं द्रोणागिरी आणि दुसऱ्या हातीं उगारलेली गदा घेऊन लोकसंग्रह करीत भारतवर्षाच्या अष्टदिशांत सर्वदूर गेला होता. तंजावरमध्ये तर त्याच प्रत्यक्ष दर्शनच झालं. महाराष्ट्रसंस्कृतीचीं गौरवचिन्हं त्यानंतर तंजावरमध्ये अनेक ठिकाणीं दिसलीं.

उन्हं उतरलीं आणि आम्ही उद्यानांतून बाहेर पडलों. हे विशाल उद्यान शिवगंगा सरोवर, अमृतवापिका आणि प्रत्यक्ष बृहदीश्वर मंदिर–ह्या भागाला छोटा किल्ला म्हणतात. आणि मोठा राजवाडा, सरस्वती महाल, संगीत महाल वगैरे भागाला वडा किल्ला म्हणतात. छोटा किल्ला पाहून झाला होता. आता बघायचा होता वडा किल्ला.

दोन भागांमध्ये साधारण दीड मैलाचं अंतर होतं. त्या निमित्ताने शहराच्या बाजारपेठांतून आणि विविध रस्त्यांतून फिरायला मिळालं. सगळी

माणसं आपली वाटतात. त्यांच्या वागणुकी आणि व्यवहारांच्या पद्धती सगळ्या माहितीच्या वाटतात. पण तोंडाला रंग चोपडून चित्रविचित्र वेष घेऊन आपल्या ओळखीचा माणूस आपल्या समोर यावा तसें हीं माणसं बघून वाटत होतें.

मोठ्या किल्ल्याचा हा भागहि अति विस्तीर्ण आणि अत्यंत नेटका असा अद्याप राखला गेला आहे. यांत मोठा राजवाडा, सरस्वती महाल ग्रंथालय, संगीत महाल वगैरे प्रसिद्ध इमारती आहेत. राजवाड्याच्या एका मोठ्या भागांत शासकीय विभागाच्या कांही कचेऱ्या, पोलीस स्टेशन इत्यादि आहेत. संपूर्ण राजवाडा बघायला मिळाला नाही. परंतु राजवाड्याच्या मुख्य अंगणांत आणि दर्शनी भागांच्या ओवऱ्यांतून प्राचीन अर्वाचीन शिल्पकलेचें छोटेसें प्रदर्शन बघायला मिळालें. काही अभंग तर कांही जीर्णशीर्ण मूर्तीचें प्रदर्शन अत्यंत सुरेख होतें. दगडाच्या रंगावरून आणि ठेवणीच्या विविधतेंत निर-निराळ्या प्रांतभेदाचें वैशिष्टच जाणवत होतें. कांही ताम्रपट आणि तांब्याच्या, मूर्ति, कांही विशिष्ट घडणीची भांडी, तऱ्हेतऱ्हेच्या नटराजाच्या तांडव-मुद्रा हीं कांही ठिकाणचीं वैशिष्टचें होतीं, तर हस्तिदंताच्या कुशलतेचा मुलायम नाजूकपणा कांही ठिकाणीं नजर वेधीत होता.

राजवाड्याचा हा भाग अत्यंत साधा, प्राचीन वास्तुवैशिष्टचविहीन असा अद्ययावत् वाटला. कदाचित् अगदी अलीकडे दुरुस्ती वगैरे करून रंगवला असावा. पण एकूण अवाढव्य होता. वरचे मजले, त्यांच्या गवाक्षाचे प्रकार मात्र जुन्या पद्धतीचे, कांहीसे मराठी ऐतिहासिक वळणाचे होते, तर मध्य-भागीचे शिखर मात्र थेट बृहदीश्वराच्या पद्धतीचें होतें. त्याच्या शेजारींच होतें 'सरस्वती महाल ग्रंथालय!'

हें ग्रंथालय साऱ्या दक्षिण भारताचें भूषण आहे म्हणतात. उत्तरेंत बनारस विद्यापीठाचें सरस्वती भवन सोडलें तर इतकी ग्रंथसंपत्ति असलेलें अन्य ग्रंथालय भारतांत नाही असें विद्वानांचें मत आहे. हें ग्रंथालय म्हणजे सर्फोजी-राजे भोसले ( दुसरे ) यांच्या कर्तृत्वाचें चालतें बोलतें स्मारकच होय. मराठी राजांपैकी आजच्या घटकेला तंजावरकरांना विशेष महत्त्वाचा वाटत असलेला हाच राजा होय. अत्यंत रसिक, दानशूर आणि विद्याव्यासंगी असा

ह्या सर्फोजीराजा होऊन गेला. जसं सबंध बडोदे शहर म्हणजे सयाजीराव महाराज तसं तंजावर शहर म्हणजे सर्फोजी दुसरा! सरस्वती महाल, संगीत महाल, धन्वंतरी महाल इत्यादींपासून बृहदीश्वर मंदिरांत आणि शहरउद्यानांत सगळीकडे याचेंच कर्तृत्व बोलकें झालें आहे. पराक्रमांतून थोडें स्थैर्य आणि संपन्नता मिळाली तर मराठी राजप्रतिनिधि सुद्धा इतकं रसिकत्व दाखवूं शकतात. आणि तत्रस्थांच्या कलाकौशल्याला उत्तजेन देऊं शकतात हें तंजावरच्या भोसले वंशजांनीं दाखवून दिलं. प्रतापसिंह, पहिला सर्फोजी, तुळाजी, दुसरा सर्फोजी असे अनेक मराठी राजे परंपरेने तंजावराला मिळाले. ही सगळी मंडळी धार्मिक होती, संगीतप्रेमी होती. दुसरा सर्फोजी हा त्या परंपरेचा शेवटचा पण पूर्णकलश होता. त्याने सरस्वती महालांत अनेक हस्तलिखितें, भूर्जपत्रांवरील ग्रंथ इत्यादि प्रयत्नपूर्वक आणवून तें समृद्ध केले.

त्याच्या काळींच या ग्रंथालयांत सुमारें तीस हजार ग्रंथ होते. कित्येक अप्राप्य आणि मौलिक संस्कृत ग्रंथ आहेत, त्याचप्रमाणे खूप जुने असे मराठी ग्रथहि आहेत. याशिवाय तामिळ, तेलगु इत्यादि भाषेंतलेहि हजारो ग्रंथ येथे आहेत.

भाषावार आणि विषयवारीने ही सगळी ग्रंथसंपत्ति व्यवस्थित ठेवली गेली आहे. आणि त्यांनी सरस्वती महालाचे दोन्ही मजले अगदी गच्च भरले आहेत. अनेक विद्यार्थी, शिक्षक आणि इतर व्यासंगी विद्वान संदर्भप्राप्तीसाठी आवश्यक ती पुस्तकें घेऊन तिथे ठेवलेल्या टेबलाभोवती गर्दी करतात. कांही दर्शन-दुर्लभ ग्रंथ वेष्टनाच्या कलावैशिष्ठ्यासह प्रदर्शनीय कपाटांत मांडून ठेवले आहेत. ते बघतांना डोळ्यांना मोठं सुख होतं. नाथ भागवताच्या दशमस्कंधाची प्रत त्यांच्याच नातवाच्या हातची लिहिलेली बघायला मिळाली. शिवरायांची जुनी बखर, तसेंच शिवराजभूषणाची जुनी प्रत इत्यादि पृथ्वीमोलाचं धन बघायला मिळालं. जुनी ऐतिहासिक चित्रें, तस्विरी आणि मानचित्राचे फलक यांसाठी एक भाग राखून ठेवला आहे. त्यातहि, तिथल्या भोसले वंशपरंपरे-प्रमाणे, डोंगरपहाडांतून हिंदवी स्वराज्याचें स्वप्न साकार करणारे शिवाजी राजे, जिजाऊ मासाहेब, राजे संभाजी, समर्थ स्वामी यांच्याहि दर्शनीय तस्विरी आहेत. कांही युद्धप्रसंगांचीं चित्रें आहेत, तर कांही दरबारी चित्रें आहेत. या चित्रांच्या रेखांना कांही ठराविक पद्धति आहे. ही दक्षिणात्य ठेवणीहून कांहीशी भिन्न आहे. तरीसुद्धा ती तंजावूर शैली म्हणूनच ओळखली जाते.

सरस्वती महालांतून बाहेर पडलों तो राजा सर्फोजीच्या कर्तृत्वाचा आणि व्यासंगीपणाचा ठसा मनावर उठला होता. ब्रिटिशांच्या अमदानींत मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाचा नव्वद टक्के भाग या महापुरुषाने या महालांत ओतला, लोककल्याणासाठी खर्च केला. हा स्वतः प्रयत्नपूर्वक अनेकभाषाकोविद होऊन कांही विद्वन्मान्य ग्रंथांचा रचयिता म्हणून प्रसिद्ध पावला. एवढेंच नव्हे तर दक्षिणेत पहिला छापखाना सुद्धा सर्फोजीने उभा केला. पूर्वजांनी सुरू केलेली विद्येची आणि संगीताची आराधना यानेच पुढे चालविली. वैद्यकशास्त्रावरहि पुस्तकें लिहिली आणि धन्वंतरी महाल ही औषधशाळा बांधली. आणि बहुजन-हिताय, सुखाय आपलें आयुष्य वेंचलें.

संगीत महालाची इमारतहि वैशिष्टयपूर्ण आहे, दुमजली आहे. आणि तिच्यांत संपूर्ण भारतीय आसनांची व्यवस्था आहे. पण कुठूनहि समोरच्या रंगमंचकावरून चाललेलें संगीत वा दृश्य सहजीं ऐकूं येईल वा दिसेल अशी खास रचना आहे. बाहेरचा उजेड आंतमधे येऊं शकत नाहीं. आंत अद्ययावत् उजेडाची सोय आहे. फार सुरेख ठिकाण आहे तें ! संगीतमहालच वाटतो तो. आजच्या कुठल्याहि शोभिवंत प्रेक्षागृहापेक्षा भिन्न ! रंगमंचावर वीणा-पाणि सरस्वतीची सालंकृत मनोहर मूर्ति आहे.

धन्वंतरी महाल मात्र दिसला नाही. पण आजहि आयुर्वेदीय औषधांच्या संशोधनाचें काम तेथे चालूं असतें असें म्हणतात.

एकूण बृहदीश्वर तसे दिसले, तर त्यांची देवधानी म्हणजे तंजावर असें दिसलें. दक्षिणेंत बृहदीश्वर ठिकठिकाणी आपआपल्या वैभवासह आणि निर-निराळ्या वैशिश्ठ्याने, नांवाने वस्ती करून आहे. तो एक मोठा ग्रंथच आहे त्या दिव्य ग्रंथांतली प्रस्तरशिल्पांचीं पान चाळतांना आणि गोपुरशिखरांचे संदर्भ बघतांना मधेच एक बखरीचं पान लागलं. त्यांत विद्याव्यासंगाचा इतिहास होता आणि त्याला संगीतकलेच्या सुवर्णरेखेची महिरप होती. पण मुखपृष्ठावर त्या सगळ्या कलांच्या कुलदेवतेचं चित्र होतं. प्रस्तराच्या मखरातलं दोनशे फूट उंचीच्या शिखराचं, अंधारप्रकाशांच्या रंगाचं, पण भक्तीच्या आणि अनुरक्तीच्या कागदावर रेखलेलं ! असं चित्र ! त्याखाली लिहिलं होतं:-- "बृहदीश्वराय नमः" ।

---

## ७

# जय नटराज !

तंजावर स्टेशन सोडून गाडी निघाली. पण जातांना बृहदीश्वराचं दर्शन घ्यायला विसरली नाही. दिवसानं सोनेरी साज टाकून दिला होता नि आता सायंसंध्येसाठी बृहदाकाशाच्या निळचा अथांग प्रवाहाच्या काठीं तो शांतपणें वसूं बघत होता. ऐन उमेदीच्या कर्तृत्वाचे सोनेरी कारनामे आता त्याने टाकून दिले होते नि आता जेव्हा त्याला 'जरा दिसों लागली' तेव्हा कुठे त्यान संध्येचीं विरागवस्त्रें धारण केलीशीं वाटत होतीं. उपभुक्त आयुष्याकडेहि उत्तरायुष्यांत माणूस विरक्तीनं बघतो. त्याच विरक्तीनं दिवस पूर्वेकडे बघत होता. पूर्वेकडच्या क्षितिजाच्या निळचा उभारींतहि वैराग्याची भगवी कड उठून दिसत होती. आणि त्याच्या पार्श्वभूमीवर बृहदीश्वराचीं उंच उच शिखरं अप्रतिम, सुंदर दिसत होतीं. त्यांना त्या वैराग्यांत जणु कांहीच वाटत नव्हतं. त्यांच्या उंचीला क्षितीजाच्या पलीकडे उभे (नव) दिवसाचे दूत दिसत असावेत !

बृहदीश्वराची ती आरास हळूहळू डोळचासमोरून सरकली नि लांब गेली. सरस्वती महाल, संगीत महाल यांनीं सजवलेलं, दुसऱ्या सर्फोजीनं छापलेलं बृहदीश्वराच्या बखरीचं पान उलटलं. मीं खिडकीपासून डोकं आंत घेत मनांतल्या मनांत 'हरये नमः' म्हणून त्या दृश्यग्रंथावर डोकं टेकलं !

आता पुढचा अध्याय सुरू होणार होता. एकाच पुराणांत एकांतून दुसरी कथा निर्माण होते तशी इथली महिमामय क्षेत्रांची अवस्था आहे. त्रिचनापल्ली सोडलं की तंजावर ! तंजावरच्या पुढच्या प्रवासांत थोड्याच अवकाशांत मायावरम्. लगेच कुंभकोणम्, चिदंबरम्. अहो, किती म्हणून किती सांगायचं, किती वघायचं ? पूर्वीच्या भाविकांच्या संपन्नतेची झेप पण मोठी दांडगी. प्रत्येकाचं, कर्तृत्व वघायचं त्यांत राहायला आलेल्या त्यांच्या इष्टदेवतेचा महिमा अनुभवायचा, आणि तिच्या पुढे सदैव गर्दी करून सोडणाऱ्या आजच्या सामान्य माणसाची असामान्य भाविकता वघायची ! छे छे ! अगदी सद्गदित व्हायला होतं, आपल्या सर्व क्षमतेसकट वाकायला होतं इथे. 'काय वानूं आता न पुरे ही वाणी–मस्तक चरणीं ठेवीतसे'–अशी अवस्था होते.

छोटी गाडी, मोठमोठालीं क्षेत्रं घेत घेत पुढे जात होती. माझ्या लालचावलेल्या मनांत पुढच्या दर्शनाची एक अव्यक्त झलक उभी राहत होती. फार असामान्य महत्त्वाच्या ठिकाणांना मी भेटी देत होतें. लहानपणापासून ज्यांची महती ऐकली होती तें तें प्रत्यक्ष दृग्गोचर होत होत आपल्या दर्शनाचा अनुपम आनंद देत अगदी कृतार्थ करून सोडीत मागे जात होतं. देखावा अदृश्य होत होता, पण हृदयांत कुठेतरी तो अव्यक्तपणें आकारत होता. चिदंबरम्‌विषयीं तर लहानपणीं बहुत ऐकलेलं पण कुठे आपण भारताच्या कुठल्या कोपऱ्यांत, आणि कुठे स्वर्णशिखरांनी, रत्नमंडपांनी सजलेलं नटराजाचं तें चिदंबरम्–किती दूर दक्षिणेंत ? अशी समजूत होती. या, सगळ्या आशाआकांक्षांच्या गाड्या, दर्शनेच्छेनं तुडुंब भरलेल्या, पण उगाच आयुष्याच्या मैदानांत तिष्ठत होत्या. त्या आता भरधांव पळूं लागल्या. 'त्या'च्या इच्छेचं एंजिन लागलं होतं त्यांना. आता चिदंबरम्‌चं अंतर काय होय ! "मानसी इच्छिले जें जें, तें तें प्रत्यक्षहोतसे"-ही तर त्याच्या वेगाची किमया होती !

एव्हाना अक्षरश: शेकडो मंदिरांनी गजबजलेलं कुंभकोणम् निघून गेलं आणि मायावरम्‌हि निघून गेलं. मग सोबती साथी पश्चिमेकडच्या स्पष्ट होत जाणाऱ्या दिव्यांचा झगझगाट बघून बोलूं लागले–' आलं, चिदंबरम् आलं !' मींहि बघितलं. गोपुरांच्या दीपप्रकाशाचा झोत उंच आभाळांत काळ्या अंधाराचा शोध घेत होता. त्या रत्नसभेची ती रत्नप्रभा मला इतक्या दुरूनहि

प्रभावी वाटत होती. आमची छोटी सैनिक पण उत्साहाने फुरफुरत त्या झगझगमगणाऱ्या दृश्याकडे बघून म्हणत होती–" जय नटराज ! जय चिदंबरम् ! !"

चिदंबरम् स्टेशनवर उतरलों तेव्हा रात्रीं नऊ वाजले होते. इतक्या उशीरा मंदिरांत जाण्यांत अर्थ नव्हता. स्टेशनपासून जरा लांबहि आहे तें. नाइलाजानं आम्हांला आमची दर्शनाची दुर्दम्य ऊर्मि सकाळपर्यंत आवरावी लागली.

सकाळीं लगबगीने उठलों. आपद्धर्म सांभाळला. सामानसुमान स्टेशनाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करीत स्टेशनचा निरोप घेतला. तरी आठ वाजले होते. चिदंबरम् दिनक्रमाच्या सोनेरी जाळ्यांत सापडलें होतें. दारोंदारीं सडे पडले होते. रांगोळ्या रेखाटल्या गेल्या होत्या. रस्ते गजवजत होते. आम्ही चिदंबरम्च्या शिखरांच्या शैलराजीच्या रोखाने निघालों होतों. स्टेशन ते मंदिर मैलभराचं अंतर असेल. मधे कोलेरून नांवाची नदीं आहे. छोटीशीच पण तिच्या तीरावर वसलेलं हें क्षेत्र मात्र प्रचंड आहे.

समोर पूर्णाकार पूर्वाभिमुख गोपुर दिसायला लागलं तसं आमच्या गतीत. चैतन्य आलं. पावलांत वेग आला. मनांत अधीरता आली. आजूबाजूला नित्य ओळखीची दृश्य दिसत होती. फुलं, माळा, नारळ, उदबत्ती, प्रसाद, कुंकू नि ओटीचं सामान–एक ना अनेक. कारण त्या राजवाड्यांत अनेक मानकरी. प्रत्येकाचें मानपान करायला हवें ना !

आम्ही आमचं पत्रपुष्प घेतलं आणि प्रवेशद्वारांतून मंदिराच्या प्रांगणांत प्रवेश केला. शंभर बिघे जमिनीवर ही विशाल वास्तु उभी आहे. दक्षिणे लं अत्यंत प्राचीनतम मंदिर म्हणून हे देवालय ओळखलं जात. एवढ्या मोठ्या परिसरात अनेक देवदेवतांची मंदिरं घेऊन अद्यापहि ते मोठ्या दिमाखानं नांदत आहे. या मंदिराचं अधिदैवत आहे भगवान नटराज. प्रथम दर्शन त्याचे मग इतर. कारण, त्या सौभाग्याच्या लेण्यानेच तर ती वास्तु सौभाग्यवती आहे. हातांतलं श्रद्धाभक्तीचं बिल्वदल सावरीत आम्ही प्राकारामागून प्राकार ओलांडित पांचव्या परिक्रमेतल्या त्याच्या निजमंदिरापुढे येऊन उभे राहिलो. एकूण प्रासादाच्या मानानं हे निजमंदिर खूपच लहान आणि एकूण पद्धतीपेक्षा जरा वेगळं आहे. हातातलं सामान, पुढे आलेल्या पुजाऱ्याकडे

देऊन आम्ही अधाशीपणें नटराजापुढे जाऊन उभे राहिलो. गर्दी होती, पण रांग नव्हती. दर्शनार्थी पुष्कळ होते. पण दर्शनात घाई नव्हती.

आम्ही त्याच्या पुढ्यात उभे राहिलो आणि बघितलं तर तोच आमच्या-पुढे उभा आहे. सोनेरी स्वप्नासारखा. नृत्यनाट्याचे भावपूर्ण आविष्कार दाखवीत. मस्तकावर कृष्णपन्नगाचं फणीसहित वळं आहे. त्यावर किंचित् एका बाजूला झुकलेली चौथीची चंद्ररेखा आहे. तिच्या शिरोभागी गंगामाईचं मुखमंडल आहे. अशा सुरेख मुकुटावर त्याच्या संहारकार्याचं प्रमाण आणि वैराग्याचं प्रतीक म्हणून एक नरकपाल आहे. अशा दिव्य मुकुटाच्या खाली सुटलेल्या त्याच्या जटांच्या लड्या सर्पाकार वळणं घेत अग्निमय प्रभावळीच्या अंगाशी भिडल्या आहेत. त्या जटांच्या प्रभेमध्ये आहे त्याचे हनुवटीशी निमुळते होत गेलेलें सुरेख मुखमंडल. रसरशीत. धगधगते ! तृतीय नेत्रांकित विशाल भाळ आणि उचावलेल्या धन्वाकार भुवयांची ठेवण अगदी खिळवून टाकते. भृकुटिभंगाची अनेक शृंगारप्रेरित ललितवर्णन माझ्या आठवणीत पटकन् येऊन गेलीं. पण या ऊर्ध्व भृकुटींचं सामर्थ्य बघून मी थक्कच झाले. काय नव्हते त्या वर चढलेल्या भिवयांत !––

" युग बढा तुम्हारी कृपा देख––
युग हटा तुम्हारी भृकुटि देख ! "

त्या बिचाऱ्या अनामिक कलाकारानं स्वतःच्या कौशल्याचं या भृकुटिरचनेंतच सोनं करून टाकलं आहे. " त्रिभुवनीचें तेज एकवटलें, वरवेपण सिगेस आलें. " म्हणून दोन्ही पापण्यांच्या पाकळ्यांनी ते नेत्र अर्धवट झाकून धरले आहेत हनुवटीकडे निमुळत्या होत गेलेल्या किंचित् फुगीर गालांच्या कडांशी कानांतली कुंडलं खेळीमेळी करत आहेत. कंबुकंठाच्या खाली तर सगळीं ऐट एकवटली आहे उजवा पाय खाली खिळवून त्यावर नृत्यविन्यासाची मोठी मनोज्ञ किमया साधली गेली आहे. डावा हात, ज्याला नृत्यशास्त्रांत दंडहस्त किंवा गजहस्त-मुद्रा म्हणतात त्या अवस्थेत, उजव्या पायावर किंचित भार देऊन वर उचललेल्या डाव्या पायाकडे झुकला आहे. त्याच्या मनगटाला मनगट भिडवून उजवं करकमल अभयमुद्रा वा वरदमुद्रा दाखवीत आहे. मागच्या डाव्या हातात पंचस्फुलिंगाच्या अग्निशिखा आहेत, तर मागल्या उजव्या हातात

आहे डमरू. हाताच्या मनगटावर, दंडावर आणि नीटस पायावर फणियुक्त सर्पांची वळणं आहेत. टेकलेल्या उजव्या पायाखाली मायामोहाच्या अविद्यारूप दानवाला दाबून धरलेलं आहे.



असा शिव तांडवनृत्य करतो आहे. शिवतांडवकार म्हणतात—

" धगद्धगद्धगज्वलल्ललाटपट्टपावके,

किशोरचंद्रशेखरे रति प्रतिक्षणं मम ।"

एका हातांत जीव-जगताची उत्पत्ति करणाऱ्या डमरूचं प्रतीक घेऊन, तर दुसऱ्या हाती सर्वसंहारक अग्निज्वाळा घेऊन 'सत्यं शिवं सुंदरम्' चा संदेश देत हा किशोर सदाशिव नाचतो आहे. अखिल ब्रह्मांड ज्याचा रंगमंच असेल तो चंद्रशेखर या कनकभवनांत हेमपुष्करिणीच्या तीरावर तांडवाची आपली ललितलीला दाखवतो आहे.

असं हे इतकं अप्रतिम विशाल कलादृष्टि देणारं कौतुक आणि तेहि परत संपूर्ण सुवर्णाचं असं बघितलं. तो स्वतःहि सोन्याचा. त्याचे नृत्याविष्कारहि सोन्याचे. आणि त्यावर चढवलेले अलंकार, त्याची प्रभावळ, त्याचं ते मखर, सारं सारंकांही सोन्याचं अन् सोन्यांत ओतलेलं. पण सोनं का त्याला सजवणार आहे ? अलंकार का त्याला साजरं करूं शकणार आहेत ? तोच या सर्वांना अलंकाररूप आहे. रत्नमाणकांचं त्याला काय ? ज्ञानदेव विचारतात--" लेणियासि लेणें हे कहीं आथी ? "

पण भक्तांनी आपल्या कल्पनेतल्या आकारात त्याला येण्याची विनंती केली. तसे अलंकारहि घालण्याची विनंती केली. तीहि त्याने मान्य केली, आणि आता जणु विचारतो आहे की, " बघा, आता तरी मी बरा दिसतों कां ? "

वस्तुतः संपूर्ण अवकाश हे त्याचं शरीर; आठ दिशा त्याच्या अष्टभुजा; धरती, आकाश आणि बुद्धीप्रकाशाचं प्रतीक सूर्य हे त्याचे तीन नेत्र. असं ज्याचं स्वरूप, तो शिवशंकर प्रलयंकरी मुद्रेचं इवलंस लाघव इथे दाखवतो आहे. ज्या नृत्याचं वर्णन कवींनी--

" खंड खंड भूखंड अंड ब्रह्मांड पिंड नभ में डोले !
मेरे शिव नटराज राज जब तांडव की मुद्रा खोले ।। "

असं केलं आहे तो नाटचेश्वर त्या छोटचाशा गर्भागारांत आम्हांला दर्शनसुख देण्यासाठी उभा होता. पण हेहि त्याचं नटणंच. महिम्नकार त्याला म्हणतात की जगाचं रक्षण करण्यासाठीच खरोखर तूं एवढा नटला आहेस. अनंत अवकाशाचा निराकार निर्गुण देव इटुकला सगुण साकार झाला होता.

महादेवाचं इथे आकाशलिंग म्हणून माहात्म्य आहे. 'क्षिति जल पावक गगन समीरा ' या पंचतत्त्वांची पांच लिंग दक्षिणेंत महिमान्वित आहेत. त्यांतलं गगन लिंग म्हणजे चिदंबरम्. नटराज मूर्तिच्या मागे एक छोटं गवाक्ष आहे. त्यावर नेहमी वस्त्रावरण असतं. अभिषेकाच्या वेळी तें दूर होतं. आणि त्या गवाक्षांतून दिसणाऱ्या नीलाभ अवकाशाचं पूजन केलं जातं. तें आकाश म्हणजेच त्याचं स्वरूप. ज्यांना तें दिसायचं नाही त्यांची सोय प्रभूंनी आपल्या नृत्यानं नटलेल्या, अलंकारानं सजलेल्या आणि साजऱ्यागोजऱ्या आकारांत भरलेल्या

स्वरूपांत केली आहे. पण त्याव्यतिरिक्तच्या माणसाला मात्र हा प्रत्यक्ष समन्वय बघून प्रश्न पडतो—'तुज सगुण म्हणों की निर्गुण रे ! '

तीर्थप्रसाद हातावर पडला आणि मंडळी पांगली. मला मात्र तिथून हलावसं वाटेना. माझी दृष्टी परत परत त्याच्या रेखीव आणि घोटीव अवयवांवरून फिरूं लागली. त्याच्या उंचावलेल्या भृकुटींत अडखळूं लागली. प्रत्येक दर्शनाच्या वेळी वाटतं की आता मात्र सौंदर्याची परिसीमा झाली. याच्यापुढे का आणखी कुठं कांही सापडणार आहे ? पण प्रत्येक नवीन दर्शन त्या सौंदर्याच्या परिसीमा वाढवीत होतं. नटराजांनी तर सौंदर्य शिगेला गेल्याचं दाखवल. किती बघूं नि किती नको असं मला झालं. भाविकता तीर्थप्रसादानंतर जरा दूर सरली, पण कलासक्ति मात्र त्याच्या पायांजवळून हटायला तयार नव्हती. मंत्रमुग्धासारखा हात पुढे केला. परत एकदा हातावर पडलेलं तीर्थामृत ग्रहण केलं आणि मागल्या पावलांनी त्याच्या सभेंतून बाहेर पडलें.

बाहेर पडलें तरी त्या दर्शनाची अजब धुंदी उतरली नव्हती. इतर ठिकाणी केवळ लिंगविग्रहांत असणारा हा महादेव इथे एकदम या स्वरूपांत कसा ? स्मशाननिवासी हा भूतनाथ या कनकमंदिरांत कसा ? परमविरागी योगीश्वर इथे नटनागर कसा ? मन विचार करूं लागलं. नंतरच्या काळात त्याच्या अवताराच्या खाणाखुणा तत्रस्थांना विचारल्या. त्यांनी असं सांगितलं .

तारगम नांवाच्या स्थानीं कांही ऋषि राहत होते. अत्यंत विद्वान मीमांसक म्हणून त्यांची ख्याति होती. परंतु त्यामुळेच इतरांपेक्षा आपण भिन्न आहोंत अशी त्यांची भावना झाली होती. विद्वत्तेनं अनन्यता यायच्या ऐवजी अहंमन्यता आली होती. पण त्यांची ती अहंमन्यता गरीबगुरिबांना बाधक होत होती. त्यांच्या शब्दज्ञानाने तिथल्या जनतेच्या कल्याणाचा मात्र नाश होत होता. ती अकारण छळली जात होती. अखेर ती समग्र त्रस्त जनता शिवांची आराधना करूं लागली. आधीच तो आशुतोष, एवढ्या मोठ्या तपानं संतुष्ट न झाला तरच नवल होतं. शेवटी त्या माणसांची बाजू मांडण्यासाडी शिवशंकर त्या ऋषिमुनींकडे गेले. परंतु कोरड्या विद्वत्तेने आंधळे झालेले ते ऋषि त्यांना ओळखूं शकले नाहीत. उलट उर्मटपणें त्यांनी शिवावर एक शूकर सोडला. भयानक आवाज करीत तो शूकर भगवंतावर

चालून आला. परंतु प्रतिपक्षी प्रत्यक्ष शिवशंकर होते हें मीमांसकांना जिथे कळले नाही तिथे त्या वन्यशूकराला कसें कळणार ? शिवाने त्या



शूकराला फाडून त्याचे चर्म कटीला बांधलें. ऋषींनी महाभयानक वासुकी सर्पाला त्याच्यावर सोडलं. पण त्याचाहि भयंकर फूत्कार मुरगळून शिवाने त्याला आपल्या गळयात माळेसारखे धारण केले. आता मात्र ऋषींच्या क्रोधाला पारावर राहिला नाही. त्यांनी मंत्रबळाने महादानव उत्पन्न केला आणि त्याला शिव गिळून टाकण्याची आज्ञा केली. पण ऋषिमुनींच्या त्याच अविद्येच्या भूताला शिवशंकरांनी पायाखाली तुडवून ठार मारलं आणि त्याच्या शवावर नटराज होऊन नृत्य केलं– गर्वोन्नत कालियाच्या प्रत्येक फणीवर जसा बाळकृष्ण नाचला तसं ! अशी नटराजाच्या प्राकटयाची कथा आहे.

चिदंबरम्‌वर चोल राजांचं आधिपत्य होतं. त्यांतल्या परमशिवभक्त वीर चोल रायार या राजाला त्याच्या मनांतला शिव चिदंबरम्‌च्या सभा-

पतीच्या स्वरूपात दिसला. शिवासमवेत नाट्येश्वरी शिवा पण दिसली. डमरूच्या तालावरचं त्या उभयाचं दिव्य नृत्यनाट्यहि त्यानं बघितलं. मग मात्र त्या अवस्थेंत पाहिलेलं प्रत्यक्ष साकारावं अशी जबर इच्छा त्याचं मन भरू लागली. अशा प्रकारे योगियांचा राणा नटराज बनून आपल्या चित्-कलेसह इथे वस्तीला आला. त्याच्यासाठी राजाने कनकसभा केली. नंतर चिदंबरम्‌चा प्रत्येक चिरा चिरा प्रत्येक पिढीपिढीनं मोठ्या श्रद्धेन आणि आपुलकीने बसवला. इ. सन ५०० च्या पूर्वीपासून तो सन; १६८५ पर्यंत क्रमाक्रमानं मंदिराचा विकास होत गेला, विस्तार होत गेला असं जाणकारांचं म्हणणं आहे. हिरण्यवर्मा नांवाच्या राजाचाहि ह्यांत सिंहाचा वाटा आहे.

त्याच्यानंतर त्याच्या साम्राज्यांत अनेक ठिकाणी मी फिरले. अनेक दर्शनं घेतली. कसोटीच्या काळ्या दगडांनी उभारलेल्या सुरेख मंदिरावरची नक्षी पाहिली. विविध नृत्यमुद्रा न्याहाळल्या. पण त्या सर्वांच्या पार्श्वभूमीवर त्याच्या वीणेच्या तारांचा मंद्र झंकार होता. आदितालाची साथ होती. आणि ॐकाराचा हृदयाकाश भरून उरणारा स्वर होता. हृदयांत उचंबळलेले तेच पंचस्वर रोमरोमांना स्पर्श करीत मुखांतून बाहेर पडत होते—

ॐ ....ॐ नमः शिवाय !

नटराजाच्या या निजमदिरासमोर त्याचा सभामंडप आहे आणि पुढे थोरला सुवर्णस्तभ आहे. या सभामडपाच्या प्रत्येक खांबावर अनेकविध नृत्यमुद्रा असलेल्या सुरेख मूर्ति आहेत. तांडवनृत्याचं पार्श्वसगित सुरू झालं की अजूनहि त्या शिल्पांचे हातपाय प्रस्फुरत असतील, त्यांच्या प्रस्तरमुद्रा अद्यापहि विविध भावभंग प्रकट करत असतील असं वाटलं. नटराजाच्या डावीकडे गोविंदराजाचं मंदिर आहे. नेहमीप्रमाणेच मोठं सुबक ध्यान आहे त्याचं. श्रीदेवीला चरणसेवा देऊन, नारदतुंबरूंना स्तुतिस्तोत्रांची अंगाईगीत गायला लावून हा गोविंदराजस्वामी शेषाच्या छत्राखाली सुखानं झोपी गेला आहे. मोठी विलक्षण झोप आहे त्याची. बाहेर शिवशंकराचं तांडवनृत्य चाललं तरी त्याच्या निद्रेंत खंड म्हणून नाही. नृत्याचे पदविन्यास त्याला जागं करूं शकत नाहीत. त्याला जागं व्हायला लागतो एखाद्या क्रोधाविष्ट भृगुमुनींचा पदाघात. तोंपर्यंत तो आपला चौहातीं आयुधं घेऊन मस्तकी मुकुट तसाच ठेवून शेलासुद्धा न पांघरतां तसाच झोपला आहे. दमून-थकून आल्यामुळे

तसाच झोपलाय् की ' कानीं बोल आर्ततेचे ' पडल्याबरोबर उठून धावण्याच्या तयारींत झोपलाय्, कुणास ठाऊक ? पण जें स्वरूप तिरुपतीच्या गोविंद-राजानं, श्रीरंगम्च्या रंगनाथानं दाखवलं तेंच झोपाळू रुपडं त्यानं इथे चिदं-बरम्मधेहि दाखवलं. तो आपला सतत नृत्य करीत तिकडे गायनमंदिरांत उभा, तर हा इकडे ' अविश्रान्त ' निद्रा घेत आपल्या शयनमंदिरांत पहुडलेला. त्याच्या मंदिराशेजारच्या मंदिरांत त्याची वल्लभा भगवती महालक्ष्मी बसली आहे. स्वामी झोपले असले तरी ती त्यांची दक्ष पत्नी करीं स्नेहाचं—अभयाचं— कृपेचं वरदवाण घेऊन उभी आहे. तिच्या या स्वरूपाला इथे पुंडरीकवल्ली म्हणतात.

मंदिराच्या चवथ्या परिक्रमेंत शिवयुगुलाच्या मनोहर मूर्ति आहेत. आणि याच परिक्रमेंत दक्षिणेकडच्या कोपऱ्यांत नटराजाची जीवनरागिणी माता पार्वतीचं सुविशाल मंदिर आहे. तेहि अत्यंत सुरेख आणि नुबक आहे. इथं तिला दक्षिण नाटचेश्वरी असं म्हणतात.

मधे नटराजाच मंदिर आणि भोवती अनेक देवतांच्या मंदिरांची अशी अप्रतिम रचना आहे की आकाशगंगेच्या तीरावर चन्द्राभोवतीच्या तारांगणा-चीच आठवण व्हावी. गोपगोपींच्या मेळाव्यांत श्रीहरीनं केलेली मनोहर रासलीलाच समोर दिसावी.

मंदिराच्या तिसऱ्या परिक्रमेंत एक विशाल सरोवर आहे. याला शिवगंगा सरोवर किंवा हेमपुष्करिणी म्हणतात. काठीं आलेल्या आर्तांचे पापताप फेडीत ही हेमपुष्करिणी पक्क्या बांधणीच्या दाक्षिणात्य वळणाच्या कुंडांत विहरत असते. इ. सन ५०० च्या पूर्वी याच पुण्यपुष्करिणीनं काश्मीरच्या हिरण्यवर्माला त्याच्या कुष्ठरोगांतून मुक्त करून परत हिरण्यवर्मा बनवलं होत. म्हणे ! या पुष्करिणीच्या तीरावर पण जगदंबेचं मंदिर आहे. तिच्याहि वाटेला शिवशिल्पाचं जरतारी मखर आलं आहे. शिवअनुरागाचं प्रसन्न आणि गुलाबी हसूं तिच्या काळ्या प्रस्तराच्या ओष्ठयुगुलांना लाभलं आहे. इथे ती शिवकामसुंदरी म्हणून विख्यात आहे.

त्या शिवकामसुंदरीच्या समोर, हेमपुष्करिणीच्या पैल, दाक्षिणात्य मंदिराच्या पद्धतीप्रमाणे एक सहस्रस्तंभमंडप आहे. इतर ठिकाणच्या मंडपा-पेक्षा सर्व शिल्पाकृतींनी अत्यंत उत्कृष्ट असा हा मंडप आहे. हा

सहस्रस्तंभ मंडप, चतु:सीमांचीं गोपुरं, आणि प्रत्यक्ष नटराजाच्या रत्नसभा आणि कनकसभा यांच्यातलीं सारीं शिल्प केवळ नृत्य आणि नृत्य आविष्कारत आहेत. शशवापासून वार्धक्यापर्यंत, स्त्रीदेहापासून तों शुकसारिकांपर्यत केवळ नृत्याचंच नितान्त रमणीय जग इथं प्रकट झालं आहे. खरं तर हें संपूर्ण सुविशाल मंदिरच एक मोठी रंगशाळा आहें हे ठायीं ठायीं प्रत्ययाला येतें. जगत्रयांचा स्वामीच इथे नृत्य करण्यासाठी उभा आहे. सोमस्तवराजांत म्हटलें आहे--

जगत्रयं शाम्भवनर्तनस्थली ।
नटाधिराजोऽत्र परः शिवः स्वयम् ।
सभा नटरंग इति व्यवस्थिति : ।
स्वरूपतः शक्तियुतात् प्रपंचिता ।।

एवढी विराट नर्तनस्थली अद्याप खरोखर बघितली नव्हती. तरी नृत्यशास्त्राप्रमाणे एकूण १०८ मुद्राभिनीत नृत्याविन्यासांपैकी केवळ एकच नृत्यमुद्रा या मंदिरामध्ये आहे. पूर्व गोपुरावर मात्र या एकशे आठ मुद्रा खोदल्या आहेत. नृत्यकलेचीं अनेकानेक अंगोपांगें दाखवीत जरी या साऱ्या आकृत्या हजारांच्या संख्येनं इथं आहेत तरी नटराजाची मूळ मुद्रा प्रत्येक ठिकाणीं आपला विशेष प्रभाव दाखवते. हें नृत्य भुजंगत्रास या नांवाने नृत्यशास्त्रांत ओळखलें जाते. मुद्रा उत्तम देशतालाच्या पद्धतीत आहे. या नृत्यांत उत्पत्ति, स्थिति, लय, मुक्ति आणि अभय असे पाच भाव दाखविले आहेत. डमरू उत्पत्तीचं प्रतीक आहे. खाली झुकलेला हात स्थिति दाखवतो. डाव्या हातांतल्या अग्निशिखा लय दाखवतात. वर उचललेला वामचरण मुक्तिहेतु आहे आणि वरदमुद्रा दाखवणारा वरदपाणी अभयसूचक आहे. आणि हें सार नृत्य विश्वाची सुव्यवस्था आणि सतुलन यांचं शाश्वत प्रतीक आहे. म्हणजे आज विश्वाला पोषक ठरणाऱ्या, वृद्धिगत करणाऱ्या आणि भिववून टाकणाऱ्या सगळ्या सर्वसमर्थ सत्ता या त्या नटराजाच्या महन्मंगल नृत्योत्सवातल्या सहाभागिनी शक्ति आहेत

तिथल्या प्रत्येक मंदिरांत दर्शन घेतांना मन त्याच्या नृत्याचाच विचार करीत होतं. कसं असेल ते नृत्य ?

अखिल ब्रह्मांडाचा रंगमंच असेल. भोवतीं ग्रहगोलांचं रिंगण असेल. चहूकडे सूर्यमंडलाचा सप्तरंगी झळाळ कोंदाटला असेल. वरुणाची आर्द्र-शीतलता असेल. अग्नीचं सर्वदाहकत्व असेल. पृथ्वीचा गुरुभार असेल. नृत्याचा अट्टहास उंच उसळवून दशदिशा व्यापून टाकणारा समीर असेल.

पौर्णिमेच्या चंद्राचा चांदवा घेऊन तारांगणाचें छत ताणलेलें असेल. चित्-कलेच्या रत्नदीपांची शोभा उजळली असेल. महामायेचं नेपथ्य असेल. नव-रसांचे सागर उचंबळत असतील. शब्दनिरपेक्ष भावनांचे गिरिवर उफजलेलें असतील. सप्तस्वरांचे सप्तसिंधु एकाकार होऊन प्रणव स्वराचा महार्णव अवघ्या अवकाशमंडळाला नादमय करीत असेल.

दशदिक्पाल ध्वनिप्रतिध्वनींचे मुरज, मृदंग, भेऱ्या, ढोल, नगारे घेऊन उभे असतील. उत्पत्तीच्या हातीं त्रिभुवनमोहिनी वीणा असेल. स्थितीच्या पायी लालनपालनाचीं घुंगरे असतील नि हातीं करताल. संहाराच्या मुखीं असेल शिंग, शंख.

असें अवघियांचें अवघें रंगमय झालें असेल. त्याच्या महान् नृत्यांत सह-भागी व्हायला आतुर होऊन त्याला लवकर येण्याविषयी प्रार्थना करत असतील--

भवानीसह भवा ये. अंबिकेसह त्र्यंबका ये. शिवेसह शिवा ये. कालीसह महाकाला ये ! आता उशीर लावू नकोस. हे रुद्राणीच्या रुद्रा, महारुद्रा, विकटभैरवा, आपल्या गणांसह ये आणि सुरू कर हा तांडवाचा सोहाळा—

डुमडुमत डमरु ये
खणखणत शूल ये
शंख फुंकीत ये--येई रुद्रा।

आणि असा तो शिवशंकर मग आपल्या चित्शक्तीसह त्या अलौकिक रंगमंदिरांत अवतरत असेल. मस्तकावरची गंगामाई जटांचं वेष्टण गच्च धरून बसत असेल. झुकलेली चंद्रकोर नीट सावरून सावधपणें बसत असेल. अंगांगांवरची सर्पकुळें आपलीं वेटोळीं अधिक घट्ट करून घेत असतील. आणि महाप्रलयंकर भाललोचन उघडला जाण्याच्या तयारीत असेल.

नृत्यातुर त्रिभुवनमोहिनी जगदंबेच्या शेजारी तो कोटिरतिमदन, मनोरमवदन नटराज उभा ठाकला असेल आणि हळूच डावा पाय वर उंचावून समस्तांकडे बघत आपला वरदपाणी दाखवीत तो आपल्या प्रचंड तांडवाला प्रारंभ करीत असेल.

कल्पनांचे पंख लावले तरीहि यापेक्षा किती भरारी मारतां येणार ? जें शब्दांच्या, दृश्यांच्या, कल्पनेच्या देखील पलिकडचं आहे तें माझ्या क्षुद्र प्रतिभेच्या कवेंत कसें गवसणार ? हो तर दुधाऐवजी पीठपाणी घेणाऱ्या द्रोणपुत्रापेक्षाहि भयंकर वंचना आहे. ही केवळ त्याच्या कनकसभेतल्या श्रीमंतीच्या दर्शनाने झडून गेलेल्या माझ्या शब्ददारिद्र्याची एक कथा आहे.

नटेश्वराच्या रंगपटांत खूप खूप फिरलों. त्याच्या रत्नकनकसभा परत परत न्याहाळल्या. नवरसांत न्हायलेलं तें शिल्पसाम्राज्य नेत्री साठवून घेतलं. त्या विस्तारांत त्याच्याविषयीचा आदब होता, पण भीति नव्हती. देव तोच होता, पण हास्यलालित्याला घेऊन, केवळ वैराग्याची विभूति लेवून नव्हे. इथं तो किशोर नटराज आहे, वृद्धेश्वर नव्हे. म्हणून त्याच्याविषयी अधिक जवळीक वाटते.

एक्या हातीं लोण्याचा कवळू घेऊन, तळवे तळहात टेकीत, डाव्या गुडघ्यानं रांगणाऱ्या नटनागर रंगनाथसारखा हा नटरंग देखील अति मोहक वाटतो. त्याची आवारें आणि भोवतीचा छोटचा मोठचा देवळांचा गोपुराच्या सीमेतला आटोप प्रेक्षणीय वाटतो. परिक्रमांच्या कोटावर सारख्या अंतरावर सारख्या आकाराचे नंदीच नंदी बसवले आहेत. जणु नंदीगण अहोरात्र तटावर पहारा देत आहे. शिवपरिवाराची सगळी मंदिरं स्वर्णमंडित शिखरांची आहेत. त्या सगळ्यांना मनोभावें नमन केलं प्रत्येकाने तीर्थप्रसाद दिला तोहि कृतार्थ बुद्धीनं ग्रहण केला आणि नटराजाचा निरोप घेतला.

नंतर पहिल्या परिक्रमेंत येऊन परत मदिराकडे वळून बघितलं. आता मघाची शोभा आंतच राहिली होती. आंतला रसमय अविष्कार आंतच मर्यादित झाला होता. बाहेरचा विस्तीर्ण प्राकार एकदम मोकळा होता. जुन्या घडणीच्या वास्तूचे अवशेष उरलेले दिसत होते. भरदार पीक कापून नेल्यानंतर उरलेल्या शुष्क खुंटासारखे. काळवंडलेले दगड, झिजून गेलेल्या प्रतिमा आणि पुसट झालेल्या प्रतिमा त्यांचे केविलवाणे भाव दाखवतात.

वार्धक्याच्या छटा दाखवितात. प्रत्यक शिलाखंडागणिक कलाकौशल्याचे श्रम ओतून उभारलेलं तें वास्तुसाम्राज्य आता जीर्णत्वाचं वैराग्य दाखवत आहे. त्यावर बेदरकारपणे शुष्क तृणांकुरें पसरलीं आहेत. वृद्धत्व दाखवून जणु तो वास्तुपुरुष आम्हांला विचारतो आहे की बघा ही जराजीर्णत्वाची लाट पहिल्या तटावर येऊन थडकली आहे; हळूहळू ती आंत सरकणार आहे, अगदी मंदिराच्या हृदयापर्यंत; तीं अडवण्याचं सामर्थ्य आहे तुम्हां कोणांत ? आम्हांला उभारणारी दानशीलता आणि वैभवसंपन्नता आता गेली; त्यांचं कर्तृत्व आता केवळ सावरून धरण्याची दानत तरी तुम्ही दाखवू शकाल काय ?

नाही, या गोष्टीला आज आमच्याजवळ उत्तर नाही. हें उत्तरदायित्व सांभाळण्याची कुवत आमच्याकडे नाही

आम्ही निःशब्द मनाने परत फिरलों. त्या कठीण वास्तवतेच्या आंतलं नटराजाच्या कृपाप्रसादाचं श्रीफल घेऊन, कनकसभेचा झळाळ त्या जीर्ण कोटांत ठेवून आम्ही गाडींत बसलो. मन नटराजाची मुद्रा आठवीत होतं. त्याचे केळीच्या गाभ्यासारखे अवयव असलेली ऐट आठवीत होतं. चिदंबरम् मागे जात होतं. नटराजाचं चिदंबरम् ! गीतनृत्याचं चिदंबरम्. त्याला निरोपाचा नमस्कार करतांना मनांत जयजयकाराच्या ऊर्मि उसळत होत्या——

जय गीत की जय——जय नृत्य की जय
नटराज की जय——जय चिदम्बरम् ।

———

# ८

# हरिहरांची कांची

नटराजाच्या नृत्यविलासाची, सुवर्णशिखरांची, अकरा अकरा कलशी गोपुरांची चिन्मय-नगरी मागे जाऊं लागली. शहरांतल्या उंच अट्टालिका नि आधुनिक पद्धतीने बांधलेल्या इमारतीचे सौध मागे जाऊं लागले. चिदम्बरम् शहर धूसर होत होत लांब गेलं आणि उतरणीच्या उन्हांत नटराजमंदिरांतल्या मांडा-मांडीच्या उंच उंच खुणा फक्त क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर तळपत राहिल्या !

खरं तर हा मुक्काम थोडा मजेचा झाला असता. पहाट, सकाळ, दुपार आणि संध्याकाळ यांच्या विविध छटात नटलेलं चिदम्बरम्चं सौभाग्य बघायचं होतं. मंदिरांत देखील कनकसभेंत नृत्यानं ओथंबून आलेलं प्रस्तराचं मऊ मुलायम हृदय परत परत बघायचं होतं. नटेश्वराला देण्यांत येणाऱ्या राजो-पचारापेक्षा गवाक्षांतल्या 'गगनलिंगा' ला होणारी साभिषेक पूजा बघायची होती. पण ' सँक्शन ' संपत आलं होतं. एकूण प्रवासाच्या मर्यादा आता जाणवूं लागल्या होत्या. त्यामुळे गेलेला, जात असलेला क्षण पकडणं म्हणजे एखादं आवडलेलं सिनेमादृश्य धरून ठेवण्याइतकं अवघड झालं होतं.

दक्षिणेतली ही पहिली परिक्रमा आता पूर्ण व्हायला लागली होती नाही म्हणायला जातां जातां दोन महत्त्वाचीं ठिकाणं बघायचीं होती. त्यांचंहि जबर आकर्षण निर्माण झालं होतं. त्यातलं एक ठिकाण म्हणजे सप्तपुरींमधलं एक अतिशय महत्त्वाचं क्षेत्र, सप्तमोक्षदायिका रत्नपुरीमालिकेंतलं मधलं अक्षय माणिक आता बघायचं होत. ज्या सुवर्णपुरींत एका अंगी गौरीसह हर आहे तर दुसऱ्या अंगी श्रीसह श्रीहरि विराजत आहे ती पुरी आता बघायची होती, ती काची नगरी, काचीपुरम्, कांजीवरम् आता घडायचं होतं.

रात्रीं चेंगलपट स्टेशनवर उतरलों. हें स्टेशन अतिशय महत्त्वाचं. मुंबईहून मद्रासकडे येतांना लागणारें आरकोणम् स्टेशन चेंगलपटशीं सांधलें गेल्यामुळे कल्याण–दौंड मनमाडसारखा आरकोणम्-मद्रास-चेंगलपट हा एक त्रिकोण निर्माण झाला आहे. आणि त्या मंगलमय तोरणाचें मधलें पदक म्हणजे कांचीपुरम् स्टेशन आहे, किंवा कांची नगरी आहे. चेंगलपटहून हें ठिकाण अवघे बावीस मैल आहे. सकाळीच व्यवस्थित गाडी मिळते वगैरे माहिती मिळवून रात्र आम्ही चेंगलपट स्टेशनवरच घालवली. झोप येत नव्हती. लहान मुलाची इवली खुशी त्याची झोप चाळवीत असते तशी 'उद्या अमुक बघायचं' ही उत्सुकता झोपेला फिरकूंच देत नव्हती त्याच उत्सुकतेनं पहाटेला अगदी अवेळी उठवून सगळं आवरायला लावलं. जरूरीपुरतं सामान बरोबर घेतलं. बाकीच तिथल्याच स्टेशनवर सुरक्षित ठेवून चेंगलपट-आरकोणम् सवारी गाडी गाठली आणि तासाभरांत प्रवास संपवून स्टेशनवर पाय टेकले. समोरची पाटी जणु विनयानं सांगत होती. 'कांचीपुरं स्थानकम् इदमस्ति—आगम्यताम्, आगम्यताम् ! शुभम् अस्तु भवताम् आगमनम् ।'

आम्हीं एका नजरेंत स्टेशनचा पसारा आणि एकूण आसमंत बघून घेतला आणि बाहेर आलों. गांवाचे दोन भाग आहेत. मोठा भाग शिव कांची किंवा मोठी कांची. छोटी कांची विष्णु कांची. दोन्ही एकमेकांपासून तीन मैल लांब आणि हें सगळें स्टेशनपासून दोन मैल लांब. तेव्हा कुठंहि जायचं तरी वाहन हवंच. म्हणून स्टेशनच्या आवारांत वाहनांची मोठी गर्दी झालेली दिसते. दोन्ही बघण्यासाठी दिवसभरासाठी तांगा ठरवण्याचे सौदे केले जातात अन् नंतर यात्रेकरू मार्गी लागतो.

आमच्या वाहनाची ठरवाठरव होऊन निघेपर्यंत बराच वेळ झाला होता. दर्शन बंद होण्याची भीति होती. आणि वेळेत सगळीं दर्शनं घ्यायचीं होती. अशा अनेकविध तत्रस्थ अडचणींच्या कुंपणापलीकडे उभे होते तिथले 'एकाम्र-नाथ' आणि वरदराज स्वामी!

स्टेशनभोवती बकालपणा सोडला तर सर्व कांची म्हणजे सतत व्यवहारांत गजबजलेली, माणसांनी फुललेली, श्रद्धेन भरलेली बाजारपेठच आहे. व्यवहाराच्या आडव्या उभ्या धाग्यांनी विणलेला कांचीपट म्हणजे एकाम्रेश्वराच्या आणि वरदराजाच्या दों बाजूंच्या छोटया मोठया पदरांनी जडवलेलं एक मौल्यवान महावस्त्रच निर्माण झालं आहे.

आमचं वाहन शिवकांचीच्या दिशेनं दौडत होतं. क्षेत्रीय ब्रह्मोत्सव चालू होता त्यामुळे व्यवहाराच्या आधीच्या गर्दीला आधिक गजबज आली होती. यात्रेकरूंचे समूह सहकुटुंब रस्त्यावरून घाईगर्दीत चालत होते. कांही दुकानांत गर्दी करत होते. भांडयांचीं नि वस्त्रांचीं दुकान फुलून गेलीं होतीं. बाजार आणि गडबड सगळीकडेच असते. पण जत्रेंतल्या गडबडीची मौज कांही वेगळीच असते. पलीकडे सगळया इमारतींच्या मागे गोपुरांची शिखरं आपली डोकीं उंचावून उभीं होतीं. आमच्याप्रमाणेच इतर अनेकांचा ओघ तिकडेच वाहत होता.

मधेच एक सरोवर लागलं. हें प्रमुख तीर्थ या क्षेत्रांतलं. त्याचं नांव होतं सर्वतीर्थ सरोवर. सर्व तीर्थांची पुण्याई आपल्या पाण्यांत घेऊन हें सुविस्तृत आकारांत नटलं आहे. भाविक मंडळी दर्शनापूर्वी इथे स्नान दान करतात. कांही मंडळी मुंडणादि तर कांही पिंडप्रदानपूर्वक पितृतर्पणहि करतात. सरोवराच्या मध्यभागी छोटसं मंदिर आहे. चारी बाजूंनी मदिरांनी दाटीवाटी करून सोडली आहें. अनेक देवदेवतांनी त्यांतून गर्दी करून सोडली आहे. त्यात काशीविश्वेश्वरहि आहेत. काशी आणि कांची हे महादेवाचे दोन नेत्र आहेत हें दाखवून दक्षिणोत्तर प्रदेशाची भावैक्यता किंवा एक अविभाज्य भक्तिसाम्राज्य दाखवण्यासाठी ते इतके दूर सर्वतीर्थांना घेऊन या सर्वतीर्थावर वसतीसाठी आले असावेत. त्या पावन तीर्थाचें आणि प्रमुख मंदिरांचें दर्शन घेऊन आम्ही शिवकांचीच्या मुख्यमंदिराकडे निघालों.

सर्वतीर्थापासून केवळ एका फर्लांगावर शिवकांचीचें हें मुख्य मंदिर विस्तारलें आहे. यांतल्या महादेवाचें नांव एकाम्रनाथ किंवा एकाम्रेश्वर. नेहमी प्रमाणे हें मंदिरहि चतुर्दिशांच्या उंच उंच गोपुरांना घेऊन आणि आंतमधे शिवपरिवारासह इतर अनेक देव घेऊन उभें आहे.

सर्वांत दक्षिणेकडचं गोपुर अधिक उंच आहे आणि कलाकौशल्याच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. याला राजगोपुर म्हणतात. अनेकानेक मूर्ति आणि विविध कलेचीं लेणीं घेऊन मजल्यामजल्यांनी चढत जाऊन वर निमुळत्या भागावर आठ ते अकरा कलश वाहणारं विमान धारण करणारीं हीं गोपुरं म्हणजे खरोखर एक वैशिष्टयपूर्ण रचना आहे, किंवा तोच दक्षिणेंतला एक विशेष आहे, दक्षिणयात्रादर्शनाचा सारांश आहे. सगळ्या यात्रांतला बारीकसारीक किंवा प्रसंगी विशेष तपशीलहि विसरायला होतो. पण गोपुर हा प्रकार कधीहि विसरला जात नाही.

कटीवर हात ठेवून, अनन्य झालेल्या भक्तांना भवसागराची उंची सांगणाऱ्या पांडुरंगाप्रमाणे हीं गोपुरंहि इमारतीच्या बाजारांत आकाशाशीं डोकं भिडवीत तापत्रयांनी शिणलेल्या जीवाला भगवंताच्या कृपेचं अभय देत उभी असतात. वस्तुत: गोधन सगळं उत्तरेंत, पण गोपुरं मात्र दक्षिणेंत—हा विलक्षण विरोधाभास जाणवतो. आणि असा गंमतीचा विचार येतो की गाई उत्तरेंत चरायला गेल्या आणि गोपालाच्या मुरलीवादनाच्या रंगांत त्या " चरु विसरल्या " " पुच्छे उभारोनी ठेल्या " अशा झाल्या असतील आणि ही गोपुरशिखरं मात्र अगस्तीच्या परतण्याची वाट बघणाऱ्या विंध्याचलासारखी त्यांच्या येण्याची वाट बघत युगानुयुगें उभी आहेत. त्यांची विमानं नुकतीच टेहाळणी करून परत आली आहेत.

या राजगोपूरासमोर एक मंडप आहे. त्यांतले स्तंभहि खूप भरदार आहेत. प्रत्येकावरचं मूर्तिकौशल्य प्रेक्षणीय आहे. त्यांच्या बैठका आणि वर प्रस्तरछत्र तोलून धरणारे त्यांचे स्कंध अतिशय सुरेख आहेत. सगळ्या आकारात वैविध्य आहे. पण ठेवणीचं वैशिष्टय तेंच तें आहे.

दोन मोठाल्या परिक्रमांत हे मुख्य मंदिर आहे. पूर्व गोपुराजवळ गणपति आणि स्वामी कार्तिक यांची मंदिरं आहेत. इथेहि राजस वैभव सगळं स्कंदाला देऊन गणेशाने स्वत:साठी तैलाभिषेक आणि भस्माचा उपचार ग्रहण केला आहे.

शिवकांचीचं हे मुख्य मंदिर आहे. काशी कांची हे त्या विराट नटेश्वराचे दोन नेत्र आहेत. म्हणून कांचीचं दक्षिणेत आधिक महत्त्व आहे अशी कल्पना आहे. उत्तरेतली सर्व शस्यश्यामलता त्या गोपाळाची आहे. " सब भूमि गोपाल की." तसं दक्षिणेकडे प्रत्येक ठिकाण, कडेपठार, नदीतीर, समुद्रकाठ, गुहा, गुंफा, सगळं सगळं महादेवमय आहे. सर्वस्वी त्याचं आहे. ही त्याची क्रीडास्थळं आहेत. क्षणात कैलासावर तो कर्पूरगौर गौरीबरोबर रामचरित्राची चर्चा करील, तर क्षणात तो इकडे दक्षिण टोकाला येऊन या एकाम्रवनांत तिच्याबरोबर सारीपाट खेळेल. स्त्रीस्वभावानुसार पार्वती म्हणजे दक्षिण नाटचेश्वरी काही रुसण्याफुगण्याचे अल्लड नाटच दाखवील. मग महासागरासारखा क्षणी गंभीर तर क्षणी खवळलेला तो भोळा सांब अचानक आपल्या जीवनसंगिनीला—आपल्या 'शिवकामसुंदरी'ला " जा तू कुरूप होशील, तुला तुझ्या प्रियकराचा वियोग होईल " असा शाप देऊन रागावून निघून जाऊ बघेल. सहज नाटचांतलं ते रौद्र पर्यवसान बघून गौरी गडबडेल. आपल्या स्वामीच्या चरणी लागेल. पण त्याचे शब्द म्हणजे दक्षिणेतल्या काळचा दगडावरची रेघ ! नंतर हळूच त्या दगडावर कृपेची क्षीण रेषा उमटेल आणि तो भोलानाथ उश्शाप देईल—" तू श्रीहरीचं स्मरण कर. तो तुला परत पूर्वीचं स्वरूप देईल मग तुझं माझं मीलन घडेल ".

पहिल्याच अंकात एका टोकाला पोचलेली कथावस्तु दुसऱ्या अंकी सतीच्या तपश्चर्येनं प्रसन्न झालेल्या श्रीहरीला वरदराज स्वामी बनवून तिच्यापुढे उभे करील अन् ते मातृस्वरूप जगदंबेला त्रिभुवनमोहिनी छबीनं सालंकृत करतील. साऱ्या गोड, लोभस, आर्जवी भावांना तिच्या डोळचात एकवटायला सांगून त्या भगवती त्रिपुरसुंदरीला कामाक्षी करतील. असं हे शेवटी श्रेष्ठ, अनिद्यसुंदर स्वरूपाचं साधन घेऊन ती शिवा शिवाराधनेला बसेल. शिव तिच्या तपाची कसोटी पाहील. कंबई नदीच्या प्रवाहांत अवखळ वेग धारण करून तिचा तपःसंसार वाहवून नेऊ बघेल. स्त्रीसुलभ भीतीनं ती गोरटी त्या शिवलिंगालाच मिठी घालील आणि शिवमीलन होऊन हे नाटच संपेल.

शिवचरित्राच्या या पुण्यप्रवाहात असे अनेकानेक प्रसंग घडले आहेत-आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या खुणा अशी तीर्थक्षेत्रं होऊन आज भाविकांच्या मनाला आल्हाद देत आहेत. ज्या एकाम्रवनात ज्या आंब्याच्या झाडा.

खाली पार्वतीनं तपस्या केली तिथे तिची स्मृति म्हणून तिची तपस्यारत मूर्ति त्या आंब्याच्या झाडाखाली आहे. संतुष्ट होऊन पार्वतीचा स्वीकार केल्यावर तोहि तिथे एकाम्रनाथ या नावानं वस्ती करून राहिला आहे. कामाक्षी सुदरीचंहि इथं सुरेख मंदिर आहे. आणि तिला सर्वांगसुंदर बनवणारा श्रीहरिही विष्णुकांचीमध्ये वरदराज स्वामी म्हणून तिष्ठत आहे. ही या क्षेत्रवैशिष्टचाची परंपरागत आख्यायिका !

ही सर्व ठिकाणं इतर ठिकाणांसारखी कोटापरकोटांच्या आंत वसली आहेत गोपुरांचे प्रतिहारी चतु:सीमेला ठेवून आपल्या परिवारासह, बहुविध शिल्पसौंदर्याला घेऊन एकाम्रेश्वर इथं विराजमान आहेत. हे वालुकानिर्मित लिंग आहे म्हणतात. त्या श्यामवर्ण महालिंगाला नमस्कार करून आम्ही बाहेर आलो.

एवढं होईतो उन्ह तळपू लागलं होतं. सगळचांच्या सावल्या 'आता पोटा-पाण्याकडे बघा' म्हणून पायी लागत होत्या. पण माहीतगार सांगत होते--अजून देवद्वारं उघडी आहेत. आणि आम्ही तोपर्यंत फक्त एकाम्रेश्वराच्याच दरबारात होतो. मग लगबगीन तेथून निघालो आणि तिथून सुमारे एक-दीड फर्लांगावर असलेल्या कामाक्षी मंदिराकडे वळलो.

मागील कथेच्या संदर्भाचं सूत्र हाती घेऊन आम्ही तिच्या गोपुराच्या सिंहद्वारांतून आत शिरलो. हे दक्षिण भारतातलं अत्यंत महत्त्वाचं आणि सर्वश्रेष्ठ शक्तिपीठ आहे असं म्हणतात. स्वत: कामाक्षी बनून आपलं सौभाग्य-निधान परत मिळविणारी ही त्रिपुरसुंदरी जगदंबा आद्याशक्ति इथे कामाक्षी किंवा कामकोटी या नावानं उभी आहे. शरणागतांची मनोवांच्छितं पुरी करण्यासाठी ती सौभाग्यसुंदरी इथे वसत आहे.

असं म्हणतात की पूर्वी तिच्या त्या उग्र तपश्चर्येचं तेज तिच्या मुखी मावत नव्हतं. त्यामुळे दर्शनार्थींना तिच्या तपाचं तेज सहन होईना. भगवत्पूज्य-पाद आद्य शंकराचार्यांनी अनेकपरीची स्तुतिस्तोस्त्र गाईली . "तू शिव-कामसुंदरी आहेस, कमलाक्षी कामाक्षी आहेस, सुकान्तचंद्रानना आहेस याचा हे आई, तुला विसर पडला कीं काय ? संसारतापांनी त्रस्त झालेल्या जड-जीवांना तुझ्याशिवाय अन्य गति नाही हे तुझ्या लक्षात नाही का आले ? माझ्या स्तुतीने तू सौम्य हो, चंद्रासारखी शीतल हो आणि भक्तांना तू काम-

कल्पवल्लरीसारखी हो. हे आई, तू त्रिभुवनजननी आहेस. तू वत्सल हो. आम्हा साऱ्यांना तुझं प्रेम लाभू दे ".

आचार्यांनी आईच्या प्रांगणांत ठाण मांडून तिची स्तुति केली नि तिला प्रसन्न करून घेतले. मग ती मातृवात्सल्याचे भाव दाखवीत सौभाग्यवतीचा साजशृंगार लेवून तिच्या निजमंदिरात विराजली. ती जणु आचार्यांना म्हणाली--" मुला, लोककल्याणासाठीच तू हे सारं मागितलंस. तथास्तु. तुझ्या म्हणण्यापलीकडे मला आता जाता येणार नाही." आजहि कामाक्षीची उत्सवमूर्ति वाजतगाजत मिरवणुकीसाठी म्हणून बाहेर पडायला निघते ती आधी शंकराचार्यांच्या मूर्तीजवळ येऊन थांबते आणि बाहेर निघण्याची परवानगी विचारते !

दर शुक्रवारी कामाक्षीच्या आवारात सुवासिनींचा मेळावा भरतो. हळदीकुंकवाच्या रंगांनी अन् सुवासांनी आसमंत धुंद होतो. सौभाग्यवायनांची देवघेव होते आणि रत्नमाणकांच्या अलंकारांनी नटलेल्या कामाक्षीच्या दर्शनासाठी ही झिम्मड उडते.

आमच्या सुदैवानं तो दिवस शुक्रवारच होता. त्यामुळे तो भरगच्च सोहोळा आमच्या दृष्टीस पडला. गर्दी जरा कमी झाली होती. निजमंदिरापुढे जी होती तेवढीच. उशीर झाला होता म्हणून गर्दीच्या दिव्यांतून सहीसलामत सुटून आम्ही दर्शनासाठी तिच्या दाराजवळ येऊन उभे राहिलो.

आपल्या ऐश्वर्याचे खूप मोठे आवार मांडून ती स्वतः मात्र माजघरासारख्या छोट्याशा आणि अंधाऱ्या गाभाऱ्यात विराजमान होती. भोवती सोबत होती दोन ढणढणत्या लामणदिव्यांची. घरातली सगळी उठबस करून, घरांतल सगळं यथास्थित पार पाडून गृहणीन सहज विसावण्यासाठी क्षणभर येऊन टेकावं तशी ती इथे टेकली होती. सोन्याची महिरपी प्रभावळ मात्र इथेहि तिची शोभा वाढवत होती. ती बसली होती पद्मासन घालून कनकासनावर. भरगच्च सुवर्णालंकार तसेच्या तसे ठेवून ती विसावा घेत होती. केशरकुंकुमाने भरलेल्या मळवटाखाली भृकुटींची हिऱ्यांची ठेवण होती. उभय नासिकापुटी हिऱ्यांची नासिकाभूषणे आणि त्याखाली लाल अधरोष्ठ उठून दिसत होते. नासिकाग्र दृष्टी, प्रसन्न हास्यरेखांनी उजळलेले मुखमंडळ, मस्तकी मुकुट, कानात मोत्यांच्या परड्या, मागील दो हाती कमळांच्या

कळचा आणि पुढील दोन्ही हात दर्शनार्थींचे स्वागत करण्यासाठी अभयमुद्रेत असलेले अशी ती श्यामवर्णा शिवप्रिया पाहिली आणि धन्य वाटले. या श्यामेसाठी कर्पूरगौर शिवशंकर श्याम झाला की त्या श्यामलिंगी एकाम्रेश्वराला आळवण्यासाठी ही गौरी श्यामा झाली हे त्यांचं त्यांना माहीत. आज उभय मिळून भक्तांचे गोमटे करायला ती उभी आहेत हे मात्र खरं.

तिचाहि प्राकार मोठ्या परिवारांनी गच्च भरून गेला आहे. अन्नपूर्णा आणि शारदांबा या दोन सख्या तिला सोबत करीत आहेत, तर तिच्या द्वारावरच्या कामकोटिचक्रात आद्यालक्ष्मी, विद्यालक्ष्मी, संतानलक्ष्मी, सौभाग्यलक्ष्मी, धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, वीर्यलक्ष्मी आणि विजयलक्ष्मी या सगळ्या आद्याशक्तींचे न्यास आहेत. वर परत द्वाररक्षक म्हणून स्वतः श्रीमत् शंकर !

परतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीमच्छंकराचार्यांनी येथे स्थापिलेलं कामकोटी पीठ हे इथलं अत्यंत प्रधान श्रीपीठ आहे. या क्षेत्रातल्या समस्त देवतांची द्वारं त्यामुळे या दिशेला आहेत. त्यांच्या उत्सवमूर्ति जेव्हा रथोत्सवासाठी बाहेर पडतात तेव्हा या श्रीपीठाला त्यांना प्रदक्षिणा ही घालावीच लागते. म्हणजे धर्मावरची सगळी परकी आक्रमणं परतून लावून आपल्यातले मतभेद दूर सारून सर्व धर्मचक्राला एक सुनियंत्रित गति देणारी श्रीशंकराचार्य ही केवढी जबरदस्त शक्ति त्याकाळी होऊन गेली हे लक्षिण्यासारखं आहे.

यानंतर त्या शिवकांचीमधे वामनमंदिर, सुब्रह्मण्यमंदिर आदि छोटीछोटी मंदिरं बघून घेतली आणि कामाक्षीसह एकाम्रेश्वराच्या कांचीचा निरोप घेतला. शिवगंगेसह सर्वतीर्थपुष्करिणीचा निरोप घेतला.

टांगेवाल्यानं विचारलं–" सब दर्शन लिया अम्मा ?"

मी हसून म्हटलं– " हां, सब देखा; दर्शन लिया."

तो अधिक मोठ्यानं हसून म्हणाला– " ये सीवाकच्ची में सौ का उप्पर आठ सीवा टेंपल है !"

' काय १०८ शिवमंदिरं ?' मी मनात म्हटलं. काय हा सोस. असल्या अतिरेकानं पार्थिव पूजेचं महत्त्व कमी होतं हे आमच्या पूर्वजांच्या लक्षात

कस नाही आल ? त्या गंडकी नदीत सगळे गोटे शाळिग्रामाचे, तसं दक्षिणेत 'जो जो दिसावा फत्तर, तो तो जाणावा शशिशेखर असं झालय असो.

आता जायचं होतं विष्णुकांचीत. आपल्या घरी. श्रीहरीच्या राउळात. एकाच गावांत सासर नि माहेर असावं. नित्य नांदणं सासरी असलं तरी आपल्या माहेरी जाताना मुलीच्या पायावर पर फुटतात. तिच्या आनंदाची हलकीफुलकी पिसं तिच्या जीवाला गुदगुल्या करू लागतात. आणि मार्गात, ओळखदेख नसलेल्या मुलीलासुद्धा ती म्हणते 'साजणी '!–" ऐक गडे, माझिया माहेरी जाईन साजणी." तसा सहजपणा श्रीहरीच्या दर्शनाची ओढ लावतो. महादेवाच्या उच कळसावर नजर ठरत नाही. त्याच्या उग्रगभीर चरित्रापर्यंत आणि गूढ गहनतेपर्यंत बुद्धीला मजल मारता येत नाही. त्याच्यासमोर गेलं की मस्तक नम्र होतं–त्याच्या शिवत्वापुढे, त्याच्या वैराग्यापुढे. त्यावेळी, हा रसिकराज–गंगाधर आहे, सकल ललितकलांचा रसराज आहे याचा विसर पडतो. हा नाट्येश्वर आहे, स्वयं नृत्यनिपुण आहे हेहि विसरायला होतं. लक्षात येतो तो फक्त त्याचा स्मशानवास, चंद्रकलेबरोबर त्याच्या मस्तकी विराजणारं नरकपाळ, आणि चिताभस्मावर वळवळणारी सर्पाची वलय. अद्‌भुत तेवढं दिसतं !

पण श्रीहरीच तसं नाही. त्याची कशीही प्रतिमा असो––शेषावर पहुडलेली असो की विटेवर नाहीतर कमळावर समचरणी उभी राहिलेली असो, पण त्याला बघितल्यावर त्याच्या सगळ्या ललितलीला आठवतात. त्याच्या स्वरूपात एखादं मिस्किल वडील माणूस दिसतं, एखादा खोडकर भाऊ आठवतो किंवा एखादं अल्लड नटखट अपत्य दिसत. आणि नकळत ओठी गंमतीचं हसू उमटतं––जवळिकेचं, आपुलकीचं!

कांचीच्या वैष्णवांगाचं दर्शन घेण्यासाठी आम्ही त्वरा करू लागलो. लौकिक अर्थानं आम्ही मोठ्या पुण्यपर्वणीला कांचीत आलो होतो. कामाक्षीच्या रूपानं शुक्रवारची सुवासिनी बघितली आणि त्याच दिवशी म्हणजे एकादशीच्या दिवशी भगवताचं दर्शन होणार होतं. लौकिक पुण्याकडे आमचं लक्ष नव्हतं. त्याचं होणारं अपूर्व दर्शन हीच आमच्या दृष्टीनं अलौकिक पर्वणी होती.

विष्णुकांचीच्या परिसरात सगळा ओघ मंदिराकडे वाहत होता. सगळें गाढे वैष्णववीर त्याच्याशी झुंझायला चालले होते. त्याच्या त्या उंच वेदी-वरच्या मंदिरवजा किल्ल्याला मोर्चे लावायला निघाले होते. त्याच्या अनंत सरोवरासह त्याला वेढायला निघाले होते. त्याच्या भक्तांच्या गर्दीत आम्ही गोपुर ओलांडून त्या अनंत पुष्करिणीजवळ किंवा कोटीतीर्थाजवळ आलो. आत गर्दी मावत नव्हती. तो विचारा आधीच वेढला गेला असेल. कदाचित् एव्हाना त्याच्या नाटकी आविर्भावाने तो शरणहि आला असेल. हात जोडून त्या वैष्णववीराचं स्वागत करीत असेल, विचारपूस करीत असेल ! ''

प्रसिद्ध उर्दू कवि ' शाद ' म्हणतात---

उसने कहा-- खिदमत तेरी ?
मैंने कहा-- है वन्दगी ।
उसने कहा-- क्या नाम है ?
मैंने कहा-- बन्दा तेरा ।

खाली समोरच एक सुरेख आरसेमहाल होता. त्यात उत्सवमूर्तीची प्रतिष्ठा झाली होती. षोडशोपचारे पूजन होऊन गेलं असावं. कर्पूरचंदनाचा सुवास धृतदीपाच्या सुवासाबरोबर आसमंतात दरवळत होता. चांगले पाच-पन्नास वेदोनारायण भोंवताली बसून वेदघोष करीत होते. गर्दी पुढे सरकत होती. त्या छोट्या मंदिराच्या उजव्या अंगाने आणि तिसऱ्या परिक्रमेच्या सोबतीत त्याच्या दर्शनाची वाट चालू लागलो. मधे पुढल्या अंगाला उजव्या बाजूचा अनंत सरोवराचा देखावा दिसूं लागतो. सुरेख बांधलेलं हे जलकुंड मधल्या मंडपामुळे फारच शोभिवंत दिसते. मागच्या बाजूला सुदर्शन मंदिर आहे. त्यांत विकट नृसिंहाची छोटी मूर्ति आहे. आणि त्या पलिकडे उभे आहेत शतस्तंभ. मंडप अगदी छोटा, पण उत्कृष्ट शिल्पाच्या अपूर्वाईनी नटलेला. मधे एक सुरेख सिंहासन. काळ्या काळ्या गुळगुळीत दगडांनी बांधलेले. नाजुक बारीक नक्ष्यानी जडवलेलं. यात्रेच्या वेळच भगवंताच विसाव्याचं ठिकाण. वैशाखी पौर्णिमेला थोडा अवकाश होता. नाहीतर देव-राजाचा तो अपूर्व ब्रह्मोत्सव डोळाभरी पाहिला असता. आताच्या दर्शनाच्या वाटेवर त्याच्या सगळ्या स्वाऱ्या अगदी सिद्ध होत्या. पुष्करिणीजवळ मांडव

घातला होता. पश्चिम गोपुराच्या अकरा मजली उंचीच्या छायेत एक अष्ट-कोनी अंगाचा कमानीकमानीचा रथ वस्त्राभूषणे लेवून सज्ज होत होता. पुष्करिणीवर जलयान सजवणं चाललच होतं. हळद लागायला अजून अवकाश होता. पण वातावरण मात्र उत्सवमय झालं होतं. गोपुरापासून गरुडस्तंभापर्यंत आणि रामानुज मंदिरापासून तो भगवती महालक्ष्मी मंदिरापर्यंतच्या हाल-चालींना त्या उत्सवाची झळाळी होती. बाहेर नवनवी उभारणी चालू होती तर मंदिरामध्ये नटणंमुरडणं चालू होतं.

महालक्ष्मीचं मंदिर पूर्वाभिमुख, अतिशय सुरेख आणि रेखीव आहे. आंत भगवती कमलासनावर बसली आहे. श्यामवर्णात हास्याची चंद्रकोर साजते आहे. मोठ्या काठापदराचा कुंकुमवर्णाचा शालू पांघुरला आहे. भरजरी हिरवी कचुकी ल्यायली आहे. विविध आकाराच्या सुवर्णाच्या माळा घातल्या आहेत. खूप मोठ्या मोठ्या पुतळ्यांचे गाठले देखील त्यात लकाकून राहिले आहेत. नाकांत नथ आहे. त्यात हुरमुंजी थेंबोट्या आकाराचा मोती अधरोष्ठ झाकून टाकीत आहे असं तिचं दर्शन झालं. हातातल्या कमळकळिका सोन्याच्या आणि अभयकर दाखवणारी तिची ती प्रसन्न मुद्राहि सोन्यात ओतलेली. भोवती माळा-वेण्यांच्या राशि पडलेल्या. त्यातलीच एक प्रसाद म्हणून मिळालेली डोक्यात माळली आणि नमस्कार करून बाहेर पडलो.

आता वरच्या मजल्यावर देवराज स्वामी. खाली आल्यागेल्याच्या भेटी-साठी सदरवजा आरसेमहाल. वर महाराणीचा महाल आणि त्याच्यावर खाशी स्वारी असा थाट. बरं नावहि देवराज. सगळ्या देवांचा राजा तो. त्याच्या वैभवाला काय उणे ? असा तो, उंच अट्टालिकेजवळ जणू भक्ताची वाट पाहत उभा आहे असं बघितल्यावर मात्र आपल्याला आपल्याच सुखाला काही उणीव नाही असं वाटायला लागलं.

वर गेलो तो त्याच्या गाभाऱ्यात विलक्षण गर्दी होती. इतर ठिकाणी गर्दी नियंत्रित ठेवून दर्शन सुलभ करण्याची जी व्यवस्था होती ती इथे आढळली नाही. आम्हालाही त्या गर्दीचं विशेष दुःख नव्हतच. भगवंताचा मुखचंद्रमा बघितला की भक्तीच्या सागराला अशा गर्दीच्या ऊर्मि येणारच. त्याबद्दल त्या उर्मीतल्याच आमच्यासारख्या थेंबांनी तक्रार कुठं करायची ? आणि ऐकायला

रिकामं तरी कोण ? आम्ही आमचा मार्ग केला आणि त्याच्यासमोर जाऊन उभे राहिलो.

अगदी जवळून दर्शन घडावं अशी तिथली मांडणी बघून बरं वाटलं. एरव्ही सगळीकडे दर्शन तसं खोलवरच किंवा दुरूनच. आंत वीज नाही, नुसत्या दीपप्रकाशात त्याचे श्रीमुख न्याहाळायचं. पण इथे ती अडचण नव्हती. विजेचे नळिकादीप अगदी त्याचे स्वरूप उजळतील अशा बेतानं लावलेले. त्यामुळे घाईत आणि गर्दीतही त्याच दर्शन कसं अगधी लख्ख झालं.

सगळ्यात डोळ्यात भरली ती त्याची घननीळ प्रभा. कृष्णप्रस्तर असूनहि एकदम तुकतुकीत काळा नव्हे, गोरा नव्हे, असा घननीळ त्याचा रंग आणि चांगलं सातफुटी त्याचं मनोवेधक ध्यान. बघत रहावसं वाटतं. दुसर वैशिष्ट्य म्हणजे त्याची उत्फुल्ल नेत्रकमळं. हजारो डोळे त्याला बघताहेत नि तो त्या दोन दीर्घनेत्रांनी सर्वांना बघत आहे. मस्तकी मुकुट. खाली झिळमिळ्यांची दाटी आहे. वर मयूरपुच्छाची वेठी देखील आहे. खांद्यावरून गुलाबी शेला बाहूंनी सावरला आहे. वरील दो भुजांनी शंखचक्र धारण केले आहेत. एक अभयमुद्रा नि एका हाती गदा असा श्रीहरि उभा आहे. कासेकसिल्या हळद-पिवळ्या पितांबराचे भर्जरी रुंद काठ पायावर रुळत आहेत. कमरेला शेला बांधला आहे नि त्याचेहि मधले पदक पितांबराच्या निऱ्यावर चापून चोपून बसलं आहे. गळ्यात मणिरत्नांची भूषणं आहेत. सुगंधी पुष्पाच्या पायघोळ माळा आहेत. मागची सगळी प्रभावळ पण विविध रंगाच्या फुलांनी मोहरली आहे. पण सगळ्यात उठून दिसली ती भरघोस नि भरदार तुळशीमंजिरींची घवघवीत माळ. असा तो देवराज थाटामाटात रोषणाईच्या झगमगाटांत उभा आहे––वरदराज ही त्याची बिरुदावली घेऊन, छायाचित्र देण्याच्या तयारीत. आणि हजारो डोळ्यांची भिंगं त्याच्या भुवनमोहन रुपड्यावर केंद्रित झाली आहेत. प्रत्येकाचं अंतःकरण सद्गदित भावनेनं त्याला बघत म्हणत असेल––

> ऐसा तू देवाधिदेव–– गुणातीत वासुदेव
> माझिया भक्तीस्तव––सगुणरूप झालासी.

शुधबुद्ध हरवणारं त्याचं ते नीटस गोजिरं ध्यान डोळ्यात साठवून घेतलं, मनात ठसवून घेतलं नि मुक्या मनानं त्याचा जयजयकार करीत परत फिरलो.

फिरावं लागलं. " हरिदरसन की प्यासी " अशी एक एक लाट त्याच्या दरवाज्यावर धडकत होती. तिला जागा देणं भाग होतं.

उतरून खाली आलो. पहिल्या परिक्रमेतले ते अनंतसरोवर ब्रह्मोत्सवाच्या उत्साहावर लहरत होतं. इकडे आमचीही मनं पुण्यवान कांचीनगरी बघून आनंदानं पुलकित होत होती. ह्या अनंतसरोवरात शेषशायी भगवंताची एक मूर्ति ठेवलेली असते. प्रत्येक वीस वर्षांनी दर्शन देण्यासाठी तो त्या जल-महालातून वर येतो. तेव्हा विष्णुकांचीला परमानंदाचं भरतं येतं. आणि त्या दिवसात 'विठोबाचं राज्य' होऊन कांचीत 'नित्य दीपावली' नांदायला येते.

ही महामहिमामय कांची नगरी आम्ही पाहिली. तिचं मोठं रम्यदर्शन चित्तचक्षूपुढे उभं राहिलं. हा परमपावन तीर्थराज. त्याच्या एका हाती शंख आहे तर दुसऱ्या हाती डमरू. एका हाती गदा तर दुसऱ्या हाती त्रिशूळ. मस्तकावर अर्ध्या भागी ऊर्ध्व त्रिपुड्राच्या रेखा आहेत तर उर्वरित भागावर भस्मांच्या पट्ट्यावर झाकलेला तृतीयनेत्र. अर्ध्या बाजूला नवरत्नांचा किरीट तर अर्ध्या बाजूला जटाजूटावर उगवलेला भालचंद्र, गळ्यातली वैजयंति एका स्कंधावरून निघून वासुकीहार बनून दुसऱ्या स्कंधी पोहोचलेली. अशी ही हास्यलास्याची, रागअनुरागाची संयुक्त मूर्ति बनलेलं हे तीर्थ खरोखर धन्य वाटत.

उत्तरेत हस्तिनापुरात महाभारत घडलं. पण हस्तिनापुरापासून दिल्ली होईपर्यंत तिथं अनेक महाभारतं घडली. राजकारणाच्या असंख्य उलाढाली झाल्या. अनेक बरीवाईट दिव्यं त्या हस्तिनापूरनं वा दिल्लीनं बघितलेली तसंच कांचीनगरीनंहि अनेक गोष्टी बघितल्या. अनेक धर्मकारणं न्याहाळली. आणि त्यांच्या अनेकानेक सत्ता पेलल्या.

प्रत्यक्ष बुद्ध कांचीत येऊन राहिले. अनेकांना उपदेश केला. बौद्ध महा-संघाची स्थापना केली. सातव्या शतकात जेव्हा चिनी प्रवासी ह्युएनत्संग कांचीला आला तेव्हा त्या त्यावेळची अवस्था अशी लिहून ठेवली आहे " त्या वेळी पल्लव राजे राज्य करीत होते. शेकडो बौद्ध संघाराम कांचीत होते आणि हजारो बौद्धानुयायी स्नातक होते. प्रसिद्ध बौद्ध तार्किक कांचीत निवास करीत होते."

तथागतांच्या आधी ही भूमि जैनधर्माच्या प्रभावानं व्यापली होती पुढे

रिकामं तरी कोण ? आम्ही आमचा मार्ग केला आणि त्याच्यासमोर जाऊन उभे राहिलो.

अगदी जवळून दर्शन घडावं अशी तिथली मांडणी बघून बरं वाटलं. एरव्ही सगळीकडे दर्शन तसं खोलवरच किंवा दुरूनच. आंत वीज नाही, नुसत्या दीपप्रकाशात त्याचे श्रीमुख न्याहाळायचं. पण इथे ती अडचण नव्हती. विजेचे नळिकादीप अगदी त्याचे स्वरूप उजळतील अशा बेतानं लावलेले. त्यामुळे घाईत आणि गर्दीतही त्याच दर्शन कसं अगधी लख्ख झालं.

सगळ्यात डोळ्यात भरली ती त्याची घननीळ प्रभा. कृष्णप्रस्तर असूनहि एकदम तुकतुकीत काळा नव्हे, गोरा नव्हे, असा घननीळ त्याचा रंग आणि चांगलं सातफुटी त्याचं मनोवेधक ध्यान. बघत रहावसं वाटतं. दुसर वैशिष्ट्य म्हणजे त्याची उत्फुल्ल नेत्रकमळं. हजारो डोळे त्याला बघताहेत नि तो त्या दोन दीर्घनेत्रांनी सर्वांना बघत आहे. मस्तकी मुकुट. खाली झिळमिळ्यांची दाटी आहे. वर मयूरपुच्छाची वेठी देखील आहे. खांद्यावरून गुलाबी शेला बाहूंनी सावरला आहे. वरील दो भुजांनी शंखचक्र धारण केले आहेत. एक अभयमुद्रा नि एका हाती गदा असा श्रीहरि उभा आहे. कासेकसिल्या हळद-पिवळ्या पितांबराचे भर्जरी रुंद काठ पायावर रुळत आहेत कमरेला शेला बांधला आहे नि त्याचेहि मधले पदक पितांबराच्या निऱ्यावर चापून चोपून बसलं आहे. गळ्यात मणिरत्नांची भूषणं आहेत. सुगंधी पुष्पाच्या पायघोळ माळा आहेत. मागची सगळी प्रभावळ पण विविध रंगाच्या फुलांनी मोहरली आहे. पण सगळयात उठून दिसली ती भरघोस नि भरदार तुळशीमंजिरीची घवघवीत माळ. असा तो देवराज थाटामाटात रोषणाईच्या झगमगाटांत उभा आहे—वरदराज ही त्याची विरुदावली घेऊन, छायाचित्र देण्याच्या तयारीत. आणि हजारो डोळ्यांची भिंगं त्याच्या भुवनमोहन रुपड्यावर केंद्रित झाली आहेत. प्रत्येकाचं अंतःकरण सद्‌गदित भावनेनं त्याला बघत म्हणत असेल—

ऐसा तू देवाधिदेव— गुणातीत वासुदेव
माझिया भक्तीस्तव—सगुणरूप झालासी.

शुधबुद्ध हरवणारं त्याचं ते नीटस गोजिरं ध्यान डोळ्यात साठवून घेतलं, मनात ठसवून घेतलं नि मुक्या मनानं त्याचा जयजयकार करीत परत फिरलो.

फिरावं लागलं "हरिदरसन की प्यासी" अशी एक एक लाट त्याच्या दरवाज्यावर धडकत होती. तिला जागा देणं भाग होतं.

उतरून खाली आलो. पहिल्या परिक्रमेतले ते अनंतसरोवर ब्रह्मोत्सवाच्या उत्साहावर लहरत होतं. इकडे आमचीही मनं पुण्यवान कांचीनगरी बघून आनंदानं पुलकित होत होती. ह्या अनंतसरोवरात शेषशायी भगवंताची एक मूर्ति ठेवलेली असते. प्रत्येक वीस वर्षांनी दर्शन देण्यासाठी तो त्या जल-महालातून वर येतो. तेव्हा विष्णुकांचीला परमानंदाचं भरतं येतं. आणि त्या दिवसात 'विठोबाचं राज्य' होऊन कांचीत 'नित्य दीपावली' नांदायला येते.

ही महामहिमामय कांची नगरी आम्ही पाहिली. तिचं मोठं रम्यदर्शन चित्तचक्षूपुढे उभं राहिलं. हा परमपावन तीर्थराज. त्याच्या एका हाती शंख आहे तर दुसऱ्या हाती डमरू. एका हाती गदा तर दुसऱ्या हाती त्रिशूळ. मस्तकावर अर्ध्या भागी ऊर्ध्व त्रिपुंड्राच्या रेखा आहेत तर उर्वरित भागावर भस्मांच्या पट्ट्यावर झाकलेला तृतीयनेत्र. अर्ध्या बाजूला नवरत्नांचा किरीट तर अर्ध्या बाजूला जटाजूटावर उगवलेला भालचंद्र, गळ्यातली वैजयंति एका स्कंधावरून निघून बासुकीहार बनून दुसऱ्या स्कंधी पोहोचलेली. अशी ही हास्यलास्याची, रागअनुरागाची संयुक्त मूर्ति बनलेलं हे तीर्थ खरोखर धन्य वाटतं.

उत्तरेत हस्तिनापुरात महाभारत घडलं. पण हस्तिनापुरापासून दिल्ली होईपर्यंत तिथं अनेक महाभारतं घडली. राजकारणाच्या असंख्य उलाढाली झाल्या. अनेक बरीवाईट दिव्यं त्या हस्तिनापूरनं वा दिल्लीनं बघितलेली. तसंच कांचीनगरीनंहि अनेक गोष्टी बघितल्या. अनेक धर्मकारणं न्याहाळली. आणि त्यांच्या अनेकानेक सत्ता पेलल्या.

प्रत्यक्ष बुद्ध कांचीत येऊन राहिले. अनेकांना उपदेश केला. बौद्ध महा-संघाची स्थापना केली. सातव्या शतकात जेव्हा चिनी प्रवासी ह्युएनत्संग कांचीला आला तेव्हा त्या त्यावेळची अवस्था अशी लिहून ठेवली आहे "त्या वेळी पल्लव राजे राज्य करीत होते. शेकडो बौद्ध संघाराम कांचीत होते आणि हजारो बौद्धानुयायी स्नातक होते. प्रसिद्ध बौद्ध तार्किक कांचीत निवास करीत होते."

तथागतांच्या आधी ही भूमि जैनधर्मांच्या प्रभावानं व्यापली होती पुढे

शैव-वैष्णवांच्या वाढत्या प्रभावामुळे बुद्ध-जिनांची ही आक्रमणं क्षीण झाली. सातव्या शतकाच्या अंतिम चरणात दक्षिणेकडे शैव नयनार आणि वैष्णव अळवार संतांची एकच दाटीवाटी झाली. त्यांनी आपल्या अभूतपूर्व काव्यरचनेनं आणि मधुर सुगम गायनानं जनसामान्यांपासून तो सत्ताधीशापर्यंत सर्वांची हृदयं काबीज केली आणि तामिळ साहित्यांत मोलाची भर घालून ते समृद्ध केलं. शैवांचा 'तिरुमुरई' नांवाचा अशा भक्तिस्तोत्रांचा ग्रंथ आणि वैष्णवांचा 'नालायिरप्रबंधम्' ही सकळसंत गाथा अद्यापहि खूप लोकप्रिय आहेत.

त्या त्या वेळच्या लोकपालांनीही या धर्माच्या उत्थानपतनात बराच भाग घेतलेला इतिहासाला माहीत आहे. या लोकपालांनी लोकमनाची कदर करून तर कधी लोकसत्ता उल्लंघूनही आपापल्या धर्माची महत्ता वाढविली. अनेक मंदिरं निर्माण केली तर कधी मंदिराचा विध्वंसही केला. सातव्या शतकातल्या एका पल्लव वंशीय राजाला 'चेत्तकरी' म्हणजे अनेक मंदिरांचा निर्माता अशी पदवी होती. अशा अनेक राजा महाराजांनी कांची घडविली. ते स्वत: या शिल्पकलेचे दर्दी होते. रसिक होते. विद्वान् व्यासंगी होते. आणि जे जे भव्य, दिव्य, उत्तम नि श्रेष्ठ त्याला आश्रय देणारे असे होते. महाकवि भारवी आणि प्रसिद्ध विद्वान् कवि दण्डी हेही याच कांचीपूरच्या उदारधी नृपश्रेष्ठांचे आश्रित होऊन गेले.

अशी सगळी धर्मावरची परकी आक्रमणं हळूहळू नाहीशी झाली. आणि कांची वैदिक धर्माच्या पताकेखाली नांदू लागली. पण नंतर शिव-विष्णूंच्या श्रेष्ठत्वाचं भलतच कलहसंकट निपजलं. परत कांची शिवकांची आणि विष्णुकांची यांमधे विभागली गेली. आणि शैव-वैष्णवांचं श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी विद्वत्सभा रंगू लागल्या. पूर्वपक्ष होऊ लागले. उत्तर पक्ष त्यांचं खंडण करू लागले. आणि एकमेकांचे मुखावलोकन निषिद्ध मानण्यापर्यंत ही मजल गेली. मग आले जगद्गुरु शंकराचार्य, रामानुजाचार्य, महाप्रभु वल्लभाचार्य. त्यांनी हा सगळा मेळ परत सुरांत आणला. 'घटोऽयम् पटोयम्'पेक्षा भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे असं प्रतिपादन केलं. आणि भक्तीच्या साम्राज्यात असे भेद संभवत नाहीत असं सांगितलं. तुकोबाच्या भाषेत कदाचित् असं सांगितलं असेल की--

हरिहरा भेद नाही--नका करू वाद
एकमेका हृदयी--गोडी साखरेचे ठायी
भेद कसा नाड--एका वेलांटीचे आड
वामसव्य भाग--तुका म्हणे एकचि अंग !

ते म्हणणं लोकांनी उरी शिरी धरलं. मग राजसत्तांची पानं इतिहासासारखी उलटली. पण कांचीची हरिहरसत्ता सलोख्यानं आजवर तशीच राहिली आहे. पल्लव गेले, राष्ट्रकूट गेले, पांड्य गेले, विजयनगर गेले, आणि सतराव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानी मूर्तिभंजक सत्तेच्या तावडींतून जगून वाचून कांची मराठ्यांच्या हाती गेली आणि सरतेशेवटी टोपीवाल्यांच्या फिरंगी हातात पडली. आज कांचीवर स्वायत्त स्वतंत्र स्वाधीन गणतंत्राचं राज्य आहे. कांचीच्या परिसरानं पाठवलेला एक जगद्मान्य विद्वान् या राष्ट्राचा राष्ट्रपति आहे. असो.

कांचीचा हा असामान्य इतिहास डोळ्यासमोर येतो आणि मग त्या हिंडण्याफिरण्यात एक प्रकारचं वजन येतं. त्या जुन्या काळचा कवऱ्या, पण अजून आवकाशांत उन्नत ताठ उभं राहणाऱ्या वास्तु बघून मन अभिमानानं भरून येतं.

वरदराजाला बघून त्याच्या चरणी लीन होऊन प्रत्यक्ष तात ब्रह्मदेवानं त्याची प्रार्थना केली होती--

नमोस्तु ते पंकजपत्रलोचन !
प्रसीद मह्यं प्रणतार्तिभंजन !
दृष्ट्वा भवन्तं वरदं वरेण्यम्--
अद्य प्रपन्नोऽस्मि तवाङ्घ्रियुग्मम् ।।

गाडी परत चेंगलपटला चालली आहे. येणाऱ्या गाडीतून अनेक यात्रेकरू कांचीला उतरताहेत संसाराच्या तापत्रयानं शिणलेले हे जीव हरिहराच्या सावलीत क्षण दोन क्षण जाणार आहेत. विसावणार आहेत. आणि त्याच्या कृपाप्रसादाची संजीवनी लाभून कांचीचा निरोप घेताना वरदराज आठवणार आहेत. त्याचं नीलाभ गोजिरं ध्यान बघून मनात नतमस्तक होत म्हणणार आहेत--

"नमोस्तु ते पंकजपत्रलोचन !"

---

# ९

## दाणा खा पाणी पी !

दक्षिणेच्या प्रवासाचं नाटय जवळ जवळ संपत आलं होत. तिरुमलैच्या तीन हजार फूट उंचीच्या नाटयमंचावर त्याची नांदी झाली आणि मदुरा, रामेश्वर, श्रीरंगम्, चिदंबरम्, कांची हे सारे अंक चढत्या रंगतीने रंगले. या नाटकाचं भरतवाक्य आता सुरू होणार होतं. ' नमोस्तुते पंकज-पत्रलोचन ' ही त्या अखेरच्या गाण्याची सुरवातही झाली होती. संत्रध नाटकाचे हर्षोन्मेष मनावर तसेच होते. विशेष पाहिलं ऐकल्याचं समाधान अंतरात तुडुंब भरलं होत. हे नाटक संपणार आहे याचीही जाणीव होती. आपण मांडलेली ही रंगीबेरंगी तुंग आणि विशाल सोन्याच्या कलेची आणि नाजुकशा नक्षीची भक्तीभावाची पेठ आता आपुल्याच हाते हलकेच आवरावी लागणार होती. पण आता एवढयातच हे सगळं होणार आहे याची मात्र कल्पना नव्हती. आता उगाचच घालमेल सुरू झाली. 'उद्या परतायचं' म्हणून जीवघेणी हुरहुर लागून राहिली होती.

कांचीहून परत चेंगलपटला आलो. त्या तेवढयाशा दिवसात दिसलेल्या अनेक प्रतिमा, जीवाला जडलेली अनेक दृश्यं अंत.करणावर वागवीत जड पायानी आणि मनानं चेंगलपटला आलो. आणि ठरलं आपण उद्या 'पक्षीतीर्था'कडे जायचं. मी मनात म्हटलं चला 'हेही नसे थोडके ! '

मनानं परत ती हरहुरीची काजळी झाडली आणि भल्या पहाटेच स्टेशनजवळची एक बस गाठली. पैशाची आणि तिकीटांची देवघेव होऊन बसने पळण्याचा शुभारंभ केला. ती आता आम्हाला तिरुक्कलकुंड्रम् ला घेऊन चालली होती.

हे 'तिरुक्कलकुंड्रम्' म्हणजेच आपण ज्याला 'पक्षीतीर्थ' म्हणतो ते आहे असं कळल्यावर बरं वाटलं. शेजारीच एक बंगाली ' आजी बसल्या होत्या. त्या आपलं सारखं म्हणतं होत्या. पोरुखाती था. ' हे बंगाली आणि तामीळनाडू काही म्हणोत मी आपली त्यांच्या बसमधून आमच्या पक्षीतीर्थाकडे चालले होते.

वेळ कशी सुरेख पहाटेची होती. मिळालेली बस पण अगदी आरामगाडी होती मऊ उबदार आसनं सुख देत होती. तर गार वाऱ्याच्या अवखळ लहरी ' काही बाहेरचं ही बघा की !' म्हणून अंगी शहारे उमटवून जात होत्या. चार दोन घरं आणि बारकासा चौक किंवा तिठा दिसला की वेगळं गाव लागत होतं. एरव्ही सगळं हिरव्यागार वनश्रीचं राज्य होतं. आई अन्नपूर्णचं समृद्ध भांडार होतं. रस्त्याच्या दोन्ही अंगी क्षितीजापासून तो रस्त्यापर्यंत जिकडे तिकडे नुसती भातशेती डोलत होती. मोटारची वाट जेमतेम तीस पसतीस फूट रुंदीनं वळणावळणानं मार्ग काढीत होती. दूर क्षितीजाकडे हिरव्या कडांना असलेली निळसर डोंगराची कड पांढुरक्या धुक्यानं धूसर झाली होती. पण पूर्वेकडे मात्र सूर्यनारायण उगवण्याची लक्षणं दिसत होती. आभाळातली रंगीबेरंगी आरास मधेच लागणाऱ्या पाणआरशात दिसत होती. पलीकडच्या ताडा माडांच्या आडून तांबूस निळ्या टेकाडापलिकडून उषादेवीची जणू मिरवणूक येत होती. मंद प्रसन्न गुलाबी दिवे हाती घेऊन कोणी वर येऊ बघत होतं. ते बघण्यासाठी लहान मुलांच्या अधिरतेनं पक्षिगण चिवचिव करीत झाडा झाडावरून आपापली जागा धरून ठेवण्याची खटपट करीत होता. तर काही पाखरं अवखळ मुलासारखं लगबगीनं सामोरेच जाऊ बघत होते. ' स्वागत करने चले पखेरू भानुनाथ आया !'

त्या धावत्या बसमधून सूर्योदय होण्याची वाट मी तिकडे टक लावून बघत होते. पण गाडीला त्याचं काही नव्हतं. ती झपाट्यानं ' तिरुक्कलकुंड्रम् ' मधे येऊन दाखल झाली. बस थांबली. मी समोर बघितलं तर नेहमीचा सोबती त्याच आकर्षकपणे समोर उंच आभाळाच्या कांठी [illegible] हो[illegible].

नेहमीचच दृश्य होतं ते. पण वातावरण शांत, प्रभातीचं होतं. नवभास्कराची कोवळी किरण ताडामाडांच्या जाळीतून गोपुराच्या कलशांवर पडत होती. आजुबाजूला छोटीशी वस्ती घेऊन हे मंदिर उभं होतं. आकारानं मोठं, पण पुष्कळसं जुनाट झालेलं. आवरासावरीचा हात फिरलेला दिसत नव्हता. पांढऱ्या चुन्यावर गेरुच्या पट्ट्यांनी रंगवलेलं रंग काम घेऊन भोवतीचा कोट उभा होता गोपुराची उंची पुष्कळ होती पण मूर्तींचे सारे जडाव काळवंडलेले होते. नाव मात्र बरंच मोठं होतं त्याला ' रुद्रकोटिक्षेत्र !'

पाचशे फूट उंचीवरचं वेदगिरीश्वर मंदिराचं माहात्म्य आणि 'पक्षितीर्थाची' चढाई इथून सुरु होते. रूद्रकोटीश्वराचं हे मंदिर बांधणीनं आणि सुबकपणानं मनाला आकर्षित करतं. मुख्य मंदिर भव्य आहे. शिवाच्या गर्भागारात नित्यनेमानं आढळणारा अंधारासूर इथही तसाच पसरला होता. कोरीव लेण्यानी बांधलेल्या सुदरशा मंडपासमोर त्याचा गाभारा होता. आतमधे श्यामवर्ण वालुकेची लिंगप्रतिमा आहे. कोटि लिंगाचा महिमा एकवटून हे लिंग तिथे विराजत आहे. मी त्याचं आधिक निरीक्षण करीत होते. हा जोडूनच माझं ते काम चाललं होतं. एक भाविक दर्शनार्थी खड्या स्वरांत त्याला आळवीत त्याचं दर्शन घेत होता. तो म्हणत होता –

कर्पूरशंख धवलाकृति चन्द्रकांत ।
मुक्ताफल स्फटिक सन्निभ विग्रहाय ।
कस्तूरि कुंकुम हिमाषु विलेपनाय
श्री रुद्रकोटि निलयाय नमःशिवाय ।।

हा एकच श्लोक तो परत परत त्याच त्याच भाविकतेनं आळवीत होता. मी माझी वही काढून हळुवारपणे त्याच्या भावसमाधीला न दुखवता तो श्लोक उतरून घेतला. तो श्लोक मी परत परत वाचीत राहिले आणि अंधारातल्या त्या विग्रहाचं दर्शन घेऊ लागले. कवीच्या दिव्यचक्षूपुढे रसिक सदाशिवाचं सुंपर रुप उभं राहिलं होतं !

त्याच्या दृष्टित तो शंखा-कर्पुरा सारखा गौरवर्ण होता. कांती चंद्रासारखी आल्हादकारक होती. हे लिंगभूषण मौक्तिकासारखं स्नेहसिक्त वर्णाचं होतं. हिमालयाचं शुभ्र स्वच्छ जळ हे त्याचं स्नान होतं. कस्तुरि आणि कुंकुमाचं विलेपन हे त्याचे राजोपचार होते.

माझ्या चर्मचक्षूंमधे आणि कवीच्या दिव्यदृष्टीमधे केवढं अंतर होतं. पण ती त्याची दृष्टी मला प्रेरणा देऊन गेली. आणि त्या साऱ्या दिव्य कल्पनांना परत जुळवीत मीही त्याला नमस्कार करीत म्हटलं, 'श्रीरुद्रकोटि निलयाय नमःशिवाय ।'

मदिराच्या डाव्या बाजूला बांधलेलं रुद्रकोटितीर्थ मात्र खरोखर प्रेक्षणीय आहे. अशा प्रकारची सरोवरं बांधणं ही दक्षिणेकडची खास हौस आहे. मंदिरा-सारखी कलाकुसर इथे तशीच काही करता येत नसते. पण निसर्गाचं ठीक सान्निध्य घेणं तर हातात असतं. मंदिराच्या भव्यतेची पार्श्वभूमी ठेवणं तर जमण्यासारखं असतं. 'देवाच्या दर्शनाला जातो आहेस. मन मळकट असलं तर निदान तनू तरी स्वच्छ करून घे' अशासारखा अप्रत्यक्ष संदेश त्या द्वारे दिला जात असतो. चहूबाजूला छोटीशी मंदिरं, छोटया रुंदीच्या घाटवजा पायऱ्या, अगदी कसं रेखीव आणि सुबक असतं. नाविन्यात म्हणावं तर गोपुरांच्या खालोखाल या पुष्करिणींनीही वेड लावलं आहे मला. एका काठावर असं गुपचूप उभं राहून पलिकडच्या पायऱ्यावर अविचल दृष्टी ठेवून सारखं उभच राहवस वाटतं. काही ठिकाणी भाविकांचा ओघ कमी असतो तिथं पाण्याला उपसा नसल्यामुळे त्या पुष्करिणी मलोन झाल्यासारख्या वाटतात. तर काही ठिकाणी त्या जलशून्य अवस्थेत नुकत्याच कमळाच्या चार दोन कळ्या दाखवीत दैन्यवाण्या पडून असतात. ही पुष्करिणी मात्र खूप मोठी, हिरवट पाण्यानी लवथवत होती. मंदिराच्या डाव्या अंगाच्या दरवाजातून फारच सुरेख दिसत होती ती.

मदिराच्या आवारात दुसरं वेगळं मंदिर आहे तिकडे मोर्चा वळवला. तिथे शिवप्रिया पाहिली. सुरेख ध्यान. उभं राहण्याची ठेप अति सुंदर. मुखा-वरचे भावही अति मनोज्ञ. तिला तिथे 'अभिरामनायकी' म्हणतात. या सौंदर्य-शालिनी प्रियेच्या मुखकमलाभोवती मधुर गुंजन करणारा असं या शिवाच वर्णन आहे. असेना का मदनदाहक, असेना का तो नगाचलावर कैलासशिखरी राहणारा योगसिद्ध दिगंबर ! त्याचं चर्मवसन असो की प्रेतभस्म विलेपन असो. इथे त्याचं काही नाही. ही भुवन मोहिनी आहे, त्रिपुर सुंदरी आहे. हिच्या भोवती भोवती तो करणारच. तो पुरुष–ही त्याची प्रकृति. तो स्वयम् ब्रह्म असला तरी ही त्याची मायाशक्ति आहे. तिच्यावाचून त्याचं चालणार

कसं ? भृंगावरून आठवण झाली. दगडासारखं कठिण लाकूड जो भृंग सहज लीलया पोखरतो तो नाजूक कोमल पद्मकळीत का बंदिवान होतो ?

त्या अभिरामनायकीला नमस्कार केला. ज्या अभिरामनायकीनं त्यांना ब्रह्मांडांचा स्वामी बनवलं, हो, श्रीमत्शंकराचार्य म्हणतात की, " हे माते ! हा पिशाच्यांमधे स्मशानात रहाणारा, अन् चिताभस्म अंगाला फासणारा अमंगळ शिव जगदीशपदाला पोहोचला. याचे दुसरं तिसरं कारण नसून (हे) भवानि त्वत्पाणिग्रहण परिपाटि फलमिदं ! (वरे ! )

मग इतर दर्शने घेत पुष्करिणीच्या बाजूनेच मंदिराबाहेर पडलो. या छोटयाशा बाजार पेठेच्या दुसऱ्या टोकालाही असलीच छोटी पुष्करिणी आहे. तिचं नाव आहे शंखतीर्थ. तिथेही पाण्याचा वापर कमी पण पाणी मात्र बहुत आहे. दर बारा वर्षांनी गुरु कन्या राशीत येतो तेव्हा इथं एक अद्‌भुत घडतं म्हणतात. ही पुष्करिणी एक शंख उत्पन्न करते. तेव्हा खूप मोठा गाजावाजा होतो. उत्सवादींची धामधूम होते. खूप मोठी जत्रा भरते. पण हे सारं तपा-तपांच्या अंतरानं. एक शंख दिला की हा तीर्थराज परत तपश्चर्येला बसतो.

तत्रस्थ वडीलमंडळीच्या सांगण्यावरून उन्हं व्हायच्या आंत वेदगिरीश्वर चढू लागलो. जवळ जवळ पांचशे पायऱ्यांची ही चढण पण फार सहजपणे झाली. पायऱ्या पक्क्या बांधलेल्या आणि उंचीही विशेष नाही. खरं तर हा सबंध छोटा पर्वतच तीर्थरूप आहे. विशेष भाविक भक्त संबध पर्वताचीच प्रदक्षिणा करतात. प्रत्यक्ष नंदिश्वरानं कैलास पर्वताची तीन शिखरं आपल्या पृष्ठी वाहून पृथ्वीवर तीन ठिकाणी स्थापन केली. त्यात वेदगिरी हे प्रमुख ठिकाण. तिरूपतिजवळचं काळहस्ती आणि श्रीशैल मल्लिकार्जुन ही अन्य दोन ठिकाणं होत.

वर प्रत्यक्ष वेदसार शिवाचा निवास असल्यामुळे त्याच्या महत्त्वालाहो एक भारदस्तपणा आहे. पक्षितीर्थाच्या महत्त्वात मतभेद असतील. पण वेदगिरीच्या मोठेपणाविषयी सगळयांचं एकमत आहे. वर गेलं की एक प्रदक्षिणा घालूनच मंदिरात शिरता येतं. वरचं मंदिर मात्र खूप छोटसं आहे. दाक्षिणात्य कला-कुसर किंवा रचनेचं कुठलंच वैशिष्टय त्याला नाही असं आहे.

आम्ही बरेच आधी जाऊन पोहचलो गाभारा बंद होता. मंदिराच्या मोठ-मोठ्या खिडक्या मात्र आपण बरेच वर आणि बाकीचा संसार बराच खाली आहे हे दाखवत होता. आम्ही बराच वेळ ती शोभा पाहाण्यात घालवला. खालचं ते रुद्रकोटि निलय एखाद्या नकाशातल्यासारखं दिसत होतं. लांबून दिसणारी ती गोपुरं, सबंध देवळाचा तो कोट, मधली मंदिर आणि शेजारच्या छोट्या चौकोनात दिसणारी ती पुष्करिणी मोठी अद्भुत वाटत होती. माणसं म्हणजे जणू सूक्ष्म पांढऱ्या ठिपक्यांची चळवळ वाटत होती. एक गृहस्थ म्हणत होते कावळासुद्धा एवढ्या उचीवर येऊ शकत नाही. इतकं हे उच आहे. मला काही तितकं ते खर वाटलं नाही.

मंदिराची दारं उघडली आमच्या जिवाची शिवाशी भेट घडली. असं काळंकुळकुळीत चमकदार प्रस्तराच ते लिंग स्वयंभू आहे म्हणतात. तसं असेल तर खरोखरी चमत्कारच म्हणावा लागेल. कारण इतरत्र कुठेही त्या जातीची शीळा बघितली नाही. ते शिवलिंग कर्दळीस्तंभासारखं सतेज आणि जवळ जवळ तसल्याच आकाराचं आहे. त्याला इथे दक्षिणामूर्ति आचार्यविग्रह स्वरूप मानतात. हे महत्त्वाच पण छोटं मंदिर आहे. आणि आतली हालचालही छोटीशीच आहे. या पहाडाच्या चतुःसीमा अपक्, यजु', साम व अथर्व वेदाची स्वरूप मानतात. त्यावर हा वेदगिरीश्वर शिव, नंदी, ब्रह्मा, इन्द्र, आणि भोगलक्ष्मी इत्यादिना उपदेश करीत बाजूंना दक्षिणामूर्ति, सोमास्कंद आदि देवतांना घेऊन बसला आहे.

आजुबाजू शिष्यांची मांदी घेऊन कौपिनरुद्राक्ष धारण केलेले आणि स्कंधी वैदिक धर्मध्वजा वाहणारे भगवत्पूज्यपाद शंकराचार्य मला आठवले. रामेश्वर-मधे समुद्राच्या सप्तरंगी पुळणीवरच्या सौधावर असच दर्शन घेतलं होतं मी. आता त्यांनी त्याच्या प्रभावी वाणीनी स्तुतीस्तोत्र गाऊन वश केलेला हा वेदसार शिव मी बघत होते. मीही नम्रपणे अंजलीबद्ध होऊन आचार्यांच्या शब्दात त्याची स्तुती करूं लागलो.

शंभो महेश करुणामय शूलपाणे<br>
गौरीपते पशुपते पशुपाशनाशिन् ।<br>
काशीपते करूणया जगदेकदेक:<br>
त्वं हंसि पासि विदधासि महेश्वरोऽसि ।।

तोपर्यंत पुरोहितांच्या मंत्रोच्चारासह त्याची दिनचर्या चालू झाली होती. आम्ही मनोभावे त्या महेश्वराला नमस्कार केला आणि त्याच्या प्रदक्षिणेच्या मार्गावर छोटयाश्या गुंफेत निवास करीत असलेल्या गौरीचं दर्शन घेतलं.

मग मंदिराच्या उजव्या बाजूला जरा खाली उतरून पुढे सरकलो. तो त्या 'तिरुक्कलकुंड्रम्'च्या नाटयाचा रंगमंच दिसला. पर्वताच्या माथ्यावर एका छोटयाश्या जलकुंडाच्या पुढे पर्वत एखाद्या वेदीसारखा सपाट झाला आहे. त्यावर एक छोटं शिवलिंग आहे. आणि पुढे मोकळी जागा आहे. तिथे मध्यान्ही दोन पक्षिराज येतात आणि शिवाचा प्रसाद म्हणून पुरोहितानं दिलेलं गुडान्न ( गूळ घालून तयार केलेलं भाताच पक्वान्न) खाऊन जातात. एक छोटसं नाटकच आहे ते. त्यावर काही मंडळींचा विश्वास नाही. पण ती घटना बघण्यासाठी आसेतु हिमाचल लोक येतात. एवढी मोठी टेकडी चढतात. आणि भर उन्हात तासन् तास त्या तापल्या दगडावर ताटकळत रहातात हे मात्र खरं!

इतक्या वरून आजुबाजूचा परिसर मात्र फार मनोहर दिसतो. त्या एवढयाशा भागात म्हणजे सुमारे एक मैलाच्या क्षेत्रात तिथे अनेक तीर्थ आहेत. त्यात बारा प्रमुख आहेत. वेदाचलाच्या पूर्वस इंद्रतीर्थ, आग्नेयेस शंभु-रुद्रकोटि तीर्थ, दक्षिणेला वसिष्ठतीर्थ, नैऋत्येला अगस्त्यतीर्थ, पश्चिमेस नंदी वरूण तीर्थ, इशान्येला अकालिका आदितीर्थ प्रसिद्ध आहेत असं तिथल्या ब्राह्मणांनी सांगितलं. काही दुरून दृष्टिगोचर होतातही. पण त्यांच्या शेवाळल्या पाण्याचे हिरवे चौकोन आणि काठच्या एकाद दुसऱ्या मंदिरामुळेच त्यांची तीर्थ म्हणून ओळख पटते.

या वेदाचलाचा अविर्भाव अनादि काळचा सांगतात. सम्राट सुरगुरूंनी रुद्रकोटिजवळ भक्तवत्सलेश्वराची स्थापना केली ती सुद्धा इ. स. पूर्वी ३०० वर्षे. पण रुद्रकोटि मंदिराच्या अन्य रचना परकोट आणि गोपुरं इत्यादि बनवण्याचा काल इ. सन १००० मानला गेला आहे. अशी दोन्ही मंदिरं आणि तो वेद पर्वत दक्षिण काशी म्हणून विख्यात आहेत. त्यांत चमत्काराच्या दृष्टीनीही अनेक गोष्टी कळल्या. पण त्याच्यावर विश्वास ठेवणं न ठेवणं ज्याच्या त्याच्या श्रद्धेवर अवलंबून आहे. परंतु अशा तऱ्हेच्या कल्पना करून त्यावर तीर्थांची रचना करणं हे मात्र प्राचीन ऋषींच्या कल्पकतेचं वैशिष्टच म्हणता येईल.

कुठल्याही जीवाची हत्त्या करणं, मग तो सुष्ट असो वा दुष्ट, ती हत्त्या सद्हेतूने असो वा अन्य काही कारणासाठी. हत्त्या ही शेवटी हत्त्याच आहे. त्याचं परिमार्जन झालं पाहिजे हा धर्माचा समतोल आहे. असूर संहार करून शिवाच्या रुद्रगणांना जे पाप लागलं त्याच्या परिमार्जनासाठी त्यांनाही इथे येऊन तपश्चर्या करून शिवाराधना करावी लागली. असाच अन्य महिमा सांगणारी ही सारी क्षेत्रं आहेत.

झालं. दुपारचे साडेआकरा होत आले. आम्ही जे अद्भुत बघायला तो पावेतो थांबलो होतो त्याची वेळ भरत आली होती. त्या छोटयाशा जागेवर खूप गर्दी झाली. सर्वांच्या औत्सुक्याच्या नजरा आभाळ न्याहाळू लागल्या. काही त्या वेदीवरची तयारी बघू लागले. बरोबर साडेअकरा वाजता एक शैवब्राह्मण ती वेदी चढून आला. त्याच्याबरोबर एक झाकलेलं भांडे होतं. त्याने ते शिवलिंगा जवळ ठेवलं. कमरेचा पंचा एकदा घट्ट बांधला आणि पाणी शिंपडून जागा शुद्ध केली. एवढं झाल्यावर भांडयावरचं झाकण उचलून त्या प्रोक्षित भूमिवर त्यानं ते जोरानं आदळलं. आणि काय आश्चर्य ? एक घारीसारखा दिसणारा खूप मोठा पक्षी वेदगिरी मंदिराच्या डाव्या अंगानं



विमानासारखा संथ गतीने आला आणि सरळ जेवायला बसतात त्याप्रमाणे त्या थाळीजवळ येऊन पंख मिटून उभा राहिला. ब्राह्मणानं भांड्यांतल पक्वान्न ताटात वाढलं नि पक्षिराजांनी त्या शेकडो मंडळींच्या साक्षीनं ' दाणा खा. पाणी पी अन् भूर्रकन् उडून जा, केलं. मंदिराला उजवी घालून तो परत आकाशमार्गानं अदृश्य झाला. आणि त्याचं उच्छिष्ट प्रसाद म्हणून मिळवण्यासाठी सगळी भाविक मंडळी त्या बिचाऱ्या ब्राह्मणावर गिधाडा-सारखी तुटून पडली.

ब्रह्मदेवाच्या आठ मानसपुत्रांनी मोक्षाच्या इच्छेनं उग्र तपश्चर्या केली. ती इथे. शिव शंकर त्यांच्या तपश्चर्येवर संतुष्ट झाला. त्यांना साक्षात् दर्शन देऊन ' वर ब्रूहि ' असं म्हणाला. सर्व तपश्चर्या एकमतानं आणि नेटानं करणारी ही आठ मुलं वर मागण्याच्या वेळी मात्र गडबडली. काही म्हणाली " आम्हाला सारुप मुक्ती हवी " तर काही म्हणाली " आम्हाला सायुज्य मुक्ती हवी त्यांच्या मतभेदाने शिव कोपला. आणि 'तपश्चर्येच्या पवित्र फळावर तुम्ही असे गिधाडासारखे तुटून पडलात. आणि एकमतानं मागायचं ते मागितलं नाहीत म्हणून तुम्ही गृध्र व्हाल. तुमचा वियोग होईल " असा शाप दिला. पश्चाताप पावलेले आठही ऋषि त्याच्या पायी लागले. तेव्हा त्यांना त्याने उःशाप सांगितला " प्रत्येक युगाच्या शेवटी तुम्ही दोघे दोघे मुक्त व्हाल " त्याप्रमाणे ही सारी टोळी गिधाडं झाली. आणि शिव-प्रसादासाठी वेदगिरीवर चकरा मारू लागली. सत्य युगाच्या शेवटी चंड आणि प्रचंड मुक्त झाले. त्रेतायुगांत संपाति आणि जटायू मुक्त झाले. द्वापरांत शंभुगुप्त आणि महागुप्त मुक्त झाले. कलियुगांत आता पूपा विधाता आणि मुनिशंभू हे उरलेले दोन गिद्ध ऋषी मुक्तीची वाट चालत पक्षि-तीर्थावर माधुकरी मागण्यासाठी येत आहेत अशी गिद्ध झालेल्या सिद्धांची कथा आहे. जी आज पावेतो दररोज माध्यान्ही तिथे खेळली जाते.

यावर थोडे मतभेद आहेत. काही विद्वानांचं म्हणणं आहे की स्थल पुराणांत असं काही एक नाही. ते आठ पुत्र शिवशापानं गृद्धपक्षी झाल्याची नोंद आहे. परंतु ती मंडळी या वेदाचलावर गुप्तरुपानं तपश्चर्या करीत युगांती मुक्त होत आहेत. इथला पक्षिभोजनाचा प्रकार केवळ पाखंड आहे. आठदहा पक्षी टेत री अज्ञात ठिकाणी पाळले गेले आहेत आणि त्यांना आळीपाळीनं सोडण्यात

येतं. नित्याभ्यासामुळे ही गोष्ट होणं शक्य आहे. पक्षी गिधाडाच्या जातीचे, मास आणि इतर खाणारे आहेत इत्यादी गोष्टी प्रत्यक्ष तिथेही ऐकायला मिळाल्या. आपल्या श्रद्धेलाही सत्याचे सौष्ठव असले पाहिजे असं वाटलं. पक्षांचा उष्टाभात श्रद्धेनं भक्षण करणारी मंडळी वेदगिरी उतरू लागली. आमच्या भुकेलाही अवेळ झाली होती म्हणून सगळ्या ठिकाणांना परत एकदा नमो-नमस्ते करून आम्ही खाली उतरलो.

आता 'महाबलीपुरम्'ला जायचं होतं. चेंगलपटहून 'पक्षितीर्था'ला येणारी बस तशीच पुढे 'महाबलीपुरम्'ला जाते. 'पक्षितीर्थ' करणारी मंडळी तिथे उतरतात. बाकीची मंडळी आणि पक्षितीर्थावरून महाबलीपुरम्ला जाणारी मंडळी घेऊन बस पुढे जाते. पुढचा प्रवासही जेमतेम एकदीड तासाचा आहे. वाट निर्वृक्ष आहे. खाशी पक्का रस्ता आहे. पण बाहेर उन्हाचा रखरखाट असूनही बसमधे मात्र थंड हवा झुळकत होती. बस महाबलीपुरम्ला पोचली तेव्हा उन मी म्हणत होतं. आम्हीही त्याच्या प्रखरपणाला शरण जाऊन 'होय बाबा तूच' अशी कबुली देत काही पाहण्याच्या इच्छेनं चालत होतो

'महाबलीपुरम्' पूर्वी काय असेल ते असो. आज मात्र ते अगदी उजाड उजाड वाटतं. चार दोन सरकारी वसतिगृहे. एक नवा आणि जुना दीपस्तंभ आणि द्राविडी शिल्पाची गंगोत्री म्हणून जिला संबोधता येईल अशी अप्रतिम आणि अद्भुत शिल्पकलांची कामगिरी याविना तेथे अन्य नाही. पांढऱ्या स्वच्छ वाळूच्या किनाऱ्यावर पाचूच्या रंगाच्या लाटा आदळत असतात. आणि तेथल्या काळसर कातळावर आदळून त्यांचा उसळलेला पांढरा चुरा घेऊन परत जातात.

मद्रासपासून अंदाजे ३२ मैल अंतरावर असलेल्या 'महाबलीपुरम्'चा हा समुद्रकिनारा सुद्धा पूर्वी फार मोठं बंदर असल्याची नोंद आहे. इथून फार पूर्वी इ. सनाच्या पांचव्या ते दहाव्या शतकापर्यंत परदेशाशी फार मोठ्या प्रमाणात दळणवळण होतं. अर्थात बंदराच्या काठी एक मोठं औद्योगिक शहरही अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. ज्या अर्थी आज ह्यांत असलेल्या शिल्पांत पल्लवयुगाच्या कर्तृत्वाची साक्ष आहे त्या अर्थी पल्लवांच्या वेळी म्हणजे पाचव्या सहाव्या शतकात इथे मोठी भरभराट असावी असं वाटतं

आता ' महाबलीपुरम् ' हे नाव का पडलं असावं याबद्दल जाणत्यांचं मत विचारलं तर एक मत असं आहे की वास्तुविशारद पल्लवराजा ' महेंद्रवर्मन' याची ही राजधानी होती. आणि त्याच्या काळातच इथे एकापेक्षा एक सरस अशी कृति निर्माण झाली. त्यामुळे हे शहरहीं त्याने त्याच्या मुलाच्या नावाने प्रसिद्ध केले असावे. त्याच्या मुलाचे नाव ' नृसिहवर्मन ' किंवा 'मामल्ल'. तोही या बाबतीत बापसे सवाई असाच बेटा होता. त्यानेही आपल्या कल्पना खूप साकार केल्या म्हणूनही कदाचित् त्यानेच या शहराला ' मामल्लपूर ' केले असावे. आणि त्याचेच पुढे ' महाबलीपुरम् ' झाले असावे.

परंतु इथे एक ' त्रिविक्रम ' मंदिर आहे. आणि त्यांत भगवंताने वामन-रूपाने बलीदमन केलेलं दृश्य आहे. बळी पाताळी लोटल्यानंतर त्या महा-बलीने इथंच त्या मंदिरात वस्ती केली आहे. ' अष्टोत्तरशत दिव्य ' विष्णु-स्थान ' या स्तोत्रात म्हटलं आहे–

" महाबलं बलिपुरे भक्तिसारे जगत्पतिम् "

म्हणून हे ' महाबलीपुरम् ' झालं आहे.

म्हणजे भाविकांच्या दृष्टीनंही ' महाबलीपुरम् 'ला महत्त्व आहे. समो-रच्या समुद्रकिनाऱ्यावर जिथे अखंड प्रस्तराचे मंदिर आहे आणि जे सर्वात मोठं आकर्षण आहे त्याला भेट द्यायच्या आधी थोडं आजुबाजूला बघावं म्हणून त्या दुपारच्या उन्हात चांगली रपेट केली. धर्मशाळेजवळची दुर्गावा आणि नंदिकेश्वर बघितले. थोड्या अंतरावर एक छोटसं पण छानदार शिवा-लय बघितलं. पुढच्याच भिंतीवर शिवयुगुलांच्या मूर्ति खोदलेल्या आणि पूर्व बाजूला चांगली दहा अकरा फूट उंचीची श्रीविष्णुची मूर्ति बघितली. केवळ हेच एक मंदिर इथे आहे की ज्याला छोटी पुष्करिणी आहे आणि मधे मंड-पही आहे. इथून पुढे पश्चिमेच्या बाजूला वराहस्वामीचं मंदिर आहे. त्यातही अनेक मूर्ति कोरलेल्या आहेत. आणि त्यातच हिरण्याक्ष दैत्याचं वराह अव-ताराकडून आणि बलीचं महाबली त्रिविक्रमाकडून झालेल्या दमनाची दृश्यं कोरलेली आहेत.

आणखीही छोटीमोठी बरीच मंदिरं आहेत. आणि बरीचशी समुद्रानं आपल्या पोटात घातली म्हणतात. नंतर बघितलेलं एकसंध दगडाचं साठ

फूट उंचीचं मंदिरही समुद्र गिळू बघत आहे. हे बघून त्याने बरंच गिळलं असलं पाहिजे याची खात्री पटते.

एवढं सगळं बघून पांडव रथाकडे आलो. हेच आश्चर्य बघायला देशो देशीचे पर्यटक आपापली छायाचित्रणांची आयुधं सरसावून इथे रस्तोरस्ती फिरत असतात. समुद्राला अगदी लागून एक मंदिर बघितलं. आंतमध्ये स्वामी नव्हता. पण विशेष असं की ही सारी कलाकृति जवळ जवळ पांचशे चौरस वारांच्या जागेत अखंड दगडाची जागीच एकसंध अशी निर्माण केलेली आहे. नेहमीप्रमाणे त्याला तीन परकोट, मागे छोटं गोपुर, वरचा सुरेख कळस, सगळं विविध मूर्तिनी जडवलेलं, हत्ती अश्व आणि पौराणिक प्राण्यांच्या वैशिष्टयांनी सजवलेलं आहे. आणि हे सगळं केवळ एकाच दगडात अखंड. कुठेही जोड नाही. कुठेही उपरा आधार नाही. केवढं कौतुक आहे ! असल्या प्रकारची कौतुकं इथं जागोजागी विखुरली आहेत. पांडवांची रथ-मंदिरंही अशाच प्रकारची आहेत. खालच्या समतल बैठकीपासून तर वरच्या कलापूर्ण छतापर्यंत सगळं कलापूर्ण. तरीही अखंड. एक संध कुठे संपूर्ण हत्तीच तयार झाला आहे. तर कुठे प्रचंड वनराज जवडा पसरून उभे आहेत.

दूर अंतरावर जियें टेकड्या जमिनीवर विसावल्या आहेत त्याही या कलाकाराच्या हातोड्यातून सुटल्या नाहीत. वेगवेगळ्या टेकड्याच्या पृश्ठा-वरून वेगवेगळे पौराणिक अध्याय सचित्र केले आहेत. कुठे अर्जुनाच्या तप-श्चर्येचा देखावा आहे. कुठे महिषासुर मर्दिनीच्या युद्धाचा प्रसंग आहे. तर कुठे गोवर्धन धरण्याची लीला आहे. या प्रस्तरांनी आपली सहिष्णु अंग उघडी करून त्याच्या पुढे धरली आणि कलाकारांनी आपल्या कलेची पुरेपूर हौस भागवून आपलं वैशिष्ट्य अमर केलं. नवल म्हणजे हे वज्रप्राय खडकही त्यांच्या त्या मुलुख वेगळ्या हौसेपुढे त्याच्या इच्छेप्रमाणे वाकले. मेणाहून मऊ झाले.

पण सर्वात आश्चर्य हेच आहे की आज जवळ जवळ हजार दीड हजार वर्ष झाली तरी या सर्व दृश्यांमधला उठाव कमी झाला नाही. सागरी सान्नि-ध्यांत राहूनही कोरीवपणाला क्षति पोचली नाही. सगळ जसं केलं तसंच अद्याप उभं आहे. त्यांत विराट दर्शनाचा सोहळा नाही. विशालत्व नाही पण कलाकराच्या विशाल दृष्टिच दर्शन मनोज्ञ आहे.

नंतरच्या दक्षिणेंतल्या सर्व जगाच्या कौतुकाचा विषय झालेल्या शिल्पाकृतींचा हा मूळ स्त्रोत् आहे असं म्हटलं तरी चालेल. चौथ्या शतकापर्यंत इकडची मंदिरं लाकूड विटा इत्यादिनी बांधली जात होती. पण त्या वस्तूना टिकाऊपणा आधिक नसे. म्हणून फक्त दगड वाकवून, दगडच कोरून आणि त्यांची विशिष्ट पद्धतींनं रचना करून दीर्घजीवी मंदिरं उभी करणं हे त्या वेळच्या लोकांचे विशेपतः राजे लोकांचे संशोधन विपय बनले.

फार पूर्वी मृतशरीराच्या मूठमातीवर उभट आकारांचे दगड ठेवले जात. ते पुढे समाधीच्या आकाराचे थोडया फार कलाकुसरीचे बनू लागले. शेवटी त्यातून आजच्या गगनचुंबी गोपुराच्या रचनेचा शोध लागला असावा. आजही अशा प्रकारचे दगड कन्याकुमारीकडे किंवा दक्षिण केरळात दिसून येतात. अशी प्रस्तरपूर्ण मंदिरं बांधण्याचा आणि त्यांच्या विविध पद्धती शोधण्याचा मान पल्लवराजांनी मिळवला. 'महेंद्रवर्मन' आणि त्यांचा पुत्र ' नृसिंहवर्मन ' हे त्या दृष्टीने प्रमुख राजपुरुष गणले जातात. म्हणूनच आजच्या शिल्पइतिहासाचे कालखंड मोजताना पल्लवयुग हे महत्त्वाचं युग मानतात.

अशा देवस्थानांना आगम ग्रंथात ' दिव्य देशं ' अशी संज्ञा दिलेली आहे. कार्यप्रवेशापासून कलश स्थापनेपर्यंत आणि गर्भगृहापासून मूलमूर्तीच्या अंगोपांगापर्यंतच्या प्रामाण्याचे त्यात वर्णन आले आहे. अशा प्रकारे ही सगळी कला शास्त्र या स्वरूपात नंतर परिणत झाली. पण तिचा मूळ उगम मात्र ' महाबलीपुरम् ' च्या या परिसरात आणि पल्लवांच्या काळातच झाला असं विद्वानांचं मत आहे.

आज हे लिहिताना ' महाबलीपुरम्चं ' सारं चित्र कसं लख्ख दृष्टीपुढे उभ रहातं. दीपगृहाच्या उंचीवरून घेतलेलं हिरव्या समुद्राचं ते मनोज्ञ दर्शन अद्याप आठवतं. एका दगडात आपल्या कलावैशिष्ट्यांचा संपूर्ण संसार थाटणारी ती पांडव मंदिरं आणि विविध आकृत्यांनी आपली हृदय कोरून घेणाऱ्या त्या छोटया मोठ्या टेकड्या आढळतात. आणि त्या रम्य दृश्यांवर तिथेच दक्षिण यात्रेचा झिळमिळता पडदा सरकतो !

———

# १०

# श्रीकालहस्ती

दक्षिणेचा निरोप घेऊन मध्यंतरी बरेच दिवस गेले. संसाराच्या चार भिंतीच्या आड परत सारे व्यवहार सुरू झाले. संसाराच्या त्याच त्या खऱ्या खोटया सुखदुःखांनी मन व्यापून गेलं. पण त्याही अवस्थेत मनाच्या गवाक्षातून स्मृतींच्या झरोक्यातून अनुभवलेल्या दिव्य क्षणांचे कलश दिसायचे. दक्षिणेच्या जनमानसाने उभे केलेली भव्योदात्त गोपुरे दीपस्तंभासारखी उभी राहायची, खुणावीत रहायची आणि मनाची ओढ भविष्याच्या सोनपाखराची मनधरणी करायची "उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढविन पाऊ ! परत दक्षिणेकडे जायचे, देवाच्या भेटीचे ते क्षण परत कधी येतील ते सांग."

एक दिवस त्या अपेक्षित गोड क्षणाची वार्ता त्या काऊने मला सांगितली. आणि एक दिवस परत दक्षिणेकडे जाण्यासाठी आम्ही गाडीत बसलो.

हे परत जमून आलं हे फार उत्तम झालं असं वाटलं. दक्षिणेत अद्यापही कितीतरी बघायचं राहिलं होतं. " कोमलतरं केरालि " म्हणून ज्या केरळाचं वर्णन केलं आहे; ते केरळ बघायचं होतं. फळासाठी रूसलेल्या बालकार्तिकाची 'बाबा तूच माझ्या आध्यात्मिक संसाराला लागलेलं फळ आहे' अशी समजूत घालायला गेलेल्या पित्याला जिथे पुत्राकडूनच प्रणवोपासना घ्यावी लागली ते पळणी बघायचं होतं. 'वाटुली पाहता शिणुले डोळुले' ते डोळुले तसेच शिणवत

ठेवून हातातली वरमाला अद्यापही तशीच टवटवीत ठेवून वाट बघत उभी असणारी दक्षिणेतली ती जोगाई अंबा, ती कोवळी सावळी कुमारी कन्या बघायची होती. आणखी कितीतरी सतत बघूनही कंटाळवाणी न वाटणारी ती हिरवी झावळी शेतीपोती, गुलाबी वाळूतले पारदर्शक पाण्याचे आरसे, भगव्या तपकिरी डोंगरकडांवर ओथंबलेले निळे आभाळ आणि माध्यान्हीच्या तप्तसुवर्णातही पाचूच्या हातातून जलबिंदूच्या हिरकण्यांची उधळण करणारा दरिया, सारं सारं परत बघावसं वाटत होतं. दक्षिण दर्शनाचं प्रज्वलित झालेलं अग्निहोत्र सवडीसोयीच्या राखोटचाखाली तसंच धुमसत होतं. प्रबळ इच्छेची योगाची अनुकूलता बघून परत पेटून उठलं. आणि त्याच्याच मंगल स्वाहाकारात आणि पवित्र प्रकाशात आम्ही परत एकदा दक्षिणेच्या उंबरठचाकडे झेप घेतली.

अपरात्री रेणिगुंठचाला पोहचलो. दक्षिणेतल्या प्रवासाला परत या म्हणून निरोप देणारं तिरूपति स्थान अवघं सहा सात मैलावर होतं. यात्रेकरूंनी खच्चून भरलेल्या बसेस ' देवा तुझी सोन्याची तिरुपति ' असं म्हणत नवलाख पायऱ्यांच्या गडाकडे धावत होत्या. आतली मंडळी बस सुटताना ' वेंकटरमणा--गोविंदा ' च्या गर्जना करीत होती. त्या अधिरेपणाच्या आणि अफाट हालचालीच्या गर्दीतून आम्ही बाहेर पडलो. पहाटचे चार वाजले असतील. आम्हालाही बस गाठायची होती. पण तिरूपतीची नव्हे. विरुद्ध बाजूची. रेनिगुंठचाच्या डाव्या अंगी दक्षिणेकडे तिरुपति तर उजव्या अंगाला बारा मैलावर आहे काळहस्ती. दक्षिणेतलं एक प्रसिद्ध सिद्धक्षेत्र. आमच्या या प्रदक्षिणेची सुरवात तिथूनच व्हायची होती.

तसं काळहस्ती रेल्वेस्टेशनही आहे. गुडूर काटपाडी लाईन मद्रास मेन लाईनला रेणिगुंठचाजवळ छेद देऊन गेली आहे. त्या लाईनवरच गुडूर बाजूला काळहस्ती स्टेशन आहे. पण बसचे रस्ते आधिक सोयीचे आणि आरामाचे आहेत. वेळ वाचवण्याच्या दृष्टीनेही बसेसच आधिक योग्य. या गाडचा वेगही उत्तम ठेवू शकतात. राज्य सरकारची या बसरस्त्यावर नेहमी दक्षतेची नजर असते. त्यामुळे रस्तेही प्रशस्त आणि निरपवाद असतात. म्हणून बस हे तिथलं वैशिष्टचपूर्ण लोकवाहन झालं आहे. केवळ आंध्रातच नव्हे तर साऱ्या दक्षिण-

भारतात भरधाव धावणाऱ्या या बसेस सरकारी आणि खाजगी क्षेत्रांत एक अपूर्व सोय होऊन बसलीं आहे.

रेनिगुंठ्याच्या बस स्टॅन्डवरून श्रीव्यंकटेश सुप्रभातम्च्या स्वरमालिका वातावरणात तरंगत असताना बस निघाली. सारं शहर अंधारातच होतं. मिणमिणत्या दिव्यांच्या रांगाबरोबर बस धावू लागली. काही वेळाने त्याही मागे पडल्या. आणि बस वाऱ्यावर सळसळणाऱ्या शेतांच्या मधून जाऊ लागली. दक्षिणेवर त्यावेळी वरुणराजाचं राज्य होतं. गेल्या सबंध दिवसभर आकाश मेघाच्छादित होतं. अधूनमधून होणाऱ्या पावसाच्या सरींनी प्रकृति प्रसन्नपणे न्हात होती. आता सगळीच भूमि जणू कषाय पाण्यानं भरून सुस्त झाली होती. पाऊस असो नसो. वरच्या ढगांच्या हालचाली मात्र देवदानवांच्या युद्धासारख्या वाटत होत्या. कधी नगाऱ्यांचा गडगडाट तर कधी वीजाचा कडकडाट. एरव्ही शुष्क आणि क्षीण दिसणारी नदीपात्रेदेखील आपल्या खऱ्या स्वरूपात दर्शन देत होती.

इतक्या सकाळी प्रवास करताना ती पावसाची पार्श्वभूमी अशी आभाळांत दिसत होती. शेतापोतातून खळखळत होती. पण पूर्वेकडे झुंजूमुंजू होत होतं. आणि वातावरणात पडदा उघडण्यापूर्वीच्या औत्सुक्याची शांतता होती. बस शेतांच्या कुंपणाच्या झाडोऱ्यातून बाहेर पडली आणि अचानक पहिलावहिला कोवळा किरण बसमधून आंत आला. त्याच्या त्या सोनप्रभेनं माझी दृष्टी पूर्वेकडे वेधली. ढगांच्या अस्तित्वाला तऱ्हेतऱ्हेचे रंग भरीत नवजात सूर्य-मंडल वर येत होतं. ढगांच्या गर्दीतून जागा मिळेल तशा किरणांच्या तारा आकाशात फेकल्या जात होत्या. पण त्या एवढ्याशा घटनेनं सगळीकडे जादूसारखा बदल झाला होता. मैथिली शरणजी म्हणतात—

> इसी समय पौफटी पूर्वमे, पलटा प्रकृतिपटि वग रंग.
> किरण कंटकोसे श्यामांबर, फटा दिवाके दमके अंग

असं सकाळी फुललेलं कविचं उषास्वप्न बघत आम्ही काळहस्तीच्या गावठाणात प्रवेश केला.

छोटीशी बाजारपेठ सोडली तर काळहस्ती हे छोटं खेडंच आहे. गावाचं खरं वैभव म्हणजे सोबतीनं वाहणारं स्वर्णमुखीचं पात्र आहे तर तिच्या काठी उभं असलेलं मंदिर हे त्याचं आणि गावाचं सौभाग्य निधान आहे.

गावात शिरायच्या आधीच लांबून दर्शन होतं ते या स्वर्णमुखीचं. पुलावरून तिचं पात्र पार करताना उजवीकडे दिसलं ते अति उंच आणि नेटकं गोपूर. मागल्या पर्वताशी बरोबरी करणारं. माथ्यावर तरळत असणाऱ्या विरळ मेघमालांशी धुंद होऊन गुजगोष्टी करणारं भव्य गोपूर.

काळहस्तीला पोचलो तेव्हा जेमतेम साडेसहाचा सुमार असेल. वाटेतलं सोन पहाटचं ते उषास्वप्न वाटेतच राहिलं होतं. काळहस्तीवर मात्र काळे ढग ओथंबून आले होते. मागल्या डोंगरकपारीतून पाऊसपाण्याच्या रुपेरी धारा खाली कोसळत होत्या. आणि ते उंच गोपूर त्यांच्यापुढे योगासन घातल्यासारखं ओलेतच बसलं होतं. ते काळचा सावळचा रंगांचं सामजस्य मोठं प्रक्षणीय वाटत होतं.

विशेष यातायात न करता हातातलं सामान सुरक्षित ठेवण्यासाठी जाग मिळाली. योग्य ती व्यवस्था करून आम्ही निघालो. काळहस्तीश्वराचं ते गोपूर ओलांडलं आणि मंदिराचा खूप मोठा औरसचौरस विस्तार लक्षात आला. आतापर्यंत बघितलेली मंदिरं विस्तिर्णपणात एकमेकांशी स्पर्धा करणारी होती. मोठमोठे उंच उंच तट इथेही आढळतात. पण इथल्या रचनेत एक विलक्षण गांभीर्याची ठेवण होती. प्रत्यक्ष मंदिर हे त्या प्रवेश गोपुराला पाठमोरं होतं. तटांच्या भिंतीच्या बरोबरीनं एक प्रदक्षिणा घातली की देवद्वार लागणार होतं. तटाप्रमाणेच जाणारा रस्ताही मोठमोठ्या शिळा अंथरून चिरेबंदी केला होता. सुरुवातीलाच थोडीशी यात्रेतली दुकानं सोडली तर बाकीचा सगळा भाग केवळ निमर्नुष्य होता. एखादा ऐतिहासिक किल्ला बघताना जसं वाटतं तसंच त्या ओवऱ्या पार करताना वाटत होतं.

सुरवातीला गणपतीचं दर्शन झालं. त्याचीही रचना एकूण गांभीर्याला साजेलशीच. त्याचं नाव पाताळ विनायक. खोल विहीरीसारख्या बांधलेल्या एका जागेत गणपतीची स्थापना झाली आहे. अरुंद पायऱ्यांनी खाली उतरून जाणारी वाट आहे. ती उतरून खाली गेलं की या तपस्वी गणेशाचं दर्शन होतं. मिणमिणत्या तेलवातीबरोबरच एक काजव्याच्या उजेडाचा विजेचा दिवाही त्या अंधाराची सोबत करत होता.

एव्हाना वाजणारे नगारे आणि नागस्वर देवद्वार उघडे झाल्याची घोषणा करू लागल्या. आम्ही मंदिराला सामोरे झालो तेव्हा पहिलं दर्शन घेऊन दहा

पाच माणसं परतत होती. इथे दर्शनाला दहा पैसे किंमत पडते. ती देऊन आम्ही मंदिरात प्रवेश केला. आतील वास्तुरचना देखील एकूण गांभीर्याला साजेलशीच वाटली. ओवऱ्या खांब, त्याच्या बैठका, त्यांचे स्कंध, वरची छतं सगळंच नेहमीप्रमाणे शिल्पालंकाराने नटलेलं होतं. पण त्या शिल्पात सुट-सुटीत साधेपणा होता. त्यातून लांबीरूंदीचा मोठेपणा मनात ठसावा अशी योजना होती. ओवऱ्यात इतर नायन्मार भक्तांबरोबर काही विविध देवदेवतांनी आराधिलेली शिवलिंगं होती. इथे देह ठेवणाऱ्या मानवाच्या कानात कालहस्तीश्वर तारकमंत्र सांगतो. नि त्याचा उद्धार करतो अशी समजूत आहे. त्याच्या पापपुण्याचा हिशेब ठेवणारा चित्रगुप्त अर्थात त्याप्रमाणे आपल्या खात्यात नोंद घेत असेल. इथे चित्रगुप्ताने स्थापलेलं, पूजिलेलं शिवलिंग आहे. 'पांडवानां धनुर्धरः' अशा पार्थाने पाशुपत अस्त्रासाठी या ठिकाणी तपश्चर्या केली अशी इकडची श्रद्धा साक्षात दाखवणारी पार्थाची धनुर्धर मूर्तिही शिवपूजनासह इथे मूर्तिमंत आहे. आणखीही पुष्कळ आहे.

आम्ही त्या सर्वांकडे श्रद्धेचा एक दृष्टीक्षेप टाकून गाभाऱ्याकडे वळलो. एकामागन एक चार अंधारे कक्ष ओलांडले आणि कालहस्तीचे मुख्य दैवत समोर दिसायला लागले. अंधाराच्या पार्श्वभूमीवर दिपशिखांच्या मांडणीत ते उठून दिसत होते. कुठूनही वाऱ्याची झुळूक देखिल येऊ नये अशी बंद पेटीसारखी गाभाऱ्याची रचना आहे. सगळ्या दीपज्योती इथे अगदी स्तब्ध तेवत रहातात पण श्रीमूर्तिच्या अगदी वरच लावलेल्या लामण दिव्यातल्या दोन दीपाशिखा सारख्या फडफडत असतात. वारा सहन न होणाऱ्या दीपकळ्या सारख्या धडपडत असतात. एक विलक्षण चमत्कारच म्हणावा लागेल तो. श्रीकालहस्ती हे पंचतत्व लिंगापैकी वायूतत्वाचं आहे असं म्हटलं जातं. या संदर्भात दिव्याचं ते फडफडणं आधिकच औचित्यानं नजरेत भरलं जातं. या वायुलिंगाला पुजारीही स्पर्श करूं शकत नाहीत. त्याच्या बाजूला एक विशिष्ट लिंगाकृति सोन्याच्या पट्ट्याची आकृती आहे. त्यावरच पूजेअर्चेचे संस्कार केले जातात. फूलमाळा वगैरे चढवल्या जातात.

मंदिरातलं शिल्प सुरेख आहे. दक्षिणेतल्या मंदिराचं सर्व शिल्प वैशिष्ट्याने नटलेलं आहे. पण गोपूर आणि बाहेरच्या तटबंदीइतकं जुनं मात्र

वाटत नाही. अलीकडेच म्हणजे ७५ वर्षापूर्वी चेट्टी नावाच्या एका शिवभक्ताने लाखो रुपये खर्चून हा सारा शिल्पोत्सव घडवून आणला आहे. कदाचित् म्हणूनच त्या साऱ्या वास्तुला नवप्रस्तराचा रंग आहे आणि कानाकोपऱ्यातही नीट रेखीवपणाचे अंग आहे. कालहस्तीश्वराचा हा दरबार फार मनोहर आहे, भव्य आहे हे मात्र मनात ठसले. शोभेला हौसेने लावलेल्या हंड्या आणि झुंबराची जोड लाभली आहे.

मूळ लिंगावर कोळी, सर्प आणि हत्ती यांच्या आकृत्या खोदलेल्या आहेत. या तिघांनीही शिवरक्षणार्थ आपले प्राण वाहिले म्हणून शिवाने त्यांना आपल्या श्रीविग्रहावर स्थान दिलं आणि त्यांच्या नावानं तो प्रसिद्ध झाला. श्री-कोळी, काल–सर्प, हस्ती हत्ती अशी श्रीकालहस्ती या नावाची उत्पत्ति आहे. पुराणात स्थळ आणि वायू पुराणांनी इथल्या शिवलीला वर्णिल्या आहेत.

पौराणिक महत्त्वाच्या दृष्टीने कालहस्ती हे संयुक्त शिवशक्तीपीठ आहे. इथले हे पर्वतश्रृंग लांबून बर्फाच्या आवरणासारखे दिसतात. स्थळपुराण म्हणते नंदिकेश्वरानं हा एक कैलास पर्वताचा भागच आणून ठेवला आहे. त्याला पार्श्वसंगतीला ठेवून श्रीकालहस्ती मंदिर आहे. पहाडावर भारतातील ४१ शक्तिपीठांपैकी एक शक्तिपीठ आहे. एक अतिशय छोटं आणि दुर्लक्षित असं देवीचं मंदिर आहे. पाशुपतशास्त्राच्या प्राप्तिसाठी या शिखरावर अर्जुनानं तपश्चर्या केली हे सांगणारं त्याने स्थापलेलं शिवलिंगही इथे आहे. शिवाय शिवभक्त कणप्पाचं मंदिरही वर आहे.

एका व्याधानं मात्र आपल नाव या कालहस्तीच्या कथेत अमर केलं. तो आहे भक्त कण्णप्पा. त्याने स्वतःच्या भाबड्या भक्तीच्या बळावर या शिवस्थानाचं माहात्म्य आधिक उज्वळ केलं आहे. त्याची कथा ऐकली ती अशी.

फार फार पुरातन काळची गोष्ट आहे ही. ज्यावेळी इथे नुसतं अरण्य माजलं होतं. कालहस्तीश्वर त्यावेळी छोट्याश्या मंदिरात झाडापानाच्या डोंगर दऱ्यांच्या सहवासांत समाधी लावून तप करीत बसला होता. उन्हाळ्यांत तापत होता. पावसाळ्यात भिजत होता. पर्वतातून सहजस्फूर्तिने निघालेले जलस्त्रोत त्याला अभिषेक करत होते. एके दिवशी दोन भिल्लकुमार–नील आणि फणीश शिकारीसाठी हिंडत हिंडत या गुंतावळीत आले तेव्हा त्यांना हा शंभुमहादेव दिसला.

नील फणींशला म्हणाला, "आपण इथे देवाचं रक्षण करीत बसूया" फणीश म्हणाला, "रक्षण काय करायचं त्यात ? आपण नव्हतो तेव्हा देव इथंच होता की नाही ? आपण कोण देवाचं रक्षण करणार ? चल आपल्याला अजून शिकार शोधायची आहे. उशीर झाला. इथपर्यंत उगाच आलो." नील त्याला काही उत्तर न देता तिथेच बसून राहिला. फणीश बिचारा नाईलाजानं निघून गेला.


धनुष्य बाण सरसावून नील शिवाचं ध्यान करीत बसला. त्याने झाडा–झुडपांची गुंतावळ थोडी कमी केली. नंतर धनुष्यबाण सांभाळीत जरा दूर गेला. देवाच्या पोटापाण्याची व्यवस्था करायला हवी होती ना ! बराच वेळाने तो परतला. दोन्ही हातात भाजलेल्या मांसाच्या नैवेद्याचे द्रोण. डोक्यावरच्या केसांत रानफुले, त्याला वहाण्यासाठी आणि त्याला स्नान घालण्यासाठी तोंडात पाणी असा त्याचा वेष होता. तो शिवलिंगाजवळ आला. दोन्ही हात गुंतले असल्यामुळे त्याने आपल्या पायानेच शिवलिंगावरचं निर्माल्य बाजूला केलं. तोंडातली गुळणी टाकून त्याला आघोळ घातली. केसातली फुलं काढून ती वाहिली आणि हातातला द्रोण पुढे ठेऊन म्हणाला. "खा".

असा क्रम सारखा चालू झाला. एके दिवशी काही भक्तमंडळी मंदिरात आली. त्यावेळी नील पूजेची तयारी करण्यासाठी बाहेर गेला होता. त्या माणसांनी मांसाच्या घाणीनं तोंड फिरवली. मांस टाकून दुषित केलेलं शिवलिंग बघून त्यांना बरं वाटलं नाही, त्यांनी ते सगळं साफ केलं अन् ते निघून गेले. नील परत आला त्याने आपल्या पद्धतीप्रमाणे पूजाअर्चा केली.

एक दिवस या गोष्टीचा तपास लावण्यासाठी ही भक्तीमंडळी तिथेच अंवती भवती लपली. कोणता नराधम हे शिवमंदिर भ्रष्ट करतो हे त्यांना बघायचं होतं. त्यांना त्याला शासन करायचं होतं. नील नेहमीप्रमाणे आला. आणि त्याने त्याच्या पद्धतीप्रमाणे पूजा केली. पण नंतर त्याच्या लक्षात आर की शिवप्रतिमेच्या डोळयातून रक्त वहात आहे. त्याला फार राग आला. तं. म्हणाला, "मी इथे प्रत्यक्ष रक्षण करायला असताना सुद्धा देवाची खोडी कुणी काढली ?"

धनुष्यावर बाण चढवून गर्जना करीत तो सगळीकडे बघायला लागला. पण त्याला कुणी दिसलं नाही. मग परत तो आपल्या देवाकडे वळला. त्याला

काही उपचार तर करायला हवेत. माहिती असलेली सगळी जडी बुटी त्याने जंगलातून शोधून आणली. ती वाटली. घोटली आणि लावली. पण प्रकृतीत काही फरक पडेना. रक्त वहायचं थांबेना. शेवटी त्याला वाटलं की काय वेडा मी ? जखम कसली नि मी औषध काय करतो आहे. देवाच्या डोळ्याला जखम झाली म्हणजे डोळा कामातूनच गेला आहे. त्याला आता नवीनच डोळा



बसवायला हवा. त्यान पटकन् धनुष्याचं टोक आपल्या डोळ्याच्या बाजूने घुसवलं आपला एक डोळा बाहेर ओढून काढला. आणि देवाच्या जखमेवर दाबून ठेवला. पण राहिलेल्या एका डोळ्याने बघतो आहे. तो प्रतिमेच्या दुसऱ्याहीडोळ्यातून रक्त यायला लागलं. नीलला चिंता करायचं काहीच कारण नव्हतं. कारण त्याला औषध माहीत झालं होतं. त्याने झटकन् त्याच प्रकाराने आपला दुसराही डोळा काढला आणि मूर्तिच्या दुसऱ्या डोळ्यावर ठेऊन दिला.

लपून बसलेले भक्तसज्जन नीलचं हे दिव्य आत्मसमर्पण दंग होऊन पहातच राहिले. इतक्यात अचानक मंदिर एका अद्भुत प्रकाशानं उजळून गेलं. आणि बघता बघता साक्षात् शिवशंकर त्या वेड्या भक्तापुढे उभा

राहिला. आंधळ्या भक्ताला कसला तरी आनंद झाला. त्या वेळी त्याला वाटलं डोळे असते तर या आनंदाचं दर्शन घेतलं असतं. त्याला दिव्यदृष्टी आली आणि त्याने आपलं दैवत पाहिलं. महादेवानं त्याला हाती धरून विमानात बसवून शिवलोकात नेलं. अशी ही जंगलातली जंगली माणसाची एका छोट्या शिवमंदिरात घडलेली कथा. त्याच मंदिराचा आज लांबरुंद एसपेस विस्तार झाला आहे. कालहस्ती या नावाने. आणि त्या भिल्ल कुमाराचं नीलाचं स्थान पर्वतावर उंचावलं आहे कण्णप्प या नावाने. तामिळमधे कण्ण म्हणजे डोळा आणि प्प म्हणजे वहाणारा. शिवानंद लहरी या स्तोत्रांत श्रीमद् शंकराचार्यांनी कण्णप्पाची प्रशंसा करून म्हटलं आहे–

' भक्तिः किं न करोत्यहो वनचरो भक्तावतं सायते ।

मंदिराच्या आवारातच जगदंबेचं वेगळं मंदिर आहे. तिथे काळ्या शीळेची साडेतीन फूट उंचीची सालंकृत मूर्ति आहे. तिला इथे ज्ञानदायिनी पार्वती अम्मा म्हणतात. तिचं दर्शन आणि चरणतीर्थ घेऊन मंदिराच्या बाहेर पडलो.

थोड्या दूर अंतरावर पर्वताच्या पोटाशी एक छोटं लेणं आहे. त्याला नटरंग सभा म्हणतात. तिथे शिल्पात नटराजाची नृत्यसभा कोरली आहे. बहुतेक सारं शिल्प पार बोथट झालं आहे. झिजलं आहे म्हणून आता त्यावर आधुनिक तैलरंगाची मनोहर चित्रावली आली आहे. एके ठिकाणी शिव-विवाहाचं दृश्यही चितारलं गेलं आहे. पुढे पंचमुखी महेशाचं छोटं मंदिर उभं आहे. त्या छोट्याश्या पहाडीवर उभं राहिलं की भोवतीच्या वनश्रीनी नटलेला परिवार मोठा रमणीय दिसतो आणि मंदिरासाठी नेमकी ठिकाणं शोधून काढणाऱ्याबद्दल मनांत आदर उत्पन्न होतो.

श्रीकालहस्ती शक्तिपीठ आहे. इथे ज्ञानदायिनी पार्वतीच्या सान्निध्यात अद्यापही विद्वत्सभा भरतात. कधी कामकोटीचे जगद्गुरू चातुर्मास वास्तव्य करून त्मा विद्वत्सभांचं संचालन करतात. वेदविद्यांचं अध्ययन होतं. परीक्षा घेतल्या जातात. दक्षिणेसह महावस्त्रांचे पुरस्कार विद्यार्थ्यांना दिले जातात. आम्ही गेलो त्यावेळी असाच एक समारंभ पार पडला होता.

मंदिराजवळच प्राचीन वास्तु संरक्षक केन्द्राचं कार्यालय आहे. त्याच्यातर्फे काही प्रकाशन प्रसारित होत असतं. सध्या तेथे वायु आणि स्थलपुराणाच्या

आधारे मंदिर आणि देवतांच्या संदर्भात संशोधन चालू असल्याचं सांगण्यात आलं.

'आंतरराष्ट्रीय प्राचीन संस्कृति संरक्षक संघटनेलाही या मंदिराचं अतिशय महत्त्व दिसून आलं आहे. काही परदेशी वास्तुतज्ञ इथे काही दिवसापूर्वी वास्तु संशोधनाच्या अभ्यासासाठी मुक्काम ठोकून होते. त्या संघटनेतर्फे कालहस्तीच्या जीर्णोद्धारासाठी बऱ्याच मोठ्या पैशांचा विनियोग भविष्यकाळात होणार आहे असं सांगण्यात आलं. म्हणजे पुढची पिढी हा अतिप्राचीन पशूपतिनाथ व्यवथित सावरलेला आणि मंदिर रचनेवर अद्यावत् संस्कृतीचा पण पुरातन पद्धतीने केलेला संस्कार वघणार आहे.

कालहस्तीहून परतताना सोवत करीत होत्या दोन गोष्टी. अंगाखांद्यावर विसावलेल्या ढगांशी गुजगोष्टी करणारं ते गोपूर आणि मागल्या सजल आकाशाच्या कागदावर चित्रासारख्या उभ्या असलेल्या पर्वतावरची एक चट्टयापट्टयाच्या रंगाची इमारत. भक्त कण्णप्पाचं जन्मस्थान !

# ११

# योगी अरुणगिरींचा

अगदी धुमधार पावसांत रेनिगुंटा स्टेशन सोडलं. दक्षिणेच्या ऐन पावसाळ्यात आम्ही तिच्या भेटीला आलो होतो. तक्रार करायला कांहीच जागा नव्हती. षोडशोपचारे पुजलेला, वस्त्रालंकारांनी नटून बाकी सगळे उद्योग सोडून केवळ भक्ताचिया काजासाठी, साधूच्या प्रेमासाठी उभा असलेला देव तर ठिकठिकाणी बघितला होता. पण ते सारं क्षणभर दूर ठेवून आपल्याच नादात, आपल्याच छंदात पर्जन्यधारांच्या अभिषेक पात्राखाली भिजून चिंब झालेलं ध्यान दिसणं हेही एक अलौकिक दर्शन होतं. पंचामृतासारखे विविध रंगाचे प्रवाह सर्वांगावरून वाहावीत सारी दक्षिण दिशा ते दिव्यरूप दाखवीत होती. त्या दर्शनातही एक वेगळीच अनुभूति होती. एक आगळेच नेत्रसुख होते. थोड्याफार अडचणी होत्या. पण प्रभुदर्शनाचा मार्ग रुद्ध होत नव्हता. पुढे जाण्याचा, आणखी आणखी बघण्याचा उत्साह काही मंदावत नव्हता.

त्या पवित्र पर्वताला मागे घेऊन कालहस्तीचा पशुपति सुवर्णमुखी नदीच्या प्रवाहात पाय सोडून बसलेला पाहून झाला. आता तो स्वतःच एक पर्वत स्वरूप बनून शिखरावरच्या ज्योतिशिखरातून दर्शन देणार होता. त्या पर्वताचं नाव तिरुवनमलै ! त्याला अरुणाचलेश्वरही म्हणतात. कालहस्तीत

ढगांनीं वेढलेला, पावसाच्या पडद्यातून दिसणारा त्याच्या दर्शनाचा सोहळा आता अरुणगिरीच्या तेजोलिंगात स्पष्ट होणार होता.

मोठ्या गाडीतून मद्रासपर्यंत आलो. नंतर पुढे मद्रास इग्मोरहून 'मदुराई सवारी' गाठली. जायचं होतं विलुपूरम्‌ला. विलुपूरमच्याच उजव्या अंगाला तिरुवन्नमलै आणि डाव्या अंगाला श्री अरविंदाची तपोभूमि पांडिचेरी. विलुपुरम् अतिशय महत्त्वाचं जंक्शन असलं तरी फारसं मोठं नाही. गावही छोटसंच वाटलं. सकाळी उठून तिरुवन्नमलैची तयारी केली. चाळीस बेचाळीस मैलाचं अंतर म्हणजे तसं काही फार नव्हतं. दोन अडीच तासांत जाऊन पोहोचणार होतो. म्हणून रामप्रहरीच आमची शिवयात्रा सुरू झाली. पावसाचा जोर कमी होता. ढगांचं घुमणंही नव्हतं. पण मोठमोठ्या शेतातल्या जलोत्सावाखाली त्यांनी आपली प्रतिबिंब पाठवली होती. ताडमाड कंबरभर पाण्यांत उभे होते, तर कांही झाडंझुडपं आकंठ बुडाले होते.

क्षणोक्षणी दिशा उजळत होत्या. हा मात्र नेहमीचाच योग जमून येत होता की कुठल्याही नवीन ठिकाणची भेट घडत होती ती पहाटेच्या रम्य वातावरणातच. इकडे मंदिरात जेव्हा प्रभातीचे नगारे वाजायचे किंवा प्रभात स्तोत्र सुरू व्हायची तेव्हा अरुणाच्या राजमंदिरातली सुकुमारी लालगुलाबी अनुरागानं आपल्या स्वामींनाही हळूच शुक् शुक् करीत उठवण्याचा खटपटीत असायची. माझ्या मनाला ह्या दोन्ही गोष्टी मोहून टाकायच्या.

तरी तिरूवन्नमलैला पोचायला आठ साडे आठ झाले असतील. स्टेशन-पासून मंदिर अर्ध्या मैलावर आहे. गाव एकूण चांगले आहे. गजबजते आहे. वर्षातून दोन वेळा चैत्रात अन् कार्तिकात मोठमोठ्या यात्रा भरतात. तेव्हा लक्षावधी भाविक जमतात. त्यांची व्यवस्था करण्याइतपत गावाची क्षमता आहे. प्रमुख गजबजलेला भाग मंदिराच्या महाद्वारांतच आहे. पंढरपूरच्या महाद्वाराचीच आठवण येते पण त्यापेक्षा बरीच प्रशस्त आणि व्यवस्थीत अशी इथली व्यवस्था आहे. दक्षिणेत भाविकतेला विधायक दृष्टीचीही जोड आहे त्याचं हे कारण असावं धर्मशाळाना इथे छत्रम् म्हणतात. अशी पुष्कळ छत्रम् देवळाच्या आसपास आहेत.

मंदिराच्या प्रवेश गोपुराच्या पुढे उभं राहिलं की पहिल्याच गोपूराच्या दर्शनानं मन भारून जातं. अकरा मजल्यांचं ते ऊंच गोपुर अनेक शिल्प कृतींना

घेऊन मंदिराच्या ध्वजेसारखं आभाळात उंच शिरलं आहे. दक्षिणेतल्या सर्व गोपुरांमध्ये हे सर्वात रुंद आहे. त्याला महाराज गोपुर म्हणतात. मंदिराच्या परिसरात एकूण लहानमोठी एकोणीस गोपुरं आहेत त्यांचा हा राजाच आहे असं म्हटल्यास वावगं होणार नाही. मंदिरही खूप प्रशस्त आहे आणि अरुणचलाला अगदी खेटून विस्तारलं आहे.

सामानासुमानाची अडचण वाटायला लागते ती यावेळी. कारण मंदिराच्या जवळ जाऊन पोहचलं की आधी दर्शन घ्यावसं वाटतं. शिल्पांच्या दाटीवाटीत सजलेली वस्तू बघावीशी वाटते. प्रत्येक ठिकाणी आवर्जून उभ असलेलं आगळं वेगळं वैशिष्ट्य बघावसं वाटतं. आवडती व्यक्ति प्रसंगविशेषी खास वस्त्राभरणांनी सजलेली जशी बघत रहावीशीं वाटते तशीच महेश्वराची ही महिमामय नित्य नवीन प्रस्तरस्थाने सारखी बघावीशी वाटतात.

त्या प्रचंड गोपुरातून आम्ही आंत शिरलो. नेहमीप्रमाणेच लहानमोठ्या पाच परकोटामधे चंद्रशेखराचं निजमंदिर आहे. सुरवातीला एक पुष्करिणी आणि मधल्या अंगाला महागणपतीचं मंदिर आहे. त्याला लागून दुसऱ्या गोपुराचं महाद्वार आहे. त्याला बल्लाळगोपुर म्हणतात. दुसऱ्या बाजूला सहस्त्रस्तंभ मंडप आहे.

सकाळच्या दहाचं उन चांगलं जाणवूं लागलं होतं. गर्दी वाढत होती. दर्शनार्थींच्या जाण्यायेण्यांत एक हत्तीही वजनदार चालीनं फेऱ्या घालत होता. एकादा विचारवंत जगाच्या हालचालीकडे लक्ष न देता स्वतःच्या तंद्रीत मागे हात बांधून आपल्या खोलीत फेऱ्या घालतो तसा. बल्लाळ गोपुरात असलेल्या महागणपतीच्या दर्शनानं आमच्या मंदिर परिक्रमेला सुरवात झाली. चार परिक्रमांची आवारं ओलांडली. महादेवाचं दर्शन होणार होतं. तसा त्याचा पुराणकल्पित श्रीविग्रह प्रत्यक्ष अरुणाचलच आहे. त्याचं दर्शन सर्वात आधी होतं. मंदिरांत आहे तो केवळ त्याचा लिंग विग्रह प्रतिनिधी. स्कंद पुराणांत म्हणतात "हे तपोधना ! हा तीन योजने विस्ताराचा पर्वतच स्वयमेव भगवान चंद्रशेखर आहे. जो लोकहितासाठी अरुणाचलाच्या स्वरूपांत प्रकट झाला आहे. हे पृथ्वीचं हृदय आहे म्हणून याचा महिमा सुमेरु, मंदार पर्वत आणि कैलासापेक्षाही आधिक आहे."

मंदिराच्या मागल्या बाजूच्या शिखरावर दर कार्तिकी पौर्णिमेला तो ज्योतिः स्वरूपांत दर्शन देतो. भक्तांच्या भक्तिमार्गावरची वळणं उजाळतो. तो स्वत-दीप आहे. कारण दक्षिणेतल्या पंचतत्त्व लिंगामध्ये अरुणगिरीवर तो 'तेजो लिंग' स्वरुपांत विख्यात आहे.

ह्या अरुणगिरी पर्वताचच तामीळ शब्दांत 'तिरुवन्नमलै' झालं आहे. भक्त, भाविक या सर्व पर्वताभोवती प्रदक्षिणा घालतात. त्यासाठी इथे व्यवस्थित सडकाही आहेत. हे सगळं बघता ऐकता आम्ही गर्भद्वाराच्या प्रवेशापर्यंत येऊन उभे राहिलो. दाराच्या अवती-भंवती सायुध सालंकृत शिवगण आपल्या काहींशा भयंकर वाटणाऱ्या आविर्भावांनी शिवदर्शनाच्या मर्यादा सांगत होते. त्यांचा आक्रमक पवित्रा, जरब दाखविणाऱ्या उंच भिवया' रोखलेले डोळे आणि नृत्यविन्यासाच्या हस्तमुद्रा तिरुवन्नमलैच्या रंगभूमीवरील शिवनाटचाची नांदी करीत होते. नांदी आकर्षक होती. प्रत्यक्ष शिवदर्शना-विषयी उत्सुकता तीव्र करणारी होती.

आता मंदिराच्या हृदयात प्रवेश करायचा होता. लांबून अंधाराच्या त्या काळोख्या गाभाऱ्यांत प्रकाशज्योतींची आरास दिसत होती. अगदी रांगेत मांडलेल्या दीपशिखा ज्योतिस्वरूप भगवंताचे तेजोलिंग घेरून तेवत होऱ्या. अनेक भिगांची झुंबरं आणि आरश्यांच्या तुकड्यांनी वेगवेगळे कोन साधून तयार झालेल्या विविध रचना त्या प्रत्येक ज्योतिची अनेकविध प्रतिबिंब दाखवून अधिक शोभा आणीत होत्या. एवढ्याश्या गाभाऱ्यात अनेक दीप-शिखांचं दर्शन घडवत होत्या. 'तब रोमरोममें ज्योतिरुप की दीप-शिखा दशकोटि जले' चा प्रत्यय येत होता !

हे दर्शन मोठं अभिनव तसंच अद्भुतरम्य वाटलं मला. त्या अंधारांत स्वत:चंही अस्तित्व दृष्टिगोचर होऊं शकत नाही. फक्त दिसतं ते शिवाचं ज्योतिरूप लिंग. देहातीत होऊन घडणारं दर्शन. पाच तटाच्या बाहेर राहिलेलं जग आणि 'अहम्' ला व्यापणारा देह अंधारात विरून गेला आहे. आणि राहिले आहे फक्त दर्शन-त्या ज्योतिकलशाचं-'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी वैदिक चेतना देणारं !

एका मोठ्याश्या चौथऱ्यावर सोन्याच्या प्रभावळीत एक चकचकीत शिव-लिंग आहे. भस्माच्या पट्ट्यानं झाकलेलं. फूलमाळांनी शोभिवंत केलेलं. आगरू

चंदनानं विलेपलेलं आणि धूपपात्रातून उठणाऱ्या धुराच्या रेशमी लड्यांनी वेढलेलं असं त्याचं स्वरूपही वातावरणाला सुसंवादी आहे. त्याच्या प्रभावळीच्या मागे दीपाशिखा महिरपी आहेत. गडद काळोखाची पार्श्वभूमी आहे.

त्या मणिलिंगाचं दर्शन घेताना स्कंदपुराणातल्या संदर्भातला जयजयकार आठवतो आहे. त्याच्या चरणामृतानं ओले झालेले हात जुळवून मी मनाशी पुटपुटते आहे.

ललाटे त्रैपुण्ड्रो निटिलकृतकस्तूरि तिलकः
स्फुरन्मालाधारः स्फुरितकटिकौपीनवसनः।
दधानोदुस्तारं शिरसि फणिराजं शशिकलां
प्रदीपः सर्वेषां अरुणगिरीयोगी विजयते ।।

ज्याच्या भाळी कस्तुरीचा टिळा आहे, गळ्यात विविध पुष्पमाला आहेत. कटि कौपिन ल्यायला आहे, मस्तकावर शीतळ चंद्रिका आणि फूत्कार करणारा सर्प आहे अशा त्या अरुणगिरीच्या ज्योतिरूप योगिराजाचा जयजयकार असो.

बाहेरील गाभाऱ्याच्या भिंतीही सहज दीपोत्सव करता येईल अशा थाटात असंख्य दीपिका घेऊन सजल्या होत्या. सगळीकडे जणू उजेडाचा आनंद भरला होता जो मंदिराच्या दाहीदिशा कोंडून उरला होता. त्या आनंदाच्या आवारात जराशी आधिक नेटकी जागा बघून आम्ही विसावलो. समोर लांबच लांब दिसणारा मंदिराचा पसारा, परिक्रमेच्या वळणावळणावर दिसणारी छोटी मोठी शिखरं आणि या शिवभूमीच्या क्षितीजाशी मांदार सुमेरू पर्वतासारखी उंच गोपुरं दृष्टी वेधून घेत होते. समोरून येणारे सूर्यकिरण पुष्करिणीच्या नितळ पाण्यामधे सरळ सूर मारत होते. त्यांनाच तेवढी स्नान करायला परवानगी आहे. एरव्ही ते पाणी फक्त पिण्यासाठीच जतन केलेलं आहे.

आम्ही कुठेही बसलो तरी अरुणगिरी आम्हाला बघू शकत होता. आमच्या सारख्या कित्येकांना त्याने बघितलं असेल. अनेकांनी दर्शन घेतलं असेल. पण मुळांत ब्रह्मा विष्णूचं गर्वहरण करण्यासाठीं त्याने हे रूप धारण केलं म्हणतात.

पुराणातल्या या कथित लोकसाहित्यांत देवाच्या श्रेष्ठकनिष्ठत्वाविषयीचे भांडण मोठ्या उद्बोधक पद्धतीत मांडलं गेलं आहे.

ब्रह्मदेव म्हणाले, "मी सर्वांचा पिता म्हणून मी श्रेष्ठ, तर विष्णू म्हणाले, "मी सर्वांचा पालक आणि विश्वपित्याचा पिता म्हणून माझ्या श्रेष्ठत्वाबद्दल वादच असूं शकत नाही." शेवटी आदिदेव भगवान चंद्रशेखरांनी मध्यस्थ व्हायचं ठरवलं. ते दोघांना म्हणाले, " अनादि आणि अनंत असे माझे आदि आणि अंत, मस्तक आणि पाय तुम्ही शोधायचे. जो यशस्वी होईल तो श्रेष्ठ."


दोघांनी मान्यतादर्शक कबुली दिली. शिव एक विशाल पर्वतरूप झाला. त्याचं मस्तक सूर्यमंडलालाही भेदून गेलं अन् मूळ सप्त पाताळाच्याही खाली राहिलं. ब्रह्मदेवांकडे मस्तक शोधण्याचं काम होतं. त्यांनी हंस होऊन आकाशात भरारी घेतली तर पाय शोधण्यासाठी " केशव भये शूकर रूप ! "

हंस उंच उंच उडाला पण त्याला महादेवाच्या उंचीचा पार लागेना. शूकर खाली पाताळ खोदत गेला पण त्यालाही खोलीचा थांग लागेना. हंसाला वाटेत एक केतकीपुष्प दिसलं. त्याला हंसाने आपल्या बाजूची खोटी साक्ष द्यायला सांगितली. केतकी कबूल झाली आणि ब्रह्मदेवांनी आपण मस्तक पाहिल्याचं जाहीर केलं. केतकीने त्यांच्या बाजूने साक्ष दिली पण लबाडी उघडकीला आली. महादेवाने ब्रह्मदेवाला शाप दिला की देव असून तुझी पूजा कोणी करणार नाही. तुझं मंदिर कोणी बांधणार नाही. केतकीला म्हणाले, "तू असत्य भाषण केलंस म्हणून शिवपूजनात तुला निषिद्ध समजलं जाईल." आज या दोन्ही गोष्टी सर्वमान्य आहेत.

दुसरीही एक कथा या संदर्भात प्रसिद्ध आहे. कांचीच्या एकाम्रनाथ क्षेत्रांत खेळल्या गेलेल्या नाट्यासारखीच ही कथा वेधक आहे. अवखळ शिवप्रियेने सहज शृंगारलीलेत आपल्या प्रियकराचे डोळे झाकले. शिवाचा तेजस्वरूप तृतिय नेत्रही झाकला गेला. देवाच्या निमिषार्ध निमिषाच्या क्रीडेने पृथ्वीवर अंधः-कार झाला. पृथ्वीवरचे जीवन ओसरून जाऊ लागलं. शिवाला हे कळलं. त्यांनी गौरीला दोष दिला. " जगज्जननी असूनदेखिल तूं अविचारी कशी झालीस ? तुला या गोष्टीचं प्रायश्चित्त घेतलं पाहिजे."

पश्चातापानं पोळलेली शिवा एकाम्र क्षेत्रांत आली आणि वालुकेचं लिंग करून तपाला बसली. तिला आकाशवाणीने सांगितलं की देवी इथं एकाम्र क्षेत्रांत नाही, तूं अरुणाचलावर जा. तिथंच तो चंद्रशेखर तेजोमय योगिराज बनून वसत असतो. त्याच्या पायाशी तपाचरण कर. तो गिरीच शिवाचं हृदय आहे. "

पार्वती अरुणाचलावर आली आणि शिवाराधनेच्या घटी बसली. तिच्या खडतर तपांत एक नवंच विघ्न उपस्थित झालं. महिषासूर नांवाचा असूर आपल्या सर्व पाशवी सामर्थ्यानिशी तिच्या रूपसौदर्यावर उठला. तिचं तप भंगलं. त्रिभुवन मोहिनी सुकुमारी देवी क्रोधानं कराल काळी झाली. आणि तिने महिषासुराशी तुंबळ युद्ध करून दैवी सामर्थ्याचा त्रिशूळ त्याच्या कंठनाळात खुपसला.



महिषासूर मातीत मिळाला. तिच्या विक्राळ रूपाच्या चरणी लोळत पडला. सिंहवाहिनी अंबा परत तपाला बसली. पण अंतर्यामीचा तिचा

अभिष्ट देव बोलला, " प्रिये झालं हे ठीक झालं. जगातलं एक पाप नाहीसं झालं. पण आईचं कर्तव्य निभलं नाही. महिषासूर राक्षस होता पण शिव-भक्तहीं होता. त्याचं काय ? "

हे ऐकून पार्वतीला दुःख झालं. महिषासुराने पूजा करण्यासाठी जे शिवलिंग स्थापन केलं होतं त्याच्यासमोर आपलं खड्ग खोल पुरलं आणि ती म्हणाली, "माझी तपश्चर्या फळाला आली, मी पुत्रवधाच्या कलंकातून मुक्त झाले तर या खड्गाचें पाणी होईल. "

आश्चर्य असं कीं कार्तिकी पौर्णिमेला योगीराज सदाशिव अरुणागिरीच्या शिखरावर ज्योतिरुपांत प्रकट झाला. पौर्णिमेच्या पूर्णचंद्राला साक्ष ठेवून त्याची अग्निशिखा आभाळांत उंच धडधडू लागली. शिवेनं त्या ज्योतिरूपाचं दर्शन घेतलं. तिची तपश्चर्या फळाला आली. खड्गाच्या जागी तीर्थराज निर्माण झाला. आज ते खड्गतीर्थ नावानं विख्यात आहे.

त्या ज्योतिदर्शनाची आठवण अरूणाचलाला दरवर्षी येते. कार्तिकी पौर्णि-मेला पर्वतशिखरावरच्या एका मोठ्या दगडीपात्रांत मणावारी कापूर त्या दिवशी संध्याकाळी पेटवला जातो. तशीच मोठी अग्निशिखा आभाळात उठते. तसाच पौर्णिमेचा चंद्र आभाळांत तळपत असतो. आणि ब्रह्मतीर्थावर उभे असलेले लक्षावधी भाविक ती ज्योत बघून नतमस्तक होतात. तिरुवन्नमळैला होणारा हा सर्वांत मोठा वार्षिकोत्सव.

मंदिराच्या बाहेर पडलो आणि प्रदक्षिणेच्या मार्गी लागलो. मंदिराच्या उजव्या अंगाला पश्चिमेच्या कोपऱ्यात कल्याणमंडप आहे तर डाव्या अंगाला जगदंबेचं मंदिर आहे. प्रदक्षिणेचा पहिला साक्षीदार ' संबंध्र विनायकर ' गणपतींचं मंदिर आहे. कल्याण मंडपांत दरवर्षी फाल्गुन महिन्यांत शिव-पार्वतीचा सोहोळा होतो. तोही एक दुसरा महोत्सव या मंदिरात साजरा होतो. दक्षिणेतल्या प्रत्येक मंदिरांत प्रतिवर्षी होणारा ' तिरुकल्याण ' हा एक विशेष महत्त्वाचा उत्सव असतो. ' तिरुकल्याण ' म्हणजे विवाह प्रकृती-पुरुषाचं मीलन. मायाब्रह्माची एकरुपता किंवा जिवाचं शिवाशी तादात्म्य. याचं हा सोहळा हे प्रतीक समजतात.

ज्योतिर्ब्रह्म बघून झालं होतं. आता त्याची महामाया मंदिराच्या उत्तरांगाला उभी होती तिकडे गेलो. पूजाअर्चा वगैरे व्यवस्थित होऊन आता दर्शनाचे

पट उघडून जगदंबा उभी होती. तिची कृष्णकमलिनींसारखी नाजूक काया सुरेख कलाकुसरीच्या सोनप्रभावळीत धवधवीतपणें उभी होती. जवळजवळ तिचा सगळाच थाट मदुरेच्या नववधूसारखा होता. साधीशींच पिवळी चिरडी ती नेसली होती. अंगाखांद्यावर यथोचित दाग दागिने होते. मस्तकावर गोपुर-शृंगांना वेध लावील असा सुरेख मुकुट होता. नासिकापुटं हिऱ्यांच्या अष्टकोनी फुल्यानी नटवलेले, उजव्या हातात कमलकलिका घेतलेली आणि डावा हात डौलदारपणें खाली सोडलेला असं तिचे ध्यान मोठं सुंदर दिसत होतं. आपल्या तपश्चर्येच्या कर्तृत्वानं परत मिळवलेलं सौभाग्य ढळढळीतपणें कपाळावर मिरवीत ती कृतार्थपणें उभी होती. मागले दोन्ही हात जाडजाड 'नीलमालयम्'च्या पुष्पभाराखाली झाकले होते. नेत्रही सुखासमाधानानें झाकाळले होते. तिची दृष्टीभेट घेतली आणि तिचे अंत:पूर ओलांडले.

बाहेर आलो. अंतरीच्या ओढीनं देवाची अंतर्गृहं बघुन झाली. त्याची मूळस्थानं, मूळमूर्ति आणि विलोभनिय सालंकार दर्शन झालं की मगच बाहेरचं कांही बघण्याच, त्याच्या विषयी काही ऐकायचं मनात येतं. तसं पहिल्या गोपुरापासून बघण्यासारख आपापल्या परीनं महत्त्वाचं असं सारंच काही असतं.


पहिल्या बृहद्गोपुराच्या छायेत आलो आणि उजवीकडे असलेल्या सहस्त्र-मंडपाकडे दृष्टी गेली. सहस्त्र खांबाच्या दाटीवाटीनी मंडप अगदी भरून गेला आहे. प्रत्येक परीचं कलाकौशल्याच प्रदर्शन इथेही हजर आहे असं वाटलं. हे सगळं बघताना आश्चर्य अस वाटतं की मंदिराचा एवढा मोठा आटोप वेग-वेगळ्या शिल्पांनी विविध मनोरम कृतीनी नटवूनसुद्धा या सहस्त्रस्तंभाची कारागिरी करायला जमलं कसं ? तसा तोच तो पणाही विशेष कुठे आढळत नाही. बघायचा कंटाळा येत नाही. खूप मोठ्या कालावधीत हे सगळं निर्माण झालं आहे आणि निरनिराळ्या आधिसत्तांकडून हे घडवलं आहे हे मान्य करूनही तो प्रश्न तसाच शिल्लक राहातो. मध्यभागी ऐसपेस प्रस्तरपीठ आहे. आश्विन महिन्यात इथें 'चिदंबरम्'ची चीद्विलास सभा भरते. साभरण, सगन गिरीश इथे नृत्योत्सव करतात. नटराजाच्या मूर्तिपुढे तो उत्सव होतो.

त्याच्यामागे एक खोल विवरांत पाताळ लिंगेश्वर महादेवाचे लिंग आहे. अंधाराच्या साम्राज्यात शिव तपाला बसला आणि त्या साऱ्या अज्ञाततिमिराचा

ग्रास करून स्वतःचं तेजोमय रूप भक्तांना दाखवलं. इथं आणखी एका अरुण-गिरीच्या योग्यानं सतत आठ वर्ष तप साधना केली. ते म्हणजे अखिल विश्वात ख्यात असलेले 'भगवान रमण महर्षी !'

या मंदिरात अनेक साधक होऊन गेले. त्यांत एका ज्ञानार्थी अति भक्ता-साठी देवाला धाव घ्यावी लागली. सहस्त्रस्तंभ मंडपाच्या उजव्या अंगाला एक मंदिर आहे ते त्या भक्ताचं. त्याचं नाव अरुणगिरीनाथ. "साऱ्या विश्वाचा ज्ञान प्रदीप तू आहेस तर देवा तुला मीच कसा दिसत नाही ! मीच या मायेच्या अंधारात कां खितपत पडावं ! या दुस्तर संसाराच्या ठेचा मीच कां खाव्यात ! प्रभु तूं मला मार्ग दाखव. नाहीतर मला तुझ्या चरणी आश्रय दे."

अशी प्रार्थना करकरून थकलेल्या त्या आर्त भक्ताने शेवटी देवाच्या दारात आत्महवन करायचं ठरवलं. तो त्या महाराज गोपुराच्या उंच शिखरावर चढून गेला. आणि शिवस्मरण करीत डोळे झाकुन त्याने सरळ उडी ठोकली. खाली चिरेबंदी होती तरी शिवमहिमेचे असंख्य वरदहस्त त्याला झेलायला



होते त्याने डोळे उघडले तो साक्षात कार्तिकेय भगवान समोर उभे ! अरुणगिरी नाथाला त्याचं इप्सित मिळालं. तो प्रज्ञावान झाला. प्रतिभावान झाला. त्याने अनेकपरीची स्तुतिस्तोत्र आळवून देवाला हलवून सोडलं आहे.

सोळाव्या शतकात झालेल्या या वीरानं मंदीराचा इतिहासही सुसूत्रपणें लिहिला आहे म्हणतात. स्वामी ज्ञानसंबंदर सुंदरमूर्ति आणि माणिकवाचकर आदि नायन्मार शिवसंतांच्या बरोबरीने, त्या मानानें ऐतिहासिक काळात अगदी अलिकडेच होऊन गेलेल्या या अरुणगिरीनाथानीही आपल्या तिरुपुगळ कंधर आलंकारम्, कंधर अनुभूति, 'तिरुवगुप्पु' आदि कृतींनी शिवसाहित्यात खूप मोलाची भर टाकली आहे. याशिवाय गुहै आणि गुरु नमः शिवाय या गुरु शिष्याचीही बरीच ग्रंथसंपदा आहे. ज्यात शिवाचा आणि या स्थळाचा अपार महिमा वर्णन केला आहे.

एकूण भगवान अन्नामलै हे स्थान अतिशय प्राचीन आहे हे निश्चीत. यजुर्वेदाच्या शतरुद्रीय संहितेत अरुणाचल महिमा वर्णिलेला आहे.

"असो यस्ताम्रो अरुण उत्त बभ्रुः सुमंगलः ।
नमस्ताम्राय चारुणाय च ।"

पण प्रत्यक्ष मंदिर रचनेचा किंवा पुनर्रचनेंचा काळ अलिकडचा म्हणजे अवघ्या सत्तर वर्षापूर्वीचा आहे असं संबंधित साहित्य सांगते. मुख्य मंदिर पूर्वीच्या रचनेंची डागडुजीं सन १९०५ मध्ये झाली. चेट्टिनाडुच्या गावकऱ्यांनी त्यासाठी लक्षावधी रुपये कारणी लावले.

अनेक आले आणि गेले. पुष्कळ घडलं आणि परत उभही राहिलं. पण शिवमहिमा तसाच अगाध राहिला आहे. आणि जोपर्यंत समोरचा तो ज्वालामूखी पर्वत कार्तिक पौर्णिमेला आपल्या स्वरुपात पेटून उठेल तोपर्यंत मंदिराच्या प्राकाराच्या कोपऱ्या कोपऱ्यातुन लक्षावधी भाविकांच्या जिवंत शिल्पाकृती त्याकडे हात जुळवून उंचावून उच्च स्वरात त्याचा जयजयकार करतील–म्हणतील,

प्रदीप : सर्वेषां अरुणगिरीयोगी विजयते ।

———

१२

# भगवान रमण महर्षि

भगवान् अरुणाचलेश्वराचा निरोप घेतला आणि पुढें निघालो. अरुणा- चलावर अनेक छोटी छोटी मंदिरं आहेत. कांही समाध्या आहेत. कांही सिद्धांच्या गुंफा आहेत. तिथंही जायच फार मनांत होतं. पण सवडीची सोय नव्हती.

चतुर्थाश्रमांत परिव्राजकानं एका ठिकाणी त्रिरात्रीपेक्षा अधिक असूं नये असा दंडक आहे. पण झपाट्यानं घडायची तीर्थयात्रा कुठल्याहीं स्थानाला एका रात्रीचीही सोय असू देत नाही.

आता श्रीरमणआश्रम बघायचा होता. अरुणाचल क्षेत्र विश्वविख्यात करणारे भगवान् रमण महर्षि याच परिसरांत होऊन गेले. त्यांनी सतत ५० वर्ष इथेच अखंड साधना करून भगवत्प्राप्तीचा नंदादीप उजळला. त्यांचं गौरवमय आयुष्य याच अरुणाचलाच्या चरणाजवळ शांत नंदादीपासारखं तेवत राहिलं. त्याच्या आश्रमाचं दर्शन घडणार होतं.

'कापुराची वाती उजळल्या ज्योती (या) ठायीच समाप्ती झाली जैशी' अशी त्यांची जीवनज्योत कर्पुराप्रमाणे अलौकिक ज्ञानाच्या सर्वांगाचं दर्शन घडवीत त्या मानानं अलीकडेच विरून गेली होती. १९५० साली त्यांनी समाधी घेतली. अनेकानेक देशी विद्वांनांना आपल्या व्यक्तिमत्वानं लोभावून ते जीवन मोक्षरेखे आलेला साधूचा अंकीला तो हरिभक्त आता श्रीहरीच्या

चरणी विलीन झाला होता. तरी त्याचं अस्तित्व तिथं रेंगाळणाऱ्या अनामिक सुगंधानं मागे उरल्याचं भासत होतं.

अस्वस्थ करणारी हुरहूर माझ्या मनाला लागली. वाटलं, हेच क्षेत्र बघण्याचा योग खरोखरच या आयुष्यांत होता तर तो वीस वर्षं आधी का नाही आला ? आजवर अनेकांना तसं वाटलं आहे. कुणाला प्रसिद्ध गानमहर्षिचे स्वर ऐकायला मिळाले नाही म्हणून, कुणाला भू गंधर्वाचं सुविख्यात अभिनय नैपुण्य बघायला मिळालं नाही म्हणून, तर कुणाला अनेक राष्ट्रविधात्यांचं डोळाभरी दर्शन मिळालं नाही म्हणून. त्यांचे प्रेरक राष्ट्रसजीवक शब्द कानी पडले नाहीत म्हणूनही असं वाटलं की आपण निदान २५।३० वर्षं आधी कां जन्मलो नाही ? दक्षिणेतल्या अनेक विख्यात वास्तू बघताना–त्यांचं विशाल पसरलेलं जराजीर्ण कलाकौशल्य बघताना तर अनेक वेळां माझ्या मनांत यायचं की या वास्तूंच्या ऐन भाग्यकाळाच दर्शन आपल्याला कां घडले नाही! भगवान रमण महर्षिचं ते आधुनिक तपोधाम बघतांनाही हाच विचार प्रथम मनांत आला. तरीही आधुनिक संताच्या–योगसाधकांच्या मालिकेतल एक दैदिप्यमान रत्न महर्षिच्या रूपानं जिथं वावरलं ते ठिकाण तरी इतक्या लांब येऊन दिसत होतं हेही कमी महत्त्वाचं नव्हतं.

आश्रमाच्या महाद्वारांत प्रवेश केला तेव्हां उन्हं उतरणीला लागली होती. जीवनाचे पापताप फेडीत दिवसभराचा साक्षीदार आता पश्चिमचलाकडे झुकला होता. पश्चिम क्षितीजावरचे राग अनुरागाचे रंगीबेरंगी सोहळे सुरू होणार होते. त्या क्षितीजाला ओठंगून अरुणाचल उभा होता. तर त्याच्या पायाजवळ महर्षिचं तपोधाम वसलं होतं. प्रवेशातच उंच उंच झाडा माडांनी आमचं स्वागत केलं. आणि त्या पाठोपाठ एका साधकानंही लगबगीनं येऊन आमची विचारपूस केली. आणि त्यानंच जणू हाती धरून दाखवावं तसं प्रत्येक ठिकाण आपुलकीनं आणि अगत्यानं दाखवलं.

आश्रमाची सुरवातच 'मातृदेवो भव' या मंत्रानं होत होती. प्रवेशद्वारासमोरच पूर्वाभिमुख एक सुबक प्राचीन कलाकुसर वापरून तयार झालेलं नवीन बांधणीचं मंदिर उभं आहे. पुढे छोटसं गोपूर आहे. मध्यावर सुबकसा सुवर्ण कलश आहे. आणि आंत मातृमहिमेचं प्रतीक म्हणून शिवलिंगाची

प्रतिमा आहे. महर्षींनी हे 'मातृभूतेश्वर' लिंग स्थापलं आहे. हे त्यांच्या मातुश्रींचं समाधी मंदिर आहे. आज तिथं त्रिकाल पूजाविधी, वेदांच पठण होतं. गुहागुफांच्या खडतर एकांतवासानंतर महर्षि सर्वप्रथम इथे आले. इथे बसले आणि शेवटपर्यंत इथेच राहिले.

मंदिराच्या पुढच्या मंडपांत महर्षिंच्या अनेक तैलचित्रांबरोबर उत्तराभिमुख कास्यमूर्ति बसवलेली आहे. कामाक्षी भगवतीच्या मंदिरात जसे भगवत्पूजापाद शंकराचार्य तसे मातृभूतेश्वराच्या दारांत भगवान रमण. मंडपाच्या भिंतींना मोठमोठी कपाटं आहेत. त्यांत तोलामोलाचें ग्रंथराज लष्कराच्या शिस्तीनं नीटस उभे आहेत.

मंदिराच्या समोर एक चिमुकली इमारत आहे. जेमतेम तीन खोल्यांची. ती रमणमहर्षिंची अभ्यासिका, विश्रांतिची जागा. याच अभ्यासिकेत बरोबर सोळा वर्षापूर्वी महर्षिंनी आपली अलौकिक इहयात्रा संपवली. आज त्या जागेत त्यांचे स्मृति–अवशेष मांडून ठेवले आहेत. कुणीही यावं आणि त्या अवशेषांच्या आधारानं मनोमन एक सलग आकृति उभी करावी आणि डोकं नमवावं.

त्या दोन दैवतांना नमस्कार करून पुढे गेलो तर आश्रमाचा सगळा थाट दृष्टिक्षेपांत आला. प्रथम नजरेत भरलं ते मधलं सुरेख अंगण. स्वच्छ दाट पांढऱ्या मातीनं सारवलेलं आणि चुन्याच्या रांगोळ्यांनी सजवलेलं. विविध कमलाकृति, दीपज्योतिच्या रचनांनी चितारलेल्या पानाफुलांनी शोभावलेल्या आणि मोरांच्या लाडिक हालचालींनी सजीव भासलेल्या त्या रांगोळ्या फार वैशिष्ट्यपूर्ण होत्या. त्यावर आश्रमाची लाडकी पांढऱ्या मोरांची एक गोजिरवाणी जोडी वागडत होती. ते दृश्य आज तसंच तितकच प्रभावीपण दृष्टीसमोर उभं राहतं.

दोन बाजूला आश्रमाच्या अगदी साध्या सोज्वळ कुटी उभ्या आहेत. आणि तिथेच मध्यभागी आता महर्षिंच्या समाधीमंदिराचं बांधकाम सुरू आहे. ते मंदिर खूप विशाल आणि वैभवशाली व्हावं अशी आश्रमवासियांची इच्छा त्या रचनेच्या तयारीवरून जाणवत होती.

आश्रमाचं नित्यकर्म मोठ्या कटाक्षानं पाळण्यांत येतं. आश्रमातल्या अपूर्व शांततेला या शिस्तीच्या सोनेरी चौकटींत बसवलेलं दिसलं. वेदपाठशाळेत

वेदांच्या ऋचांचं विद्यार्थी सामूहिक पठण करीत होते. संध्याकाळच्या त्या प्रशांत वेळी त्यांचे स्वर आश्रमातलं वातावरण भारून टाकत होते. आश्रमातलं गोधन एका नेटक्या गोशाळेत व्यवस्थित रहात होतं. त्याच्यापुढे लक्ष्मीचं वृंदावन दिसलं. महर्षिंच्या लाडक्या गाईचं ते स्मृतिचिन्ह होतं. आश्रमाच्या अंवतीभवती आणि अरूणाचलावर राहाणारे सगळे वनचर महर्षिंचे आप्त होते. त्यांच्या समदर्शी दृष्टीत ते सर्वांचे जिवलग होते. पण आश्रमातल्या गाई–हरिणं–कुत्रे–खारी–मोर हे त्यांचे विशेष प्रियजन होते. लक्ष्मीवर तर त्यांनी अपार माया केलीं. अन् शेवटी तिची पाठवणी आपल्या हातानं केली. तिच्या समाधीवर स्वरचित श्लोक खोदून घेतला.

अतिथीगृह, भोजनशाळा रुग्णालय, सगळचाच इमारती वैशिष्टचानं आश्रमाच्या जागेत उभ्या होत्या. आश्रमाच्या आधिकारी व्यक्ति आम्हाला ते मोठचा आपुलकीने दाखवत होत्या. सगळचांत मनांत घर करून राहिलेली खोली म्हणजे महर्षि ज्या हॉलमध्ये साधकांबरोबर बसत आणि साधक त्यांच्या समवेत ध्यान करीत ती. आम्ही त्या शांत खोलीत प्रवेश केला. एकाद्या मूल्यवान गालिच्यावर हळुवार पाऊल टाकावं तसे अलगद आम्ही आंत गेलो. पावलांना नकळत. त्या काळाशार जमिनीला नकळत. नेहमी कारण अकारण बाहेर पडणारे शब्द जडवत् स्थिर झाले होते. आश्चर्यानं भिरीभिरी पाहण्याची संवय डोळे जणू विसरून गेले होते. समोरच्या एका सुखासनावर महर्षिंचं पूर्णाकृति तैलचित्रं ठेवलं होतं. भंवती धूपपात्रं ठेवलेली, दीपदान ठेवलेली आणि पुढचांत सुंदर पुष्पगुच्छ. महर्षिंच्या त्या मूर्तिवर नजर खिळून गेली होती. आम्ही हळूच त्यांच्या पुढचांत बसलो. चित्रांतून त्यांची तेजस्वी अन् प्रेमळ नजर आम्हाला सागत होती "बसा." ज्या डोळचांनी व मितभाषी वैशिष्टचानं देशीविदेशी विप्तानांवर किमया केली, ते अमूर्त चैतन्य आमच्या समोर एका सोफ्यावर विराजमान होतं. विचारत होतं, "बघा, तुम्हालाही कांहीं वाटतं कां इथे ?" पण स्वतःच्या वाटण्याच्या पलिकडच्या वातावरणांत आम्ही होतो. नराचा झालेला नारायण प्रत्यक्ष समोर बघत होतो. त्याचं स्वरूप नेत्री साठवत होतो. त्याच्या तपस्तेजानं हृदय भरून घेत होतो. त्या थंड भूमीवर मस्तक ठेवून महर्षिंना नमस्कार

केला आणि जसे गेलो तसेच बाहेर आलो. आतिथ्यतत्पर आश्रमवासी बाहेर उभे होते. ते पुढच्या ठिकाणासाठी निघाले. आम्हाला म्हणाले, "चला."

मी हळूच म्हटलं "जरा थांबा. मला महर्षिंच्या जीवनाबद्दल कांहीं सांगाल कां ? मला उत्सुकता आहे. आज इतकी वर्ष रमण महर्षिचं नांव मी ऐकते आहे. आज त्यांची तपोभूमि पण बघते आहे. पण त्या मागचे त्यांचे आयुष्य कसे होते ते थोडेतरी सांगा." पुढे जाणारी त्यांची पावलं घुटमळली. ध्यानकक्षाच्या व्हरांड्यात ते बसले. आम्हालाही त्यांनी बसायला सांगितलं. एक क्षण तिथे नीरव शांतता पसरली.

ते सांगू लागले, 'परमात्म्याचा या संसाराशी जणू करार झालेला असतो की प्रत्यही उत्पन्न होणाऱ्या जीव सृष्टीत जवळ जवळ सगळं तुझं. पण त्यामधे कधीकाळी उदयाला येणारं माझ्या जीवाभावाचं–ते माझं. माझ्यासाठी. ते तुझ्या हातीच लागणार नाही. श्रीरमण अशा जीवापैकी होते. त्या परमपित्याचे ते खास प्रियपात्र होते. संसार त्यांना बांधू शकला नाही. माया त्यांना अडवू शकली नाही.

तिरुच्चुपी गांवात सुंदरम् अय्यर नांवाचे प्रतिष्ठित वकील रहात होते. त्यांच्या संसारात आषगम्माळ आईच्या कुशीत सन १८७९ च्या डिसेंबर महिन्यांत आर्द्री नक्षत्राच्या पुण्यपर्वणीला एका गोजिरवाण्या मुलानं जन्म घेतला. काळसावळं पण सुगठित शरीर आणि तेजःपुंज पण स्नेहवर्षा करणारे डोळे हे त्या मुलाचं जन्मजात वैशिष्टच होतं. अय्यर वकिलांनी आपल्या या मुलाचं नांव ठेवलं वेंकटरमण.

वेंकटरमण दिसामासानं वाढला. शाळेत जाऊ लागला. सामान्य आयुष्याप्रमाणे त्यांची गाडी मर्गाला लागली. प्राथमिक शिक्षण तिरुच्चुपीला घेतलं. मग डिंडिगळच्या शाळेत गेले. आणि नंतर मदुरैच्या अमेरिकन मिशन हायस्कूलमध्ये. मुलाचे पाय पाळण्यांत अशी म्हण आहे. पण व्यंकटरमणच्या बाल्यावस्थेत पुढें घडलेल्या बदलाचं एवढंसुद्धां चिन्ह दिसलं नाही. वर्गात ते अगदी 'ढ' नव्हते पण विशेष हुषारही नव्हते. अंगयष्टी चांगली होती तरी अभ्यासेतर हालचालीतही विशेष गती नव्हतीं. दिवस, महिने आणि वर्ष आपल्या परी जात होते. व्यंकटरमण पुढच्या इयत्तांची पुस्तकं घेत होता. मागलीं पुस्तकं प्रगतिपुस्तकांत गुंडाळून गतवर्षीच्या अडगळीत टाकत होता.

एक दिवस एक आगळीच घटना घडली. तो मदुरैला काकांकडें रहात होता तिथें तो माडीवर अभ्यास करीत बसला होता. एकाएकी त्याला भास झाला की आपण संपलो. आपलं आयुष्य सरलं. हे बघा आपले हात-पाय चेतनाविरहीत होत आहेत. दृष्टीसमोर अंधारून आलंय, संज्ञा बधिर झाली आहे. मी आता मरणार आहे. मी मेलो तर काय होईल ? काय होणार आहे ? घरांत रडारड होईल, आणि लाकडाच्या अंथरूण पांघरूणांत मी निजलेला असेंन. माझं शरीर लोक उचलतील आणि स्मशानांत नेऊन चितेवर ठेवतील. चिता पेटून उठेल आणि मग ? माझी होईल केवळ राख. जळला जाणारा मी आणि जाळणारा अग्नी दोघेही भस्म होतील.

पण भस्म झाल्यानंतर पुढं काय ? माझं काय होईल ? म्हणजे राख झाल्यानंतर सुद्धां मी उरणारच आहे कां ? मग मेलं ते कोण ? लाकडासंगे जळलं ते कोण ? मग बालरमणाच्या लक्षांत आलं की नाश झाला तो त्या वेड्यावाकड्या शरीराचा. माझा नाही. या शरीराला मी म्हणता येणार नाही. कारण हे तर बधिर झालं आहे, लाकडासारखं ताठ झालं आहे तरी ' मी ' ला माझं ज्ञान आहे. मग मी आणि माझं हे कोण ?

त्या दिवशी वेंकटरमणला भारतीय दर्शनाचा पहिला साक्षात्कार झाला. अध्यात्म शास्त्रानं पहिला धडा शिकविला. आपुल्या मरणाच्या त्या दर्शनानं पुढच्या सुख सोहळ्याचा मार्ग त्यांना दाखवला. हे शरीर मी नाही. या शरीरासाठी जे आहे तेही माझ्यासाठी नाही. मी वेगळा आहे. मन आणि मीही निराळा आहे. मन आणि मोक्ष या कार्यकारणापलीकडे मी आहे. अशी भराभर पावलं पडायला लागली. ती वाट दुस्तर होती. ठिकाणही अद्याप अगम्य होतं पल्लाहि ठाऊक नव्हता. वाट दाखवणारा भेटत नव्हता.

एक दिवस एक पाहुणा काकांकडे आला. रमणने विचारलं. "कुठून आलात?" त्यांनी उत्तर दिलं "अरूणाचलाहून" अन् बाळाच्या हृदयाचं स्पदन थिरकलं. हृदयाची धडधड वाढली. सर्वांग रोमपुलकित झालं. अरूणाचलाच्या दर्शनाच्या असंख्य तारा झणझणू लागल्या. अरुणाचल, जन्म जन्मांतरीच्या परमपित्याचं चिरपरिचित गांव, आता ओळखलं गेलं. बस् ! अरुणाचल ! अरुणाचल !

व्यंकटरमणला कांहीं सुचेना. जेवण पोट भरीना, निद्रा विश्रांति देईना. आंघोळीच्या पाण्यात हातच भिजत रहायचा. जेवायच्या ताटात फक्त हातच

जेवत रहायचा "दिनू तैसी रजनी झाली वो माये. अवस्था लावोनी गेला अजूनी का नये" अशी अवस्था झालीं. पुस्तकातली पानं पारदर्शी होऊन आत्मज्ञानाचं मृगजळ मनाच्या क्षितीजावर उठायचं. त्या मृगजळाची वावटळ व्हायची आणि सवंध वाट झाकाळून जायची. पुस्तकाविषयी चीड यायची. अन् ते बाजूला फेकलं जायचं. थोरला दादा शेवटी न राहवून म्हणालाच "अरे ज्याची अभ्यासावर श्रद्धा नाही त्यानं पुस्तकं कशाला फेकायची, घरदारच सोडायला हवं!"


दादानं टोमणा मारला खरा. पण त्याच्या तोंडानं जणू देवानंच मंत्र दिला. व्यंकटरमण गडबडीनं उठला आणि म्हणाला, "दादा एकस्ट्रॉ पिरीयड आहे मी जातो." दादाला समाधान वाटलं. तो म्हणाला आता कसा शहाण्यासारख बोललास. बरं जातोच आहेस तर माझी फी पण भरून ये. हे पांच रुपये घे.'

व्यंकटरमणाच्या इच्छेला दादाची आज्ञा म्हणजे गाडीला इंजिन लागल्यासारखंच झालं. तो निघाला. त्याचा तास म्हणजे आयुष्यातला महत्त्वाचा क्षण होता. पुस्तकातल्या नकाशामध्यें एकवार पाहिलं. पानं उलटावी तश्या आठदहा तारखा उलटल्या. आणि अरुणाचलाचा लाडका पुत्र त्याच्या पायापाशी आला. तो दिवस होता २९ ऑगस्ट १८९६, वय वर्षे फक्त सतरा!

वाटेत अनेक ठिकाणी नाना प्रकारचे हाल सोसून तो त्या परमपित्याच्या सन्निधीच्या सन्निध उभा राहिला. होत्या नव्हत्या त्या जवळच्या सगळ्या वस्तू त्यानं समोरच्या तलावात फेकून दिल्या. शिल्लक असलेले पैसे, त्याचप्रमाणे एक लंगोटी ठेवून बाकीचे सारे कपडे टाकून दिले. आणि बालरमण संन्यासी झाला. एका अद्भुत प्रेरणेनं जे प्रखर वैराग्य निर्माण झालं होतं त्याने त्याला संन्यासदीक्षा दिली. सहस्त्र मंडपाच्या उजव्या बाजूला जे खूप खोलवर पाताळेश्वर लिंग आहे त्या अंधाऱ्या गुहेत त्याने प्रवेश केला. आणि एक दोन नव्हे तर सतत आठ वर्षं अरुणाचलाच्या दारी धरणं धरलं. आठ वर्षानंतर केवळ योगायोगानं बाहेरच्या जगाला त्याची माहिती झाली. त्याला लोकांनी बाहेर काढलं तेव्हां त्याचे पाय मांड्या किड्यामुंग्यांनी पोखरून काढले होते. आणि भोवतीची जमीन रक्तानं, पुवानं भिजून गेली होती.

पण तोपर्यंत त्याला हवं असलेलं त्याला मिळालं होतं. त्याची वृत्ति आत्मानंदात निमग्न झाली होती. त्याचे शब्द मूक झाले होते. आता तो पर्वतावरच्या गौतमाश्रमांत साधनारत राहूं लागला. तब्बल दहा वर्षानंतर घरातल्या लोकांना त्याचा पत्ता लागला आणि आपल्या मुलाला परत नेण्यासाठी आषगम्माळ मातोश्रीनं तिरुवन्नमलैला धांव घेतली. पण बालरमणाचा निश्चय दृढ होता. त्याला ध्रुवाची मांडी मिळाली होती. आईनं विनय अनुनयादि सारे मार्ग संपल्यानंतर जमलेल्या मंडळींपुढे करुणेच्या अश्रूंनी आपलं गाऱ्हाणं मांडलं. लोकांनी आग्रह केला की "यतिवर कांहीं तरी बोला. आईला उत्तर द्या." बालयोग्यानं जवळचा एक कागद घेतला नि त्यावर लिहिलं.

"विधाता प्राण्यांच्या भाग्याचं त्यांच्या प्रारब्धकर्मानुसार नियमन करत असतो. किती प्रबल इच्छांचं बळ लाभलं तरी जे व्हायचं नाही ते होणार नाही. आणि रोखण्याचा कितीही यत्न केलात तरी घडणारं, घडतच राहणार आहे हे एक अटळ सत्य आहे. म्हणून शेवटी मौन राहणं हाच उत्तम मार्ग आहे."



शेवटी अखेर सर्वस्व गमावलेली, निराश झालेली आई पदरानं अश्रू पुशीत परत घरी गेली. इकडे देवावर भार टाकलेला हा अवधूत परत आपल्या तपस्येत मग्न गेला. खूप अवघड घळी, गुंफा, दुर्गम ठिकाणं आपल्या तपानं

पुनीत करीत बाल रमण तपस्वी व्यंकटरमण झाला. सामान्य जीवनाची कळी तपश्चर्येचं सौष्ठव मिळून सुविकसित फूल झाली. त्या पूर्णाकार [illegible] मधुर मकरंद अष्ट दिशांना वेडया भ्रमरांना आवाहन करूं लागला. त्यानंच एका अति विद्वान विभूतिला बोलावलं. त्याचं नांव काव्यकंठ गणपतीशास्त्री. ते आले. श्रींच्या चरणी लागले. लोकांना म्हणाले "अहो हा साधासुधा तपस्वी नव्हे. हा तर प्रत्यक्ष भगवान आहे". मग लोक त्यांना भगवान "रमणमर्हषि" म्हणु लागले.

संसाराच्या तापानं पोळलेले जीव मोठया आशेनं महर्षींकडे येऊं लागले. एकानं विचारलं "स्वामी ! येशू, बुद्ध आदि महात्मे पापीजनांच्या उद्धारासाठी अवतीर्ण झाले होते. आमच्या सारख्यांना कांही आशा आहे कां ? " आणि महर्षींनी ताबडतोब उत्तर दिलं.

There is nope. There is hope. आहे. आशा आहे ! जरूर आशा आहे. आणि लोकांच्या अनुभवाला आलं की महर्षींच्या सान्निध्यात अनुपम शांती मिळते. त्यांच्या तप पूनित शब्दांत आणि करुणादृष्टीत अज्ञान आणि दुःख नाहीसे करण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. लोक महर्षींच्या भवती जमले. पण महर्षींचा एकांतवास चालूच राहिला. दुरून बघणारी मंडळी त्यांची अनुचर झाली. त्यांनी एक आश्रम काढला आणि महर्षींच्या तत्वज्ञानाच्या प्रकाशात आपली साधना चालू ठेवली. हळुहळू आश्रमाला व्यवस्थित आकार यायला लागला. त्यांच्या नित्यनेमाची दिशा ठरायला लागली आणि महर्षींच्या उपस्थितीच्या दर्शनाचे भाग्य त्यांना लाभायला लागलं.

महर्षींच्या पितृगृहीचं सारंचं जीवन एव्हाना संपुष्टात आलं होतं. त्यांचे वडीलबंधू, काका, भावजई सारे आटोपले. दुःखावेगानं होरपळलेली आई परत महर्षींच्या जवळ आली. महर्षींनी तिला जवळ केलं आणि या संन्यासी मुलाच्या जवळच तिचा अंत झाला. तिची पारमार्थिक, आध्यात्मिक प्रगती बघून महर्षींनी तिच्या समाधीवर लिंग स्थापन केलं. त्याचं नांव ठेवलं 'मातृभूतेश्वर' ईश्वर जो मातृभूत झाला.

त्या मातृभूतेश्वराच्या पीठाभोवतीं आजच्या आश्रमाचं स्वरूप वसलं आहे. महर्षी एका ठायी स्थिर झाल्यानंतर त्यांच्याकडे लोकांची रीघ लागली. त्यांत

हॅम्फ्रीस' आले. 'ग्रँट डफ' आले. आणि अनेकांबरोबर त्यांचं तत्त्वज्ञान आणि नाव विश्वविख्यात करणारे 'पॉल ब्रन्टन'ही येऊन गेले. त्यांनी आपल्या 'आध्यात्मिक भारतातील अन्वेषण' या ग्रथात लिहिले आहे.

I learnt to recognise in this person the sublime truths which he taught while I was no less hushed into reverence by his incredibly sainted atmosphere. He possessed a deific personality which defies description. I might have taken shorthand notes of the discourses of this sage. I might even print the record of his speech, but the most important part of his utterances, the subtle and silent flavour of spritua. lity which emanated from his can never be reported. If therefore, I burn literary incense before his bust, it is but a mere fraction of the tribute I ought to pay to him.

आणि अशी अवस्था आश्रमात येणाऱ्या प्रत्येकाची झाली आहे. महर्षींच्या ह्यातीत वा पश्चातही जी मंडळी आली ती अशी मूक होऊन महर्षींच्या पायाशी नतमस्तक झाली.

तुम्ही विचाराल की बाहेरच्या संसाराच्या या चढाओढीत महर्षींच्या तपश्चर्येचं काय महत्त्व ? परंतु भारतवर्षात असा एकही माणूस मिळणार नाही की ज्यांला रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, योगी अरविंद यांच्या तपश्चर्येतून उत्तेजन मिळालं नाही. ज्याला उजेडाची अपेक्षा असते त्यानं सूर्यासमोर यायला हवं, किमान आपले डोळे तरी उघडायला हवेत. ज्यांनी असं केलं त्यांना मार्ग मिळाला. ज्यांनी विचारलं त्यांना उत्तर मिळालं. त्यांनाच ते कळलं. रमण महर्षींचं जीवन कशासाठी होतं, त्यांच्या तपश्चर्येचं लक्ष्य काय होतं. त्यांच्या दृष्टीनं तुम्ही संसारी माणसं सुद्धा आध्यात्मिक जीवन जगू शकता. ज्ञानमार्ग आणि गार्हस्थ यांत विरोध असूच शकत नाही. प्रभू रामचंद्राच जीवन गार्हस्थ्य आणि राजकारण आध्यात्मिक होतं. आणि त्यांच्यासारखा ज्ञानी पुरुषोत्तमही तेच होते. याचं मर्म महर्षींनी तुम्हा आम्हा सर्वांना सांगितलं. फक्त स्वतःचं मन ओळखा. 'कारण मन हेच मनुष्याचे बंधन मोक्ष कारण सोची'

पुनीत करीत बाल रमण तपस्वी व्यंकटरमण झाला. सामान्य जीवनाची कळी तपश्चर्येचं सौष्ठव मिळून सुविकसित फूल झाली. त्या पूर्णाकार सहस्त्रदळकमळाचा सौरभ दशदिशा भरूं लागला. त्यातल्या ज्ञानामृताचा मधुर मकरंद अष्ट दिशांना वेड्या भ्रमरांना आवाहन करूं लागला. त्यानंच एका अति विद्वान विभूतिला बोलावलं. त्याचं नांव काव्यकंठ गणपतीशास्त्री. ते आले. श्रींच्या चरणी लागले. लोकांना म्हणाले "अहो हा साधासुधा तपस्वी नव्हे. हा तर प्रत्यक्ष भगवान आहे". मग लोक त्यांना भगवान "रमणमहर्षि" म्हणु लागले.

संसाराच्या तापानं पोळलेले जीव मोठ्या आशेनं महर्षींकडे येऊं लागले. एकानं विचारलं "स्वामी ! येशू, बुद्ध आदि महात्मे पापीजनांच्या उद्धारासाठी अवतीर्ण झाले होते. आमच्या सारख्यांना कांही आशा आहे कां ? " आणि महर्षींनी तावडतोब उत्तर दिलं.

There is nope. There is hope. आहे. आशा आहे ! जरूर आशा आहे. आणि लोकांच्या अनुभवाला आलं की महर्षींच्या सान्निध्यात अनुपम शांती मिळते. त्यांच्या तप पूनित शब्दांत आणि करुणादृष्टीत अज्ञान आणि दुःख नाहीसे करण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. लोक महर्षींच्या भवती जमले. पण महर्षींचा एकांतवास चालूच राहिला. दुरून बघणारी मंडळी त्यांची अनुचर झाली. त्यांनी एक आश्रम काढला आणि महर्षींच्या तत्वज्ञानाच्या प्रकाशात आपली साधना चालू ठेवली. हळुहळू आश्रमाला व्यवस्थित आकार यायला लागला. त्यांच्या नित्यनेमाची दिशा ठरायला लागली आणि महर्षींच्या उपस्थितीच्या दर्शनाचे भाग्य त्यांना लाभायला लागलं.

महर्षींच्या पितृगृहीचं सारंचं जीवन एव्हाना संपुष्टात आलं होतं. त्यांचे वडीलबंधू, काका, भावजई सारे आटोपले दुःखावेगानं होरपळलेली आई परत महर्षींच्या जवळ आली. महर्षींनी तिला जवळ केलं आणि या संन्यासी मुलाच्या जवळच तिचा अंत झाला. तिची पारमार्थिक, आध्यात्मिक प्रगती बघून महर्षींनी तिच्या समाधीवर लिंग स्थापन केलं. त्याचं नांव ठेवलं 'मातृभूतेश्वर' ईश्वर जो मातृभूत झाला.

त्या मातृभूतेश्वराच्या पीठाभोवतीं आजच्या आश्रमाचं स्वरूप वसलं आहे. महर्षी एका ठायी स्थिर झाल्यानंतर त्यांच्याकडे लोकांची रीघ लागली. त्यांत

'हॅम्फ्रीस' आले. 'ग्रँट डफ' आले. आणि अनेकांबरोबर त्यांचं तत्त्वज्ञान आणि नाव विश्वविख्यात करणारे 'पॉल ब्रन्टन'ही येऊन गेले. त्यांनी आपल्या 'आध्यात्मिक भारतातील अन्वेषण' या ग्रथात लिहिले आहे.

I learnt to recognise in this person the sublime truths which he taught while I was no less hushed into reverence by his incredibly sainted atmosphere. He possessed a deific personality which defies description. I might have taken shorthand notes of the discourses of this sage. I might even print the record of his speech, but the most important part of his utterances, the subtle and silent flavour of spritua. lity which emanated from his can never be reported. If therefore, I burn literary incense before his bust, it is but a mere fraction of the tribute I ought to pay to him.

आणि अशी अवस्था आश्रमात येणाऱ्या प्रत्येकाची झाली आहे. महर्षींच्या हयातीत वा पश्चातही जी मंडळी आली ती अशी मूक होऊन महर्षींच्या पायाशी नतमस्तक झाली.

तुम्ही विचाराल की बाहेरच्या संसाराच्या या चढाओढीत महर्षींच्या तपश्चर्येचं काय महत्त्व ? परंतु भारतवर्षात असा एकही माणूस मिळणार नाही की ज्यांला रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, योगी अरविंद यांच्या तपश्चर्येतून उत्तेजन मिळालं नाही. ज्याला उजेडाची अपेक्षा असते त्यानं सूर्यासमोर यायला हवं, किमान आपले डोळे तरी उघडायला हवेत. ज्यांनी असं केलं त्यांना मार्ग मिळाला. ज्यांनी विचारलं त्यांना उत्तर मिळालं. त्यांनाच ते कळलं. रमण महर्षींचं जीवन कशासाठी होतं, त्यांच्या तपश्चर्येचं लक्ष्य काय होतं. त्यांच्या दृष्टीनं तुम्ही संसारी माणसं सुद्धा आध्यात्मिक जीवन जगू शकता. ज्ञानमार्ग आणि गार्हस्थ यांत विरोध असूच शकत नाही. प्रभू रामचंद्राचं जीवन गार्हस्थ्य आणि राजकारण आध्यात्मिक होतं. आणि त्यांच्यासारखा ज्ञानी पुरुषोत्तमही तेच होते. याचं मर्म महर्षींनी तुम्हा आम्हा सर्वांना सांगितलं. फक्त स्वतःचं मन ओळखा. 'कारण मन हेच मनुष्याचे बंधन मोक्ष कारण सोची'

असं त्यांनी बरंच सांगितलं. महर्षीचं जीवनसंगीत ते शब्दशब्दानं आळवीत राहिले. वाक्यावाक्यानं घोळवीत राहिले. शेवटी कर्करोगासारख्या जागतिक पाहुण्यांचं स्वागत करीत आणि त्याचं आतिथ्य स्वीकारीत १४ एप्रिल १९५० मध्ये आपली दृश्यतनू ठेवून त्यांचा आत्मा अरुणाचलाच्या अविनाशी चिरस्थायी तेजःपुंजात विलीन झाला. या आरतीच्या स्वरांची 'इदं चरित्रं परमं पवित्रम्'ची सांगता त्यांनी केली. आमच्या सफल जिज्ञासांची फुलं महर्षींच्या त्या परमपूनीत कर्मभूमीला वाहून आम्ही त्या आश्रमाचा निरोप घेतला. त्या आश्रमाच्या सुगंधी शांततेनं एका श्लोकाची आठवण झाली.

"चित्रं वटतरोर्मूले वृद्धा शिष्या गुरुर्युवा ।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयः" ।।

छिन्न होण्यासाठी मनांत विकल्प नव्हतेच. पण श्रीगुरुंचं मौन व्याख्यान ऐकून मात्र कान तृप्त झाले. डोळे कृतार्थ झाले !

------



१३

# योगीराज श्री अरविंद

तीर्थयात्रेचं महत्त्व विशद करताना पुराणकरांनीं अनेक परी सांगितल्या आहेत. त्या त्या स्थळाचा महिमा ऐतिहासिक, धार्मिक पार्श्वभूमीची जोड देऊन वर्णन केला आहे. म्हणून तू तिथे शरण जा. तिथे माथा नमव. अमूक एक ठिकाणीं स्नान कर, अमुक ठिकाणी पितृस्मरण कर आणि या महामहिम भारतभूत जन्मल्याचं सार्थक कर असं सांगितलं आहे, पण शेवटी हे सगळं जणू लालरेषेत अधोरेखित करावं तसं एक मर्मही सांगून ठेवलं की हे सारं तू सर्वभावे कर. या साऱ्या खटाटोपात तुझ्या भावनेचं चैतन्य नसेल तर हे सगळं व्यर्थ होय. कारण—

न काष्ठे विद्यते देवो न शीलायां कदाचन ।  
भावे हि विद्यते देवस्तमाद् भावं समाश्रयेत् ।।  
न देवः पर्वताग्रेषु न देवः शिवसद्मनि ।  
देवश्चिदानन्दमयो हृदिभावेन दृश्यते ।।

मनातला भाव त्या काळ्या पाषाणांना, मंदिरपहाडांना तीर्थराजाचं पावित्र्य आणत तेथून आपला साकार झालेला भावच आपल्याला दर्शन देतो. आपल्याशी बोलतो. आपली संकटे निवारतो. तीर्थातले 'धोंडापाणी' आपल्या भावनेत असे सजीव होतात. पण तुकाराम महाराज म्हणतात की 'देव रोकडा सज्जनी,

देवाला साक्षात बघायचं असेल तर साधुसंतांच्या सहवासात त्याची प्रचीती येईल. त्यांनी आपल्या तपोबलानं भगवंतांच्या दिव्यशक्तीचा साक्षात्कार करून घेतलेला असतो. फार काय, ते प्रत्यक्ष सजीवपणे भगवंतांची मूर्ती झालेले असतात. म्हणून त्यांच्या सहवासानं पुनित झालेल्या त्या त्या ठिकाणांना एक विशेष महत्त्व प्राप्त झालेलं असतं.

प्रखर वैराग्यानं बालरमणाला भगवान रमण महर्षी बनवलं. त्याच आदिशक्ती दक्षिणेश्वरच्या वेड्या पुजाऱ्याला 'अरे जो राम, जो कृष्ण, तोच इथे रामकृष्ण' ही योग्यता प्राप्त करून देऊन 'भगवान रामकृष्ण' बनवले. त्याच वैराग्यानं आणि निश्चयी तपोबलानं निर्माण झालेली स्थानं तीर्थयात्रेचं महत्व अधिक वाढवत असतात. कारण तयांच्या चिंतने तरतील दोषी, जळतील राशी पातकांच्या ' ही त्या ठिकाणांची प्रतिष्ठा असते. सगळ्या दोषापासून ' कायज कर्मज ' पापापासून मानव मुक्त होतो. त्याच्या चित्ताला त्यांच्या पायाशी शांती मिळते.

तिरुवन्नमलैच्या चंद्रशेखराचं दर्शन, त्यांच्या पायापाशी रमण महर्षींच्या निमित्तानं उजळलेल्या आध्यात्मिक ज्योतींचं दर्शन मिळालं आणि संध्याराणी अरुणाचलाच्या अट्टालिकेवर सांजवात करत असतानाच गाडीनं तिरुवन्नमलै सोडलं. चित्तचक्षूंपुढे त्या दिवशी बघितलेलं सारं परत परत उभं राहत होतं. अफाट पसाऱ्याचं ते अरुणाचलाचं मंदिर, त्या मागला तो ज्योति पहाड, पुढलं ते महाराज गोपुर आणि मातृभूतेश्वराच्या शांतिवनातला तो अवधूत तपस्वी. खूप मोठ्या समाधानाचं अमोलिक धन घेऊन आम्ही आता परत विलुपुरम्‌ला चाललो होतो. पुढच्या ठिकाणासाठी.

विलुपुरमच्या उजव्या अंगाला आम्ही जितके आलो तितकंच जवळ जवळ डाव्या अंगाला आता जायचं होतं. पहाटेपर्यंत पोचू शकणार होतो तिथे. भारतमातेच्या वामचरणाशी गंगासागर लाटालाटांनी सलगी करीत जिथे जे एक योगी अरविंद विकसले ते ठिकाण बघायचं होतं. पांडिचेरीचे अरविंद बघायचे होते. अरविंदांची पांडिचेरी बघायची होती.

आमच्या स्नेहयांनी कळवल्याप्रमाणे मुद्दाम रविवार साधून आम्ही पांडिचेरित आलो होतो. आश्रमीय कार्यक्रमात रविवारच्या दिनक्रमाला विशेष महत्त्व आहे. ते बघता यावे म्हणून रविवार गाठला होता.

पांडिचेरीबद्दल सांगायचं तर आमच्या सीमा जखडून टाकणाऱ्या ज्या परकी सत्ता भारतात होत्या त्यांत एका जळूसारखी चिकटलेली फ्रेंचांची एवढीशी सत्ता इथं होती. ते त्यांचे राज्य आणि तीच त्यांची राजधानी. ऐसपैस पसरलेलं नीटनेटकं शहर. जरा वेगळ्या थाटाच्या वाटणाऱ्या सुरेख इमारती, रुंद आणि स्वच्छ रस्ते. ठिकठिकाणी उभी केलेली पॅरिस सुंदरीची शिल्पं आणि अथांग हिरव्या सागराचं सान्निध्य हे पांडिचेरीचं वैशिष्टय म्हणता येईल. क्षणभर आपण परदेशीच आलो आहोत असा भास व्हावा इतका वातावरणातला तुटकपणा जाणवतो. रस्त्यांची नाव, दुकानांच्या पद्धती, मद्य-विक्रीकेंद्र, वेगवेगळे क्लब आणि आपल्यातच मश्गुल होऊन चालणारी माणसं यांपासून भारताचं स्वतंत्र्यच नव्हे तर भारतही बराच लांब असल्या-सारखा वाटतो. नाही म्हणायला टांगेवाले रिक्षावाले आणि दारिद्र्य यांची हीनकळा पसरलेली झोपडपट्टी मात्र अस्सल भारतीय दिसते.

या असल्या वातावरणातही आपण एका श्रेष्ठ राष्ट्रपुरुषाची तपोभूमी बघणार आहोत म्हणून मन उल्हसित होत होतं. पावसान काय मनात आणलं होतं कुणास ठाऊक ! तो आमच्या सामानासह आम्हांला भिजवत होता. पांडे-चेरीतला तो भिजलेला प्रवेश काही तेवढा उत्साहवर्धक नव्हता. रिक्षानं एका इमारतीसमोर आणून पोचवल. त्यावर पाटी होती ' ल्यूरोसेंटर ' त्या सेंटरात आमची योग्य ती चौकशी केली गेली आणि रीतसर अनुज्ञापत्रकं दिली. व्यवस्थापकानं सांगितल की इथून एक मैलावरच्या ' अतिथिगृहात ' व्यवस्था होईल. " त्यापूर्वी सेंटरजवळ असलेल्या भोजनगृहात जाऊन आधी न्याहारी घ्या " असाही सल्ला दिला. आमच्या सोयीप्रमाणे तो कार्यक्रम पार पाडून आम्ही ' अतिथिगृहात ' येऊन पोचलो

समुद्राच्या लाटांना अंगावर घेत ते अतिथिगृह मोठ्या डौलदारपणं वसलं होतं. पक्क्या बांधलेल्या साध्याशाच इमारती भंवती लावलेली रंगीबेरंगी पाना फुलांची झाडं वैशिष्ट्यपूर्ण होती. प्रवासात अवघडलेल्या साऱ्या गोष्टी इथं निवांतपणे पार पाडल्या आणि शरीरालाही विश्रांती मिळाली. पण या विश्रांतीला खरं स्वास्थ्य नव्हतं. आम्हाला अभिप्रेत होतं, काही वेगळं वैशिष्टचानं नटलेलं ठिकाण, डोळ्यांचा शीण घालवणारं, उत्सुकता वाढवणारं निराळेपण आणि ओढ लावणारं देवदर्शन. इथे थोडीशी निराशा पदरी येत होती.

आश्रमाच्या शिस्तीत त्यांच्या गतीबरोबर चाल ठेवणं जरी प्राप्त होतं तरी कुठेतरी काहीतरी खटकत होतं. आपला अमूल्य वेळ वाया चालला आहे असं राहून राहून वाटत होतं. स्टेशनपासून १॥ - २ मैल दूर हे सेंटर आणि आश्रमाच्या प्रमुख इमारती. त्यांपासून हे सागर अतिथिगृह आणखी एक मैल दूर. मधे फक्त लांबच लांब ओकेबोके रस्ते, रखरखीत ऊन, नाहीतर बुरबुरणारा पाऊस आणि गोंगाट करणाऱ्या लाटांचा आवाज.

आश्रमाचा आजचा एकमेव मानबिंदू—पूज्यस्थान आहेत माताजी. योगी अरविंदांच्या एक श्रेष्ठ शिष्या. साधनेतील प्रमुख सहचारिणी मीरादेवी. आजही त्यांच्या साधन तपश्चर्येत आश्रमाचा परिवार स्निग्ध गंभीर भाव ल्यायला आहे. आश्रमाच्या प्रत्येक हालचालीवर नि प्रत्येक गोष्टीवर त्यांची आपुलकीची आणि देखरेखीची नजर आहे. सर्वत्र त्यांच्या अस्तित्वाची छाप आहे. प्रत्येक व्यवहारावर त्यांच्या मान्यतेची मोहोर आहे; पण योगीराजां-प्रमाणे त्याही आश्रमाच्या एका विशिष्ट ठिकाणी साधनारत असतात. आश्रमवासीयांनाही त्यांचं दर्शन घडू शकत नाही. कारण इतर अनेक वैशिष्ट्यां-प्रमाणे माताजींचं दर्शनही एका शिस्तशीर पद्धतीत होत असतं. वर्षातून चार वेळा त्या साधकांसमोर येतात. ती पर्वणी साधून देशविदेशातले सगळे दर्शनाभिलाषी पांडिचेरीला येतात. आणि दर्शनाची घटिका साधतात. आमच्या तिथल्या मुक्कामात अशी अनेक मंडळी अतिथिगृहात आम्हांला भेटली. ती त्या दर्शनासाठीच आली होती. आणखी दहा दिवसांनी माताजी सर्वांना दर्शन देणार होत्या.

दुपारचे बारा वाजले आणि आम्ही पाकशाळेकडे चालू लागलो. दुपारचं ऊन रणरणत होतं. रस्त्यांवर झाडांना स्थान नव्हतं. बरचसं चालून आणि एका छोटया बागेच्या वर्तुळाला वळसा घालून आम्ही भोजनगृहाच्या आवारात प्रवेश केला. अनेक स्त्रीपुरुष जेवत होते. उठत होते. साठीच्या पुढे गेलेले होते तसे षोडषीच्याही अलीकडचे साधक होते. मुलं, मुली, स्त्रीपुरुष विविध रूपांची, विविध वर्णांची आणि अन्यान्य देशांची प्रतिनिधित्व करणारी माणसं एकत्र येत होती. खाली अंथरल्या आसनावर बसत होती. थाळी हातात घेऊन वाढलं गेलेलं अन्न आणत होती. पुढे ठेवलेल्या चौकीवर ताट ठेवून अति शांतपणे त्याचा आस्वाद घेत होती. इवलंससुद्धा इकडे तिकडे नाही. एवढीशीसुद्धा

बोलाचाली नाही. परिचयात्मक हसण्यातही फक्त गालाला पडलेली खळी, क्वचित् दिसणारे दात. पण खुद्कन म्हणून निघणारे हसणे नाही. कुठल्याच प्रसंगात नाही. लहान मुलंही त्या प्रसंगातून सुटलेली नाहीत. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' वस्स. चार आहुती उदराग्नीत टाकल्या की साधक बाहेर.

मला हे जरा विचित्र वाटलं. सगळ्या वयांना, सगळ्या अवस्थांना असं गंभीरपणे का बांधलं गेलं आहे हे कळेना. खेळण्या बागडण्याच्या आणि तोंड-भरून हसण्याच्या अवखळ नटखट खटपटीमधून त्यांना आश्रमीय वातावरणात का वंचित केलं गेलं आहे हे कळेना. विटांच्या नीटस नक्षीदार ओळींमागून वेगवेगळ्या सुंदर सुंदर फुलांनी फुलावं, हसावं, डोलावं पण जागच्याजागीच. तसं आश्रमीय वातावरण मला तरी वाटलं. बघण्यात वेंधळेपणा आणि वाट-ण्यात चूक असेल तर असो, पण दिसलं ते मात्र असं.

भोजनालयातलं ते रम्य गंभीर वातावरण अजून दृष्टीसमोर उभं रहातं. अरविंदांच्या, माताजींच्या मोठमोठ्या प्रतिमा, उंच नक्षीदार छताखाली लावलेल्या विद्युत् दीपांच्या हंड्या, खाली रंगीबेरंगी फरशा, आसनांच्या पट्ट्या हंतरलेल्या नि त्यापुढे पांढऱ्या कापडाचे तुकडे पांघरून ठेवलेल्या चौरंगी चौक्या आणि वातावरणात नीरव शांती ! बसलं कोण नि उठलं कोण कुणास ठाऊक ! घरमालकाला भाडं देऊन गुपचूप निघून जाणाऱ्या भाडेकरूंची कर्तव्यबुद्धी इथे दिसत होती की काय न कळे. जेवण साधसंचं रुचकर होतं. जेवण झालं आणि उपकरणी घेऊन भोजनशाळेच्या मागे गेलो. उरलेलं अन्न एका ठिकाणी, वाट्या एके ठिकाणी, चमचे दुसरीकडे, पेले एका बाजूला आणि थाळ्या एकीकडे अशी विभागणो शिस्तीप्रमाणे करून दिली होती. साधिक साहिला भांडी स्वच्छ करत होत्या तिथे मात्र थोडा खेळकर खळाळ होता.

रविवार असल्यामुळे आश्रमाच्या विविध हालचालींना सुटी होती. श्री अरविंद आश्रमाची मासिक पत्रकं वगैरे वेगवेगळ्या भाषांत निघत असतात. त्या योजनेत 'संजीवन' नावाचं एक मराठी त्रैमासिकही प्रकाशित होतं. त्याचं संपादन श्री. आप्पासाहेब लिमये करतात. पुण्याहून एक तपाहून अधिक वर्ष ते तिथे स्थायिक झाले आहेत. त्या आधी ते पुण्यातच 'संजीवन' प्रका-

शित करून श्री अरविंदांचे दिव्य संदेश लोकांपर्यंत पोचवत होते. ऐच्छिक वार्षिक मूल्य हे त्याचं पहिल्यापासूनचंच वैशिष्टय. पुण्यातच त्यांची ओळख झाली असल्यामुळे इतक्या दूरवर ती फार उपयोगी पडली. जे बघणं शक्य होतं ते त्यांनीच दाखवलं. जे रविवारच्या सुटीमुळं बंद होतं त्याचंही वर्णन त्यांच्याकडून ऐकायला मिळालं.

मिळालेल्या माहितीप्रमाणे महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत अरविंदाश्रमात सोय आहे. सुयोग्य विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांची पदवी परीक्षेपर्यंतची तयारी आश्रम करून घेतो. त्यासाठी हवा असणारा शिक्षक–प्राध्यापकवर्ग आश्रमाजवळ आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगींण उन्नतीकडे लक्ष पुरवण्यासाठी आश्रमात सर्व सिद्धता असते. शारीरिक सुदृढपणा येण्यासाठी आश्रमाच्या व्यायाम शाळेत अनेक देशी विदेशी साधनांची भरपूर सामग्री बघायला मिळाली. आजचे विद्यार्थी साधक उद्याच्या भारताचे जबाबदार आधार स्तंभ आहेत ह्या जाणीवेनं सगळ्या उत्कर्षाकडे बघितलं जातं. शैक्षणिक आणि शारीरिक तयारीबरोबर त्याची मानसिक आणि आध्यमिक उन्नती साधली जावी अशी दैनंदिन कार्यक्रमाची आखणी झालेली असते, तर जीवनधारणेच्या नित्य उपयुक्त गोष्टीही उद्योग शिकणाऱ्या योजनेत साधल्या जातात. शाळा, महाविद्यालये, कलाविद्यालय, गीतनृत्याची विद्यालये, चित्रकला, शिक्षणकेंद्र, रुग्णालय, मुद्रणालय, बेकरी या सगळ्या आश्रमाच्या विविध संस्थाचे जाळे सबंध शहरात पसरले आहे.

जेवढं शक्य होतं तेवढं ते दाखवीत होते. बाकीच्याविषयी सांगत होते. आम्ही ऐकत होतो. विद्यार्थ्यांसाठीच ही सारी धडपड होती. त्यांच्यासाठी आश्रमाने ठिकठिकाणी आवास (Quarters) निर्माण केले होते. त्यांपैकी एकाचे ते स्वतःच पर्यवेक्षक होते. २० विद्यार्थ्यांचा एक एक समूह एका ठिकाणी राहील आणि त्याच्यावर एखाद्या अधिकारी साधकाची सर्वांगीण देखरेख राहील अशी व्यवस्था होती

हे सगळं होईस्तवर संध्याकाळ झाली होती. आश्रमाचं अकल्पित ते सगळं बघून झालं होतं. पण मुख्य भागच बघायचा राहिला होता, जिकडे आता जायचं होतं ती इमारत म्हणजे या सगळ्या पसाऱ्याचा प्राणच होती;

किंबहुना कमलनाळ बघायच होता, ज्याचा विकास इतक्या संस्थांच्या पाकळ्या पाकळ्यांनी चहूअंगी झाला होता.


त्या इमारतीत श्रीअरविंदांनी आपल्या आयुष्याची अमोलिक पन्नास वर्षं तपस्येत वेचली. आणि मिळालेल्या दिव्य संदेशांच्या आनंदात देशीविदेशी साधकांची मांदी मेळविली. जीवनाच्या चैतन्यमय तत्वज्ञानाच्या तेजानं विश्व भारून टाकलं ते ठिकाण बघायचं होतं. आणखी बघायचं होतं. जिथे त्यांच्याच तपश्चर्येची दुजी मूर्ती; महान तत्त्वज्ञानाच्या इवल्याशा दुनियेची जननी अद्यापही मुलांच्या कल्याणासाठी जगत आहे.

आश्रमाच्या महाद्वारातून आत पोहोचलो. एका धुंद सुगंधानं वातावरण भरून गेलं होतं. उन्ह केव्हाच ओसरली होती. सायंप्रकाशही सरला होता. अरविंदांच्या त्या समाधी मंदिरात आता दीपाराधनेची तयारी चालली होती. दर्शनार्थी साधकांची ये-जा चालली होती पण मनोवेधक शांततेत समोरच्या इमारतीत साक्षात्कार 'कक्ष' सजवला होता. श्रीअरविंदांच्या छोटया मूर्तिच्या भंवताली काही पुस्तकांची कपाटं, काही सुखासनं आणि त्याला साजेलशी भिंतीवरची कला, छताची नक्षी आणि खालची बिछायत फार सुरेख दिसत होती. धूपपात्रात प्रत्यही उठणारे गंध पसरवीत वेडी वाकडी वळणं घेत जाणारी वलयं, छानदार आकारांच्या पुष्पपात्रातल्या फुलापानाच्या मनोहारी रचना अत्यंत वेगळ्या आणि प्रसन्न वातावरणात नेत होती.

इमारतीच्या डाव्या अंगाला एक प्रशस्त अंगण आहे. त्याच्या मधोमध अविरत छोटुकल्या फुलापानांचा वर्षाव करणारे एक भलेमोठे झाड आहे. त्या झाडाच्या छायेत योगीराज अरविन्दांची महासमाधी आहे. समोरच्या इमारतीत तपश्चयनं उजळून निघालेला, पन्नास वर्षं दिव्य जीवन जगलेला योगीराजांचा देह इथे या तरुतळी आई धरित्रीच्या कुशीत पहुडला आहे. त्याला साक्षी ते झाड आहे. सतत पुलकित होऊन अमर्याद वर्षा करणाऱ्या वृक्षराजानं तें सारं पाहिलं आहे.

सारी येताहेत. समाधीभवती नतमस्तक होताहेत. श्री अरविंदांच्या अपार्थिव स्मृती मनी आठवताहेत. आणि समोरच्या अंगणात कुठेतरी विसावताहेत. समाधीवर पुष्पांचा, पानांचा गालिचा आकारला आहे. त्यांत मनोहारी रंगांचं प्रदर्शन फुलून आलं आहे. मस्तकाजवळ 'अरविंद' ठेवलं आहे. चो-

बाजूंच्या कोपऱ्यात पुष्पपात्रांच्या रचना आहेत. मधोमध एक नाजूक जलकण उधळणारं कारंजं आहे. समाधीवरच्या फुलांना न्हाऊ घालणारं. तिथंच फुलांच्या दाटीवाटीत पादुकांच्या पितळी आकृती कमलांच्या आकारांत तरंगत राहिल्या आहेत. दुरून मंद प्रकाशझोत येत आहेत. धपदानं वलयावलयानं हवेत



चढत आहेत. आणि वरून फुलझडी होत आहे. हे दृश्य जसच्या तसं आज दृष्टीसमोर उभं राहातं आहे. स्मृतीचं कारजं तसंच ताजं टवटवीत ठेवताहेत. त्याच धूपाचा दरवळ अजून त्या दृश्यासमोर वलयांकित होतो आहे. आणि तशीच इवल्याशा पानाफुलांच्या बरसातीत ती न्हाऊन निघत आहे. तिथं उभं राहिलं की मनुष्याला साऱ्या गोष्टींचा विसर पडतो. अवतीभवतीच्या साधकांची गर्दी दिसेनाशी होते. आसमंतात पाहिलेल्या अनेक पटणाऱ्या न पटणाऱ्या गोष्टी आठवेनाशा होतात. दिसते फक्त ब्रह्मीभूत झालेले दिव्यजीवनाचे चैतन्य. आयुष्यभर अनेक गोष्टींचा पाठलाग करून हातात. येणारे श्रेय. त्याचं गूढ गाढ शांततेंत होणारं दर्शन. त्या दर्शनानं—

भाग गेला, शीण गेला. अवघा झालासे आनंद-

आता कोठे धावे मन तुमचे चरण देखलिया

अशी अवस्था होते.

मनाच्या त्या निराळ्या अवस्थेत, एका वेगळ्या तन्मयतेत बराच वेळ तिथं गेला. नंतर तिथली 'ध्यानकक्ष' ही आणखी एक विशेष जागा पाहिली. जिथे अंधार नव्हे प्रकाश नव्हे अशी अवस्था आहे. खालची मऊ गुळगुळीत स्वच्छ फरशी केवळ पद्मासनातच बसायला भाग पाडील. समोरच श्रीअरविंदांचं विद्युदीपान काढलेलं चित्र एकतानतेनं बघावंसं वाटेल. मन एकाग्र होईल आणि त्या चिरंतनाचं चिंतन करत राहील अशी व्यवस्था आहे. त्याच इमारतीच्या सर्वांत वरच्या मजल्यावर माताजींचा निवास असतो.

आश्रमाच्या बाहेर पडलो तेव्हा सात साडेसात झाले असतील. पांडिचेरी ध्यानस्थ होण्याची तयारी करत होती. मोठ्या प्रशस्त रस्त्यांना दिवे आकार आणीत होते. आता एक विशेष कार्यक्रम बघायचा होता. व्यायाम शाळेच्या क्रीडांगणावर ध्यानाचा हा कार्यक्रम होणार होता. सगळ्यांची तिकडे रीघ लागली होती. लहानमोठे, स्त्रीपुरुष, विद्यार्थी–विद्यार्थींनी सगळी तिकडेच चालली होती. त्या आवारात पोहचलो तेव्हा तिथे नित्यनेमाचे कार्यक्रम चालले होते. विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षणाची प्रात्यक्षिकं चालली होती. त्यांची गणवेषातली ती शिस्तबद्ध हालचाल मोठी प्रेक्षणीय वाटत होती. बरोबर आठ वाजता ते सारे थांबले. सगळे एकत्र येऊन खालच्या गार वाळूवर विसावले आणि क्षणातच सारं कसं शांत शांत !

कुठून तरी आवाज ऐकू येऊ लागला. थरथरता कापरा, मायेनं, वात्सल्यानं ओथंबलेला शब्दांना फ्रेंच भाषेतलं अंगड टोपडं पांघुरणारा, मेंदूपर्यंत अर्थ न घेऊन जाणारा पण अंतःकरणाच्या कमलाभोवती मधुर रुंजी घालणारा माताजींचा आवाज. मिनिटामागं मिनिटं गेली. टेप उलगडत राहिला. आबाल वृद्ध नेत्र अर्धोन्मिलीत होऊन ऐकत राहिले. मग तोही आवाज हवेत विरला. उरली केवळ नीरवता, शांतता, वैभवामागच्या वैराग्याची शांतता, हालचालींमागच्या समाधीची शांतता. शब्दामागल्या निस्तब्धतेची शांतता. वेदामधल्या 'ॐ शांतिः शांतिः शांतिः ' च्या शांतिपाठातली शांतता.

समोर पूर्णाकार भारताचं, भारतमातेचं मानचित्र आहे आणि पुढ्यात तिचे पुत्र ध्यानांत प्रविष्ट झाले आहेत. एक अत्यंत दुर्मिळ दृश्य ! मनात किती साठवावं नि किती नको असं झालं. तिथे हळूच कळलं की इथे, या टोकाला हा सगळा समूह भारताचा आध्यात्मिक अभ्युदय व्हावा म्हणून धडपडत आहे. आपलं आत्मिक सामर्थ्य वाढवीत आहे.

खरंच का इथे होणारी प्रत्येक क्रिया, प्रत्येक गोष्ट, प्रत्येक संस्कार आणि तयारी भारताच्या समुन्नतीसाठी असेल? धर्मांच्या व्याख्येसाठी दुनियाभरच्या धर्मपंडितांमध्ये भारताचा धर्म विशद करण्यासाठी दंड थोपटून उभ्या राहिलेल्या आणि आपल्या विजयध्वजा उभ्या करणाऱ्या स्वामी विवेकानंदांना-सुद्धा या देशातल्या धर्मवेड्यांना हेच सांगावं लागलं की अरे जोपर्यंत माझ्या मातृभूमीतला कुत्रासुद्धा उपाशी आहे तोपर्यंत तुमचे ते देवधर्म मी जाणीत नाही. ते सगळे भ्रम आहेत. दुष्काळापायी चिराळलेली, भेगाळलेली जमीन आणि भुकेपोटी तहानभूकच खाऊन जगणारे या भूमीचे पुत्र त्यांना दिसले असतील आणि त्या संन्याशानं प्राप्त सन्मान वैभवातही अश्रू गाळले असतील. श्री अरविंदांनाही तोच साक्षात्कार झाला असेल का ? स्वातंत्र्याच्या लढ्यात असहकारापासून शस्त्राचाराच्या विहीत-अविहीत मार्गांचा अवलंब करताना ज्यांच्यासाठी आपण करत आहोत त्यांची होणारी विटंबना बघून त्यांच्या मनी वैराग्य जागले असेल का ? आणि गौतमाच्या आवेशांत इथे येऊन त्या परमतत्त्वाचा, अंतिम सत्याचा, दिव्य जीवनाचा शोध घेतला असेल का ?

अखंड भारताचं मानचित्र समोर आहे. भारत परत अविच्छिन्न होणार, एकसंघ होणार आहे अशी इथली श्रद्धा असेल का ? ती परत सुजलाम् सुफलाम् होणार आहे, आणि आपल्या आध्यात्मिक सामर्थ्यानं संपन्न होऊन बाहू उभारून विश्वातल्या इतर लोकाना हाका मारीत म्हणेल—

श्रृण्वन्तुसर्वे अमृतस्य पुत्राः।---।

आत्मैवह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः।

चा संदेश तीं देणार आहे अशीं इथली धारणा असेल का ?

अशीच असो. त्या माझ्याच आशेला जोजवीत असता आम्ही क्रीडांगणाच्या दारातून बाहेर पडलो. भोजनशाळेत अल्पोहार घेऊर मुक्कामावर आलो. मनात समाधान होतं काहीतरी वेपळं पाहिल्याचं. आतापर्यंत डोळ्याना सुख देणारी दृश्य पाहिली. मनाला समाधान देणारी देवस्थानं पाहिली. पण आज अंतकरणात तृप्ततेचे हुंकार उठत होते. ' हा तो अनुभव वेगळाची ' त्याना आजवरच्या आयुष्यात तोड नव्हती. त्या सुखसोहळ्यात एक अमिट मुद्रा होती "सहा त्रिकोणात एक षटकोन—मधे पूर्ण विकासित कमळ-त्या कमळाच्या परागावर दोन स्पष्ट पदचिन्हे-श्रीअरविंदांची ।

------

१४

# अमृतक्षेत्र कुंभकोणम्

पांडिचेरीच्या समुद्रावर सूर्य उगवला आणि किनाऱ्यावरची सगळी दुनिया परत सोनेरी झाली. अतिथिगृहात स्नानं ध्यानं होऊ लागली. माताजींचं दर्शन व्हायचं म्हणून दहा दिवस आधीच मुक्कामाला आलेल्या साधकांनी अतिथिगृह गजबजून गेलं होतं. ती सगळी माणसं स्नान वगैरे उरकून अरविंदांच्या समाधिमंदिराकडे, छोटया हजेरीसाठी भोजनशाळेकडे निघाली. आता आमचा मुक्काम संपला होता. पावसाने भिजवत दाखवलेले अतिथगृह सोनेरी सकाळच्या उन्हांत सोडायचं होत. अखंड भारताच्या मानचित्रासमोर, अखंड भारताच्या भावी जीवनाचं स्वप्न फुलवीत असलेल्या साधकवृन्दाचा निरोप घ्यायचा होता. अरविंदांच्या समाधीमुळे, माताजींच्या ध्यानधारणेमुळे पवित्र झालेल्या आश्रमभूमीचा निरोप घ्यायचा होता. दहा दिवस उशीरा आलो असतो तर त्यांची तपःपूनित मातृमूर्ती आम्हांला दिसली असती. पण त्याला लागणारी ' बहुत सुकृताती जोडी ' आमच्याजवळ नव्हती.

वडिलधारं माणूस आणि माताजींचे प्रतिनिधी म्हणून पोचवायला आलेल्या श्री. लिमयांचा पदस्पर्श घेऊन आम्ही गाडीत बसलो आणि गाडी पांडिचेरी स्टेशनवरून हालली. परत विलुपुरम्‌ला येऊन पुढच्या गाडीसाठी थोडी वाट

बघून ती गाडी पकडायची कसरत करावी लागली. आता पुढच्या मुक्का-माचे ठिकाण होते ' मायूरम् '

'मायूरम्' ला पोहोचलो तर संध्याकाळचे पाच वाजले होते तरी. उन्ह कडक होते. सामान ठेवण्यासाठी क्लोकरूममध्ये गेलो तर अधिकाऱ्याने सांगितलं, ' वा ! वेळेवर आलात. आजपासून गावात उत्सव सुरू आहे. आजच रथोत्सव आहे. उद्या कावेरीचा उत्सव आहे. खूप महत्त्वाचे दिवस आहेत. ' वगैरे वगैरे.

सामान त्यांच्या ताब्यात देऊन त्यांनी सांगितल्याप्रमाणे बस गाठली. ' मायूरम् 'च्या बाजारपेठेतून बस निघाली. चांगलीशी बाजारपेठ, बरीचशी गडबड आणि स्थानिक उत्सवात सहभागी होत असलेल्या नागरिकांची जा ये बघायला मिळाली. गावाचा एकूण आकार बराच मोठा. गावाजवळून दक्षिणेची लोकमाता वाहते आहे. म्हणून गावात आणि एकूण उत्सवात चैतन्य आले आहे. उद्याच्या उत्सवात भारताच्या लोकमाता कावेरीच्या भेटी येणार आहेत. त्यांचीही पूजा व्हायची आहे. शिवाय आजच्या रथोत्सवात नगरप्रदक्षिणा करणारा मयूरनाथ उद्या कावेरीस्नान करणार आहे. म्हणून आजच्या-ऐवजी उद्याचा उत्सव मोठा. असो

गावातल्या मध्यावर ' सेन्ट्रल बस स्टॅन्ड 'वर बसनं सोडलं नि आम्ही त्या उत्सवात सहभागी होण्यासाठी पायउतार होऊन मंदिराकडे चालू लागलो. दक्षिणेत देवालयाची वाट पुसावी लागत नाही. गोपूर उंच असते. तेच दिशा दाखवत असतं. असं अनेक ठिकाणी दिसलं. जिथं ते कुठं नारळी झावळीच्या आड लपलेलं असतं तिथं दर्शनार्थी पौरजनांचा ओघ ती दिशा दाखवतो. भडक रंगीबेरंगी गर्भरेशमी वस्त्र ल्यालेल्या, हळदीनं तोंड पिवळं केलेल्या, काजळानं डोळे काळेभोर झालेल्या, दोन्ही नाकात हिरकण्यांची भूषणं ल्यालेल्या, वेणी-वर कण्हेरीपासून केवड्यापर्यंत, आणि तुळशीपासून मरवा दवण्यापर्यंत हवी ती वनस्पती गुंफून तयार केलेल्या ' कदंबमालिका ' माळलेल्या, कुंकवाच्या वर किंवा खाली ठळकपणे भस्माचं बोट ओढलेल्या त्या वनिता हाती पूजा-साहित्य घेऊन जात–येत असलेल्या बघाव्या आणि खुशाल तीच दिशा आपण अनुसरावी.

त्या बस स्टॅन्डपासून मायूरेश्वराचं मंदिर बरंच लांब होतं. परंतु जत्रेंचा थाट सगळीकडे गच्च भरला होता. लांबून रथयात्रा दिसत होती. मंदिरा-

पासून नुकतीच निघालेली. रथ मात्र एक मोठंच प्रकरण होतं. सबंध रस्त्याची रुंदी त्यानं अडवून टाकली होती. रंगीबेरंगी कपडे आणि कपड्यां-चीच झुंबरं हालवीत चाललेला तो रथ म्हणजे एक छोटसं देऊळच गर्दी-सह गावात फिरायला निघाल्यासारखं वाटत होतं. पुढे नागस्वरम् मृदंगम्चीं वाजंत्री, मधे भजनमंडळी आणि शेवटी रथ. रथाला कृत्रिम घोडे जोडलेले आणि त्यांची रास धुरेवर बसलेल्या विश्वकर्म्याच्या हाती. पण प्रत्यक्षांत मात्र दंडाएवढ्या जाड दोरखंडांनी शेकडो मजुरांच्या बळावर रथ हालत होता.

चौकातून रथ उजवीकडे वळला. त्याबरोबर मुख्य रस्त्यातली गर्दीही विरली. आम्ही आमच्या दिशेला चालू लागलो. कारण डावीकडे नारळीच्या कमानीतून 'मयुरेश्वराचं' गोपुर दिसत होतं. मावळत्या सूर्याची किरणं त्या अकराही कलशांतून चमकत होती. त्यावर नारळी चवऱ्या ढाळीत होत्या.

तीन परिक्रमामध्ये सुटसुटीतपणे मायूरेश्वर मंदिर उभारलं गेल आहे. पहिल्याच परिक्रमेत खूप दुकानं आणि डाव्या बाजूला 'ब्रह्मतीर्थ' नावाचं सरोवर आहे. कावेरी जवळच असल्यामुळे सरोवरात खूप पाणी आहे. मंदि-राच्या दुसऱ्या परिक्रमेत भगवान् दक्षिणामूर्ति भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकरा-चार्यांच्या गुरुमूर्तिचा श्रीविग्रह आहे. त्यासमोर एक छोटी पुष्करिणी आहे. आगस्त्यतीर्थ हे तिचं नाव. तिसऱ्या परिक्रमेत मंदिर आहे. विशेष कलाकुसर नाही. काही ठिकाणी आधुनिक उपचारांनी पडझड सावरलेली आहे. निज-मंदिर नेहमीप्रमाणेच खूप खोलवर असल्यामुळे अंधाराच्या साम्राज्यात आहे. दीपावळीच्या उजेडात भगवान् मयुरेश जेमतेम दिसले. त्यांना नमस्कार केला. प्रदक्षिणेच्या मार्गात जगदंबेचं छोटं मंदिर दिसलं. तिथलंही दर्शन असंच 'दीपज्योती नमोऽस्तुते'च्या चालीवर झालं. ती इथे अभयांबिका या नावाने ओळखली जाते.

मायुरेश्वराच्या मागे छोट्याशा सुबक मंदिरात स्वामी कार्तिकेय आपल्या राण्यांसमवेत उभा होता. अंगावर भरजरी कपडे, डोक्यावर सोनेरी मुकुट, हाती चांदीची आयुधं, अन पुष्पपालांनी सजलेला असा त्याचा थाट होता. भस्माचा सुगंध दरवळत होता. उजवीकडे श्रीगणेशाचं मंदिर होत. तिथही 'शुभं करोति कल्याणम्' झालं होतं. सबंध मंदिरात उत्सवाची हालचाल होती. पण गर्दी सगळी रथयात्रेबरोबर होती.

राजा दक्षाच्या घरी यज्ञ आरंभला. देवांना निमंत्रण गेलं. दानव मानव सारे सारे बोलावले ते आले. पण बोलावलं नाही शिवाला. त्या भिकारड्या जोग्याला निमंत्रण देऊन यज्ञाची शोभा कमी करावी, त्याने तिथं येऊन जावयाच्या मानापानानं मिरवावं हे त्याला पटणं शक्य नव्हत. म्हणून मुद्दामच दक्षानं त्याला निमंत्रण दिलं नाही. दक्षकन्येला हे सहन झालं नाही. तिनं भर सभारंभात पित्याला जाब विचारला. तेव्हा तिचाही अपमान झाला. सती रागानं लाल झाली. पुढे घडणारा प्रकार महादेवाला कळून आला. त्याने यज्ञ उध्वस्त करण्यासाठी रुद्रगण पाठवले. सबंध यज्ञमंडपात पेटत्या अग्नीसारखा त्यांचा थयथयाट सुरू झाला. सगळीकडे धावाधाव-पळापळ सुरू झाली. तेव्हा जीवाच्या भीतीने एक सुरेख मोर सतीकडे झेपावला तिच्या पाया–भोवती आपला पसारा वेढून दीनवाण्या नजरेनं त्यानं पार्वतीकडे पाहिलं. तिनं त्याला उचलून घेतलं नि कुरवाळीत म्हणाली. मा भैः !



शवटी व्हायचं ते झालंच. सतीने योगाग्नीच्या साहयानं यज्ञात आत्माहुति दिली. पण शेवटच्या क्षणी नजरेसमोर सहस्राक्ष रंगीबेरंगी नयनममोहर

पिसाचं पाखरू उभं राहिलं. शरीर जळून गेलं पण सप्तरंगी वासनेनं सतीचं सुरेख मयूरीत रूपांतर झालं. सती मयूर झाली. आणि त्याच अवस्थेत तिथंच तिनं आपल्या आराध्यदेवतेसाठी तप केलं. सांब सदाशिव प्रसन्न झाला. सती पर्वतराज हिमालयाच्या कुशीत पार्वतीचं नाटच खेळायला निघून गेली. शिव 'मायूरेश्वर' म्हणून प्रतिष्ठित झाला आणि गौरी अभयांबिका (अभय देणारी अंबा) म्हणून प्रसिद्ध पावली अशी 'मायूरम'या क्षेत्राची कथा.

मंदिराभोवतालच्या मैलभराच्या कक्षेत दक्षिणमूर्तिमंदिर, सप्तमातृका-ऐय्यर, अप्पर आणि ऐयनार ही मंदिरे प्रसिद्ध आहेत. कावेरीच्या वाहण्या-मुळे मात्र खऱ्या तीर्थस्थानाची शोभा 'मायूरम' ला आली आहे. 'मायूरम' चा कावेरीमहोत्सव दक्षिणेत अतिशय प्रसिद्ध आहे. दिवसभरातून अनेक देवता मिरवणुकीच्या लवाजम्यासह कावेरी तीरावर येतात. पूजाविधी होतो. तीर्थावगाहन होते. रात्री होणारं दारूकाम इतकं अप्रतिम होतं की त्या समा-रंभास तोड नाही म्हणतात. आई म्हटल्यानंतर सगळ्यांच्याच उत्साहाला उधाण येत असतं. मग कावेरी तर दक्षिणेतला अतिशय प्रेमाचा विषय आहे. हिमालयाच्या बर्फाळ संगमरवरी कुशीतून निघून गंगेनं उत्तरेला पावित्र्य आणलं आहे तर काळचा ओबडधोबड खडकाळ प्रांतातून कावेरीची करूणा उपजली आहे आणि तिनं रुक्ष दक्षिणेच्या जनजीवनात मायेची ओल आणली आहे. तिचं कौतुक होईल तेवढं थोडचं.

आम्हांला ती दीपशोभा नि रंगशोभा पाहण्याइतपत सवड नव्हती. नाहीतर त्या कावेरीच्या काळ्यासावळ्या मुलांबरोबर आमच्याही नेत्रांचं पारणं फिटलं असतं. एक परंपरागत आणि अलौकिक उत्सव आम्हांलाही बघायला मिळाला असता. पण आमची गतीच वेगळी होती. दिशा भिन्न होती. आम्हाला लवकर हलावे लागले. बसस्टँडवर बसची वाट बघताना आपुलकीनं विचार-पूस करून मैत्रीचं नातं जोडणारी एक विद्यार्थिनी 'लक्ष्मी' मला म्हणाली-देखील 'की तुम्ही एक चांगली संधी हुकवता आहात' मी तिला तिच्या हसण्याचं हसून प्रत्युत्तर करीत म्हटलं 'मिळालेली ही संधी काय कमी आहे?'

स्टेशनवर आलो तो एक गाडी जणू आमची वाट बघत उभी होती. सामान ताब्यांत घेऊन प्लॅटफॉर्म बदलून गाडी गाठीपर्यंत तिचा शांतपणा ढळला नाही. आम्हाला व्यवस्थित जागा मिळाली आणि तिनं समाधानाच्या

सुस्कान्यावरोबर ' मायूरम सोडलं. याला म्हणतात योग. ती गाडी हुकली असती तर कदाचित् रात्रही मायूरम स्टेशनवर काढावी लागली असती. कारण वेळापत्रकाची दाणादाण उडाली होती. मिळालेली गाडी चार तास उशीरा आली म्हणूनच मिळाली होती. मधल्या गाड्याही रद्द झाल्या होत्या. पुढच्याही रद्द होण्याची शक्यता होती. पण दक्षिणेच्या यात्रेनं आम्हांला 'विलब खोळंबा' हे शल्य शेवटपर्यंत कुठेही बोचू दिलं नाही.

महत्त्वाची ठाणी जिकून पुढच्या ठाण्याकडे विजयी घोडदौड करणाऱ्या सैन्याप्रमाणे आमची यात्रा चालू होती. मायूरम गेलं. आता लक्ष्य ह तं कुंभ-कोणमवर. देवाचं लाडकं कुंभकोणम्. ' महामधम् ' सरोवरानं महामहिम झालेलं कुंभकोणम्. अक्षरश: शेकडो मंदिरांचं भरलेलं शिबीरच जणू ते. शंकराचार्यांच्या सर्वात महत्त्वाच्या पीठाचं ठिकाण कामकोटीपीठाचं कुंभकोणम्

प्रवास तसा थोडा. केवळ वीस मैल अंतराचा. तशांत रात्रीचा. भूक आणि झोप! उत्तर 'आता कुंभकोणला पोचल्यावर' हेच होतं. तरीही चिंदबरम्-एवढं प्रचंड स्वप्न डोळ्यापुढे उभं करण्याचं सामर्थ्य कुंभकोणम्मधे होतं हे निश्चित.

कुंभकोणम्ला पोहोचलो तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. छोटंसं दोन प्लॅटफार्मचं हे स्टेशन दिव्यांच्या झगमगाटांनं आणि भरपूर गर्दीनं गजबजून गेलं होतं. रात्री मुक्कामाला रेल्वेचेच अतिथी म्हणून राहाणं प्राप्त होतं. भुकेचा प्रश्न अतिशय व्यवस्थित सुटला. प्रवासात भोजनाच्या बाह्य व्यवस्थेवर शहरची सांस्कृतिक घडण अवलंबून असते असं अनुभवांती वाटूं लागलं होतं. त्या समाधानानं ती रात्र स्टेशनवर विसावा देत निघून गेली

दुसऱ्या दिवशी सूर्य नेहमीसारखाच उगवला. पण आम्हांला तो ' सोनियाचा दिवस आजी अमृते पाहिला ' असा ठरणार होता. आमच्या यात्रेतल्या माळेतलं रंगीबेरंगी गेंदेदार फूल म्हणजे ' कुंभकोणम् ' ठरणार होतं.

सकाळीच सगळे शरीरोपचार सांभाळून अतिशय उत्साहानं कुंभकोणम् नगरात प्रवेश केला. शहराचा विस्तार आणि रचना, सरळसोट रस्ते, उंच उंच हवेल्या, मोठमोठी दुकानं चटकन् नजरेत भरली. कुंभकोणम् हे दक्षिणेतलं मोठं सांस्कृतिक केंद्र आहे म्हणतात. शहराचं एकूण ' ब्राह्मणी वळण ' बघून तेही ताबडतोब पटलं. पाय रस्ता चालत होते. नजरा दोन्हीं अंगं भिर-

भिरत न्याहाळत सरकत होत्या. शाळा, प्रशाला महाविद्यालयांच्या इमारतीसमोर मिशन हायस्कूल्स आणि वसतिगृहाचा भव्य पसारा पुढे असलेल्या उंच शिखरांच्या चर्चेस्‌सह दिमाखानं उभा होता. वरची अधिक चिन्हे (क्रॉसेस) उन्हात चमकत होती. कुंभकोणम्‌च्या मुख्य रस्त्याचं प्रथमदर्शन हे असं होतं.

चौकामधे घड्याळाचा एक उंच सौध दिसला. त्याच्या डाव्या बाजूला वळलो. आणि समोर खूप विशाल पसरलेला जलाशय दिसला. तेच ते महामघम् सरोवर हे समजायला वेळ लागला नाही.

सकाळचे ७।। वाजले असतील. आम्ही त्या 'महामघम्' सरोवराच्या काठी उभे होतो. तो देखावा केवळ अवर्णनीय, अविस्मरणीय म्हणावा असा वाटत होता. ते अथांग पाणी, ते विशाल सरोवर आणि चोहोबाजूंना लांबलांब नागरी वस्तीच्या घरादाराच्या खुणा. किमान दीड फर्लांगभर रुंद असं पक्कं बांधलेलं कुंड आणि आतमधे पाणीच पाणी. वर सुरेख घाट बांधलेले ठिकठिकाणी कोरीव शिल्पाचे मंडप थाटलेले आणि छोटी छोटी मंदिरं, किना-या किनाऱ्याला वस्तीला आलेली .किती सुंदर दृश्यं ! केवळ कॅमेरान टिपून घ्याव असं सौंदर्य, अशी घडण प्रत्येक कोनाला लाभली होती. 'कुंभकोणम्' च्या दृश्याचा पहिला रंगीत चित्रपट तिथे बघायला मिळाला. निळं निळं आभाळ, हिरवं हिरवं पाणी, काठ सोनेरी उन्हानं चमकताहेत. वेगवेगळ्या वास्तूशिखरांचे सुदर आकार ते दृश्य अधिक मनोहर करताहेत. नजर वळता वळेना दुसरीकडे.

डाव्या कोपऱ्यात एक रंगीबेरंगी गोपूर उभं आहे. ते मंदिर काशी विश्वनाथाचं. तिथं गंगेसह काशीविश्वनाथ राहायला आले आहेत. या नऊ लोकमातांच्या पाच फुटी भव्य मूर्ती सौभाग्यलेण्यांसह मंदिराच्या उजव्या अंगी उभ्या आहेत. या सगळ्या 'महामघम्' तीर्थाच्या प्रतिनिधी आहेत. मंदिर छोटसं, विस्तारही छोटा. पण 'महामघम्' सरोवराच्या तीर्थाचं मर्मच मंदिरात असल्यामुळे ते महत्त्वाचं मानलं गेलं आहे. तिथल्या दर्शनानंतर 'महामघम्'ला उजवी घालायला सुरुवात करणं सोयीचं.

काठाकाठानं प्रदक्षिणा होऊ लागली. स्नानध्यान करणारी क्षेत्रस्थ मंडळी पायऱ्या पायऱ्यांवर आपल्या व्यवहारात मग्न होती. त्यांना संकल्प सांगणाऱ्या ब्रह्मवृंदासारखे काठाचे छोटे छोटे मंडपही तसेच उन्हात तळपत उभे होते.

नऊ सरितांच्या पावित्र्याचा महिमा मिळालेलं पाणी छोटया लाटांनी पायऱ्या-पायऱ्यांवर थबथबत होतं.

कसं झालं हे महामघम् ? कुठून आला हा महिमा ? दर तपाच्या अतरानं अखिल भारतवर्षाच्या कोटी कोटी जिवांचं भाविकपण खेचून आणण्याचं सामर्थ्य कसं मिळालं याला ?

पेरिय पुराणातली कथा आहे ही. काय झालं की नित्याप्रमाणं सारी मन्वंतरं संपली. सृष्टी सर्जनाचा धारणाचा, आणि संहाराचा क्रम सपला. एक फेरी पूर्ण झाली. सगळा खेळ गोळा करून ठेवून परत पहिल्यापासून सुरू करण्याच्या अवस्थेला आला. हे सारं चराचर संपण्याच्या टोकाला आलं प्रलय-काळ जवळ आला. ‘ उपजलेल्याचा नाश ’ जवळ आला. ब्रह्मदेवाच्या मनात चिंता निर्माण झाली, की हे सगळं संपलं तर नवीन सृष्टी करायची ती कशाच्या आधारावर ? कुणाच्या वरहुकूम ? वृक्ष आणि बीज दोन्ही संपणार होती. त्यानं महेश्वराची प्रार्थना केली ‘ प्रभो ही समस्या सोडवा !’ महादेवानं त्यांना सुचवलं ‘आता असं कर. अमृतात माती मळून एक कुंभ तयार कर. त्यात सगळी सृष्टीची बीजं भर आणि त्या पूर्ण कुंभावर अंब्याची पानं ठेव. वर नारळ ठेव. कुशदर्भाची शिवगळी करून मेरू पर्वताच्या दोन उच्च शिखरां-मधे चांगली घट्ट बांधून ठेव. रोज बिल्वपत्रांनी पूजा कर. सगळ व्यवस्थित होईल.’ विधात्यानं हे सारं सांगितल्याप्रमाणं केलं. सृष्टीबीज कुंभ मेरूच्या शिखरांवर लोंबू लागला. ठरल्याप्रमाणे प्रलयंकर मेघ झाला. साऱ्या सृष्टीवर वोळून आले. प्रलयाच्या महाभयंकर सर्वसहारात सगळ्या गोष्टी विसर्जन पावल्या. स्थल काल नाश पावले. अंधार उजेड लयाला गेले. भूत-भविष्य-वर्तमान सारं सारं अंतर्धान पावलं. पण त्या नाशाच्या उदरांत पुढच्या सर्जनशील बीजांचा कुंभ होता. त्याचं काय झालं ? प्रलयाच्या झंझावातांनी आणि जलराक्षसांनी त्यांच्याशीही मस्ती केलीच होती. तो कुंभ तिथून सुटला, तुटला आणि प्रवाहपतित होऊन वाहत राहिला. शेवटी पाणी कमी झालं. संकटाचं आभाळ निवळलं आणि तो कुंभ एके ठिकाणी येऊन पडून राहिला. आम्रपर्णे कुठंतरी वाहून गेली. नारळही पडून गेला. कुशानीही गळा मोकळा केला.

मग त्या उजाड रंगभूमीवर, अंगावर किराताचा वेष राणि हाती धनूष्य-बाण घेऊन, महेश्वरशिव अवतीर्ण झाला. त्याचं पहिल्या बाणाचं लक्ष होतं

ते कुंभपात्र. कुंभ फुटला. आतलं अमृत दहा मैल परीसरात फेकलं गेलं. ती सगळी अमृतभूमी झाली. सजीव तीर्थ झाली आणि सृष्टीची बीजं मोकळी झाली. मग मानवांना उद्देशून अपौरुषेय वेदांनी संबोधायला सुरवात केली "शृण्वन्तु सर्वे अमृतस्य पुत्राः "

त्या अमृतकुंभाच्या शकलांनी महादेवांनी स्वतःचा श्रीविग्रह तिथं स्थापन केला. त्याला नाव घेतलं कुंभेश्वर. असं हे सृष्टीच्या मरण जननाचं कौतुक या 'महामघम्' क्षेत्रांत झालं. सर्व सृष्टीं बुडाली पण बीज कुंभाचा कोणकोपरा बाचला. आणि संहार कार्याचा नेम मोडून शिवशंकरानं भावी उत्पत्तीची मुहूर्तमेढ इथं रचली.

असं हे अमृतक्षेत्र महामघम् याचं भाग्य पहाण्यासाठी शेकडो देवमंदिरांनी आणि छोटया मोठया जलतीर्थांनी कुंभकोण्च्या परिसरात गर्दी करून सोडली आहे. पण त्यातही वैशिष्टय असं आहे की ब्रह्मदेवालाही मंदिर बांधण्याची परवानगी 'कुंभकोणम्' मधे मिळाली आहे. माघी पौर्णिमा असते. मघा नक्षत्र गुरुशी संयोग करते. गुरु दर तेरा वर्षानीं सिंह राशीत येतो. मघा सिंह राशीत स्थिर आहे. आणि ज्या विशिष्ट दिवशी माघ महिन्यात चंद्र मघा आणि गुरु संयुक्त होतात तो दिवस अतिभाग्यवान समजला जातो. बहुधा त्या दिवशी महामघम् सरोवरात भारतातल्या आठही गंगांचे पाणी येते. वर्षोवर्ष कलिमलदहन करणाऱ्या लोकमाता त्या दिवशी तिथे येऊन आपल्या संचित पाप मळापासून शुद्ध होतात. 'महामघम्' च्या भोवती लक्षावधी भाविक जमतात आणि स्नानदानाचं पुण्य लुटून शुद्ध होतात. आखिल भारतातली सर्वात मोठी पर्वणी दर तेरा वर्षांनी 'कुंभकोणम्' ला येतें. तिला 'मामघम्' असंही म्हणतात.

'कुंभकोणम्' मधे तशी मंदिरं अनेक पण अतिशय प्रख्यात अशी मंदिरं फक्त सोळा. एका गावात प्रख्यात मंदिरांची संख्या सोळा. मोठं विलक्षण आहे हे. पण अगदी चक्षुर्वैसत्यं आहे ते ! त्या सोळामधे बारा शिवमंदिरं आणि चार विष्णुमंदिरं आहेत. शिवमंदिरामधेही कुंभेश्वर, नागेश्वर, काशीविश्वेश्वर स्वामिमलै आणि विष्णुमंदिरात सारंगपाणी, चक्रपाणि, रामस्वामी, उप्पिलीं अप्पन ही विशेष प्रसिद्ध.

दहा वाजायला आले. उन्हानं डोकी तापायला लागली तरी 'महामघम्' आम्हाला सोडीत नव्हतं. अन्यत्र इतकी सुरेख शिल्पकला आहे, मोठमोठी गोपुरं उभी आहेत याचीही विस्मृति आम्हाला होत होती. एवढंच काय, पण 'कुंभकोणम्'च्या सोबतीनं तीच ती पुण्य सलिला कावेरीमाई वाहते आहे हेही तोपर्यंत लक्षांत आलं नव्हतं. 'महामघम्'च्या सर्व तीर्थांना नमस्कार करून आम्ही निघालो. घड्याळाच्या टॉवरजवळ आलो आणि तसेच त्या मुख्य रस्त्यावरून चालत राहिलो. मनात विचार आला, काही नुसती प्रमुख ठिकाणं घ्यायची म्हटली तरी त्यांच्या एकूण अंतरात आपल्या हालचालींचा मेळ बसवायचा तर किमान दोन पूर्ण दिवस तरी रहायला हवं होतं.

समोर एक मोठं गोपूर दिसलं. अति उंच आणि सुरेख. सबंध रंगीबेरंगी नक्षी घेऊन ते उभं होतं. बारा मजल्यावर अकरा सुवर्णकलशाचं विमान मोठं डौलानं शोभत होतं. परत एकदा मीनाक्षीचं ते नवरंगी स्वप्न आठवलं. त्या गल्लीत नुसतं वळलं की दोन्ही बाजूच्या इमारतींच्या मधोमध दुरून ते गोपूर दिसतं तिथपर्यंत गेलेला रुंद रस्ता असतो. मधे क्वचित एकादा उंच दगडी मंडप असतो. मन पवनाचा वेग प्रबळ होतो. पायांच्या हालचालीकडे मनाची ओढ अगतिकतेने बघते. आणि कधी काळीचे प्रारब्धांत साचलेले सोन्याचे क्षण तिकडे निर्देश करीत गाऊ लागतात, 'मनोरथा चल त्या नगरीला.'

ते गोपूर पाहिलं आणि श्रीहरीच्या रसिकपणाचा परत प्रत्यय आला. दक्षिणेत त्याला रंगराज म्हणतात ते उगीच नाही. आताच बघितलं केवढं गोपूर हे ? नि किती सुंदर ?

कुंभकोणम् मधली काही मंदिरं अशी प्रचंड आहेत. काही अतिशय प्राचीन-काळीं बांधली गेलेली. अगदी सातव्या शतकापासूनचा इतिहास माहीत असलेलीं अशी आहेत. या मंदिरांची शोभाच काही वेगळी. डौल फारच निराळा आणि स्वामीचं नावही आगळंच. शारंगपाणी मंदिराची रचना काहीशी कांचीच्या वरदराजस्वामीच्या मंदिरासारखी. भोवतीच्या ओवऱ्यांमध्ये मुख्य मंदिराचं उंच पीठ आहे–एक मजल्याएवढं. सोनेरी गरुडस्तंभ खाली. अन्य देवी देवता आणि वैष्णवभक्तासह श्री लक्ष्मीचं निजमंदिरही खालीच. पण स्वामी मात्र वर मज-ल्यावर खास महालात. आम्ही वर गेलो तर स्नानपूजा इत्यादितून स्वारी

नुकतीच मोकळी झाली होती. कशाला ? अर्थात झोपायला. इथंही श्रीहरी शेषशय्येवर शांत पहुडला आहे. मंदिरात कमालीची शांतता आहे. पुजारीही आमच्याशी हळू बोलताहेत. त्या एकूण झोपाळू वातावरणाचा खोल परिणाम आमच्यावर होऊन आम्ही गुपचूप त्याची प्रार्थना पुटपुटत नमस्कार करतो आहोत.

मूर्ति अतिसुंदर आहे. विशाल आहे. संपूर्ण शेष अंधारात दिसला नाही. पण चतुर्भुज शाम सुंदराची मऊ काळी तकतकीत मूर्ति डोळ्यात भरली. 'कासे पितांबराची धटी, वैजयंती शोभे कंठी, नेत्री निद्रेची सावटी, ऐसा जगजेठी देखीला ।' श्रीदेवी भूदेवी पाया पायाजवळ चरण सेवा करताहेत, नाभिकमलांतून उपजलेला ब्रह्मा स्तुतिस्तोस्त्रं गातो आहे. नारद तुंबरु सामगायन करताहेत. मंदिरपुरोहित सहस्त्र नामांनी तुळशीदल अर्चना करताहेत. आमच्या सारखी काही दूरस्थ मंडळी दर्शनसाठी दार आडवून उभे आहेत. पण झोप सपत नाही. डोळे उघडत नाहीत.

या झोपण्याबद्दल एकदा भृगु मुनींनी शिक्षा केली ती सुद्धां या झोपेत स्वप्नवत झाली.हो बरी आठवण झाली. भृगु मुनींच्या त्या लत्ता प्रहार प्रकरणातून आंध्रात तिरुपति क्षेत्र निर्माण झालं. रुसलेल्या लक्ष्मीनं महाराष्ट्रात जाऊन कोल्हापूराच श्रीपीठ करून टाकलं. पण तामीळनाडमधे या गोष्टीनं एक वेगळच औचित्यं दाखवलं. श्रीहरीनी श्रीवक्षाचा अपमान करणाऱ्या भृगु ऋषींचे पाय चेपले म्हणून लक्ष्मीला राग आला आणि त्या रागाच्या सपाट्यात तिनं 'महामघम्'मधे आश्रय घेतला. तिथे श्रीहरीसाठी तप करणारा 'हेम' नावाचा ऋषि तिनं पाहिला. एक दिवस हेम ऋषी 'महामघम्' सरोवरात स्नानसंकल्प सोडण्यासाठी ओंजळीत पाणी घेऊन उभा राहिला तर चमत्कार झाला. त्याच्या हातात एक अतिसुंदर कोमल कमलकलिकेसारखी मुलगी आली. सर्वसंग परित्यागी त्या म्हाताऱ्या ऋषीनं देवाचा प्रसाद समजून त्या मुलीला वर आणलं. तिच्यासाठी परत एकदा संसाराच्या चार भिंती आणि चुलीचे तीन दगड मांडले. त्याला तिचा लळा लागला. रुसलेली का होईना पण देवी लक्ष्मी होती ती. लळा लागणं साहजिकच होतं त्याला. पण नवल असं की त्या मुलीलाही त्याचा लळा लागला.

आज येईल उद्या येईल, अशी वाट बघून कंटाळून गेलेल्या श्रीविष्णूला मात्र तिला शोधण्यासाठी रथ जुंपावा लागला. तेवढ्यात गरूडानं लक्ष्मीचा ठावठिकाणा बरोबर सांगितला मग गरुडासह महाराजांचा तो रथ कुंभकोणम् क्षेत्रात उतरला आणि त्या ऋषिकन्येशी त्यांचा प्रीतिविवाह झाला. आज मंदिराच्या त्या उंच पीठाला रथाचा आकार आहे, त्याला चाकं आहेत. बाजूला घोडे जुंपले आहेत. आणि पुढे स्वत: गरुड आहे. मदिर अतिशय सुंदर सजवलं. आहे. सासऱ्यांच्या स्मृतिसाठी 'हेमपुष्करिणी'चं सुदर सरोवर उजव्या अंगाला आहे. आधी बघितलेलं रंगीत गोपूरही—एकशेसत्तेचाळीस फूट उंचीचं नयनमनोहर कलाविलासानं नटलं आहे. ही सर्व कलाकृति नायकराजांनी बांधून काढली आहे.

'भक्तांचिया काजासाठी, साधूंचिया प्रेमासाठी' वैकुंठ सोडून आपला संसार थाटणारा रसिकराज शारंगपाणी बघितला आणि पुढची वाट धरली. आता वाट जात होती 'कुंभेश्वर' मंदिराकडे. कुंभेश्वर हा कुंभकोणम्चा आदिदेव. महामघम् चा तीर्थरूप. आसमंतातल्या तीर्थकुंभाचं कुलदैवत. अत्यंत प्राचीन अशी त्याची ख्याति. वास्तूही अगदी जुना पुराणा !

मुख्य गोपुरापासून जवळ जवळ फर्लांगभर आंत आंत जायचं तेव्हा कुंभेश्वराच्या निजमंदिराची गाठ पडायची. दोन्ही बाजूला छोटया छोटया दुकानांनी अगदी दाटीवाटी करून सोडलेली आणि त्यांतून मालही खच्चून भरलेला. त्या भोवती गर्दी तर एवढी की वाट काढणं म्हणजे एक दिव्यच होऊन बसलं होतं. कारण अभावितपणे आपणही एखाद्या दुकानाजवळ केव्हा येऊन थांबलो हेही कळत नव्हतं.

अशा बऱ्याच वाटचालीनंतर आम्ही एकदाचे कुभेश्वराच्या गाभाऱ्यापर्यंत येऊन पोहचलो. आत शिवमंदिराचा नित्याचा देखावा होता. लिंगविग्रह मात्र कुंभाच्या आकाराचा डेरेदार होता. वरून पाण्याची संततधार स्रवत होती. पण त्यामुळे बांधलेल्या पूजेच्या पुष्पसज्जेला धक्का लागत नव्हता. पूजेच्या दुरड्या येत जात होत्या. सुगंधी विभूती हातावर ठेवली जात होती. भाविक ती अंगाखांद्याला कपाळाला लावून घेत होते. त्या थंडगार फरसबंदीवर स्वत: देह लोटून साष्टांग प्रणिपात करत होते. महामघम् सरोवर आणि

कुंभेश्वर यांचा अतिनीकटचा संबंध आहे. कुंभेश्वर स्त्रष्टा आहे तर त्या अमृत तीर्थाचं ते महासरोवर ही त्याची सृष्टी आहे.

कुंभेश्वराच्या त्या बाजारहाटातून बाहेर पडलो तर ऊन चांगलं झालं होतं. पण जवळची मंदिरं तरी 'दुपारच्या सुट्टी'च्या आंत बघून व्हायला हवी होती. आता जवळ होतं 'रामस्वामी' मंदिर.

'कुंभकोणम्' पासून दोन मैलावर 'दारासुरम्' नावाचं गाव आहे. तिथं शिव रुद्राक्ष वृक्षाच्या रुपान प्रकट झाला आहे. 'दारासुरम्' मंदिर पौराणिक आणि वास्तू कौशल्याच्या महत्त्वामुळे या परिसरात प्रसिद्ध आहे. या गावात एक गरीब भक्त रहात होता. त्याचं आराध्य दैवत होतं श्रीराम ! जन्मापासून राज्यभिषेकापर्यंतच्या सगळ्या राजस लीला आठवण्याचं आणि त्यातच तन्मय होण्याच पिसं त्याला लागल होतं. सरोवरांत स्नानाला गेला तरी त्याला त्या पाण्यावर शिवशंकर त्रिशूळानं 'श्रीराम' ही अक्षरं लिहीत आहेत असा भास व्हायचा. एके दिवशी रामाचं नाव घेऊन त्यानं त्या सरोवरात बुडी घतली तर हाताला कोरीव काम केलेला पाषाण लागला. वर येऊन बघतो तो साक्षात् श्रीरामाची मूर्ति. अत्यानंदानं त्यानं परत परत बुड्या मारल्या आणि माता जानकी, भ्राता लक्ष्मणही वर निघाले.

त्याला प्रश्न पडला की ह्यांचं काय करायचं ? दरिद्री माणसावर राजानं प्रसन्न व्हावं आणि त्याला बक्षिस म्हणून भला मोठा हत्ती द्यावा तशी त्याची अवस्था झाली. पण व्यवस्था आधीच होऊन बसली होती. नायकराज कुळातल्या एका विष्णुभक्तानं एक भव्य मंदिर कुंभकोणम्मधे बांधलं होतं आणि त्याच्या मूर्तिस्थापनेविषयी दृष्टांत झाला की 'दारासुरम्'ला जा . आणि मला घेऊन ये.

शुभघडी शुभदिनी ते रामत्रिकुट, राजा आणि हा वेडा भक्त असं रामपंचायतन वाजत गाजत मंदिरात आलं आणि मंदिरात रामराज्य सुरू झालं. 'दारासुरम्'च्या त्या अलौकिक भक्तान मंदिरामागच्या भिंती रामचरित्रानं रंगवून काढल्या.

आम्ही आत शिरलो तो अगदी सामोरे आल्यासारखे श्रीराम, लक्ष्मण आणि जानकी मंदिरात उभे होते. काळ्यासावळ्या पण सतेज मूर्ति निवडक सजावटीत उठून दिसत होत्या. ऊंच उभा मुकुट, खाली गोपीचंदनाचे त्रिपुंड्र,

जाड जाड काठाची वस्त्र, सुबक अंगभूषणं सारं मोठं मोहक दिसत होतं मध्यभागी श्रीराम मोठा ऐटदार उभा होता. उत्तरीयाचा पदर धनुष्याच्या हातावरून पायापर्यंत लोंबत होता. जानकी लक्ष्मणाबद्दल काय म्हणायचं ! श्रीहरीच्याच दुज्या प्रतिमा त्या ! त्यांना नमस्कार करताना मनातलं पाठांतर चटकन् ओठात आलं.

‘ सुंदर ते ध्यान शोभे सिंहासनी, वामांगी नंदिनी जनकाची
दक्षिणेसा उभा बन्धू लक्ष्मण .......’

मंदिराचं वैशिष्टयपूर्ण आणि मऊ मुलायम पत्थरात ओतलेलं शिल्प बघत प्रदक्षिणा घातली. निजमंदिराच्या मागच्या बाजूला श्रीरामाचा जीवनपट रंगवला आहे. अगदी श्रावणहत्येपासून रावणवधापर्यंत. पुत्रकामेष्टीपासून रामराज्याभिषेकापर्यंत. चित्रं वळणानं जुनी वाटत होती. पण उचित आशय व्यक्त करणारी होती.

रामस्वामी मंदिर बघून झालं. आता सकाळची नव्या नव्हाळीची जिज्ञासा थोडी थकली होती. डोळयांना बघायला मिळालं होत तर पायांना हिंडायला. पण पोटातला विठो तसाच राहिला होता. त्याची पूजा करायला हवी होती. त्याला भोग लावायला पाहिजे होता.

दुपारी उन रणरणू लागलं होत. पोटातली हालचाल एकूण शरीरावर सुस्ती आणू पहात होती. पण आम्ही चालत होतो कर्तव्याच्या भावनेन नव्हे. काही बघायच्या ओढीनं. काही निराळं दिसावं या तळमळीनं.

राममंदिरापासून सुमारे अर्ध्या मैलावर होतं चक्रपाणी मंदिर. आम्ही गेलो तर मंदिर उघड होतं. मंदिरात श्रीहरीची चतुर्भुज शस्यशामल मूर्ति उभी आहे. अलंकार आणि फुलांनी सजलेली आणि चौहाती शंखचक्रादि आयुधं घेतलेली.त्याच्या पुढयात आणि मागे प्रभावळीच्या जागी सुदर्शनचक्राची आकृती ठेवली आहे. सुदर्शन स्वरूप होऊन श्री विष्णूंनी सूर्याच्या तेजाचं गर्वहरण केलं. मग चक्रपाणी होऊन इथंच श्रीनागेश्वराची पूजा केली. छोटसं आणि सुरेख मंदिर आहे. पुढे नायक रघुराजाची आणि राजपत्न्यांच्या मूर्ति आहेत. डाव्या बाजूला स्वतंत्र चबुतऱ्यावर श्रीलक्ष्मीचं मंदिर आहे.

गावातलं बहुतेक पाहून झालं होतं. आता आजूबाजूला हिंडाव लागणार होतं. मुख्य रस्ते सोडून गावाच्या इतर घडणीतून फिरावं लागणार होतं.

पहिलं ठिकाण होतं स्वामीमलै. उन्हानं तापलेली धूळ गुलालासारखी उधळीत बस कुंभकोणम् शहराच्या एका टोकाला निघाली. कावेरी नदीला बांधलेला पाट आडवा गेला. नि बस छोटया मोठ्या वस्त्या घेत स्वामीमलैला येऊन पोचली. बसचं हे अंतर चार मैलाचं होतं. पण रेल्वे रस्त्यानं सहा मैलावर स्वामीमलै हे स्टेशन लागतं.

स्वामीमलैला बरीच गडबड होती. स्कंदषष्ठी तीन दिवसावर आली होती. त्याचं नवरात्र चालू झालं होतं. स्कंद हे दक्षिणेचं अतिशय आवडतं दैवत आहे. देव सेनेचं नेतृत्व करणारा समर्थ सेनापती. तरुण आणि गरम रक्ताचा. मदनासारखा सुंदर दिसणारा. आणि हाती शूल घेऊन मयुरावर बसून रणवेशात हिंडणारा हा कार्तिकेय षडानन अति जागृत दैवत आहे. कितीतरी कुळांचं कुलदैवत आहे ते ! उपासतापास, व्रतवैकल्य करून पावणारा, प्रचिती देणारा म्हणूनही तो विशेष विख्यात आहे.

मंदिर उंचशा टेकडीवर व्यवस्थितपणे बांधून काढलं गेलं आहे. खालीच मीनाक्षी आणि सुंदरेश्वराच्या सुंदर प्रतिमा आहेत. आजुबाजूंच्या ओव्यांत वाहनयात्रा भरली आहे. त्याबरोबर गोजिरवाणीं हरणं आणि सुंदर सुंदर पिसाऱ्याचे मोरही पाळले आहेत. तिथून ८० पायऱ्या चढल्यावर स्वामीमंदिर आहे. पहिल्या पायरीजवळ एक प्रचंड हत्ती झुलतो आहे. देवद्वारात झुलणारा हत्ती हे वैभव दक्षिणेशिवाय अन्यत्र नसावेच. केळयांचा सबंध लोंगर खाऊन किंवा उसाची मोळी लीलया खाऊन, देणाऱ्याच्या मस्तकावर सोंड टेकवून आशीर्वाद देण्याची सर्कस करणं आणि वेळी देवसेनापतीच्या उत्सवमूर्ति पृष्ठी वाहून मिरवणुकीनं डौलात चालणं हे त्याचं काम !

सबंध मंदिर तैलरंगांनी रंगलेलं. पायऱ्या सुद्धा. त्या रंगीत पायऱ्या चढून वर जाऊन पोहचलो. मंदिरात गर्दी होती. काळे सावळे, उघडे वागडे भक्त दाटी करून त्या स्वामीचं दर्शन घेत होते. धूपचंदनाचा धूर कोंदाटत होता आणि त्यात स्कंद सहस्त्रनामाचं खड्या स्वरात पठण चाललं होतं.

समोरून गाभाऱ्यात दिसणारा देवसेनापती हाती ‘वज्रवेलिल’ घेऊन उभा होता. त्याच्या भोवती विजेच्या रंगीबेरंगी दिव्यांनी रोषणाई केली होती. त्या प्रकाशात त्याचा सोनेरी मुखवटा शोभून दिसत होता. मस्तकावर मुकुट, कपाळावर विभूती, मधे आडवा त्रिपुंड्र, डोळे झाकून घेतलेले असा

राजबिंडा देव उभा होता. अंगावर घवघवीत फुलमाळा होत्या. मनगटावर, दंडावर आणि पावला भोवतीही फुलांचे गजरे बांधले होते. मोठं रम्य ध्यान दिसत होतं ते. हातात त्याचा आवडता शूल होता. त्यावरही भस्माचे तीन पट्टे आणि मधे कुंकुम तिलक होता.

वातावरणात वेदांचं सामगायन सुस्वरपणे चाललं होतं. दर्शनार्थी जशी जागा मिळेल तसे बसले होते. उभी असणारी मंडळी गजावर ओणवून त्याला बघत होती. त्याच्या सोनेरी स्वरूपाला डोळ्यात साठवून घेत होती. फुलांचे हारे येत होते. फुलं कोमेजू नयेत म्हणून त्यावर गुलाबपाण्याचं प्रोक्षण चालू होतं. नारळ फुटत होते. विभूती हातावर मिळत होती. चंदनगंधित पाणी शिंपलं जात होतं.

प्रदक्षिणेच्या वाटेवर सुरेख स्वच्छता होती. थंड सावली बघत छोटे मोठे परिवार थांबत होते. मिळालेला प्रसाद वाटून खात होते. देवाच्या उत्सवातल्या आनंदाची लयलूट मुलाबाळांच्या चेहऱ्यावर दिसत होती. अशी मोठी रम्य दिसली " स्वामीमलै "

परत बस मार्गस्थ झाली. परत सर्व शहर ओलांडलं आणि ' कुंभकोणम् ' च्या दुसऱ्या कोणाकडे आम्ही आलो. इथं एक विशाल शिवक्षेत्र होतं. ' मध्यार्जुन ' क्षेत्र म्हणून ते प्रसिद्ध आहे. तामीळमधे त्याच नाव आहे तिरुवरुमरदूर !'

तिथे जाऊन पोचलो तेव्हा दोन अडीच झाले असतील. मंदिर अर्थातच बंद होतं. देव वामकुक्षीच्या निमित्तानं गाढ झोपी गेले असावे हे मंदिरातल्या ठायीठायी आडव्या झालेल्या प्रत्येक माणसाच्या अवस्थेवरून दिसत होतं झोपला नव्हता तो एक प्राणी—नंदिकेश्वर ! त्याचा मात्र जागता पहारा होता.

नंदीची ही प्रतिमाही खूप प्रचंड होती. चार फुटाच्या उंच बैठकीवर तो नीटस बसवला होता. पण कपाळावरची आखुड शिंगं बऱ्याच उंच असलेल्या छताला भिडली होती. पांढऱ्या स्वच्छ रंगातला हा प्राणी उमदा वाटत होता. रंगवण्यानं त्याला असा सजीवपणा आला होता की असं वाटे हा जर आत्ता उठून उभा राहिला तर मंदिराच्या या चित्रविचित्र छताचं कसं होणार ?

पण आमच्याकडे न बघता जणू तो आम्हाला सांगत होता "बसण्यासाठी जन्म आमुचा ! "

मंदिर उघडायला अवकाश होता. तेवढ्यात सारं मंदिर हिंडून फिरून बघून घेतलं. इतक्या दूर थोड्याश्या विजनवासामध्येच हे मंदिर उभं आहे. पण मंदिराच्या आकार प्राकारांनी, शिल्पांनी आणि भित्तीचित्रांनी त्याला द्यायचं तेवढं वैभव दिलं आहे. महत्त्वाच्या दृष्टीनं जे महत्त्व नटराजाच्या चिदंबरम्ला तेच या मध्यार्जुन मंदिराला. शिवपुराणांत एकशेआठ शिवलिंग क्षेत्र प्रसिद्ध आहेत. निजमंदिराची एक प्रदक्षिणा म्हणजे अश्वमेध यज्ञाचं पुण्य आहे म्हणतात. आणि या एकाच प्रदक्षिणेत भारतवर्षाच्या परिश्रमेचं फळ लाभतं असं म्हटलं जातं.

ब्रह्महत्येसारखं महापाप या क्षेत्रात प्रवेश करू शकत नाही. पश्चिम गोपूराच्या पलिकडे एक विकट विद्रूप दिसणारी ब्रह्महत्या उभी आहे. ती आत येऊ शकत नाही. मदुराईच्या परगुण पांड्य नरेशाकडून एकदा अहेतुपूर्वक ब्रह्महत्या घडली. तिनं त्याचा पिच्छा पुरवला. त्याने हरतऱ्हेचं दान पुण्य केलं. पण ती दूर होईना. तीर्थयात्रा केल्या पण सारं व्यर्थ. शेवटी तो या ठिकाणी आला. पाठलाग करणारं ब्रह्महत्येचं भूत बाहेरच थबकलं. ते आंत येऊ शकलं नाही. ते बाहेरच अडकलं. आणि राजा दोषमुक्त झाला. ही सारी कथा मंदिरातील भिंतीवर रेखाटली गेली आहे.

मन्दिराला साजेलसं असं सारंच वैभव मंदिर उघडल्यावर दिसल. मधला मंडप, पुढे दार, पुढे परत मंडप, परत दार असं चकित करून सोडणारं दृश्य बघितल शिवपरिवाराचं व्यवस्थित दर्शन घडलं आणि 'तिरुवरुमरदूर 'चा निरोप घेतला.

आता संकल्पाप्रमाणे फक्त एक ठिकाण बाकी होतं. उन्हं सरत आली होती. सकाळपासून हिंडणं फिरणं चाललं होत. त्यात काही कुठं खंड पडला नव्हता. दमल्या थकल्यासारखंही विशेष वाटत नव्हतं. झाडाखाली फळांचा सडा पडला. वेचता वेचता साठवायला जागा उरली नाही तरी वेचण साठवणं थांबवू नये असं लहानपणी वाटायचं. तसं इथेही झालं होतं. आता एवढंच एवढंच करावं तसं आम्ही म्हणत होतो. 'बस आता हे शेवटचच ठिकाण !'

हे शेवटचं ठिकाण बघण्यासाठी आम्ही बसमधून उतरलो तर तिरप्या

झालेल्या सावल्या देखिल पुसून गेल्या होत्या. झाडापानांत संध्याकाळची सळसळ चालू होती. हवेत दिवसाभराच्या तापण्यातले उरलेले कधी गरम कधी थंड सुस्कारे होते. क्षितीजावरची झाडामाडांची नक्षी काळीसावळी होऊ घातली होती.

वसमधून उतरलेल्या मंडळीत चारसहा मंडळी घोळक्यांनी गोपुराच्या दिशेनं चालली. आम्ही त्यांच्या मागोमाग निघालो. त्यांच्यातला एक तरुण यात्री गात होता, 'सारी येनो निन्नु श्रीवेंकटरमणा ऽऽ' बाकीची मंडळी साथ करत होती. मनात दर्शनाची अभिलाषा फुलत होती. दिवसभराच्या या हरिहर दर्शनाच्या कार्यक्रमात आता शेवटचं दर्शन वासुदेवाचं होतं.

आंत सायंधूपदीप झाला होता. विझल्या वातींचा आणि जळत्या कापराचा धुंद सुगंध सुटला होता. आत दिवाबत्ती झाली होती तरी सगळीकडे नीरव शांतता होती. आमच्या सोबत्यांनीच त्या शांततेचा भंग केला "लक्ष्मी रमणा..ऽ गोविंदा..ऽ!" आवाज घुमला आणि थोडचाच वेळात आम्ही थेट गर्भगृहासमोर जाऊन उभा राहिलो. अन् काय चमत्कार ! एका क्षणांत संपूर्ण तिरूपतीचा वेंकटेश्वर तसाच्या तसा उभा राहिला. तोच साजबाज, तोच थाटमाट. तसाच तो मुकुट, तेवढीच ती आकृती. तसंच मोहक ध्यान पण आधिक स्वच्छ आणि नेटकं. दर्शन जवळच्या विद्युदीपांच्या उजेडात कसं छान दर्शन झालं त्याचं. कपाळावर हिरकण्यांनी जडवलेला उर्ध्वत्रिपुंड्र आणि छातीवरच्या रत्नहारामध्ये जडवलेली लक्ष्मीची नीटस प्रतिमा.

'कुंभकोणम्' यात्रेतल्या या शेवटच्या दर्शनानं मन आनंदविभोर झालं. या दर्शनानं एका वेगळ्याच विश्वात नेऊन सोडलं. हे असंच ध्यान अखंड समोर ठेऊन मग कुठंही जावं, काहीही करावं. संसाराच्या काटेरी वाटेवरून पुष्प वाटिकेसारखी सहल करावी असं वाटत राहिलं !

शारंगपाणीसारखी या उप्पिलीअप्पांचीही कथा आहे. तुलसीवनामधे महर्षि मार्कंडेयाना एक कमळकळी इथे गवसली. तिच्यासाठी त्यांनी स्वतःचं महर्षि-पण जरा दूर सारलं. तिचं लालनपालन करून शेवटी या परब्रह्म परमात्म्याच्या शेल्याशी तिच्या सौभाग्याची गाठ बांधली. मार्कंडेयांची मूर्तिही त्याच्याजवळच आहे. कन्यादान करताना ते त्यांना म्हणाले, "जावईबुवा ही आमची मुलगी मोठी खटचाळ आहे बरं ! आता तुम्हाला काही वेगळं

सांगायला नको म्हणा ! स्वयंपाक चांगला करता येतो तिला पण मुद्दामच एकादेवेळी ती तिखटाऐवजी साखर घालते. मीठाला चव असते हे तर तिच्या गावीही नाही. मीठच घालीत नाही ती कशात. ते बघा बुवा ! ”

आजही मंदिरात प्रसाद होतो. पण त्यांत मीठ नसतं. अगदी अळणी असतो पण फार स्वादिष्ट असतो तो. हे ‘ उप्पलिअप्पनस्वामी ’ तिरूपतीच्या व्यंकटेश्वराचे थोरले बंधू समजले जातात. मधले तिरुमलैचे ‘ श्रीनिवास ’ आणि धाकटे सालेम जवळचे “ श्रीगुणशीलस्वामी ! ” अन्य दोन ठिकाणी केलेले नवस इथे फेडले तर चालतात. पण ‘उप्पिलीअप्पन’ जवळ केलेला नवस इतर ठिकाणी फेडून भागत नाही. इथेच यावं लागतं.

बस परत फिरली. ‘ कुंभकोणम् ’ वरचा दिवस सरला. दिव्यांची दीपनळयांची रात्र पसरली. बस स्टेशनवर चालली होती. आजचा आरंभ, मध्य, शेवट सर्व उत्कृष्ट झालं होतं. मन विचारत होतं कुठून सुरवात झाली आज ? ‘ महामघम्’चा रंगीत चित्रपट डोळ्यापुढे उभा राहिला.

नारदीय निर्णय सिंधू म्हणतो–साधू संताचा अतिशय आवडता माघमास येतो. ‘ कुंभकोणम्’वर मंगलप्रभात सुवर्णकिरणांचं जाळं पसरते तेव्हा ‘ महामघम्’ची पवित्र तीर्थ आनंदानं गलबलून हाका मारतात.

‘ पुनीमः सर्वपापानि त्रिविधानि न संशयः ।

निःसंशय आम्ही सर्व त्रिविध पापं धुवून टाकू. या. आमच्याकडे या–परत या !

१५

# पळनीचा देव बहुत कोवळा

कुंभकोणम्हून गाडी निघाली. आता तिला मदुरेला जायचं होतं. सकाळी ८–९ वाजता तिनं मदुरेला पोचवलं असतं. पहाटे पहाटे डिंडिगल स्टेशन आलं. आम्ही त्या गाडीचा निरोप घेतला. ती निघून गेली आम्ही थांबलो. आम्हाला आता गाठायची होती डिंडिगल कोइंबतूर सवारी. कोइंबतूरच्या दिशेला डिंडिगल स्टेशनपासून सदतीस मैलावर पळनी हे ठिकाण होतं. तो दिवस आमचा तिथे साजरा होणार होता.

पहाटेची वेळ होती. गाडी पळनीकडे सरकत होती. स्टेशनामागे स्टेशनं जात होती. पळनी जवळ येत होतं. काल यावेळी कुंभकोणम्ला उगवत्या सूर्याची वाट बघत होतो. आज पळनीकडे पळत आहोंत. एक वेळ वाटायचं आता काय शिल्लक आहे बघायला ? कालपर्यंत काय कमी बघितलं ? कालचा कार्यक्रम काय कमी झाला? तीच मंदिरं, तीच गोपुरं, त्याच टेकड्या ! आता विशेष ते काय राहिलं ? वरवर हा प्रश्न पडत होता. त्याला पौराणिक महत्वाचे संदर्भ दाखवून भाविक मन काही सांगू बघत होतं. पण त्याला बाजूला सारून मनाची प्रबळ प्रवृत्ति पुढे येत होती. ती प्रवृत्तिच एवढ्या मोठ्या मार्गाचा

आधार होती. निरनिराळे ध्वनी टिपण्यामागे, रमणीय दृश्य कुठेतरी कायमचं चितारून ठेवण्यामागे आणि आसमंतातले प्रासादिक धुंद सुगंध श्वासात भरून घेण्यामागे तिचीच प्रेरणा होती. तिला दमणं थकणं माहीत नव्हत. तिची भूक मोठी होती. झेप विलक्षण होतीं. तिला त्या तोच तो पणामधेच विधायक वैचित्र्य जाणवत होत. त्या प्रवृतीचं नाव होतं रसिकता ! तीच यात्रेची प्रवृत्ति, तर यात्रेकरूंची प्रकृति होती. ती विचारत होती. दरवर्षी वसंतागम होतो. ग्रीष्माच्या पिवळया आगीनं होरपळून शुष्क झालेले झाडांचे पिंजरे बेचक्या बेचक्यातून नवनवीन लुसलुशीत कोवळं चैतन्य बाहेर दाखवतात. आम्रतरूंच्या मंजिऱ्या अमृतांच्या फळांचा पुलक प्रकट करतात. त्यांच्या सुगंधी मांडवातून कुणी पक्षिणी पंचम स्वरांची महफिल रंगवते.

गलितगात्र वृद्धेच्या मुखावरून वृद्धत्वाचं जाळं ओढलं जाऊन नवनवोन्मेषाचं मुसमुसलेपण फिस्कारलं जावं तसं सृष्टीचं होतं ते काय कपिलाषष्ठीसारखं साठ वर्षांनी एकदा ? पर्जन्याच्या सहस्त्रतारा छेडून कृष्णमेघांच्या घनगंभीर मृदंगांच्या तालावर प्रकृति पंचमल्हार गाते ते काय कधी काळी लहर लागल्यावर ? शारदीयेची अमृतकळा चुटूचुटू पिणाऱ्या चकोरतलगांना काय बारा बारा वर्षं वाट बघावी लागते ? शिशिराचं कापरं कथ्यक काय एकदम लाट आल्यासारखं कधी, नव्हे ते सुरु होते ? नाही. ते अगदी नियमानं येतं. दरसाल येतं. मग तेच ते बघण्याचा कंटाळा नाहीं येत तो ? तेच ते वर्णन करण्याचा आजवरच्या साहित्यकांच्या लेखणीला, अनामिक कलाकारांच्या तूलिकेला कंटाळा नाही आला तो ? मग मलाच कसा कंटाळा येईल तेच ते बघताना ! हा केवळ युक्तिवाद नव्हता. काही तथ्यही होतं. नेहमी तेच ते बघायला उत्तेजित करणारं !

गाडी गतिमान होती. आम्हीही आपापल्या गतीत होतो. शेतामळ्यांच्या पलिकडे निळे पर्वत उभे होते. त्यांच्या कडा सोनेरी दिसत होत्या. कुठेतरी मधेच त्यांच्यावर एकाद गोपुरम् दिसे आणि पायथ्याच्या नागरी वस्तीतून त्यावर जाणारी वेड्यावाकड्या वळणाची पायरीदार वाट ! आजुबाजूचा लपून छपून येणारा जलप्रवाह खळखळ करीत गाडीखालून पलिकडे जात होता. दृष्टी पोचावी तिथपर्यंत श्रमाचं पातेदार हिरवं हिरवं जग वाऱ्याबरोबर

झुलत होतं तरी आंतमधे कष्टाचं पाणी साचत होतं. कधी बाहेर झिरपत होतं. हे असले देखावे आपल्याकडे बघायला मिळत नाहीत. हिरव्या वैभवाच एवढं अखंड आणि विशाल दृश्य कुठे दिसतं ? आणि पाणीच पाणी चहुकडे असं तरी कुठे बघायला मिळतं ?

साडे नऊ वाजले असावे. उन्हं चढू लागली. मधूनच येणाऱ्या अभ्रामुळे ती विशेष जाणवत नव्हती. गाडीचा वेग मंदावला. डाव्या बाजूची शिखरावली दुरून गोपुरांची टोकं दाखवू लागली. बांधलेल्या तटांच्या भिंतीचा लांब रंगीत पट्टा दुरून दिसायला लागला. पुढं जाणारी मंडळी बायकामुलांना तिकडे हात दाखवून म्हणू लागली "सुब्रह्मण्या, स्वामी पळनी" आणि बायका माणसं तिकडे बघून 'मुरूगासाऽमी' म्हणून हात जोडू लागली. गाडी स्टेशनमध्ये शिरली.

स्टेशनपासून दीड मैलाच्या अंतरावर हे पहाडी मंदिर आहे. मुख्य आकर्षण तो पवित्र पहाड आहे. खाली स्वामींचं मोठं मंदिर आहे. तीनही बाजूंनी गाव. मागच्या बाजूला दूरवर वळणावळणानं वहात जाणारा पाण्याचा पाट अन् पर्वत मालिकेतले घाट अशी पळनी गावाची रचना आहे. वर्षातल्या ४–५ उत्सवयात्रामुळे गावात गर्दी होत असते. यात्रेकरूंची व्यक्तिगत, धंदेवाईक आणि देवस्थानम् कडून धर्मार्थ अशी रहाण्याची वगैरे व्यवस्था होते. भोजनालयही बरी आहेत. स्टेशनपासून निघून देवदर्शन करून माणूस पाच सहा तासात परतू शकतो. ह्याच विचारानं आम्ही निघालो. सामान स्टेशनवर ठेवलं. तांगे रिक्षा गर्दी करून होती. पण इतर मंडळी तशीच निघाली. मग आम्हीही पायीच निघालो. रस्त्याच्या सारख्या रहदारीमुळे आणि आजुबाजूच्या विविध दुकानांच्या सजावटीमुळे अंतर जाणवलं नाही. फुलं नारळं आणि पूजेच्या सामानाची दुकानं लागली आणि आम्ही समजलो देऊळ अजून उंच असलं तरी आम्ही राउळात दाखल झालो आहोत.

गोपूर पार केलं. समोरच या चढाईच्या युद्धात मला निर्विघ्न कर ! अशी प्रार्थना करावी असा प्रशस्त थाटाचा देव गजानन दिसला. त्याला नमस्कार करून ती उभी टेकडी पायरी पायरीनं चढायला सुरवात केली. या पहाडाची एकूण उंची साडेचारशे फूट आहे. पहाडाची एकूण रचना अगस्ती. मुनींनी केली आहे. म्हणजे अगस्तिकालापासून त्या ठिकाणाला प्रसिद्धी आहे.

स्कंदपुराणात याला शिवगिरी असं संबोधलं आहे. पहाडावर मध्यभागी 'सुब्रह्मण्यम्' स्वामींचं मंदिर आहे. देवाधिदेवाच्या या लाडक्या पुत्राला लहानपणापासूनच पहाडाटेकड्यांचं वेड होतं. इथं तो आईवडिलांवर रुसून या टेकडीवर येऊन बसला आहे. वडिल पाठोपाठ आले रुसवा काढायल तर त्यांनाच इथे त्यानं ॐकार मंत्राची दीक्षा दिली.

पहाडावर जायला चारी बाजूंनी रस्ते आहेत. काही पायऱ्या बांधून काढा लेले वर पक्क्या बांधणीची छतं घेतलेले आहेत तर काही नुसत्या चढणीचे आहेत. मधे मधे विसाव्याचे मंडप बांधले आहेत. वर मोराच्या सुंदर सुंदर आकृति काढल्या आहेत तर काही ठिकाणी शिवलीलेचे प्रसंग मूर्तिबद्ध झाले आहेत.


पक्क्या पाचशे पायऱ्यांची चढण पार केल्यावर समोर एक मोठं गोपूर दिसायला लागलं. देवाचं दार दिसलं. आता देव केवळ काही अंतरावर होता. यात्रेनं परिवार फुलून गेला होता. उन चटचटा लागत होतं. पण भाविकांची रीघ लागली होती. गोपुराच्या जवळच एक पर्वतप्राय हत्ती सोंड उंचावून देवभेटीला येणाऱ्याचं स्वागत करीत होता. आम्ही ती सलामी योग्य अंतराची आदब राखून स्वीकारली आणि आंत शिरलो.

दह्यादुधाच्या कावडी घेऊन क्षेत्राचे तडीतापसी येत होते. कमानदार रंगीत कागदांनी आणि मोरपिसांनी सजवलेल्या कावडी खांद्या खांद्यावरून येत होत्या. गोपुराच्या आंत पाऊल टाकल्याबरोबर 'मुरुगाऽदंडायुधा—स्वामी—नयनास्वाभी अशा आरोळ्या ठोकल्या जात होत्या. त्या सगळ्या थाटात आम्ही वलीवेदीजवळ जाऊन पोहलो. बलिवेदीवर त्याचा आवडता शस्त्रशूल रोवलेला होता. आणि जवळच्या एका दांडीवर एक गुबगुबीत खराखुरा कोंबडा ऐटबाजपणे बसवलेला होता.

त्या पश्चिमाभिमुख मंदिराला वळसा घालून दक्षिणेच्या दरवाजातून आम्ही आत शिरलो. गर्दी बरीच होती. पण थोडी फार वाट काढीत आणि रेटारेटी करीत आम्ही मंदिराच्या मुख्य दैवतापुढे जाऊन उभे राहिलो. सुब्रह्मण्यस्वामीचं हे ध्यान विलक्षण होतं. तीन फूट ऊंचीची ती मूर्ति विभूतीच्या उधळण्यानं एकदम पांढुरकी दिसत होती. खंडोबावर सव्वामणाचा भंडारा-उधळावा तशी 'सुब्रह्मण्यम्' स्वामीच्या बालमूर्तिवर राहून राहून विभूती

उधळली जात होती. त्याच्या पायाशी पांढऱ्या भस्माचा ढीग जमला होता. तो परत परत गोळा केला जात होता आणि नवा उधळला जात होता.

त्याचं छोटं गोंडस स्वरूप त्या भस्मचर्चेतही मोठं विलोभनीय दिसत होतं, सारं अंग उघडं उघडं, कमरेला मौंजमेखलामधे दोन बोटाची लंगोटी. गळ्यात आणि दंडांत रूद्राक्षांच्या माळाचे लेणे. एका हाती दंड कमंडलू नि एक हात कमरेवर ! पायात खडावा आणि पायाशी मागच्या बाजूनं हळूच डोकावणारा एक मोर ! उभी रहाण्याची ऐट तर अशी की अगदी बघत रहावं त्या उभं राहण्याच्या पद्धतीला थोडी गती आहे. इतर देवतासारखं समचरणी उभं असलेलं ते ध्यान नाही. हातातला दंड सावरीत मस्तक किंचित खाली झुकवून तो कुठेतरी निघाला आहे असा भास होत होता. किंवा चालताना समोर दर्शन घेणारी मंडळी दिसली म्हणून नुकताच थांबत आहे काहीतरी शुभाशीर्वाद मुखी पुटपुटतो आहे आणि परत वैराग्याची विभूती लेवून गर्दीतून वाट मागत आहे.



गर्दी वाट देत नाही. दर्शनार्थींचो एक लाट हळूहळू विरायच्या आधीच दुसरी जोरदार लाट दाटीवाटीनं स्कंदनामाचा पुकारा करीत आंतमधे घुसते आहे. तो थांबतो आहे. दर्शन देतो आहे. शरण आलेल्याचं रक्षण करतो आहे. स्मरण करणाऱ्यांचे मनोरथ पुरवतो आहे. लहान असून उभं राहाण्याचा कंटाळा येत नाही. उघडावाघडा असून थंडी वाजत नाही आणि विभूती सोडून अन्य उपचार मागत नाही.

फार गोजिरवाणं ध्यान आहे त्याचं. उत्तरेत बालकृष्णाचं जेवढं कौतुक तेवढं इथे 'बालसुब्रह्मण्याचं' या रुसून आलेल्या बंडोखोर मुलाचं. त्याच्या

भक्तीत प्रतारणा चालत नाही. त्याच्या व्रतवैकल्यात ढिलेपणा त्याला मान्य नाही. रडीखेळण्याची त्याला चीड आहे. मग तो कुणीही असो.

साधी गोष्ट! आईवडिलांचा तो थोरला की नाही ? पण आईचा धाकट्या-वरच एवढा जीव का ? आणि वडील नुसते तटस्थ का ? एकदा काय झालं तोच वाद रंगला. कैलास पर्वतावरच्या मातुलगृही गिरीजा मातुश्री बसली होती. गणांसहीत गिरीशही बसले होते. ही दोन मुलं आपसात भांडत होती. षडानन आणि गजानन. प्रकार अगदी विकोपाला गेला. हा त्याला ढेरपोटचा म्हणाला. तो याला सहातोंडाचं जनावर म्हणाला. आईनं मध्यस्थी केली. ती म्हणाली " हे बघा मुलांनो, भांडू नका. तुम्ही दोघंही सारखीच शूर, वीर आणि बुद्धिवान आहात. आमचं तुम्हा दोघांवरही खूप प्रेम आहे. पण तुम्ही अगदी अटीतटीलाच आला आहात. तर असं करा, तुम्ही दोघंही पृथ्वीप्रदक्षिणा करा. जो आधी परत येईल तो आमच्या संसाराला लागलेलं सर्वात मधुरफळ असं आम्ही समजू. कबूल ? "



उभयक्षांनी कबुली दिली. कार्तिकेय मोरावर बसून पृथ्वीप्रदक्षिणेला निघाला. गजाननाला अर्थातच हे जमण्यासारखं नव्हतं. त्यानं आपलं 'आईबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी. कशाला पळू मी पृथ्वीवरी' असं म्हटलं आणि तुम्हीच माझं पृथ्वीमोलाचं धन आहात, तुमच्या प्रदक्षिणेत माझ्या सप्त पृथ्वी प्रदक्षिणा पुऱ्या होवोत अशी प्रार्थना करून तो सरकत सरकत आईवडिला-भोवती एक चक्कर मारून हुश्श हुश्श करीत एका कोपऱ्यात जाऊन बसला. वडिलांनी प्रसन्न होऊन एक फळ त्याला दिलं.

नंतर आला कार्तिकेय. त्याला हा प्रकार समजला. प्रतिपक्ष रडी खेळला. पण वडिलांनी त्याला फळ दिलं. या गोष्टीचा त्याला फार राग आला. तो मानधन तसाच परत फिरला आणि सरळ या शिवगिरीवर आला. वस्त्र भूषणं टाकून दंडकमंडलू घेतला. मस्तकावरचे कोवळे कुंतल काढून टाकले नि तो ब्रह्मचारी वटू झाला. वडिलांना खेद झाला. मुलाला समजावण्यासाठी ते त्याच्या मागोमाग येऊन म्हणू लागले. "माझ्या मुला परत चल. फळाबद्दल काय वाटून घेतोस ? तेवढ्याश्या फळांची किंमत ती काय ? खरं तर तू स्वतःच असं गोड फळ आहेस. माझ्या संसाराला लागलेलं तूच ते फळ आहेस". तामीळमधे 'पळ' म्हणजे फळ आणि 'नी' म्हणजे तू–तूच ! आज हा सारा इतिहास थिजल्या तुपासारखा त्या टेकडीवर साकळला आहे. दंडकमंडलू घेतलेला तो रुसका मुलगा त्या क्षेत्राचं प्रचितीचं भक्तकाम पूर्ण करणारं जाज्वल्य दैवत म्हणून तिथं उभा आहे. आणि समोर समजुतीच्या गोष्टी सांगो आलेला त्याचा पिता शिवमहादेव परिवारासह बसला आहे. गावाचं नाव ' तूच ते फळ 'पळनी' आहे ते असं ! '

मंदिराचा पसारा कितीही मोठा असला, त्याला मिळालेलं निसर्गाच्या पार्श्वभूमीचं वैशिष्ट्य कितीही असलं, किंवा मंदिराच्या भव्य दिव्यपणात विविध नाजुक शिल्पांनी कितीही मोठी भुलभुलैया निर्माण झालेली असो माझं खरखुरं लक्ष असतं मंदिराच्या मुख्य पीठावर. तिथं कोण उभं आहे, कसं उभं आहे, त्याला बघून मनांत काही हालचाल उत्पन्न होते की नाही ? त्याला बघून हृदयाला काही आगळ्या संवेदना उत्पन्न होतात की नाही ? हातापायातला सगळा थकवा आणि चालून आलेल्या अंतराचं दूरत्व संपतं.

की नाही ? हे माझ्या मनाचं वेड आहे. बाकीचंही बघायचं असतं. पण ते नंतर. आधी रोकड. कागदपत्र नंतर !

म्हणून मंदिराचा श्रीविग्रह सारखा सारखा परत न्याहाळावासा वाटतो. तिथून अगदी हलू नयेसं वाटतं. यावं तरी त्याच्याचसाठी आणि जावं तरी त्याचाच निरोप घेऊन भरल्या मनानं. त्याच्या दर्शनानंदात तुडुंब भरून जड झालेल्या अंतःकरणानं. ही माझी साहजिक ओढ आहे. म्हणून त्या रांगांचं मला काही वाटत नाही. म्हणून त्या गर्दीची अडचण होत नाही.

इतिहास किंवा पुराणकथा घडणाऱ्या घडून गेलेल्या असतात. पण त्यांचं महत्त्व तितकच ताजेपणानं तसंच टवटवीत ठेवण्याचं कौशल्य, मंदिरं घडविणाऱ्या, मूर्तिची विशिष्ट पद्धतीत योजना करणाऱ्या, नंतरच्या भक्त भाविकांवर पडत असते. आणि दक्षिणेत म्हणाल तर खरं कौतुक त्याच्या रचनेचं आहे. त्यात बरोबर साधल्या गेलेल्या औचित्याचं आहे.

स्कंद चरित्राला पुराणात फार गौरव मिळाला आहे. कालिदासाने तर त्यावर 'कुमारसंभवाची' रसिकमान्य रचना केली आहे. त्याच्या सहस्त्र नावांत आज काही विशेष नावं आधिक प्रचलित आहेत. पण ' पळनी 'च त्याचं मोहक ध्यान बघून मात्र त्याला ' कुमार ' नावानं संबोधणाऱ्या कविकुलगुरुची रसिकता मनात अधिक ठसते. तो एक तेजस्वी कुमार आहे. पित्याच्या अंकावर वा मातेच्या कुशीत खेळणारं त्याचं शैशव वा बाल्य हरवलं आहे. तो आता रुसण्याफुगण्याइतका समजुतीचा झाला आहे. मुलं थोडीशी जाणती झाली की मोठेपणाचा अभिनय करताना आपण बघतो. कुणी शिपाई होतो, कुणी कारकून होतो तर कुणी दोन पाटांच्या आडोश्यात आपला चूलबोळक्याचा संसार मांडून बाहुलीला आपल्या इवल्याशा मांडीवर बडबडगीत म्हणत झोपवणारी ' आई ' होते. तर एखादं वेडं गळ्यात दोऱ्याचं जानवं अडकवून मुंज मुलगा देखील होतं. हे ललित लाघव या कुमारमूर्तित नाही असं कोण म्हणेल ?

मूर्ति घडवणाऱ्यानं ही सगळी बालस्वप्न बघितली नसतील का ? मौंजीसाठी तळमळणारे आळंदीतले कुमार त्याला दिसले असतील का ?

> यज्ञोपविते करूनी धारण गायत्रीचे मंत्रोच्चारण
> ब्रह्मचारी मी गुरु घरी जाईन. होईन ज्ञानी दिपवित सकळा ।

अशी एकमेकांना रिझवणारी मंडळी त्याला स्फूर्ति देऊन गेली असतील का? नाहीतर आईवडिलांवर रुसून दुर्गम पर्वताचा आश्रय घ्यायला आलेल्या कुमारांचा इतका सुंदर आणि रमणीय अविष्कार त्यांच्या कलेत त्याला कुठ गवसला असता ? असा कुमार त्याच्या मनीमानसी कसा संभ-वला असता ?

त्या बटू मूर्तिकडे मी एकटक बघत होते. गळ्यात जशा घवघवीत फुलांच्या माळा होत्या तसेच माळेचे तीन पदर त्या चकाकत्या मस्तका-वरून मुंडावळी सारखे चेहऱ्याभोवती झुलले असते तर आता तिथेच हाल-चाल करणाऱ्या ब्रह्मवृंदानी त्याच्यापुढे शालीची घडी धरून अंतरपाट धरला असता आणि मंदिराच्या सर्व बाजूंनी अक्षतांची उधळण होत मंगलध्वनी आला असावा. "सुमुहूर्त ऽऽ सावधान !"

मी आपली मनोमन हा उपनयनाचा विधी त्याला बघत साजरा करत होते. पण प्रत्यक्षात इथल्या परिसरांत जे घडून गेलं ते मात्र उलट झालं होत. बटू झाला हा आणि प्रणवाची मंत्रदीक्षा मात्र यानंच पित्याला दिली होती. 'नाथांच्या घरी उलटी खूण ! दुसरं काय ?'

पण कुमाराच्या या मनोहर कल्पनांची उभारी ज्यांनी केली त्यांनी इथे आणखी जे नवल घडवलं ते याहीपेक्षा विस्मयजनक होतं. म्हणजे या मूर्तिच्या विशेषतेबरोबर मूर्तिसाठी वापरलेलं साहित्यही जगावेगळं होतं. नवविध महाविषांचे विखार एकत्र केले आणि त्यातून अमृतदृष्टीचा पुतळा साकार केला. साक्षात् मृत्युचं मर्दन करून मृत्युंजयाचीही दृष्ट लागावी अशी मूर्ती निर्माण केली.

आज त्याचं चरणतीर्थ महौषधीच्या मानाचं समजलं जातं. त्याच्या स्नानाचं पंचामृत आज खरोखरीच्या अमृताच्या ओढीनं लोक घेतात. म्हणून पळनीच्या बाजारात प्रसादापेक्षा पंचामृताचे विशिष्ट आकाराचे डबे विकणारीच दुकानं भरपूर आहेत. आणि पंचामृताचा आणि इथला प्रकारही अतिशय स्वादिष्ट असतो. सुगंधी विभूती आणि केळी घातलेलं हे पंचामृत हाच इथला तीर्थप्रसाद !

स्कंदषष्ठी दोन दिवसावर राहिली होती. 'पळनी' मुलामाणसांनी भरून जात होती. मंदिराच्या धर्मशाळामधून गजबज वाढत होती. दुकानांचे

आकार वाढले होते. आणि भक्तांची भाविकता त्याला गडावर खेचून नेत होती. तिथे त्याच्या सर्व सकृताचे लाहिले फळ त्याला त्या परब्रह्माशी क्षेम अलिंगनाचा सुयोग सांगत होतं. योगियाच्या जगांतली कोवळी नव्हाळी तिथे भस्माच्या वर्षावात नहात होती. तो अनुपम सुखसोहळा ज्याला त्याला आता बघायचा होता.

आता दोन दिवस गडावर अशी गडबड उडून जाईल. दह्यादुधाच्या भरल्या कावडी वाजत गाजत पायऱ्यांवर सांडत नागस्वरांच्या आणि 'मृदंगम्'च्या कडकडाटात वर चढत जातील. स्कंदा-मुरुगाच्या जयकाराबरोबर सर्व गड गर्जून उठेल. छोटचा करतालाच्या ठेक्यावर आणि दोन सुरांच्या हातपेटींच्या आवाजात 'बालसुब्रह्मण्याची' लीलागीतं आळवीत भजनीमडळ रंगत रंगत वर चढतील. आणि त्या कुमाराच्या पायाजवळ भावभक्तीच्या सगळचा कावडी रित्या होतील.

मी मात्र आता त्याचा निरोप घेत आहे. त्याच्या बटुवेशाचा निरोप घेत आहे. त्याच्या त्या दंडायुधपाणी रुपाचा निरोप घेत आहे. हातांत सुगंधी विभूती आहे आणि अंतःकरणात त्याची अविस्मरणीय प्रतिमा–

गले रत्नभूषं, तनौ मंजुवेषं, करे ज्ञानशक्ति दरस्मेरमास्यम् ।

कटिन्यस्तपाणिं शिखिस्थं कुमारं भजे ऽहं गुहादन्यदैवं न मन्ये ।।

अशी मंजुमधुर प्रतिमा

———

# १६

# तिरुच्चेन्दूरचा रणसंग्राम

पळनीचा कोवळा बटू तसाच गडावर राहिला. त्याची मौंज तशीच वाजत गाजत राहिली. आम्हा मुंबईकरांना आधिक सवड होती कुठे? नुसतं अक्षता उडवून आणि पंक्तीला हात उष्टावून निघणाऱ्या अतिउद्योगी पाहुण्यासारखं आम्ही मिळालेल्या पहिल्या गाडीनं पळणी सोडली. खरं म्हणजे आम्हाला सोडावी लागली. पण पळनींनं आम्हाला काही नवीन दाखवलं होतं. कधीकाळी लहानपणी अगदी बोहल्यावर चढलेला, डोकं तुळतुळीत केलेला, डोळ्यात भरगच्च काजळ, कपाळ मळवटानं माखलेलं, कमरेला मेखला, नव्या कोऱ्या लंगोट्या, एक नेसलेली, एक हातातल्या दंडाला बांधलेली. काखेत हरिणाजिन घेतलेला असा साजरा गोजरा किशोर बटू पळनींनं क्रौंचपर्वतावर अगदी मुख्य पीठावर उभा केलेला दाखवला. त्याच्यावर उधळल्या जाणाऱ्या विभूतींनं आमच्या यात्रेच्या कार्यक्रमावर पण जादूची फुंकर घालून उत्साह आणला होता. बघण्याच्या, बघत रहाण्याच्या क्रियेत चैतन्य आणलं होतं.

पळनी मागे जात होती. पळनीच्या गडावरच्या मांडवातली दिवे आरास मागे चालली होती. गाडी पुढे जात होती. पळणीत हिंडता फिरता दिवसभर तापलो होतो. आता आभाळाला मधेच ‘पावसाळा चालू’ असल्याची आठवण

झाली. आणि गाडीच्या दोन्ही बाजूला पावसाच्या हलक्या सरी विभूती–सारख्या उधळल्या जाऊ लागल्या. गाडी थांबत होती, चालत होती. वाटेत बऱ्याच ठिकाणीं पावसाने बरेच प्रताप करून ठेवले होते.

डिंडिगला पोहचलो. मिळेल त्या गाडीनं मदुरैला पोचून मध्यरात्री सुट-णारी तिन्नेवेल्ली पॅसेंजर पकडायची होती. अगदी सारं काही मनासारखं जुळून आलं. थोड्याफार हालचाली जाणवल्या न जाणवल्या तो अर्धवट झोपेत रात्रीचा समय सरूनि येत उषःकाल हा ! 'चं स्वप्न पडू लागलं. आम्ही परत एकदा थेट खाली निघालो होतो. आमच्या मातृभूमीची एक थडी बघायला शिवायला निघालो होतो.

रात्र उजळत होती. पहाट स्पष्ट होत होती. दिवस पहाटेला पुढे करून हळूच अर्ध अर्ध पाऊल पुढे सरकत होता. गाडी एक एक स्टेशन घेत पुढं चालली होती. पानाफुलांच्या माहेरघरी, विविध वनस्पतींच्या वस्तीतून गाडी जात होती. गाडीच्या वाटेवाटेनं अगदी बघत राहावसं आटे. पहाट म्हणजे इतकी की अगदी पक्षी सुद्धा उठले नव्हते. गाडी साखरझोपेच्या तालावर हळूहळू सरकत होती. आतले दिवे देखिल पेंगुळला प्रकाश दाखवीत होते. पण इतका सुदर मार्ग आणि इतकी रम्य वेळ माझ्या डोळ्यातली नीज पळवीत होती. वाटेतली नाना प्रकारची नाना आकाराची झाडं दृष्टि-क्षेपात येतायेताच मागं जात होती. निवडुंग आणि घायपात याचं गच्च दाटलेलं रान सगळीकडे पसरलं होतं. त्यांचे आकार अगदी बघत रहावे असे होते. केतकीच्या आकाराच्या पानांची सजावट असलेलं एखादं कॅकटस् म्हणजे पूर्ण विकसित कमळच वाटायचं. आणि एखादंच का, रांगेनं मैलोमैल गाडीची सोबत करत येणाऱ्या या वनस्पती म्हणजे या वाटेवरचं एक अनोखं शिल्पच म्हणाव. लांबवर दिसणारे स्थितप्रज्ञासारखे उभे असलेले ताडाचे खुंट, इवल्याश्या पहाटवाऱ्याबरोबर सळसळणाऱ्या नारळी, तर कधी चापून चोपून नीटनेटकी उभी असलेली नव्या नवरीसारखी पोफळी. कधी अशोकाचं गर्द वन तर कधीं आंब्याची दाट राई. सगळी जणू बोलायला उत्सुक. आपल्याला बघून डोलायला अधीर ! पण कुणाला वेळ आहे त्यांचं हितगुज ऐकायला ! त्यांच्याशी त्यांच्या भाषेतून कौतुकाचा सहज संवाद करायला ?

आता मोठ्ठं स्टेशन येणार आहे. प्रवासी तोंड धुवून चक्क दात घासून तयार आहेत. गाडी स्टेशनवर थांबली की गरम गरम कॉफीची भांडी प्रत्येकाच्या ओठी लागणार आहेत. एखादा वडा किंवा इडलीचा घासही घाईघाईत ते मारणार आहेत. आणि असं भरलेलं इंधन मग पुढचा प्रवास डोळसपणे करायला साह्यभूत होणार आहे. हळूच गाडी थांबते. प्रवाशांची धावपळ होते आणि अचानक पाटी खिडकीसमोर येते.

' मणियाच्ची ! '

या ' मणियाच्ची 'च्या पुढचं मोठं स्टेशन आहे ' तिरुनेलवेल्ली ' किंवा ' तिनेवेल्ली '. या ' तिनेवेल्लीला ' लगेचच गाडी मिळणार आहे आणि ती दुपारी बारावाजेपर्यंत तरी तिरुच्चेंदूर'ला घेऊन जाणार आहे. ' तिरुच्चेंदूर' हे या यात्रेचं पुढे जाण्याचं शेवटचं टोक. तिथून मग उजवी घालून आम्हीं परतणार आहोत. काय काय बघणार आहोत, नि कुठे कुठे जाणार आहोत या तंद्रीत गाडी 'मणियाच्ची' सोडून किती पुढे गेली कुणास ठाऊक ?

दुसऱ्या दिवशी स्कंदषष्ठी होती. तिनेवेल्लीच्या स्टेशनात यात्रेची गर्दी होती. इथून मोटार रस्ताही आहे. बसेस पण पुष्कळ आहेत. पण प्रशस्त सामान-सुमान, कुटुंब कबिला घेऊन यात्रा घडवणारं वाहन म्हणजे रेल्वेचं ! गाडी गच्च भरली आणि वेळही भरली. ' तिरुनेलवेल्ली 'च थोडसं दर्शन घडवीत ती ताम्रपर्णी च्या पुलावर येऊन थांबली ' तिरुनेलवेल्ली ' ही एक व्यापारपेठ आहे. तिथंही शिव, विष्णू, शक्ति आणि स्कंधादि देवतांची मंदिरं गोपुराच्या छायेत नांदत आहेत. ताम्रपर्णीच्या काठी सुरेख घाटाचा थाट आहे.

बरोबर साडेबाराला आम्ही ' तिरुच्चेंदूर 'ला उतरलो. शेवटचं स्टेशन. ' रामेश्वरम् ' सारखं. पण त्यामानानं छोटेखानी. एक प्लॅटफॉर्मचं. गावही स्टेशनपासून एक दीड मैलावर. तांग्याचा सहारा घेतला आणि नगरीत प्रवेश केला. छोटयाशा आकाराचं छोटसं गाव, छोटीशी बाजारपेठ. मोठासा समुद्र कांठ आणि त्या काठावर छोटया गावाला खूप मोठ्ठं महत्त्व देणारं सुब्रह्मण्याचं विशाल मंदिर. असं गावाचं थोडक्यात वर्णन करता येईल.

' देवस्थानम 'ची मोठी धर्मशाळा समोर दिसली. तांगा थांबला, आम्ही उतरलो. एवढी मोठी धर्मशाळा, पण अगदी गच्च भरून गेली होती. यात्रेकरूनी महिना महिना आधी रिझर्वेशन करून ठेवलं होतं. उद्याचा दिवसच

तसा महत्त्वाचा होता. 'तिरुच्चेंदूर'चा वार्षिक महोत्सवाचा दिवस तो. त्यातून सुब्रह्मण्य स्वामीच्या दक्षिण भारतातल्या एकूण सहा पीठापैकी हे सगळ्यात प्रधान असं स्थान आहे. त्यामुळे यात्रेकरूंची गर्दी न लोटली तरच नवल. पण त्यामुळे आमच्यापुढे मात्र जागेची मोठी समस्या निर्माण झाली. एकही खोली खाली नाही. सार्वजनिक जागेतही टेकायला जागा नाही. एवढीसुद्धा जागा नाही. उतरायला आणि बोलायला देखील. व्यवस्थापका-पुढे हात जोडून उभे राहिलो. शक्य तेवढ्या करुणस्वरात आमच्या वस्तु-स्थितीची जाणीव करून दिली. मामला विचाराधीन राहिला. चांगला दोन तास दोन तासांनी का होईना पण स्वामींना आमची दया आली. ते आम्हा-जवळ येऊन म्हणाले (अर्थात इंग्रजीत.) "खरंच तुम्ही भाग्यवान आहात. एक रिझर्वेशन झालेली खोली, काही कारणामुळे आपण येऊ शकत नाही असं अर्जदारानं कळवलं आहे, म्हणून तुम्हाला मिळेल."

त्यांनी सांगायचं कारणच नव्हतं. प्रवासाला सुरुवात केल्यापासून क्षणो-क्षणी "आपण भाग्यवान आहोत" याची जाणीव होत होती. आणि आता तर अगदी खात्रीच झाली होती. सुब्रह्मण्यस्वामीची यात्रा बघायला आम्ही खऱ्या भावानं आणि भक्तिनं आलो होतो हे जणू त्यांना पटलं होतं. म्हणून त्यांनी आमची अत्यंत सुरेख व्यवस्था केली.

सध्याकाळ होत होती. मिळालेल्या छोटयाशा खोलीच्या खिडकीजवळ मी उभी होते. धर्मशाळेच्या बरोबर प्रवेश द्वारावरच ती खिडकी होती. पुढे विशाल पांढरे स्वच्छ सिमेंट कॉंक्रीटचं अंगण आणि समोर गोपुराची भव्य आरास. समोर मंदिर. मंदिरासमोर निवासाइतका सुयोग अद्याप आला नव्हता. खऱ्या भाग्यवंताचंच लक्षण नव्हतं का हे ?

छानदार स्नान वगैरे करून उल्हसित मनानं धर्मशाळेच्या बाहेर पडलो. मंदिराच्या त्या मोठ्या परिवारात उत्सवाचं राज्य चालू झालं होतं. सबंध गोपूर विजेच्या दिव्यांनी नटलं होतं. त्यावर विजेच्या दिव्यांनी आणि नलि-कांनी गूलाकृति उमटली होती. तिन्ही बाजूंनी मंदिराकडे येऊन मिळणाऱ्या वाटा टयूबलाईटस्नी झगमगत होत्या. दूर कुठेतरी सुरेल नागस्वर मृदंगम्चा थाट घेऊन आणि सनईचा घाट घेऊन कर्नाटक संगीत आळवत होता तर

मधेच एखाद्या मंडपात चौरस्त्याच्या असंख्य श्रोत्यांमधे बसून कुणी प्रवक्ता प्रवचन करत होता. संस्कृत श्लोकांच्या आधारानं मधूनच कीर्तनाची लय उठवीत होता. असं सगळीकडें उत्साहमय झालं होतं.

देवद्वार तर अपूर्व शोभेत नटलं होतं. तिथे उत्सव अधिक सांस्कृतिक रूप धारण करत होता. दीपशोभांबरोबर माडापोफळीच्या फांद्या ठिकठिकाणी लटकत होत्या. आंब्यांच्या टहाळयाची तोरणं आणि केळीच्या झाडांच्या कमानीतून त्यांचे फळभारांनी नम्र झालेले लोंगर वाकून नमस्कार करून जणू सांगत होते. 'हा उत्सव आहे. पण असा तसा नाही. उद्या संध्याकाळी स्वामी रथाशीबीकानून बाहेर पडतील. मग गजारूढ होतील आणि ज्ञानशक्तिनं तारकासुराचा आणि इतर असुरांचा संहार करतील. विजयाचे नगारे वाजवीत स्वारी परतेल. आणि परवा पहाटे त्याचं लग्न होईल इथे या मंडपात. म्हणून आमची दाटीवाटी. म्हणून ह्या जमिनी रांगोळयांनी नटल्या आहेत. म्हणून हे जलकुंभ आंब्याची पानं आणि वर नारळ ठेवून रांगांनी सजले आहेत !'

छोट्या आकाराचे दोन कोट पायऱ्यांनी खाली उतरले होते आणि जमिनीच्या खाली निजमंदिर विस्तारलं होतं. दारात दर्शनार्थींची एकच गर्दी उसळली होती. पुरुषमंडळी फक्त पंचे किंवा 'मुंडू' नेसून आंत घुसण्याची घाई करत होते तर त्यातूनच मद्रदेशीय ललनाही दर्शनाची वाट शोधत मागे पुढे होत होत्या. सर्वांना लवकर दर्शन हवं होतं. दर्शन घेतलेल्या मंडळींना लवकर बाहेर निधावसं वाटत नव्हतं. हे सगळं नियंत्रणाखाली ठेवणारी व्यवस्था अति तुटपुंजी ठरूं बघत होती. कितीतरी वेळ अशा अवस्थेत ताटकळावे लागले. पण दर्शनाशिवाय का तिथे काही दुसरं महत्त्वाचं होतं ? दर्शनाशिवाय का दुसरा काही पर्याय होता ? छे ! दर्शनाची भूक दर्शनच भागवू शकणार होतं.

दोन प्राकार पार पाडले आणि आम्ही गर्भगृहांत दाखल झालो. समोर देवाची उत्सवमूर्ति दिसत होती. सुवर्णकवच घातलेली दैदिप्यमान. सहा तोंडे बारा हात. दो बाजूला अलंकारांनी नटलेल्या वस्त्रांनी सजलेल्या दोन भार्या. मस्तकावर उंच मुकुट. सर्व हातांत युद्धशस्त्रास्त्रे. पुढच्या हातात ज्ञानशक्ति शूळ. सबंध वेष पौराणिक सैनिकासारखा. पुढे मयुर वाहन आहे. असं ते सारं

दृश्य मिरवणुकीसाठी जणू तयार होतं. दिव्यांच्या नानाविध रंगात ती स्वरुपं रसरसती शोभा दाखवीत होती. डाव्या बाजूला मूळ मूर्तिचा गाभारा होता. तिकडे रांग वळत होती. तिकडचं दर्शन आधिक महत्त्वाचं होतं.

काळोख्या गाभाऱ्यात धूप पात्रात दिवे ढणाढणा जळत होते. जळणाऱ्या धूपानं सगळं वातावरण कोंदाटलं होतं. लोक गर्जना करत होते. जयजयकार करत होते त्यांच्या लाडक्या देवाचा. दक्षिणेच्या लाडक्या लोभस कुमाराचा. देवाच्या प्रबळ प्रतापी योध्याचा. सेनापती स्कंदाचा. नारळं फुटत होते. असंख्य हार आणि फुलं उधळली जात होती.

आणि त्या साऱ्या गडबडीत तो उभा होता शांतपणे. उत्सवातून तो षण्मुख म्हणून मिरवणार होता. द्विभार्याचा पती म्हणून उभा रहाणार होता. बारा हातांमधल्या शस्त्रांचे प्रहार असुरांवर घालणार होता. पण इथे त्याचे त्यापैकी काही एक नव्हते. बाहेरचा उत्सव बाहेरच रोखून तो आतमधे फक्त दोन दीपांच्या संगतीत सुवर्ण कमलाकर समचरणी उभा होता. मकर कुंडलांनी आणि मणीरत्नांनी जडावलेल्या मुकुटानी तो एकमुखी स्कंद चतुर्भुज श्यामसुंदर नारायणासारखा शोभत होता. त्याच थाटात तो उभा होता. संबंध देहावर केशरचंदन चर्चिलं होतं. गळयातल्या माळात रत्नमाणकं चमकत होती. त्यातच फुलांची पायघोळ माळही शोभत होती. नीटस नेसल्या पीतांबराचे रूंद काठ झाकून टाकीत हिरव्या रंगाचं कटिवस्त्र भोवती गुंडाळून घेतलं होतं. खांद्यावरून दोन्ही भुजांचा आधार घत गर्द गुलाबी रंगाचं मोठाल्या सोनेरी काठाचं झगझगत्या पदराचं वस्त्र कमरेच्या दोन्ही बाजूला समांतर लोंबत होतं.

मूर्तिचा सगळा थाट आणि ठेवण विष्णूमूर्तिची. मागले दोन हात आणि पुढचा उजवा हात तसाच पदकमलं दाखवणारा आणि डावा हात कटीवर किंवा मांडीवर. उजव्या हाताला ओठंगून त्याचं आवडतं शस्त्र भाला, कपाळावर विभूतीचा दाट थर, मधे कुंकुमाचा थोरला टिळा. वयान बाल नव्हे, किशोर नव्हे, खास तारुण्यही नव्हे पण पोक्तपणही नव्हे असा. फार आंबट नाही अगदी गोड नाही अशा गाभुळल्या चिंचेसारखा साजरा गोजरा देव गर्दी न्याहाळतो आहे. दर्शनार्थिना बघतो आहे. केलेले दिलेले उपचार स्वीकारतो आहे. त्याच्या शांततेची आज कसोटी आहे. भाऊ गर्दीत

तो आज सापडला आहे. त्या तेवढ्या गर्दीतही त्याला बघून घेतले. त्याचा प्रसाद म्हणून उगाळल्या चंदनाचा श्रीखंडासारखा लेप हातावर पडला. पुरुष भाग्यवान. त्यांनी तो आपल्या साऱ्या उघड्या अंगावर फासून टाकला. विभूति आणि चंदनाचं अजब मिश्रण हातांना मुखांना लावलं फासलं आणि बाहेर पडलो. सगळेच विभूतीधारी शिवगण झालेले. हंसायचं कुणी कुणाला ?

सध्याकाळ जवळ जवळ टळून गेली होती. एरव्ही पाचूसारख्या लाटांचा आणि हिरकण्याच्या फेसाचा वाटणारा तो महोदधी आता काळोखाच्या फेऱ्यात सापडला होता. लाटांच्या गर्जनांचे आवाज तेवढे ऐकू येत होते. पायाला मऊ मऊ थंड वाळू लागत होती. पण तिचं पांढुरकं गुलाबी रूप दिसत नव्हतं.

मऊ हिरवळ आणि मऊ वाळू जणू बसायचाच आग्रह करतात. उभं राहून थकलेल्या शरिराला त्या मऊ वाळूमधे प्रशस्तपणे विसाव्यासाठी सैल सोडलं आणि समोरच्या मंदिराची शोभा बघत बसून राहिलो.

एकूण पाहिलेल्यामधे हे पाचवं सुब्रम्हण्य क्षेत्र मी बघत होते. पहिली चारी टेकडीवरची होती. तिरुतण्णी, तिरुपुरकुंड्रम, स्वामीमलै आणि पळनीचा सुब्रह्मण्यस्वामी. सारे टेकडीचे रहिवासी. पण तिरुच्चेंदूरचा हा षण्मुखानंद समुद्राच्या किनाऱ्यावर आपलं लीलाक्षेत्र मांडून बसला होता. इथंच त्यानं तारकासुराशी संग्राम माडला. त्याला मारून ते समर जिंकलं. आणि आपल्या देवसेना आणि वल्ली या दोन्ही पत्न्यांसह इथेच सुखानं संसार केला. इथे त्याचा नित्य वास आहे.

सारी दक्षिण दिशा त्याच्या लीलाप्रसंगानी भारून गेली आहे. दक्षिणेत एकही गाव नसेल की जिथल्या शिवमंदिरात कार्तिकेयाची मूर्ति नसेल किंवा त्याचं स्वतंत्र मंदिर नसेल. दाक्षिणात्यांच्या ऐहिक आणि पारमार्थिक संसारात या स्कंदाची किंवा मुरगा स्वामीची सोबत आहे. पण आश्चर्याची गोष्ट अशी की नीलगीरीच्या रांगा ओलांडल्या, म्हैसूर आंध्राच्या उत्तरसीमा ओलांडल्या की तहत् हिमालयापर्यंत कार्तिकस्वामीचं मंदिर ब्रह्मदेवाच्या मंदिराइतपत दुष्प्राप्य आहे. तात ब्रह्मदेवांना किमान वेदापासून हिंदूच्या

षड्दर्शनापर्यंत सगळीकडे मानाचं स्थान आहे. पण कार्तिकस्वामीचा उल्लेख अठरा पुराणाच्या महासागरांत फक्त स्कंदपुराणातच विस्तृतपणे दिसतो.

शिवपुराणामधे थोडा उल्लेख आहे. काही ब्रह्मवैवर्त पुराणामधेही आहे. पण आहे तोही एकमेकाशी विसंगत आहे. शिवपुराण म्हणते तो आईबापावर रुसून विवाह न करता निघून गेला आणि अखेरपर्यंत कुमारावस्थेतच अविवाहीत राहिला. 'ब्रह्मवैवर्त म्हणते तसं नाही. भगवान् विष्णुंनी त्याला कृत्तिकांकडून आणवले आणि त्याच्या लौकिक मात्यापित्यांची गाठ घालून दिली. तारकासुराच्या पारिपत्यासाठी देवसेनेचं अधिपत्य दिलं. नंतर अनेक देव देवतांनी त्या कुमाराला अनेकनेक अमूल्य उपहार अर्पण करून त्याचा सन्मान केला. त्यातच प्रजापतीनं त्याला अत्यंत सुलक्षणी अशी देवसेना नावाची कन्या विवाहविधीपूर्वक अर्पण केली. त्यामुळे देवांच्या या प्रिय नेत्याला देशात काही ठिकाणी अतिशय लाडकं स्थान मिळालं आहे. इतकं की तो प्रेमाचा देव आहे. इष्टवर प्राप्तीसाठी आणि पतिप्रेमाच्या चिरंतनत्वासाठी मायबहिणी त्याची आराधना करतात.

तर काही ठिकाणी एकतर त्याचं मंदिरच नाही. आहे तिथे ' स्त्रियांनी दर्शन घेणं शास्त्रबाह्य' या शापांत जगू तो सापडलेला आहे. त्यामुळे दक्षिण सोडली तर इतर कुठेही त्याच्या कर्तृत्वाच्या मानानं आपुलकी आणि जनमानसातील आदर यांनीहि वंचित झालेला अशी त्याची अवस्था आहे.

इतर देवतांसारखा त्याचा जन्मही ' अयोनिसंभव ' आहे. तारकासुरासारख्या प्रबळ पाशवी दैत्याचा वध करील अशी शक्ति त्यावेळी देवांना हवी होती. शिव आणि शक्ति यांच्या मिलनातूनच हे संभवनीय आहे अशी देवतांची समजूत होती. वैराग्य सोडून शिवानं अनुरागाचा आश्रय घेणं आवश्यक होतं. देवतांची शिकस्त चालली होती. पण वैराग्याचा पुतळा तपस्येच्या भंगामुळे खवळून उठला. आणि त्याने मदनच जाळून टाकला. शेवटी उःशाप प्रकरणातून त्यानं देवाचं गाऱ्हाणं ऐकून घेतलं. मग विभूतीचं उधळण सोडून अर्धांगी पार्वतीला तो अनुरागाच्या सुमनमाळांचा शृंगार

दाखवू लागला. पण शिवाचं प्रखर तेज धारण करील असं कोणी दिसेना. शेवटी ते काटयांच्या सरडयाच्या जंगलात पडलं आणि तिथंच एका तेजस्वी बालकाचा जन्म झाला.

सूर्य म्हणाला त्याला उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मी लवकर अस्ताचलाला गेलो. रात्र म्हणाली त्याला निशाचरांनी त्रास देऊ नये म्हणून मी सूर्याला लवकर उठण्याची प्रार्थना केली. मुलाला भूक लागली. ते तळमळून रडूं लागलं. बदरिकाश्रमातून सहा कृत्तिका स्वस्थानी जात असता त्यांच्या कानी हा कोमल रुदनस्वर गेला. त्यांनी कळवळून त्याला उचललं आणि



आपल्यावरोबर घेऊन गेल्या. त्यांनी त्याला लहानचं मोठं केलं. त्या साही आयांचं प्रेम हा सहा मुखांनी प्याला.

काटयाकुटयांत जन्मला म्हणून तो 'शरवनभव'. कृत्तिकांचा पौष्यपुत्र म्हणून कार्तिकेय. सहामुखांचा तो षडानन किंवा षण्मुख म्हणून नांवाजला. तसा तो स्कंद आहे, मुरुगन आहे, शेयोन आहे आणि ब्रह्मदेवाची एक अप्रतिम निर्मिती म्हणून तो 'सुब्रह्मण्यम्' ही आहे. याशियाय सेनानी, कुमार गुह, तारकाजित ही त्याची नावं आहेत.

हा असा आईवेगळा वाढलेला दिव्यपुत्र शिवगणांनी वोलावून दिव्यसभेत नेला. तिथं त्याला त्याचं अवतारकार्य समजावून सांगण्यात आलं. आणि त्याला सेनापती पदाचा अभिषेक करण्यात आला. श्रीहरीनं क्षीरसागराच्या संपत्तीनं त्याला सजवलं. ब्रह्मदेवानं त्याला यज्ञसूत्र वेद, वेदमाता गायत्री इत्यादिंची दीक्षा दिली आणि ब्रह्मास्त्र दिलं. शिवानं मृत्युंजय ज्ञान, योगज्ञान आणि त्रिशूल, परशु, धनुष्य इत्यादी आयुधं दिली. इतरही देवदेवतांनी त्याला कुणी छत्र, कुणी रथ, कुणी यमदण्ड हे दिलं. तर आईनं मेधा, दया, स्मृति, निर्मल बुद्धि, शांति हे दिलं.

त्यानं हे सारं घेतलं आणि तारका सुराला युद्धासाठी आव्हान केलं. समुद्रा किनारी युद्धात ज्ञानशक्तीच्या साह्यानं त्याचा पाडाव केला. आणि देवांन- त्रिभुवन निष्कंटक केलं. पण युद्ध संपलं तरी त्याचं सेनापतीपद सुटलं नाही. त्यानं सगळीकडे गडकोटांचा आश्रय घेतला. मयुर वाहनावर आरुढ रहायला लागला. हातीची ज्ञानशक्ती किंवा 'वज्रवेलिल' नेहमी परजू लागला. त्यानंतरही सैन्यशक्तीची प्रतिष्ठा, विजय, व्यवस्था, अनुशासन हे त्याच्या कृपेमुळे होते अशी श्रद्धा तात्कालिन शासकामधे वसत होती. चतुर्वेदाच्या संहितेचा एक रचयिता म्हणूनही स्कंदाचं नाव घेतलं जातं.

वराह पुराण म्हणते देवतांचा मूर्तिमंत अहंकार म्हणजे स्कंद. लिंग पुराणही त्याच्या सबंधी थोडयाफार फरकानं हेच म्हणते. वैदिक ब्राम्हणांत म्हटलं आहे की पृथ्वीचा उदरस्थ अग्निला प्रजापती हे संबोधन आहे आणि त्याचे संवत्सराग्नी, कुमाराग्नी, चित्राग्नी इत्यादि पाच अवतार आहेत. त्यात कुमाराग्नि म्हणजे सेनापति स्कंद. संवत्सराग्नीचं रूपकात्मक वर्णन करताना म्हटलं आहे की संवत्सराचे म्हणजे वर्षाचे सहा ऋतु म्हणजे त्याची सहा मुखं आहेत. बारा महिने हे त्याचे बारा हात आहेत. किंवा मन आणि पंचज्ञानेंद्रियेच तो षण्मुख आहे. इच्छा आणि क्रिया या त्याच्या दोन भार्या आहेत आणि ज्ञान ही त्याची शक्ति आहे.

तामीळ लोकगीतामधे त्याचे वर्णन तो रंगानं लाल आहे, तो प्रेमाचा देव आहे, असं केलं गेलं आहे. हा मुरुगन् देव वृत्तीनं शिकारी बाण्याचा आहे. अन्यायाचा भेद घेण्यासाठी त्याचा शूल नेहमी उगारलेला असतो आणि

मोरावर बसून वायुवेगानं तो भक्ताकड धावत येतो असं तामीळची भोळी भावडी लोकगीतं म्हणतात.

तीच तामीळनाडची भोळीभावडी लोकगीतच देवाला वेढून उभी असलेली दुपारपासून मी बघत होते. रात्र होत होती पण गर्दी खळत नव्हती. आज रात्री मंदिरात दिवा विझणार नव्हता. कुठलंही दार आड केलं जाणार नव्हतं. देवाच्या डोळयाला डोळा लागणार नव्हता. रात्रभर मोटारी भरभरून जत्रा येताना रस्त्यांना विश्रांती मिळणार नव्हती. राहिलेली उत्सुकता दुसऱ्या दिवसासाठी हृदयाशी धरून ठेवून मी वाळूची ती ऐसपैस बैठक मोडली.

दुसऱ्या दिवशीच्या गर्दीचं आणि त्या उत्साहचं वर्णन करणं अशक्य आहे. आदल्या दिवशी सायंकाळी अर्ध्या तासाच्या झटापटीनंतर दर्शन मिळालं होतं. पण त्या दिवशी लांबच लांब लागलेल्या रांगा बघून मात्र दिवसभरात आज दर्शन होईल की नाही याबद्दल खात्री वाटत नव्हती. तरी रांगेतून उभं राहून आम्ही दर्शन घेतलंच. रांगामधे रेंगाळत पुढच्या मागच्या लोकांबरोबर विविध भाषांमधून बोलण्याची सर्कस करत त्यांच्या संगतीचा आनंद घेत दर्शन घेतलं. त्या दिवशी स्नानासाठी तयार ठेवावं अशी वेषभूषा होती. चंदनाची चर्चा गेली होती! आणि मणीरत्नांचे झळाळही उतरले होते. उत्सवमूर्तिसाठी मात्र 'याने' तयार होती. दूर दाराजवळ लाल रेशमाच्या अल-वणाची कितखापी नक्षीदार झूल घालून कानामागे मोठमोठे गोडे डुलवीत एक हत्ती झुलत होता. आपल्याच गळयातली घटा सोंडेनं वाजवून मुलांना गंमत दाखवणारा हत्ती देवाची स्वारी घ्यायला तयार होता. त्याच्या पाठीवर छोटेखानी पाळण्याची अंबारी होती. वर छत्र होतं.

संध्याकाळी सहा वाजले. तोफांचे गडगडाट झाले. युद्धाचे प्रारंभिक इषारे झाले. धर्मशाळेपुढची केवढी मोठी वाटणारी जागा आलेल्या मोटारींनी पूर्ण भरून गेली. आडवाट काढणंही केवळ अशक्यप्राय झालं. मंदिरात आणि भोवती यात्रेकरूंची गर्दी दाटली समुद्राच्या किनाऱ्याला भाविक भक्तांची भरती आली. अनेक आवाजाच्या संमिश्र गोंगाटात नगारे गर्जू लागले. शंख-ध्वनी धडकू लागले. शिंग वाजले, रणतरे फुंकली गेली. बीजघंट बडवली जाऊ लागली. आणि मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी देवाचं सजवलेलं यान मोठ्या झपाट्यानं मंदिराबाहेर पडलं. शिवगणांची मिरवणूक चालावी तसं

विचित्र वाद्य घेतलेली. हृदयात दडपण बसेल असा आवाज करींत ती पदयात्रा मंदिराला उजवी घालून येऊ लागली.

देवयान हत्तीजवळ थांबलं. देवाला सजावटीच्या हौद्यात घेतलं. हत्ती चालू लागला. तो वाद्यमेळ त्याला आपल्यामागे घेऊन जाऊ लागला. समुद्राच्या पुळणीवरून गर्दी गर्दीतून वाट काढीत हत्ती चालत राहिला. थोडं दूर, वल्लीगुंफेच्या टेकाडावर देव जाऊन थांबले. वाद्यांचा गजर चालू होता. मोरचेलाची हालचाल चालू होती. उंच उंच काठ्यावर मोठमोठे हिलाल जळत होते. हत्ती समुद्राभिमुख उभा राहिला.

महाभयानक तोफेचा गडगडाट झाला. युद्धाला तोंड लागलं. जे युद्धदृश्य पाहण्यासाठी खास एवढी गर्दी दाटली तो अद्‌भुत नि चित्तथरारक प्रसंग चालू झाला. महाभयंकर आवाज करीत शस्त्रास्त्र फेकली जाऊ लागली. त्यांचे उधळणारे शतरंग आणि काळोख्या आभाळांत दिसणारे त्याचे शोभिवंत आकार दृष्टीची धणी फेडू लागले. शोभेच दारूकाम किती कौशल्यान हाताळलं जात होतं. हत्तीवरून निघणारं एखादं अस्त्र समुद्रावर जाऊन परतत होतं. जणू तो असूर सगळी अस्त्र परतवीत होता. एखादं समुद्राकडेही परतत होतं. ठिणग्या उडत होत्या. लाल, पिवळ्या, सोनेरी, चंदेरी, आणि हिरव्या निळ्या देखील.

वाद्यं जोराजोरांनी वाजताहेत. घनघोर युद्ध चालू आहे. एवढा जनसमुदाय चित्रवत् तटस्थ होऊन उभा आहे. देव युद्ध कौशल्य दाखवतो आहे. एवढ्यात एक महाभयानक अक्राळ विक्राळ शक्ति देवाच्या हातून निघते आहे. एखादं अंतराळयान सुटावं तसं रो–रो धुम्–धुम् चा आवाज करीत आणि समुद्रावर थोडया दूरवर जाऊन तिचा भयंकर स्फोट होतो. आवाजानं आणि प्रकाशानं दशदिशा भरून जाताहेत आणि त्या प्रकाशात तारकासुराची विकट विक्राळ आकृती काड्–काड्–काड् आवाज करीत दाणकन् समुद्रात आदळते आणि युद्ध प्रसंग समाप्त होतो. देव हत्तीवरून उतरतो. छानश्या विमानात बसतो आणि वाजत गाजत, थांबत थांबत मंदिराकडे येतो आहे. लोक फुलांच्या माळा उधळताहेत. बत्तासे उधळताहेत. विजयी सेनापती शिबिरात परततो आहे. आता मघाची कर्णकटु वाद्ये वाजत नाहीत. भक्तांनी त्याला

आपल्या ताब्यांत घेतलं आहे. त्याच्या चरित्रलीला वर्णन करणारी भजनं म्हणत रिझवीत गात नाचत त्याला परत आणत आहे.

त्या दिवशी स्वस्थानी परतलो तर मनात स्कंदषष्ठीचं दारुकाम उसळत होतं. लोकांचा उत्साह आणि आनंद मुक्त कारंज्यासारखा थुई थुई उडत होता. कार्तिकस्वामींना आपल्या भक्तांसाठी केवढं मनोहर युद्धकाम करून दाखवावं लागलं. खूप खूप मजेचं दृश्य बघायला मिळालं. त्या दिवशी. अगदी ठरवून आलो असतो तरी असा योग क्वचित लाभला असता.

हो. युद्धलाघव बघून अनुरक्त झालेली वल्ली आता दरबारात येईल. आणि माहेरच्या सगळ्या विरोधांना बाजूला सारून त्या किरातकन्येचा मध्यरात्री स्वामींशी विवाह होईल. ते सारे यात्री ती लग्नाची पानसुपारी घेऊनच परतणार होते. पळनीच्या अर्ध्या मुंजीतून आम्ही मांडव सोडला. इथेही आम्हाला तसच करावं लागणार होतं. लग्नाचा अंतरपाट धरण्या-आधीच आम्हाला ‘ सुब्रह्मण्यस्वामी ’ ची तीं निसर्गरम्य राजधानी सोडावी लागणार होती. लक्षात रहाणार होतं ते समुद्राकाठचं रंगीबेरंगी युद्धच ! आणि त्या स्मरणातच दंग असताना गाडी ‘ तिरुच्चेंदूर ’ पासून दूर दूर जाणार होती.

१७

# शुचिंद्रम्

तिरुच्चेंदूरच्या सागरदर्शनानं या विशाल भारताची एक कड दिसली. रामेश्वर मंडलाला वळसा घालून गंगासागर हिन्दी महासागर आणि सिंधू सागराला मिळण्यासाठी संगमोत्सुक होऊन निघालेला तिरुच्चेंदूरला दिसत होता. आम्हीही आता तिकडेच निघालो होतो. भारतातल्या सगळ्या जीवनदायिनी लोकमातांचा प्रवाह घेऊन तीनही महोदधी कन्याक्षेत्रात एकत्र आले होते. कन्याकुमारीच्या नाजुक पावलाभोवती त्यांच्या भक्तीभाव अनादिकालापासून लाटालाटांनी उधळला जात होता. युगानुयुगे त्यांच्या गंभीर ध्वनीचा शांतिपाठ ऐकत कन्याकुमारी तिथे वाट बघत उभी होती. भारताच्या यात्रेकरूंचे एक मोठे तीर्थक्षेत्र, रसिकांचे आणि परदेशी मुशाफिरांचे एकमेव आकर्षण असा कन्यकुमारीचा सागरसंगम बघायला आता जायचं होतं. त्या आनंदात तिरुनेलवेल्लीला रात्र कशी गेली ते समजलं नाही तिरुच्चेंदूरचे यात्री रात्रभर परतत राहिले. गाड्या सारख्या जात येत राहिल्या.

तिरुनेलवेल्लीची बसेसची यातायत फार मोठी आहे. शेकडो बसेस उभ्या असतात. त्यांची अगदी पहाटपासूनची वर्दळ शहराला फार लवकर जागं

करते. काही थेट कन्याकुमारीला घेऊन जातात तर कांही फक्त नागर-कॉईललाच पोचवतात. तिथून कन्याकुमारी केवळ अकरा बारा मैलाचा पल्ला आणि नागरकॉईल ते कन्याकुमारी बसेसही खूप. त्यामुळे कसंही गेलं तरी गैरसोयीची भीति नसते.

सकाळीच बसनं तिरुनेळीवेल्ली सोडली आणि ती नागरकॉईलकडे धावू लागली. संबध रस्ता कसा स्वच्छ काँक्रीटचा वेळही सकाळची सूर्यनम-स्काराची. स्त्रोत्र भूपाळ्या गाण्याची. वातावरण कसं नितळ. सूर्याची कोवळी किरणं झाडापानातून झिरपत होती. तळचामळचा ं शिरत होती. उघड्या रस्त्यावरून वाळत होती. सृष्टीचं चैतन्य नवीनत्वानं फुलून येत होतं. घर-ट्याकोटरातून जाग आली होती. झोपड्या खोपट्याच्या झडपा उघड्या झाल्या होत्या. पशुधनाला दाही दिशा मोकळ्या झाल्या होत्या. भाताच्या खाचरातून पाचूचा समुद्र उन्मत्तपणे सळसळत होता. ताडमाड आणि पोकळी शिंदी देखील तोरणाच्या पानांचा संभार सोंडामधे ऊंच उचलून गजेंद्र-मोक्षाचा देखावा दाखवीत होत्या.

सूर्यनारायणाला ते सारं बघत उभं राहण्याइतपत वेळ नव्हता. त्याची भ्रमंती चालू झाली होती. वाऱ्याची गती मंदावली होती. उन्हाचा नवथर-पणा जाऊ बघत होता. सावल्या हळूहळू जवळ येत होत्या. मोटार भरधाव पळत होती. छोटीमोठी गावं लागत होती. दुरून येणारी गाडी बघून टाळ्या वाजवणारी आपल्या खेड्यासारखी उघडी नागडी लेकरं तिथंही दिसत होती. आंधळे अपंग तिथंही भोवती घुटमळत होते. आणि शेव–चकल्याची वेढी पाट्यात घेऊन 'मोरू मोरूकु' ओरडणारे विक्रेतेही आपल्याकडच्याच आवि-र्भावात गाड्यातून शिरत होते. त्या सगळ्या जंजाळातून गाडी वाटेला लागली की परत ती मैलोमैल पसरलेली धनलक्ष्मी धान्यलक्ष्मी सुवत्तेचं सुलक्षणी हरित सौभाग्य दाखवीत होती.

रुंद आणि स्वच्छ रस्त्याचं मात्र नवल वाटावं. कितीही मोठाली वाहनं परस्पर दिशाहून येऊन जराही वेग कमी न करता पलीकडे जात होती कुठे थांबणे नाही. मागे घेणे. ड्रायव्हर साईड, क्लिनर साईड घेणे, मग थोड्या गप्पाटप्पा, काही नाही. सरळसोट रस्ते. आवश्यक सूचनांचे माहितीचे फलक. सगळं कसं अगदी जिथल्या तिथे.

दहा वाजायला नागरकॉईल आलं. खूप मोठं शहर एवढंच त्याचं वैशिष्टच नाही तर दक्षिणेच्या टोकाचं शेवटचं व्यापारी शहर हे त्याचं विशेष आहे. इथून पुढे रस्ते अगदी भूमी संपेपर्यंत गेले आहेत. पण त्याचं महत्त्व शरिरातल्या किरकोळ नखांसारखं.

कन्याकुमारीची बस तावडतोब मिळाली. आणि पुढची यात्रा सुरू झाली. केवढी उत्सुकता असते नाविन्याबद्दल. कुठं काही अद्भुत असेल, नवल असेल तर उत्कंठा लहान मुलासारखी अधीर होते. कसा असेल तो प्रदेश की जिथे समुद्राभिमुख उभं राहिलं की सारा देश पाठीमागे रहातो आणि पुढे सगळी भूमि संपते. भूमिचरांची गती खुंटते असं ते टोक. विलंब आता खुपत होता. दूरत्व खपेनासं झालं होतं.

पण दारामागे दार आणि दालनामागं दालनं ओलांडली तरी स्वामीनीच्या भेटीसाठी आणखी दारं आणखी एखादा प्राकार रहावा तसा कुमारीच्या भेटीच्या प्रवासात झालं. कन्याकुमारी आता आठ मैल उरली होती आणि बस उभी राहिली. उतरणारी उतरू लागली. आणि शेवटी आम्हीही उतरलो. समोर एका मोठ्या पुष्करिणीच्या पलीकडे एक गोपुरम् झगमगत होतं. दहा मजल्यावरचे सप्तर्षिसारखे सात कळस उन्हांत सुवर्णकांतीनं तळपत होते. आणि समोरच्या पिवळ्या पाटीवर तामीळ अक्षरांच्या नक्षीखाली इंग्लिश अक्षरं रेखाटली होती ' सुचिंद्रम् '

कुमारीदेवीशी विवाह करण्यासाठी लवाजमा घेऊन निघालेला शिव इथे थांवला. इथे थांववला गेला. देवाचं लुटुपुटीचं कपट सफळ झालं नि नारदानं कोंबडा होऊन अवेली बांग घातली आणि मुहूर्त टळून गेल्याचं जाहीर केलं. बिचारा महेश हिमालयापासूनचा पल्ला गाठीत आला नि केवळ आठ मैलांच्या अंतरानं त्यानं त्याला फसवलं. त्याची गती रोखली आणि आता तो इथेच थिजून बसला आहे. कन्याकुमारी मात्र तिकडे त्याची वाट बघत अजून सागरतीरी तिष्ठत आहे. दोघांच्यामधे आहे आठ मैलांची नागमोडी वाट.

' सुचिंद्रम् ' किंवा ' शुचिंद्रम् ' क्षेत्रही अतिशय प्राचीन काळचं आहे. वास्तूही त्या मानानं प्राचीन आहे. स्थापत्यशास्त्रज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे मंदिरानं कमीतकमी आठव्या शतकापासूनचा इतिहास पाहिला आहे. जुन्यातली

जुनी कागदपत्र सांगतात की पांड्य राजांच्या काळात किमान इ. सन ८०० ते ९०० मध्ये मंदिर अस्तित्वात होतं. त्यावेळी 'माइन्पाण्डयन्' राजा सार्वभौमपदी होता. म्हणजे कन्याकुमारी क्षेत्राचही पुरातनत्व अनायसे सिद्ध होतं.

उन चढत होतं. पुष्करिणीतल्या पाण्यांतून किरणांचं परावर्तन होत होतं. मंदिराच्या तटावर पाण्याच्या तिरीपांची नक्षी हेलकावत होती. मुलं माणसं यथेच्छ स्नानसुख अनुभवित होती. लेकीसूना नि आयाबायांची धुणीपाणी चालली होती. मंदिराची दारं बंद व्हायला थोडाच अवकाश होता. त्यामुळ घाई करणं भाग होतं.

गोपूरद्वारातून आंत शिरलो. एक उघडा प्राकार ओलांडून मुख्य प्रवेशद्वारा पाशी आलो. भोवतीची सारी नक्षी आणि अद्याप चांगली उभारी असलेली एकूण एक शिल्प रंगवली गेली होती. हा प्रकार एकदम नवीन होता. पण त्या तैलरंगांनी सगळं शिल्प शिमग्याचं सोंग दिसत होतं. इतक्या उठावदार शिल्पाला अगदी वेंगरूळ स्वरूप मिळालं होतं. करणाऱ्यांना काही चांगलं करून दाखवायचं होतं. पण अदूर दृष्टीमुळे त्या अपूर्व कलाकृतीचा मात्र अपमानच झाला होता. त्यातच मदिराच्या कचेऱ्या होत्या. समोर सस्कृत पाठशाळा होती. तिथून कुठल्याश्या संस्कृत स्तोत्रांच संघगायन बालकंठातून गायल जात होतं.

आंतमध्ये मुख्य दरवाजासमोर नंदीमंडप होता. मदिराचं खरं शिल्प सुरू झालं होतं. काळाभोर पाषाण त्या प्रत्येक कलाकृतीला उठाव आणीत होता नंदीमडपाचं छत उचलून धरणारे स्तंभ बघत रहावेत इतके रम्य आहेत. स्तंभ म्हणजे मूर्तिच आहेत त्या. रति आणि मदनाच्या. मदनाचं गुलाबाच्या फुलासारखं लोभस रूप तर रतिची नाजूक चंपाकळीसारखी सुकोमल काया. सुंदर मोराच्या गर्वोन्मत्त मानेसारखं आणि एक एक पावलाच्या रूबाबदारं पदन्यासासारखं मदनाचं सौंदर्य तर चमेलीच्या गजऱ्यासारखी मान गोल वेळावणारं चांदण्याचे पंख लावून दुधाच्या समुद्रात हळुवार विहरणारं रतीचं सौंदर्य म्हणजे संगीत आणि नृत्याची जुगलबंदीच. मदुरैच्या षडज् धैवत पंचमाचे आवाज काढून पत्थराच्या हृदयातलं संगीत प्रकट करणारे ते स्तंभ आठवले. पण इथल्या प्रस्तरांनी शृंगारांचं, लावण्याचं जे दृश्य दाखवलं ते केवळ

अविस्मरणीय होतं. आणि गंमत अशी की त्यांच्यामधे एक सुरेख खराखुरा मोर आपल्या सप्तरंगी पिसाचं ओझं घेऊन खेळत होता. कधी रतीच्या तर कधी मदनाच्या खांद्यावर प्रीतीसंदेशाची नेआण करणाऱ्या दूतासारखा. रति मदनाच्या अशा नाजुक शिल्पांची सलामी घडली.

भारताचं मानचित्र नजरेसमोर धरलं तर उत्तरेच्या सर्वोत्तुंग शिखराला आम्ही गौरीशंकर म्हणून गौरविलं आहे. तर दक्षिणेत एका टोकाला शिव आणि अगदी शेवटी शक्तिस्वरुपिणी कन्या महिमा पावली आहेत. कृष्णेच्या दक्षीण तीरापासून तो तीनसागरांच्या पाण्यानी जिथे भारतमातेच्या पाया-भोवती तीन्ही बाजूंनी लोळणं घेतली आहे. तिथपर्यंत या विशाल आणि उंच उंच गोपूर मंदिरांची जी अखंड मांडामांड झाली आहे. त्यातलं मोठ्यात मोठ मदिर म्हणून शुचिंद्रम म्हणावं लागेल तर सर्वांत शेवटचं महत्त्वाचं तीर्थ म्हणून कन्याकुमारीला संबोधावं लागेल.

'शुचिंद्रम्' मंदिराचं आणखी एक वैशिष्टच म्हणजे ते त्रिमूर्ति क्षेत्र आहे. मुख्य मंदिरातलं हे शिवलिंग म्हणजे त्रयमूर्तिचा मनोहर संगम आहे. खरं तर अप्रत्यक्षपणे ते श्रीदत्तात्रय क्षेत्र म्हणायला प्रत्यवाय नसावा.

जननारण्य असा या क्षेत्राचा पौराणिक उल्लेख आहे. महर्षि अत्रि आणि महासती अनुसया त्यावेळी इथं वास्तव्य करून रहात होती. अत्रि दूर गेल्याचं निमित्त साधून अनुसयेचं सत्व बघण्यासाठी ब्रह्मा, विष्णू, महेश यांचं आगमन झालं.

न ददासि यदी प्राज्ञे विवस्त्राऽन्नं पतिव्रते ।
एतत्करोदकं मुक्ता प्राणांस्त्यक्षामहे वयम् ।।

ही सर्वश्रूत अट घातली गेली. प्रसंगात सापडलेल्या सतीनं केवळ प्रसंगा-वधानानं पतीचं चरणतीर्थ शिंपडून त्या जगच्चालक शक्तींची गोजिरवाणी बाळं करून टाकली. बाळाच्या मोठमोठ्या बायका घाबरून सतीच्या चरणी लागल्या. आणि तीन्ही देव परत सरळ झाले. तिच्या सतीत्वानं प्रभावित झालेले ते 'वरं ब्रूहि म्हणाले. तिनं त्यांचच मातृत्व मागितलं. तेव्हा ब्रह्मा झाला चंद्र विष्णू झाला दत्त आणि शिव दुर्वास. चंद्र आणि दुर्वास आज्ञा घेऊन निघून गेले. आणि तीन देवांचं महात्म्य घेऊन त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त अनुसयेच्या कुशीत वाढू लागला. पुढे जगत्त्र्यांचा परात्पर गुरू झालेल्या दत्तात्रेयांचा जन्म आणि त्याचं बालपण इथे या जननारण्यांत पार पडलं.



घडून गेलेल्या इतिहासाच्या खुणा दाखवणारी चिन्हं आता मुख्य मंदिरासमोर पसरली आहेत. मधे एक विशाल नंदीमूर्ति आहे. आणि नंदीच्या मागे आधार देऊन उभं ठेवलेलं एक झाड आहे. जननारण्याच्या अस्तित्वाची ही सांभाळून ठेवलेली निशाणी आहे. त्या झाडाखाली एक घुमटी आहे. त्यात त्रिगुणात्मक त्रयमूर्ति तीन मुखवटयासह बसवला आहे. तेच त्याचं जन्मस्थान सांगितलं जातं. तिथं झालेल्या कर्पुरारतीच्या वेळेला त्या तीनही मुखवटयांचं चमकदार दर्शन घडलं. सांगणाऱ्यानं सांगितलं की मूळ मंदिर हेच. देवाचा मूळचा श्रीविग्रह इथे आहे.

मदिराच्या या अव्याढव्य पसाऱ्यात या तीनही देवतांची वेगवेगळी मंदिरं आहेत. परंतु समोर जे मुख्य मंदिर दाखवलं जातं ते 'स्थाणुनाथ' मंदिर अतिशय जुनी रचना असल्यामुळे आंतल्या निजमंदिराची रचना काहीशी विस्कळीत आहे. रचनेत नीटसा पोच नाही. पण आतलं शिल्प मात्र अगदी अलीकडेच घडवून बसवले आहे एवढं टवटवीत वाटतं. केवळ नुसते नक्षीचे खांब जवळ जवळ नाहीत म्हटलं तरी चालेल. सगळी नक्षी 'मूर्तिमंत.' कुठे

कामलोलुप श्रृंगार आहे तर कुठे शस्त्रपूरित वीर रस आहे. कुठे गळचात अडकवलेल्या वीणा मृदंगातून संगीत उमटलं आहे तर कुठे खांबावरच्या आघातातून आजही प्रत्यही येणारं श्रुतिमधुर विनशब्दांचं गाणं आहे.

या सगळचा शिल्पाख्यात एक दार दिसतं. आत खूप माणसांची गर्दी- बाहेरच्या सगळचा कौशल्याकडे दुर्लक्ष करून आतल्या अंधारात चाचपडत देव शोधणारी माणसं. पण मनुष्य स्वभावाची ही नेहमीचीच गंमत आहे. समोर असतं ते त्याला नको असतं. पण नेमके काय हवं हेही त्याला कळत नाही. समोरचे दगड धोंडे पाहून, मोठमोठचा पर्वतशीळा पाहून त्याचं मन रमेना. त्याला देवाचा आकार आणण्यासाठी त्याने स्वतःच कौशल्य वापरलं. पिढचान्- पिढचा खर्च करून मिळवलेली सगळी विद्या कारणी लागली आणि मूर्ति तयार झाली. मग जणू त्यानं विचार केला असेल. छे ! हा कसला देव ! त्याचं शरीर माझ्यासारखं. याचे भाव माझ्यासारखे. यातून दिसणारे विकार माझ्यासारखे. हा असा देव नसेल. अन् त्यानं त्या सगळचा शिल्पांना दूर उभं केलं आणि अंधारात चाचपडत एक गुळगुळीत पत्थर घेतला. त्याची स्थापना केली. आपण निराकार निर्गुण परमेश्वराची स्थापना केली अशी स्वतःची समजूत करून घेतली.

दाण्यांनी भरलेल्या कणसासारखं टिच्चून शिल्प भरलेल्या खांबाभोवती मी फिरत होते. नि असलं काही मनात येत होतं. कारण वरून साजिरं श्रीमंत दिसणारं प्रत्येक मंदिर गर्भगृहात एकदम विरक्त होतं. शिल्पशून्य दिसून येत होतं. काही अपवादात्मक मंदिरं सोडली तर बाहेरच्या सारखं एखादं अप्रतिम शिल्प क्वचीतच कुठे अंतर्पीठावर प्रतिष्ठित झालेलं दिसत होतं.

पण निजमंदिराचं दारच असं होतं. प्रत्येक मंदिराच्या गाभाऱ्याला जणू अदृश्य उतार असतो. बाहेर माणूस कितीही बघत, गोंधळत राहिला तरी लहान मुलांच्या घसरगुंडीसारखा तो नेमका गाभाऱ्याच्या ठराविक दिशेला नि ठराविक वेगात जाणारच. आम्ही गाभाऱ्यात प्रवेश केला. आंतल्या अंधारा- वर दीपज्योतिंनी मात केलेली दिसत होती. त्यातही दिव्यांची कुशल मांडणी करणाऱ्यांनी अधिक शोभा आणली होती. आंत कुठे खोलवर नि उंचावर दीपज्योतीचं फिरतं प्रतिबिंब दाखवून प्रभावळीचा आभास निर्माण करणारं

एक यंत्र होतं. त्यापासून दोन्ही बाजूंनी चढत्या होत गेलेल्या दिव्यांच्या रांगा फार सुंदर दिसत होत्या. सारखा आकार, सारखं तेज हेच हे आणखी विशेष या दीपमाला जळत ठेवणारी पितळेची सारी उपकरणीही मोठी नाजूक आणि चकचकीत. त्याच्या मधोमध हारमाळांनी सजवलेलं शिवलिंग होतं. दोन अडीच फूट उंचीचं आणि एकदीड फूट व्यासाचं. लिंगावर श्रीशिवाचा मुखवटा आहे जटाजूट बांधलेला. मुखवटयाचा तो भाग शिवाचा. त्याच्याखाली श्रीविष्णू आणि मुळाशी ब्रह्मदेव असं ते त्रिगुणात्मक लिंग आहे. त्याचं नाव 'स्थाणुमालंयन'. स्थाणु, शिव, मालय, विष्णु आणि आयन् म्हणजे ब्रह्मा. त्याला स्वामिनायैन वडक्कडम स्थाणुमालय पेरूमाळ असंही म्हणतात.

आंत पूजेच्या दुरडचा सारून बाहेर माणसांची गर्दी आधिक अंधार करून उभी होती. प्रत्येकाच्या हातावर बिल्वपत्र, तुळशीदळ, विभूति मिळत होती. उजव्या बाजूच्या कुंडात पडणारं अभिषेकाचं दूध, पाणी, तेल किंवा फुलं देखिल खालून गुप्त मार्गानं कन्याकुमारीच्या स्थाणुतीर्थात जाऊन पोचतं अशी समजूत आहे.

'शुचिंद्रम्' मंदिरातलं हे प्रमुख मंदिर असलं तरी नैऋत्य दिशेचं 'कैलास महादेव' मुख्य मंदिराच्या उजव्या बाजूचं श्रीविष्णुचं आणि वायव्य कोनातलं ब्रह्मदेवाचं असं प्रत्येकाचं वेगवेगळं स्थान आहेच. ही सगळी मंदिरं दहाव्या शतकात अस्तित्वात होती असं सांगणारे अनेक पुरावे जतन करून ठेवलेले आहेत. 'शुचिंद्रम्' गावाचंच पूर्वीच नाव ब्रह्मदेव असं होतं. या सर्व मंदिरांची व्यवस्थित दर्शनं झाली आणि परत त्या कलाकुसरीच्या हाटांत आलो.

या मुख्य मंदिरापुढे आणि प्रथम बघितलेल्या अत्रिअनसूयेच्या स्थाना-मधे 'कोणरायदिनाथ' नावाचं स्वयंभू लिंग आहे. अत्रिअनसूयेच्या मागणी-प्रमाणे त्या त्रिमूर्ति प्रथम ह्या लिंगातून व्यक्त झाल्या. या मंदिराचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे ह्या मंदिराच्या उभं रहाण्याच्या विस्कळीतपणाचा फायदा घेऊन इथे खूप मोठमोठे मंडप निर्माण झाले आहेत. 'केम्पकरमन' मंडप, उदयमार्तंड मंडप, पूर्वेकडची नाटकशाळा, चहुबाजूची श्री बलीपुरे, चित्रसभा हे प्राकार खूप विशाल आहेत. तिथे देवाचे वेगवेगळ्या ऋतुतले त्सव आणि भारतभागवताचे सप्ताह आणि धार्मिक कार्यक्रम होतात. केम्प-

करमन मंडपातला पंचवीस फूट उंचीचा रंगीत मारुती मला वाटतं सबंध भारतात एकमेवाद्वितीय असेल.

नाटकशाळा आणि चित्रसभा म्हणजे वेगवेगळ्या शिल्पांचा एक आगळाच संग्रह आहे. या चित्रसभेमधे मदुरैला पाहिलेले उर्ध्वपद विन्यासाचे उर्ध्वतांडव शिल्प आहे. आदि शंकराचार्यांना या सभेत शंकराच्या तांडवाचं महादर्शन घडलं आणि प्रत्यक्ष श्रीमहादेवाकडून प्रणवाची दीक्षा मिळाली. ऐतिहासिक माहितीपत्राचे आधार असं सांगतात की मंदिराचं हे एकूण वैभव आणि हे भिन्न प्राकार वेगवेगळ्या राजसत्तांत उभारले गेले. शिल्पांमधेही तो भेद अभ्यासकांना जाणवतो. पांड्य राजा, चौलराजापासून तो विजयानगर. नायक आणि त्रावणकोर राजघराण्यापर्यंत सर्वच राजवटींनी आपल्या कर्तृत्वाचे ठसे इथे कोरून ठेवले आहेत. पशुपक्षी, देवदेवता, झाडंफुलं, वेल आदि वनस्पती आणि काही निसर्गदृश्ये या सर्वांना इथं जागा मिळाली आहे. शिवाय भित्तीचित्रे आहेत ती वेगळीच. पौर्वात्य गोपुराच्या आंत भिंतीवर आणि प्रत्यक्ष ' स्थाणुनाथ ' मंदिराभोवती आणि गर्भगृहातही एकूण पंचाहत्तर कलाकृतींचा उल्लेख मार्गदर्शक करतात. जी भित्तीचित्रे दिसली. त्यातही नंतर दिसलेल्या केरळच्या मंदिरामधल्या शैलीची बरीच छाया आढळते. तामीळ नाड आणि वेरुळमधे सापडलेला हा पहिला महत्त्वाचा दुवा. गोपुरं तर दक्षिणेकडे सगळ्या राज्यात आढळतात. एका ख्रिस्तीचर्चलाही या गोपुरम्‌नं वेड लावलं आहे.

नंतर पाहिला उदयमार्तंड मंडप. त्याचं वैशिष्ट्य शुचिंद्रम्‌च्या मंदिरात अद्यापही अस्तित्वात आहे आणि ' शुचिंद्रम् ' या नावाभोवती घुटमळून राहिलं आहे. इथलं प्रायश्चित्त जाज्वल्य आहे. इंद्रानं व्यभिचाराचा कलंक आपल्यामागे लावून घेतला. गौतमी शीळा झाली. श्रीरामाच्या पदस्पर्शानं ती पूनित झाली. तिचा बहिष्कार मावळला. पण क्षणिक मनोविकृतीच्या सबंध शरीरावर पसरलेल्या लज्जास्पद खुणा इंद्राला पोळू लागल्या. तिन्ही लोकातून धावपळ करीत इंद्र इथे आला. खडतर तप केलं. त्याहीपेक्षा विलक्षण प्रायश्चित्त त्याला घ्यावं लागलं. खळखळ उकळत्या तुपामधे त्याला आकंठ स्नान करावं लागलं. एवढं केल्यावर तो शुद्ध झाला. त्याचे कलंक जळून गेले. त्याचा दुर्लौकिक, अपकिर्ती झडून गेली आणि तो शुचिर्भूत झाला. स्वर्लोकीचं

राज्य उपभोगायला निघून गेला. इंद्राला शुची करण्याचा मान या क्षेत्राला मिळाला. हा गौरव नामांकित झाला. क्षेत्र झालं ‘ शुचिंद्रम् !’

याला, ‘ गोघन ’ क्षेत्रम् म्हणतात तेही याचमुळे. निरपराध जीवाला आपलं निरपराधत्व सिद्ध करण्यासाठी शुचिंद्रमला यावं लागे. तिथल्या व्यवस्थाधिकाऱ्यांना भेटून शुद्धीचा दिवस निश्चित करायचा. मग ठरलेल्या सुमुहुंतावर उभय बाजूंची मंडळी पहाटेच उदयमार्तंड मंडपात जमा व्हायची साधकही शुचिर्भूत होऊन देवदेवतांची दर्शन घेऊन तिथे हजर झाला की विधि सुरू होत असे.

एखाद्या खोल कढईत खूप तेल टाकलं जायचं. खालची लाकड पेटायची. इतर बारीकसारीक विधि होईपर्यंत तेल अति उच्च उत्कलन बिंदूपर्यंत गेलेले असायचे. बरोबर माध्यंदिनी टळटळीत बारा वाजता प्रायश्चित्त पार पडायच. त्या उकळत्या तेलात एक नाणं फेकण्यात यायचं. ते तळाशी गेलेलं नाणं या साधकानं काढायचं. त्याने कुठूनही आणि कसेही हात घातले तरी दंडाच्यावर हात बुडायचेच. पुढील तीन दिवसाच्या आत तो आणि त्याचे हात जर खडखडीत बरे झाले तर तो निरपराधी. नाहीतर जन्माचा बहिष्कार त्याच्या कपाळी यायचा.

असं वैचित्र्यपूर्ण बहुमहिमान्वित ‘ शुचिंद्रम् ‘ बघून झालं. मंदिराबाहेर आलो आणि पुष्करिणीच्या तीरावर बसलो. दिवसभरात पाहिलेल्या दृश्यांचा मेळ नजरेसमोर येऊ लागला. व्यापाऱ्यानं दिवसभराचा गल्ला घरी आणल्यावर ओतला की कमाईचं वैचित्र्यपूर्ण दर्शन त्याला त्या लक्ष्मीतून होतं तशी माझी अवस्था झाली होती. सकाळी याच पुष्करिणीनं मला जरा वेळ तिष्ठत ठेवलं होतं. याच गोपुराच्या कळसांनी सूर्यरथाच्या चमकदार सप्तअश्वाची याद दिली होती. आतल्या प्रवेशाबरोबर रतिमदनांनी आपल्या नयनमनोहर अभिनयानं खिळवून ठेवलं. आणि त्यानंतर काय पाहिलं नि किती पाहिलं याला गणित नाही. सारखं सारखं बघून वर्णन करायला शब्द बोथट होतात. खाऊन घेतलेलं किती चवदार आणि रोचक होतं हे सांगायला शब्द नसेल तरी एखादी गोड ढेकर सगळी अभिव्यक्ति पूर्ण करते. तसं झालं हे !

पश्चिम क्षितीज नितळ झालं आहे. लांब थोडा थोडा अंधार सांकळून राहिला आहे. जगमग दिव्यांची रांग दुरून कुठून अनोळख्या प्रांतातून येते आहे. सैरभेर झालेल्या भातलक्ष्मीतून वाहात असल्यासारखी चमकदार सडक. तिच्या संगती येते आहे. तिला समोर छेद देऊन पाण्याचा एक चमकदार पट्टा पल्याड जातो आहे. सडक तिच्या डौलात दिव्यांना घेऊन जाते पुढे. " शुचिंद्रम् 'च्या परिसरात पुष्करिणीच्या तीरावर बसलेल्या माझ्या मनात उद्याच्या सुखसंवाद सुरू होतो. आणि समोर सडकेवर पिवळी पाटी दाखवते 'कन्याकुमारी ८ मैल !'

— —

## १८

# विलसते कन्या सागरतीरी

पूर्व दिशा उजळल्या. पक्षिगण जागले, किलबिलू लागले आणि शुचिंद्रम् मंदिरासवे भवतीची छोटीशी वस्ती गजबजूं लागली. माझं सारं चित्त आता कन्याकुमारीला गेलं होतं. आज तिच्याशिवाय अन्य काही सुचणार नव्हतं-दिसणारं नव्हतं. ती युगानुयुगे शिवाची वाट बघत आहे. मी तिच्या भेटीची वाट बघत आतापर्यंतची वर्षं घालवली आहेत. तिच्या दर्शनाचा ध्यास या डोळ्यांना आता लागला आहे. मनी मानसी सतत जोजावला गेला आहे. म्हणून आज हरवल्यासारखं झालं आहे. या आठ मैलाची प्रतिक्षा मधेच हरपल्या सारखी वाटते आहे.

आतापासून आणि इथंपासून मी कन्याकुमारीच्या क्षेत्रात आहे असं वाटूं लागलं. ' आकाशात्पतितं तोयम् ' नद्यानद्यांनी समुद्रात जाऊन मिळतं तसं आता दिसणाऱ्या या साऱ्या वाटा, त्यांच्या साऱ्या दिशा त्यांची कुठलीही वळणं ही आता कन्याकुमारीलाच जाणार आहेत असंच वाटत होतं. सगळ्या सगळ्या गोष्टींना आता वेग उत्पन्न झाला होता. सारी सारी भूमि आता कन्याकुमारीकडे उतरती झाली होती जणू !

सगळीकडे आता अगदी समतल भूमि दिसत होती. हिरव्या हलत्या डुलत्या मखमालीवर लांबच लांब तर कधी रूंद, गोल, त्रिकोणी पाण आरसे दिसत होते.

टेकड्या नि पर्वत दूर दूर गेले होते ते आता मधे कुठे तरी तुटणार होते. त्यांचाही शेवट होत होता. दृष्टी पोचते तिथपर्यंत तीनही बाजूंचं क्षितीज कुठल्यातरी नाजुकशा कातळांच्या झाडझुपाच्या नि पाठवठ्यांचा आड धरित्रीला टेकत होतं.

बस आता ' सर्वेषामविरोधेन ' कन्याकुमारीच्या राज्यात निष्कंटक धावत होती. अभ्र आणि उन्हं आळीपाळीनी येत जात होती. पश्चिमेकडे अभ्र आली होती. आणि त्या अभ्रच्छादित आकाशाचं प्रतिबिंब खालच्या पाण्यांत शिरलं होतं. पण तेवढ्यामुळे असं काही विलक्षण दृश्य उभं राहिलं होतं की जणू आपल्या उजवीकडे पाच सहा फुटावर सारं सारं काही संपलं आहे. उरलं केवळ आभाळ आणि पलीकडच्या सहा फूट अंतराच्या क्षितीजापर्यंतची पृथ्वी.

मधे डोकं वर काढेल असं आता काही उरलं नव्हतं. सगळी पर्वतराजी कमी कमी होत गेली होती. होती थोडीफार जमीनच. तीही आता केवळ कोस दोन कोन. पुढे तीही आपला गुरुभार सागर संगमाकडे सोपवून निश्चित होणार होती. असा तो अपूर्व संगम बघायला मी आसुसले होते. आणि तो ताण जणू सहन होऊ नये म्हणूनच की काय बसची गती अगदी मंद वाटत होती. लहान मुलाच्या आतुरतेनं ' कधी येणार हो कन्याकुमारी ' असं सारखं विचारावसं वाटे. पण आपण आता कन्या असलो तरी कुमारी राहिलो नाही ही अवघड जाणीव जाच करीत राहिली.

शेवटी गाडी कन्याकुमारीच्या प्रांगणांत शिरली आणि बोल बोल म्हणत. मुक्कामावर उभी राहिली. लगबगीनं खाली उतरलो. नवलाईच्या नजरेनं सारा आसमंत भिरभिरून पाहून घेतला. लांबवर पसरलेला सागर, त्यावर पसरलेली अभ्रं, मधूनच पडणाऱ्या किरणांमुळे हलणाऱ्या सोनेरी लाटा, घोंघावणारा गार गार वारा आणि वाटेच्या टोकाला उभं असलेलं बिर्ला-मंदिराच्या कळसासारखं गांधीमंदिर ! सारं हावरटासारखं बघितलं. आणि सामान उचलून मुक्कामाकडे वळलो.

इथली हवा, इथलं पाणी, इथली माती अगदी नवनवलाईची वाटत होती. इथं पडणारं पाऊल नव्या संवेदनेच्या गुदगुल्या करीत होतं. श्वासात येणारी हवाही आगळाच सुगंध हृदयात भरत होती. मनाला जाच करतील, कानांना

पीडा देईल असे आवाज नव्हते, सारं शांत गंभीर तरी चैतन्यमय. फक्त एकच आवाज, एकतान, सागराच्या गर्जनेची. खर्ज षड्जाच्या तारेसारखी. महफिलीतल्या साथीसारखे संतत छेडले जाणारे ते सूर ' भूमातेच्या चरणतला तू धूता मी नित्य पाहिला होता. "असं मानलेल्या समुद्राला म्हणणाऱ्या कवीला परदेशी आठवलेले ते सूर ' लंकापदतल शतदल गर्जितोस्मि सागरजल.

धोताशुचि चरणयुगुल स्तवकर असं बघणाऱ्या एका 'निराल्या' महाकवीला दिसलेल्या बहु अर्थभरे दिव्य स्वप्नातले अर्थपूर्ण स्तवनाचे सूर. ते सूर सतत सोबत करत होते. कुमारीच्या महन्मंगलपूजेच्या वाद्य मेळातला तो संतत स्वर अहोरात्र दिशादिशांना निनादित करत होता.

इथे येण्यापूर्वी एक भीति होती. वाटत होतं की अगदी जगद्विख्यात ठिकाण आहे हे. देशी परदेशी हौशीमौजी आणि वडी वडी मंडळी इथं येणार. त्यामुळे महागडं झालेलं हे ठिकाण किमान चारसहा तास सामान टेकू देईल एवढं तरी सौजन्य दाखवील की नाही ? सतत वाचनात आलेला पावसाळा आणि अभ्रं या टोकाला आल्याचं समाधान लाभू देतील की नाही ? उत्कंठेच्या शिगेला पोचलेला उत्साहाचा फुगा शेवटी फुटणार तर नाही !

पण दैव आमच्या बाजूचं होतं. प्रवासाची सुरवात संततधार पावसात केली. आलेले पूर, विस्कळीत झालेले रस्ते आणि गाड्यांच्या वेळा यांना ओलांडून सचैल भिजत दिवस दिवस प्रवास करत इथपर्यंत आलो होतो पण कन्याकुमारीनं आम्हाला काही कमी पडू दिलं नाही. अरुण किरणातलं, पिवळ्या धम्म उजेडातलं, सांजवातीच्या प्रभेतलं आणि नीरव नितळ चंद्रिकेतलं अशी एका पेक्षा एक सुरेख दृश्यं आमच्या नजरेसमोर तिनं उभी केली. राहण्यासाठी परवडेल अशी सुरेख जागा. खाण्यासाठी रूचकर व्यवस्था आणि बघण्यासाठी तिन्ही त्रिकाळ मऊ मऊ वाळूची मनसद ! ' बघा ! ठीक आहे ना एवढं ? काही लागलं भागलं तर सांगा. पूर्वेकडच्या मंदिरात मी उभी आहे.' असं जणू तिचं आणखी विचारणं.

मधेच पावसानं एक तडाखा दिला नसता तर चार वाजेपर्यंत दम धरवला असता की नाही कुणास ठाऊक ! बाहेर पडलो तर रस्त्याच्या भोवतीचा सगळा भाग ओला झाला होता. काळी ओली सडक वाळत होती. सावल्या पूर्वेकडे झुकल्या होत्या. एकच एक मोठी सडक गांधी स्मारकाकडे उतरत पोचवीत होती.

गांधीस्मारक समुद्राभिमुख दक्षिणेकडे तोंड करून उभं राहिलं आहे. अलिकडेच झालेलं आणि आधुनिक तीर्थाचा महिमा दिलं गेलेलं हे एक ठिकाण. आसेतु हिमाचल राज्य करणाऱ्या मोठ्या अधिसत्तेचं राजगुरूपण भूषविणाऱ्या या राष्ट्रपुरुषाचं स्मारक वस्तुतः यापेक्षाही आधिक भव्य आणि रचनेच्या दृष्टीनं आधिक उदात्त असायला हवं होतं असं प्रथमदर्शनीच वाटलं. प्राचीन प्रस्तराच्या रचनेपुढे हे अत्याधुनिक सीमेंटचं बांधकाम तेवढं आब ठेवित नाही असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही विचित्र आणि विशोभित आकार एकत्र करून वर मंदिराची कळा आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रवेशद्वारांच्या तीन महिरपीवर शांति, अहिंसा आणि सत्य लिहिलं आहे. अहिंसेच्या खाली चरखा आहे. आणि सारं मंदिर बाहेरून पिवळ्या रंगानं रंगवलं आहे. आत आधुनिक फॅशन्सचे जिने, गॅलऱ्या. लॉब्रीज अशी देशीविदेशी तंत्राची सरमिसळ झाली आहे. मुख्य ठिकाणी रक्षाकुंभ विसर्जनापूर्वी ठेवल्याची आठवण देत एक शीलालेख उभा आहे. सीमेंटच्या रंगीबेरंगी फरश्या सगळीकडे बसवल्या आहेत. वर उभा घुमट आहे. त्या घुमटाभोवती सूर्योदय आणि सूर्यास्त नीटस दाखविणाऱ्या अट्टालिका आहेत. आजुबाजूच्या सौधावरही तसेच पण छोटेसे घुमट आहेत. हे सगळं बघितलं की आमची आवड निवड, आमचा आदर, पूज्यतेच्या आणि स्मारकाच्या चिरंतनत्वाच्या कल्पना बदलल्या तरी त्या उचित मार्गावर आहेत असं वाटत नाही.

गांधीस्मारकानं अगदी योग्य आणि मोक्यावरची जागा साधून सुद्धा व्यवस्थित उभं रहायचं टाळलं आहे असं वाटल्यावाचून राहिलं नाही. दोन जिने उतरून खाली आलो. महात्माजींच्या स्मारकाला नमस्कार करून बाहेर पडलो.

पश्चिम समुद्राकडे तोंड करून आता सारी माणसं ठिकठिकाणी बसली होती. मऊ मऊ वाळूत, उंच बांधलेल्या बांधावर, कट्ट्यावर, गांधी स्मारकाच्या गॅलऱ्यामध्ये आणि समुद्र मर्यादेच्या जवळच्या शीलाखंडावर ती विखुरली होती. सूर्यनारायण आता घरी जाणार होता. त्याला निरोप देण्यासाठी ही गडबड होती हे तितकं खरं नव्हतं. तर जाताना तो कन्याकुमारीचा कसा निरोप घेतो हे साऱ्यांना बघायचं होतं. रोज तो येत होता नि रोजच

तो जात होता. पण त्याच्या येण्याजाण्याचं कुतुहल आज शेकडो वर्षं तसंच्या तसं कायम होतं.

जायच्या वेळी तो आता जाणार होता. पण पंचप्राणेंद्रियांना डोळ्यांत आणून आबालवृद्ध त्याच्या हालचालीकडे त्याच्या बदलत्या स्वरूपाकडे एकटक बघत होते. एखाद्या समरजयी वीराप्रमाणे तो घरी परतत होता. क्षितीजाच्या उंबरठ्यावर त्याच्या ओवाळणीसाठी पंचारतीचे दिवे रसरसू लागल्याचा भास होत होता. क्षणोक्षणी सारे रंग सारी सजावट बदलत होती. इकडचा रंग तिकडे नि तिकडचा दिवा इकडे असं काहीसं होत होतं. सूर्य उतरत होता. उन्हं आवरली जात होती. पण आभाळात विरकळीत पसरलेल्या छोट्या छोट्या अभ्रांचा सगळा कापूस गुलाबी झाला होता. लाल सोनेरी कडा त्यावर उठल्या होत्या. काय बघावं नि काय नको अशी विचित्र अवस्था झाली होती. क्षणभर सूर्यबिंब बघावं, क्षणात पूर्वेकडचा अनुराग बघावा की पश्चिमेची रंगपंचमी अशी त्रेधा उडत होती. अचानक दाट अभ्रांनी मावळत्या सूर्यनारायणाला घेरलं. त्याच्या भोवती फळी धरली. अन् सूर्यबिंब मावळायच्या आधीच मावळलं !

सर्वांचे चेहरे आंबट झाले होते. वाट मिळेल तेथून किरणांचे झोत बाहेर पडत होते. साऱ्या गगनात जांभळट, गुलाबी रंगाच्या पिसांची रम्य पखरण झाली. वातावरणात अव्यक्त सप्तरंगी सप्तस्वरांची उधळण झाली नि विरली. आणि यमनकल्याणाच्या मंदमधुर स्वरमालीकेच्या पैल दिवसाचा धनी, जग जीवनाचा कंठमणी अभ्रांच्या गर्दीला आड करून उतरला.

दिवस बुडाला अन् एकदमच अंधारल्यासारखं झालं. माणसं पूर्ण पश्चिमेकडे पाठ वळवून चालायला लागली. काही वेडी माणसं बसूनच राहिली. त्यांना या अंधारातही मांजराच्या डोळ्यानं काही शोधायचं होतं. काही बघायचं होतं. कुमारी देवीच्या मंदिरात सांजवात झाली होती. सायंपूजेची वाद्यं वाजू लागली होती. आता तिकडे जीव ओढला जात होता. इथं आल्यापासून तिच्याकडे गेलो नव्हतो. तिला बघितलं नव्हतं. मंदिराच्या राजोपचाराबरोबर काही बंधनही तिला स्वीकारावी लागणारच होती. म्हणूनच एवढ्या वेळपर्यंत आम्हाला तिचं दर्शन मिळू शकलं नव्हतं. आता ते दार मुक्त झालं होतं. दर्शनाचा रोकडा लाभ आमची वाट बघत होता.

छोटयाश्या कुमारीचं हे छोटं पण सुबक मंदिर आहे. नेत्र विस्फारील असं तिथं काही नाही. सूर्यचंद्राशी श्रेष्ठतेच्या भांडणात मध्यस्थीची बोलणी करतील अशी गोपुरं नाहीत किंवा त्यांच्या तेजाचा मद जिरवतील असे सोन्याचे कुंभकलशही नाहीत. नुसत्या हिंडण्यातच दमछाक करतील असे आकार प्राकारही नाहीत की अगदी तोंडात बोट घालून खिळवून ठेवतील असं शिल्पाचं लेणही नाही. इथली उंची एकच, इथली चमक एकच आणि खिळवून ठेवणारं अतिरम्य शिल्पाचं कोरीव लेणही एकच. ते म्हणजे देवीकुमारी. सगळा भव्यपणा तिनं तिन्ही सागरांना वाटून दिला आहे. सगळी रंगीबेरंगी चमक तिने सूर्याच्या उदयास्ताला बहाल केली आहे आणि शिल्पांची अत्यद्भूत जाळी मागं टाकून ती एकटी एकटी इथं येऊन उभी राहिली आहे.

गोपुराच्या आत येऊन दोन छोटे प्राकार ओलांडून देवीच्या निजमंदिरापुढे येऊन उभे राहिलो. सगळीकडे दिवेच दिवे दिसत होते. छोटयाश्या आरतीदीपापासून पुरुष पुरुष उंचीच्या मोठमोठ्या समयापर्यंत आणि टांगत्या लामणदिव्यापर्यंत प्रत्येक ज्योत मंदिराचा कानाकोपरा उजळत होती. दिव्यांची अतिशय मनोहर आरास देवीच्या पुढयात नि आजुबाजूला केली होती. आरतीच्या गजरातच आम्ही देवीच्या दारात प्रवेश केला.

विलक्षण उत्सुकता लावणारा तो क्षण, प्रथम दर्शनांतली ती मंगल घटिका झणझणत्या नादात साजरी होऊ लागली. दीपावलीच्या अपूर्व मेळाव्यांत ती उभी होती. आणि हाती दिव्यांनी फुललेलं झाड घेऊन पुरोहित तिला ओवाळीत होता !

छोटयाश्या कमलावर ती रेखीवपणे उभी राहिली आहे. मुखावर हरिद्राचंदनाचा लेप आहे. त्यावर ढळढळीत कुंकवाच्या खाली कमानदार भुवयांची सृष्टी झाली आहे. अर्धमुकुलित नेत्रकमले आरतीचा तो देखावा बघत आहेत इवल्या जीवणीवर इवलेसेच पातळ ओठ साजले आहेत. त्यावर शोभतो आहे नासिकेत जडलेला दैदिप्यमान तेजस्वी हिरा. खूप दुरूनही अंधारातूनही चमचमून उठेल असा हिरा. अंगात भरजरी कंचुकी. तिचे दंडावरचे छानदार काठ नि खांद्यावरची कुयरी लांबून दिसते आहे. खाली परकर. त्यांत खोवलेला उत्तरीयाचा झुळझुळीत दुपट्टा. नाजूक देहाभोवती प्रदक्षिणा घालून डाव्या खांद्यावरून उतरून उजवीकडच्या बाजूला खोवलेला.

शरिराची सारी ठेवण नाजूक किशोरीची. शिल्पाच्या अंगाप्रत्यंगातून निर्माण झालेली अर्धस्फुट तारुण्याची कोवळी झलक दृष्टीआड होत नाही. डावा हात सरळ खाली आला आहे. जप मोजण्याच्या पद्धतीची बोटांची जुळणी आहे. आणि उजवा हात वरमाला घेऊन उंचावला आहे. कधी वर-माला कधी जपमाला. कुठलीही कल्पना साजरी दिसते. गळ्यांत सोन्या-मोत्याचे भरघोस अलंकार आहेत. कमरेला घोसदार पदकांची सुवर्णमेखला आहे. पायांत रुणझुणते लडिवाळ चाळ आहेत. गळयात अनेक सुगंधी आणि नाजुक फुलांच भाग्य उजळलं आहे. मुकुटापासून खांद्यावरही भरघोस फुलमाळांची पदके कर्णभूषणे झाकून लोंबलो आहेत.

असं सगळं त्या अर्धविकसित कोमल कलिकेचं अल्लड नाटच दिसतं खरं. पण मुखावरच्या हंसरेपणामधे जो स्निग्धगंभीर भाव आहे किंवा थोडया गांभीर्याकडेच आधिक झुकणारी जी ठेवण आहे. तीही मोठी अजब वाटते. अशा नाजूक भावभावनांच्या मेळाव्यात ती हातीची माला सांभाळीत उभी आहे.

जगदंबेनं परमेश्वरासाठी तप केल्याचे अनेक पुराणांत आणि कथांमधून संदर्भ मिळतात. काही ठिकाणी अस्पष्ट खुणाही आढळतात. पण प्रत्यक्ष तपस्यारत अशी तिची गोजिरवाणी छबी दिसते ती ह्या कुमारी देवीच्या नाजूक अन् लाघवी मूर्तितच. अकाली आणि अकारण गंभीर झालेली छोटुकली बहीण तिच्यामधे दिसते नि तिचं देवीपण संपून एक ओढाळ जिव्हाळा तिच्या विषयी वाटू लागतो. क्षणात हंसणारं, क्षणात रुसणारं लडिवाळ लालित्य नजरेसमोर विलसू लागतं.

मग त्या कन्येच्या गप्प उभं राहण्यानं मनाची चलबिचल होते. तिनं आपल्याकडे बघावं, ओळखीचं हसावं, मनातलं सांगावं म्हणून तिची आर्जवं कराविशी वाटतात. अशी खुळी आर्जवं नि मनधरण्या आजवर कितीतरी झाल्या असतील तिच्या ! पण ' बी ' कवि म्हणतात.

' चाफा हालेना. चाफा बोलेना, चाफा खंत करी. काही केल्या फुलेना.' तसा हा चाफा. ही चाफेकळी काही केल्या उमलत नाही. मुग्धतेची इवली पाकळीही बाजू सारीत नाही. अशी ती कुणाशी हसत नाही. बोलत नाही. सारखी समोर दृष्टी ठेवून जप करते आहे. तप करते आहे. तिच्या डाव्या

डोळ्याला आल्हाद देत चंद्र उगवतो तेव्हा उजव्यातला सूर्य सप्तरंगाची अपूर्वाई दाखवत जातो. उदो उदो करीत तीन्ही सागर तिच्या भोवती रात्रं-दिवस गोंधळ घालतात. धरित्रीनं तर तिच्या पायापाशी उरलं सुरलं वाहून टाकलं आहे. तरी ती मौन आहे. तिचं तप अभंग आहे. तिचं मंद हसू तसच तेवत आहे.

चराचराला तिनं वेड लावलं आहे. कन्याकुमारी म्हटल्यानंतर कवींच्या प्रतिभेचे अष्टसात्विक भाव जागे होतात. त्यांच्या दिव्य स्वप्नाच्या सुंदर तनूवर कल्पनांचे रोमांच उभे राहतात. कुणाला तिची प्रभा ' बालार्कायुवसत्प्रभां ' वाटते तर कुणाला ती ' मनोहर तन्वी ' वाटते. कुणाला ती ' मन्दास्मितोघन्मुखीम् ' तर कुणाला ती ' जगन्मोहिती ' वाटते. अशा त्या ' लोलंवमाला श्ष्टार्थदां कन्यकाम्'चं साऱ्यांनी सर्वोतपरी कवन केलं आहे. स्तवन केलं आहे.

आता सारे राजोपचार झाले आहेत. भरून पावले आहेत. गाभाऱ्यातल्या उत्सवमूर्तिला बाहेर वाजत गाजत फिरवून आणलं आहे. आणि देवीचं दार बंद होणार आहे. बाहेरचा नागस्वर काहीतरी मंद मंद आळवतो आहे. मंदिरातून एक एक जण काढता पाय घेतो आहे.

देवीच्या निजमंदिराचं शयनागार बंद झालं तसं आम्ही सारे बाहेर पडलो. आणि आमच्या नियोजित विश्रामगृहाच्या पुढे येऊन वाळूवरच बसलो. लांब लांबवर दिवे चमकत होते. वातावरणातली शांतताही काही गोड गोड कुजबुजत होती. ही एकटी दुकटी इतक्या लांबवर येऊन समुद्राकडे तोंड करून उभी राहिलेली मुलगी आज युगानुयुगे कशासाठी उभी आहे ? कुणाची वाट बघते आहे ? कुणासाठी तपते आहे ? कुणाला जपते आहे ? कुणासाठी तिनं अग्रहार सजवला आहे ? कुणासाठी तिनं ते सुंदर भोळं भावडं नवविकासित तारुण्य उभं केलं आहे ? समुद्रासारखी गंभीर मुखाकृति आणि बालरवीच्या प्रभेसारखं गुलाबी हंसू कुणासाठी जतन करून ठेवलं आहे ? हेच का ती शांतता मला सांगणार होती ? तिच्या नीरव हृदयात दडलेलं, असलं एखादं रहस्य का ती मला सांगणार होती ?

पर्वतराजा ही पार्वतीच आहे. गौरीहरामधली ही गौरीच आहे. पण मातलेल्या महाप्रतापी बाणासुराचा वध करण्यासाठी ती ' शिवसभा सदस्य

'मयाची' लौकिक कन्या झाली होती. समग्र देवदेवतांच्या तपस्तेजातून ती प्रकटली होती. आणि कन्यास्वरुपातच तिचं नेमलेलं कार्य तिला पार पाडायचं होतं. बाणासुराला तसा वरच होता. त्याचं मरण फक्त एका कुमारिकेच्याच हाती होतं.

त्या लौकिक पित्याच्या घरी हे कन्यारत्न वाढत असताना एक दिवस पित्याची अंगुली धरून ती शिवदर्शनाला गेली आणि शिवभेटीत स्वत:च सर्वस्व हरवून बसली. मदनावर मात करणाऱ्या स्वरूपावर भाळली. तिनं त्यांची परोपरी स्तुति केली. शिवाच्या मनालाही तिच्या कमनीय रमणीय स्वरुपाची भुलावण पडली. सार कांही विसरून शिव सुंदरतेवर लुब्ध झाला. त्यानं तिला सांगितलं 'भद्रे ! तीन सागर जिथे मिळतात, चंद्रसूर्याचा पाठलाग जिथे समोरच्या समोर दिसतो आणि परशुरामानं परशूचा अडसर घालून जिथे तीर्थ निर्माण केले आहे तिथे जाऊन तू माझी वाट पहा. मी येतो. तिथे आपली मंगल घटिका बुडेल, सूर्यचंद्र अंतरपाट धरतील, समुद्राच्या लाटा स्वच्छ जलकणांच्या अक्षता उधळतील. त्यांचे घनगंभीर ध्वनी लाजा-होमाचे मंत्र म्हणतील. त्या स्वच्छ सिक्त पुलिनावर आपली सप्तपदी उमटेल. ज्या ठिकाणी अन्य कुणी नसेल, देव दानव मानव कुणी कुणी नसेल. केवळ तू आणि मी. तिथे आपलं मीलन होईल.'

कन्येनं ते मानलं आणि मातापित्यांची परवानगी घेऊन ती दक्षिणेकडे आली. सांगितल्याप्रमाणे उभी राहिली. कबूल केल्याप्रमाणे शिवही गुपचूप निघाले. भल्या पहाटेचा मुहूर्त माधायचा होता. देवांच्या मनात भीति उत्पन्न झाली. बाणासूराला अभय मिळेल. त्या अत्याचारी मुक्त संचाराला आधिक आयुष्य मिळेल म्हणून लग्नात विघ्न उत्पन्न कसं करावं याची चिंता उत्पन्न झाली. शेवटी नारदानं ही अवघड कामगिरी पेलली आणि शिवशंकर केवळ आठ मैलावर राहिले असता त्यांना शुचिंद्रम्‌मधे थोपवून धरलं. पूजाअर्चा नि स्तुतिस्तोत्रांच्या मधुर गायनात सारी रात्र घालविली आणि बाहेर जाऊन आपण कोंबड्याचा आवाज काढून सूर्योदय झाल्याचं अन् मुहूर्त टळून गेल्याचं जाहीर केलं.

कन्येनं घातलेला आशाआकाक्षांचा मांडव उन्मळून पडला. मुहूर्त टळला. वर आला नाही. आपल्या हातानं जमवलेलं लग्नाचं सगळं साहित्य 'समुद्र-



तुस्प्यन्तु ' करून टाकलं. जमा केलेली सगळी शोभा उषेला अन् संध्येला देऊन टाकली. हिरकण्यांचे साज, नि कुंदकळयाचे हार गजरे लाटांना देऊन टाकले आणि चिरंजीव झालेल्या भूतकाळाला घेऊन उद्यांच्या आशेला जोजवीत ती इथे अशीच उभी आहे. तिच्या कौमार्याचा अपमान करणारा मदांध आणि लंपट बाणासूर तिच्या हातून मरून गेला. पण या सौभाग्यकाङ्क्षिणीच्या डोईवर मंगलाक्षता उधळल्या गेल्या नाहीत. 'शुचिंद्रम्' मधे रमलेला भुललेला तिचा अभीप्सित वर पाऊलभरही पुढं आला नाही. असुरसंहारासाठी मिळालेली ब्रह्मशक्ती तिनं टाकून दिली आहे. सिंहवाहनाला परत मायदेशी पाठवलं आहे. पण भालावरचा अग्निमय तृतियनेत्र आणि मुकुटावरची सुधावर्षिणी चंद्रिका मात्र तशीच ठेवली आहे.

दुसऱ्या दिवशी अगदी काळोख्या पहाटेच तिच्या राउळांत गेलो. निर्माल्य दर्शनापासूनचे सारे विधी व्यवस्थित पाहता आले. निर्माल्य गेले आणि देवी स्नानासाठी उभी राहिली. एकेक करून सारी वस्त्रं उतरवली गेली. कुमारीची मूळ मूर्ति आपल्या सहज आकारात दिसू लागली. मी आधिक जवळून

पाहण्याचा प्रयत्न केला. अगदी पूर्णाकार ( Life Size ) आणि प्रमाणबद्ध सुरेख शिल्पकाम वाटलं मला. दाक्षिणात्य शिल्पातली कमरेची डाव्या अंगाची लोच दिसली नाही की सारा भार डाव्या पायावर टाकून उजव्या पायाचा ऐटदार बाकही दिसला नाही. पण त्या सहज उभं राहण्याच्या क्रियेतही मोठा मनोज्ञ डौल साधला गेला आहे. मुकुटाच्या मागे केस मोकळे सोडले असावेत. एका पुस्तकात व्यक्त केलेला अभिप्राय तिच्याकडे बघत आठवत रहातो.

" The more I looked at the figure, the more I wished to look at it again ! "

ही मूर्ति खुद्द परशुरामांनी बसवली आहे म्हणतात. नाहीतरी ही भूमि परशुरामाचीच आहे. पूर्वेकडची अगस्त्यभूमि आणि पश्चिमेकडची परशुरामाची भूमि आहे. गोव्यापासून कन्याकुमारीपर्यंत हे सारं क्षेत्र परशुराम क्षेत्र आहे. त्यांनी आपल्या कर्तुत्वाच्या परशूनं समुद्र मागे हटवला आहे. त्याला त्याची मर्यादा शिकवली आहे.

नेसायला धोतर मिळालं नाही म्हणून बाहेरूनच नमस्कार केला असं वर्णन करणाऱ्या साहित्यिकांनी आपल्या 'देव न मानणाऱ्या' श्रेष्ठ (?) प्रवृत्तीच किती वेडगळ प्रदर्शन केलं आहे असं हे शिल्प बघून वाटतं. नाहीतर इथ येऊन " उपहास करायला आले आणि प्रार्थनेला हात जोडायचंही भान राहिल नाही " अशीं अवस्था त्यांचीही निश्चितच झाली असती.

कन्याकुमारीच्या पंचामृत स्नानाचा यथास्थित सोहळा उल्हसित मनानं बघितला. दोन घागरी पाण्यानंतर केवळ दूध आणि गुलाबपाण्यानं न्हाईली ती. परत कालच्यासारखे कपडे दागिने नि काजळ टिकली लावून सजून ती उभी राहिली. आरतीच्या झांजा झणाणल्या. धूपदीप तिच्याभोवती फिरत खाली बसले. पुरोहितांची स्वच्छ संस्कृतवेदसूक्ते सुरू झाली.

'कात्यायनाय विद्महे कन्याकुमारीचधीमही तन्मे दुर्गा प्रचोदयात ॥

ऋग्वेदानं हिमखंडालंकृत पर्वतराजाचं आणि गंगामाईचं ठायी ठायी वर्णन केलं आहे. तर यजुर्वेदानं कन्याकुमारीची स्तुति गाईली आहे. महाभारतात वनपर्वात तीर्थयात्रा प्रसंगात व्यासांच्या प्रतिभेवरही लिहिलं आहे की

" ततस्तीरे समुद्रस्य कन्यातीर्थमुपस्पृशेत् ।

एका लेखकानं तर भावविवश होऊन लिहिलं आहे की, आहो हिच्या अस्तित्वाच्या कालगणनेचा विचार कशाला करता ? वेद उपनिषदं कशाला बघता ? तो या भूमिच्या निर्मितीपासून या शैल शिखराच्या उत्पत्तीपासून नि या तिन्ही महोदधीच्या अगदी पहिल्या पहिल्या ओळखी आपापसांत झाल्या तेव्हापासून ही मुलगी इथं उभी आहे !

तिला नमस्कार केला. परत भेट घडणारच होती. पण तात्पुरतं तिला विचारून बाहेर पडलो. आणि तिच्या समोरच्या बंद दरवाज्यापुढच्या मंडपात दाखल झालो. जरा उंचावर बनलेला हा मंडप आहे. पुढच्या पायऱ्यांनी उतरत माणूस सरळ समुद्रतीर्थाच्या स्नानकुंडात जातो. अंधार उजेडांत तिथं स्नान संकल्पाची घाई चालली होती. परत कालच्या संध्याकाळसारखं एकटक बघण्याचं अधीर दृष्टीचं दृश्य आता उभं रहाणार होतं.

मंदिराच्या डाव्या कोनात पूर्वदिशा आपला रंगमंच सजवून बसली होती. पण फुकटच्या प्रेक्षकांची सोय ते स्वतः लावून घेतील त्यावरच अवलंबून होती. हळू हळू पूर्व दिशा उजळू लागली. नजर सूर्य नेमका कुठून वर येणार हे शोधू लागली. काल संध्याकाळच्या आणि आत्ताच्या रंग सज्जेमधे फार फरक होता. कालची शोभा कुशल नटीसारखी सफाईदार रंगाभिनय दाखवून डोळे निवून जातील, हृदय भरून जाईल असं दृश्य उभं करीत होती. तर आजची उषा शांत तपस्यारत राधिकेसारखी प्राचीवर विलसत होती. कुठंही इतकंस सुद्धा अभ्रं आज दिसत नव्हतं. रात्रीच्या रात्री सगळ्या कापसाच्या गाद्या गिर्दा शिवून झाल्या होत्या. सगळं नभांगण कसं लख्ख दिसत होतं. अश्वाच्या टापानी तेवढी बाजू धूलि धुसरित झाली. हळूच किरणदूत पुढे आले. बघता बघता त्यांनी गगनमंडल व्यापले. आता मात्र सूर्यरथ वर निघणार आहे या बेतान सर्वांच्या नजरा कॅमेरापुढे बसल्यागत झाल्या.

इकडचं तिकडचं काही दिसेनासं झालं. प्रत्येक नजर त्याच्या आगमनाची प्रतिक्षा करू लागली. 'विझले रत्नदीप नगरात, आता जागे व्हा यदुनाथ !' अशी ही प्रार्थना मनामनांतून होत असेल. किरणाचं आरुण्य गेलं आणि भोवती उज्जल पिवळी सोनेरी प्रभावळ गरगरू लागली. वर येऊ लागली. आणि मनाच्या एका क्षणाच्या असावध अवस्थेचा फायदा घेऊन सूर्य बिंबाची केवळ एक कड समुद्रापार दिसू लागली. बघता बघता तिचं रसरशीत अर्धबिंब

होऊन वर उठलं. क्षण दोन क्षण उभट लिंगाकार धारण करून हळूच त्यानं पाण्याची कडा सोडून दिली.

शेकडो कंठातून त्याचे जयध्वनी उठले. हजारोंनी त्याचं स्वागत केलं. विवेकानंदशीळेच्या मागून तांबडी शेंदरी कात टाकून सतेज सोनेरी अगानं वर येणाऱ्या त्या सूर्यमंडलाला नमस्कार करीत मी तो मंडप सोडला. हे आणखी एक नव्या नवलाईचं बघून झालं होतं.

मंदिरापुढच्या वस्तीला वळसा घालून सागर किनारी आलो. लांबवर विवेकानंदरॉक दिसत होता. तिथे जाण्याच्या वाटाघाटी आल्यापासूनच सुरू केल्या होत्या. आज नौका सिद्ध होती. बारा कडचे बारा यात्री आमच्या बरोबर होते. नावाड्यांनी नाव पाण्यात ढकलली.

कन्याकुमारीनं त्या खडकावर एक पायावर उभं राहून तप केलं. विवेकानंदाना कदाचित देवीनंच प्रेरणा दिली असेल की 'ती माझी' श्रीपादशीळा 'आहे. तिथे त्रिरात्र ध्यान कर !' विवेकानंद एवढ्या अथांग दरियातून मोठमोठ्या वेगवान लाटांना पार करीत या खडकावर आले. देवीच्या पदचिन्हाला साक्षी ठेवून त्यांनी तीन दिवस इथं ध्यान केलं. आणि मग त्यांनी ते विश्वविजयी परदेश-गमन केलं.

आज त्यांच्या त्या तपोभूमिवर स्मारक होत आहे. लाखो रुपये खर्च करून तिथं खूप मोठी वास्तू उभी रहाणार आहे. मंदिरासमोरच एका मोठ्याश्या जागेत सारी घडजोड चालू आहे. आणि नावेच्या फेऱ्यातून ती त्या खडकावर पोहचली जात आहे.

किनाऱ्यापासून सुमारे फर्लांगभरचं हे अंतर पार करताना पोटातलं पाणी ढवळून निघतं पण त्याहीपेक्षा त्या खडकाला जो तात्पुरता धक्का बनवला आहे त्यावर नावेतून पटापट उड्या मारताना तर कसबच दाखवावं लागतं. वर गेलं की लांबून एवढासासा दिसणारा हा खडक म्हणजे समुद्रसपाटीतून वर आलेली जवळ जवळ ५० फूट उंचीची एक टेकडीच आहे हे जाणवायला लागतं आकारानं म्हणजे लांबी रुंदीही बरीच प्रशस्त आहे. आता एक प्रशस्त मंडप, ध्यानात रमलेला विवेकानंदांचा पूर्णाकृति पुतळा, व्यवस्थापकांना राहण्यासाठी जागा. एक छोटासा तलाव एवढं सारं वर तयार होत आहे. टेकडीच्या मधोमध देवीकन्येचं एक पाऊल उमटलं आहे. ते व्यवस्थित जतन करून ठेवलं आहे

विवेकानंदांची ही तपोभूमि बघून त्यांच्या देवदुर्लभ पराक्रमाची आठवण झाली. बंगालच्या सागरासारखा हा महापुरुष इथल्या तपश्चर्येच्या बळावर खऱ्या अर्थानं जगद्गुरू ठरला. हे स्मारक एकदा पुरं झालं की परत यायचं इथं. त्यांच्या त्या भव्य स्मृतिपुढं नमायचं असं मनोमन ठरवून मी ती शीळा उतरले. आलेले उतारू परत नौकेत बसले. बांधलेले दोर अन् रोवलेले नांगर काढले गेले. आणि नाव लाटांच्या हेलकाव्यात किनाऱ्याकडे सरकू लागली. अकराच्या सुमाराचं कडक ऊन भासू नये असं गारगार वारं अंगाला गुदगुल्या करून जात होतं. पाण्याच्या हिरव्या टेकड्या उठत होत्या. क्षणात नाव वर जात होती. शरिराला गोड झोके देत झटकन खाली उतरत होती. सगळ्या सहप्रवाशांचे चेहरे प्रफुल्लित दिसत होते. मुखावर अनामिक आनंदाच्या कळ्या फुलत होत्या.

माझ्या समोर बांगला गृहिणी बसली होती. गोल चेहऱ्याची अरूंद जिवणीची. लालचुटुक ओठांची नि त्यापेक्षा लाल गोल कुंकवाची. तिच्या शेजारी तिचा धनी बसला होता, त्याला आपल्या आनंदाच्या उर्मि आतल्या आत जिरवता आल्या नाहीत. डोळ्यावरचा काळा चष्मा त्यानं काढला. जरा चहुबाजूला नजर टाकली आणि कानाशी हात नेऊन डोळे झाकले. दुसऱ्याच क्षणी त्याच्या कंठातून भरतीच्या लाटांप्रमाणे आवाजाचे चढउतार बाहेर पडू लागले. बंगाली सागरी संगीताच्या लकेरी वातावरणात उमटू लागल्या. तो म्हणत होता, नाव हालत होती. लाटा थपथपत होत्या. आम्ही आंदुळत होतो.

ओ माँ ऽऽ
सार्थक जनम अमार
जन्मेछि ए देशे
सार्थक जनम मागो
तो भालबेसे–ओ माँ ऽऽ

आई ग ! या तुझ्या कुशीत जन्म लाभला नि माझ्या जीवनाचं सार्थक झालं. तुझ्यावर प्रीति करतो आई. तुझ्या वात्सल्यात न्हातो आई. धन्य माझं जिणं.

गाणं थांबलं–

कितीतरी वेळ वातावरणात तो मधुर ढाला आवाज घुमत राहिला. अवरुद्ध श्वास हळूच मोकळे झाले. त्यानं परत चष्मा चढवला. नाव हळूच येऊन रेतीत घुसली. खाली उतरलो. तीन रंगाच्या वाळूंनी हळूहळू दोन्ही पायावर घर बांधायला सुरवात केली.

ते बंगाली युगुल पुढं चाललं होतं. माझ्यानं राहावलं नाही. एवढ्या गुणी माणसाचा परिचय करूनच घ्यायला हवा होता. मी हळूच तिला हाक घातली, 'भाबीजी !' नि आमची ओळख झाली. परिचय वाढला. आणि त्यांच्या गीतांना उत्तम मराठी श्रोते लाभले.

खूप लांबवर आलेली आमच्या यात्रेची नौका आता अशीच परतीला लागली आहे. कुमारीच्या सुकोमल पदकमलाभोवती प्रदक्षिणा घालण्याची, भृंग होऊन तिच्या मुखकमलाभोवती प्रदक्षिणा घालण्याची. ओवाळून जाण्याची तिची आस पुरी झाली आहे. आता ती परतते आहे. पण परतण्याची कल्पना सहनच होत नाही. इतक्या दिवसांचं हलकं फुलकं, शिल्पांच्या छायेतलं, सुखाचं जिणं संपू नये—कधीच संपू नये असं वाटतं. परत फिरू नये, सगळी बंधनं झुगारून मुक्तपणे इथेच रहावं, उदयास्तात रमावं, वाळूवर खेळावं, कुमारीच्या दर्शनात हरवावं.

पण व्यवहार कन्याकुमारी दूर करीत होता. डोळ्यात उठलेलं काहूर काठ ओले करत होतं. मन अव्यक्त हुंदक्यात त्यानं म्हटलेलं गाणं आठवत होतं—

'आमि फिर्बो ना रे, फिर्बो ना आर, फिर्बो ना रे !'

# १९

# तिरु अनंतपुर

कन्याकुमारीचं ते निसर्गरम्य क्षेत्र सोडताना जीव जड झाला होता. तीन दिवसांच्या तिथल्या निवासांत तिनं सगळं तनमन आकर्षून घेतलं होतं. तिच्या निरागस हास्याची आमच्या हालचालीला मिठी पडली होती. आणि प्रत्येक दर्शनानं ती आधिकाधिक घट्ट होत होती. भातुकली खेळणाऱ्या लहान मुलीसारखं ती त्या संगमावर तीन रंगाच्या वाळूशी खेळत होती. शंखशिपले वेचित होती. सकाळ संध्याकाळ आपल्या खोलीच्या गवाक्षातून सूर्यचंद्राच्या जाण्यायेण्याच्या लीला बघत होती. तिच्या लुटपुटीच्या संसारातून आमचं लक्ष दुसरीकडे जाऊच नये असं लाघव ती दाखवित होती. पण आपली माया बाजूला सारावी लागतेच ना, व्यवहारचं ओझं आपण होऊनच आपल्या शिरी घ्यावं लागतं ना ?

अतिशय जड अंतःकरणानं तिचा निरोप घेतला. बसनं कन्येचं परिसर सोडलं आणि ती कोमलतरं केरालि प्रांतातून धावू लागली. आता परतायचं होतं ते केरळमधून, त्रिवेंद्रम घेऊन, पद्मनाभ स्वामींचं 'तिरुअनन्तपुरम्' बघून.

कन्याकुमारी ते त्रिवेंद्रम अंतर फार तर चार तासाचं, एकावन्न मैलाचं. जाणं येणं शुचिंद्रम आणि नागरकॉइल वरूनच. नागरकॉइलनंतरच तामीळनाड आणि केरळ भिन्नमार्गी झाले आहेत.

दुपारी ११॥ - १२ वाजता त्रिवेंद्रमला पोचलो. मोठमोठाले रस्ते, उंची श्रीमंती थाटाची दुकानं आणि तिथली अफाट वर्दळ ते राजधानीचं शहर आहे असं सुचवीत होते. केरळमधलं सर्वात मोठं शहर आणि राजधानी म्हणून त्रिवेंद्रमला अतिशय महत्त्व आहे. पूर्वीच्या त्रावणकोर संस्थानची राजधानीही त्रिवेंद्रम शहरच होती. म्हणून आजची नवी सजावट तिथं खुलत असली तरी पूर्वीची जुनी योजना आणि प्रमाणबद्ध मांडामांड नजरेतून सुटत नाही.

बस येनानाच स्टँडवर थांबण्याच्या आधीच एक किल्ल्यासारख्या दिसणाऱ्या विभागातलं पद्मनाथस्वामींच्या मंदिराचं पसरट गोपूर चुटपुटतं दाखवूनच बस पुढे जाते. बस स्टँड रेल्वेस्टेशनसमोर आहे. स्टँडवर बसेसची धावाधाव अविरत चालू असली तरी खरा संस्थानी आणि राजधानीचा डौल आहे रेल्वेस्थानकाला. रेल्वेस्टेशन दर्शनी भागातच भव्यपणाचा ठसा उमटवते. रेल्वे-स्टेशनला लागूनच सर सी. पी. रामस्वामींच्या सन्मानार्थ बांधलेलं भव्य अतिथिगृह आहे. सर्व दृष्टीनं ते अतिशय सोयिस्कर आणि व्यवस्थेच्या दृष्टीनं उत्कृष्ट वाटलं.

संध्याकाळशिवाय दर्शन घडणार नव्हतं. आणि त्या दिवशी सोमवार असल्यामुळे इतर सरकारी संस्था बंद होत्या. त्यामुळे केवळ हिंडण्या फिरण्या पलिकडे बाकी काही साधण्यासारखं नव्हतं पण आता त्यांत वाईट वाटून हिरमुसलं होण्यासारखं काही नव्हतं. मुंबापुरीच्या मायानगरीत यातलं काय नव्हतं ? नव्हता तो फक्त अनंतशयन पद्मनाथ त्याच्या दर्शनाचे पट संध्याकाळी सरणार होतेच. म्हणून अगदीं अनंतशयन न करता थोडी विश्रांती घेतली.

संध्याकाळचे सहा वाजले आणि आम्ही त्रावणकोर नरेंद्राच्या किल्ल्याकडे चालू लागलो. उन्हं उतरली होती नि रहदारी आणखीनच वाढली होती. फार दिवसांनीं ही शहरी धांदल आणि धावपळ दिसत होती. त्रिवेंद्रम स्टेशनवर अजून मीटर गेजची छोटी गाडीच धूर सोडीत येत जात होती. पण शहरात मात्र डबलडेकर बसेस धावत होत्या. इतर कुठल्याही मालापेक्षा सर्व प्रकारच्या कपड्याची उलाढाल दुकानादुकानातून अधिक दिसत होती.

पांढऱ्या उंच उंच भिंतींनी तोलून धरलेली भव्य पण साधीशीच कमान समोर दिसली तेव्हा सकाळी भिरभिरून गेलेली खूण पटली. समोर मंदिराचं

मोठं पण बुटकं गोपूर छोटे छोटे कलश चमकावित उभं होतं. त्या साध्याशा दारातून अगदी समोर अर्ध्या फर्लांगांच्या अंतरावर मंदिराची पहिली पायरी लागते. इथंही आत जाताना पूजेइतकेच कपडे पुरुषानी अंगावर ठेवायचं बंधन आहेच.

आत कोट परकोटांची विशेष गुंतागुंत दिसली नाही. मुख्य मंदिराला लागून लांब लांब अशा बैठया ओवऱ्या मात्र पसरल्या आहेत. सगळ्या वास्तूचा भव्यपणा वाखाणण्यासारखा आहे. पण शिल्पांच्या दृष्टीनं थोडी निराशा पदरी येते. मोठमोठाली शिल्प एकतर त्यांच्या जुनाटपणामुळे किंवा कलाहीनतेमुळे नज़रेत भरत नाहीत. निजमंदिराची दारं उघडली म्हणून आतला परिसरही फार बारकाईनं न्याहाळून बघितला. पण आधीचे डोळ्यात भरलेले आकार हे जुने पुराणे आकार ठरूं देईनात.

एक वैशिष्टय मात्र या मंदिरातल्या शिल्पांत दिसलं. आणि नंतर भिंतीवरच्या रंगचित्रात दिसलं जे अन्यत्र विशेष दिसलं नाही. इथली कित्येक शिल्प कित्येक रंगाकृत्या त्यांच्या अगदी सहजावस्थेत उभ्या आहेत. अन् नुसत्या उभ्या नव्हेत तर सकृद्दर्शनी गलिच्छ वाटणाऱ्या अश्लील आणि कामुक हावभाव दाखवीत उभ्या आहेत. इथं मात्र गोंधाळायला झालं खरं. दक्षिणनाडमधल्या शिल्पात आतापर्यंत केवळ स्त्री आकृती अधिक दिसली. कमलासनावर उभ्या रहाणाऱ्या देवीपासून तो श्रृंगारोत्सुक रमणीपर्यंत जवळ जवळ बहुतेक ठिकाणी स्त्री आकृत्या दिसल्या.

त्यांच्या उभ्या राहण्याच्या पद्धती, त्यांच्या डोळ्यांचे विशिष्टकोन, त्यांच्या हाताच्या नि बोटाच्या कल्पक रचना, भरदार उन्नत वक्षे—त्या सिंहकटी आणि कटीखाली नितंबाचे कलात्मक उठाव. मुखावर उचित रसाचा परिपोष करणारं मनोहर दर्शन. म्हणजे हे सगळे नवविध रस त्या सगळ्या आकृत्यामधून बघताना मनाला कुठे सुरकुती पडत नाही. अभिरुचिला कुठे आढी पडत नाही. आणि डोळ्यांनाही संकोच होत नाही.

मग प्रश्न पडतो की हे भीषण वस्तुदर्शन कशासाठी ? काही रचना तर विकृतीच्या पराकोटीला पोचलेल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी या शिल्पाची मोडतोड झालेली दिसून येते. कुणाचे हात तुटले, कुणाचं एखादं वक्ष सपाट झालं, तर कुणाचे मुंडक्यावरचे भागही अंतर्धान पावले आहेत.

मुख्य मंदिराच्या सर्व भिंतीवर बाहेरून याच पद्धतीची चित्रं आहेत. फरक एवढाच की त्यात देवदेवता आणल्या आहेत. मंदिराचा कळस जिथे चार भिंतीवर विसावला आहे तिथे तर अशा विकृत आकृत्यांचा, अश्लील कृत्यांचा बुजबुजाट आहे.

मंदिराच्या स्वामीला गाढ झोप लागली आहे. तेव्हापासून आता केवळ रात्रच आणि अंधारच रहाणार आहे असं तर नसेल वाटलं या आकृत्यांना ? आतमध्य स्वामींनी त्या तसल्या झोपेतही हात शिवलिंगावर ठेवला आहे. हातानं शिवत्व झाकून ठेवून प्रत्यक्ष स्वामीनीच का या साऱ्या गोष्टीना मुक्त परवाना दिला आहे ? कुणास ठाऊक ! काय आहे ते अनंतशयतम्च जाणे. विद्वान म्हणतात या साऱ्या गोष्टीत आमच्या पूर्वजांची दूरदृष्टी दिसते. त्यांच्या दृष्टीला अग्राह्य असं काही नाही. जीवनाचं सर्वांगीण दर्शन त्यांनी त्यांच्या कलात्मक शिल्पानं देऊन ठेवलं आहे.

असेलही तसं ! मी आपली माझी समजूत करून घेतली की देव भक्ताला सांगतो की, तू तुझ्या साऱ्या विकृती घेऊन, क्षणिक सुखाच्या साऱ्या गलिच्छ कल्पनांना घेऊन, माझ्याकडे ये. मुळीच संकोच करू नकोस. माझी अनंत शय्या मी पसरवून ठेवली आहे. त्या योगनिद्रेत मी त्या साऱ्या विकृती निद्रावश करून टाकतो. तू सगळ्यांना इथं ठेवून जा. पण लक्षात ठेव, त्या इथं या मंदिरात केवळ झोपल्या आहेत. नाहीशा झाल्या नाहीत. असा सावधगिरीचा इशारा तर त्यांनी नाही सांगितला यांच्या मार्फत ?

पण माझ्या मनातला हा प्रश्न तसाच ठसठसत राहिला आहे. पदराशी चुळबुळ करीत रहाणाऱ्या एखाद्या निरागस नि गोंडस छकुल्याच्या डोळ्यात लंपटतेचा विखार असावा अशी विसंगती मनात येऊन गेली. मंदिर शिल्पांचे एक प्रसिद्ध अभ्यासक श्री भगवती प्रसाद सिंह आपल्या एका निबंधात म्हणतात की, मंदिराच्या वास्तुला, आतल्या मूर्तिना नजर लागू नये म्हणून या अश्लील मूर्ति पुष्कळ ठिकाणी कोरल्या गेल्या आहेत. त्याला संदर्भ म्हणून त्यांनी उत्कलखंड अग्निपुराण आणि बृहत्संहिता यामधली उद्धरणे दिली. आहेत.

'वज्रपातादिभीत्यदिवारणार्थं यथोदितम्
शिल्पशास्त्रोऽपि मण्यादिविन्यासं पौरुषाकृतिम् ''

किंवा

मिथुनैः पत्रवल्लीभिः प्रमथैश्चोपभमयेत् ।

त्यावेळी मात्र मनातली ती खतं मनातच ठेवून देवाची पायरी ओलांडली. आंतमधे गर्दी विशेष नव्हती. निजमंदिराच्या उजव्या बाजूला छोटयाशा मंदिरात शिगू अनंताची गोडंस मूर्ति आहे. बाळलेण्याऐवजी खूप अलंकार आणि पुष्पमाळांच्या संभारानं तो झाकून गेला होता.

मंदिर छोटसं नि देवही इवलासा हे इथलं त्याचं मूळरूप आहे आपल्या लोभस शैशवानं त्यानं भगवद्भक्तांना या अनंतवनात आपलं हे विराट निजस्वरूप दाखविण्यासाठी येथवर खेचून आणलं आहे म्हणतात त्याच्या डाव्या अंगाला काळ्या कसोटीच्या मऊ संगमरवर प्रस्तराच्या सुरेख वेदीवर अनंतशेष विस्तारला आहे. त्याच्या गुळगुळीत पायठण्या चढून पद्मनाथ स्वामीच्या गर्भागारासमोर येऊन उभे राहिलो.

तीन दरवाजाचा तो लांबट हॉलसारखा दिसणारा दिवाणखानाच स्वामींचे शयनमंदिर आहे. आंत सर्वत्र कृष्ण पाषाण वापरला आहे. स्वामींची ती प्रचंड योगनिद्रा त्यांच्या अनंत नागशय्येसकट शालिग्रामशीळांत कोरली आहे. डाव्या बाजूच्या दरवाजातून त्याचं मुकुटासहित भव्य मुखमंडळ, उशाखाली घेतलेला हात, महादेवाचा लिंगविग्रह झाकून टाकणारा हात, मधल्या दरवाजातून वक्षापासून नाभिमूल आणि तिथून निघालेल्या कमलावर अधिक अंधारात गेलेला ब्रह्मदेव, आणि तिसऱ्या दरवाजातुन केवळ ती मोठमोठी पदचिन्हे एवढंच दिसावं इतका मोठा श्रीविग्रह तिथे पहुडला आहे.

त्या छोटयाशा दरवाजातून अखंड दर्शन घेता येत नाही ही एक मोठी अडचण वाटली मला. खाली हरिलक्ष्मी आणि हरितलक्ष्मी समवेत पद्मनाभस्वामीची उत्सवमूर्ति अत्यंत मनोरम पुष्पसज्जेत साजुन उभी होती. तिच्या पुढयात अनेक दीप हरीनी लागले होते. पण त्यांचा प्रकाश मूळमूर्तिच्या अंगापर्यंत पोचत नव्हता. बाहेरचा उजेड आंत ठरत नव्हता. त्यामुळे डोळे विस्फारूनही नीट दर्शन होत नव्हतं.

जेवढं दिसलं त्यानं पद्मानाभस्वामीचा मऊ मऊ प्रस्तराचा, बाळसेदार अंगाचा आणि प्रचंड आकाराचा देह त्या खूप मोठ्या विस्तारलेल्या अनंताच्या मंचकावर आणि छत्राखाली सुखानं झोपला आहे. एवढं मनावर उमटलं.

मस्तकावरचं सोन्याचं मुकुटकवच कवेत मावणार नाही एवढं मोठं होतं. कपाळावर रामानंदी त्रिपुंड्र अंधारात उठून दिसत होता. अंगावर, हातावर आणि पायावर देखील सोनपत्र्यांची कवचं बसवली आहेत. एवढ्या गोंडस शरीराच्या मुखमंडलावरचे योगनिद्रेचे शांत भाव, नासिकाग्र अर्धमुकुलित दृष्टीची स्नेहसिक्त ठेवण आणि ओठांच्या जुळणीमधली नाजूक हास्याची मनोहर जादू मात्र नीट नीरखता आली नाही. अधिक प्रयत्न करूनही ते जमलं नाही.

लोकांच्या पूजा घेण्यासाठी पुरहित चांदीची मोठमोठी तबकं पुढं करीत होते. त्यात फुलं नारळ आणि कमळाच्या मोठमोठ्या कळयांचं भरघोस पुजा-द्रव्य पडत होतं. एखादवेळी भल्या थोरल्या रुपेरी दीपपात्रांत कर्पूर प्रज्वलीत होत होता. आणि जेमतेम पुरोहिताच्या ऊंचीपर्यंतच स्वामीदर्शन घडवीत होता. मनांत पुष्कळसं येत होतं. स्वरूप पाहून निर्माण होणारे संवाद थोडे थबकल्या सारखे झाले होते. कारण अंधार त्याना दाद देत नव्हता. एवढच एक कळत होतं की अतिशय महत्त्वाचं ठिकाण आज मी बघत आहे.

विष्णूदेवतेच्या महिम्याची अष्टोत्तरशत दिव्य प्रवेशामधे ज्याची प्रामुख्यानं गणना होते त्या 'पद्मनाभममन्ततके' क्षेत्राच्या दर्शनाचं भाग्य लाभत होतं.

फार फार पूर्वीची गोष्ट आहे ही. एक गरीब शेतकरी दांपत्य केरळमधे भातशेती करून रहात होतं. भाताच्या शेतात ओणवं होऊन काम करणाऱ्या त्या शेतकरणीला भुकेनं तळमळुन रडणाऱ्या लहान मुलाचं रडं ऐकू आलं क्षणभर हनुवटीवर बोट ठेवून ती चकित होऊन ऐकतच राहिली ति मग चौकस नजरेनं तिनं इकडे तिकडे पाहिलं.

बघते तो काय ! एका झाडाखाली एक गोजिरवाणा बालमुकुंद पाय झाडीत कधी हाताची अंगुली मुखात घालीत रडतो आहे. असलं सुलक्षणी लेकरूं बघुन तिच्या मनातलं वात्सल्य जाग झालं. ते पदराखाली उचंबळू. लागलं. त्याला घेण्यासाटी तिचें हात शिवशिवु लागले. तिला वाटलं आपण स्वच्छ सचेल स्नान करून मगच घ्याव छकुल्याला. ती मग स्वच्छ न्हाऊन धूवून आली. पदर पसरून तिनं त्या निरागस पाडसाला छातीशी धरलं. आणि 'अहो तान्ह्याचे लागता झटे तेणे अधिकची पान्हा फुटे, असं सुख अगदी अकाली अवेळी उपभोगलं.

बाळाचं पोट भरलं. तिनं त्याला पदराखालून काढून एवढसचं धडोत पसरून एका झाडाच्या छायेत झोपवलं नि ती परत शेतकामाकडे वळली. पण आता तिला काम सुचणं कसं शक्य होतं ? हृदयाच्या ओढीनं तिनं नाइलाजानं काम सोडलं आणि ती झाडाखाली आली. अन् तिथला देखावा बघून थक्क झाली. पाच मुखाच्या सर्पानं आपल्या वेटोळचात घातलेल्या अंथरुणावर त्याच्या छायेखाली तिनं पाजलेलं ते लेकरू तसंच गाढ झोपलं होतं. जसं हंसत झोपल होतं. तसं आता झोपेत हंसत होतं.

तिनं त्याला अनन्य भावानं लोटांगणं घातली. पदर पसरून करूणा भाकली. तो खटचाळ देव परत येऊन तिला बिलगला. तिचं दूध प्याला. तिच्या हातची कांजी सुद्धा नारळाच्या करंटीतून प्याला त्या वेळच्या तिरूवांकुर राजाच्या नि तिरुचेद्रमच्या राजराजेश्वराला या गोष्टी कळल्या तो तातडीनं तिथं आला आणि त्या जागेवर त्यानं मंदिर बांधलं.



दुसरीही एक कथा सांगितली जाते ती अशी. दिवाकर नावाचा एक भक्त विष्णूच्या प्रेमाची भजनं कीर्तनं करायचा. विष्णूस्तुतीची कवनं करायचा त्याला बिल्वमंगल असंही म्हटलं आहे. त्याला त्याच्या दर्शनाची ओढ लागली

होती. भंजनाच्या प्रेमानंदात रंगून गेल्यामुळे त्याने डोळे मिटले की एक खटयाळ पोर कुठून तरी रांगत रांगत यायचं आणि त्याच्या पोथीची पानं घरभर करून ठेवायचं. त्याची लेखणी दूर फेकायचं त्याच्या मांडीवर बसून दौत आपल्या अंगावर उपडी करून नाना तऱ्हा करायच अन् छळून भंडावून त्याला डोळे उघडायला भाग पाडायचं. त्यानं डोळे उघडले रे उघडले की कुठेतरी पळून जायचं खुदकन् हंसत, पायातले चाळ छमाछम वाजवीत. मग त्याला वाईट वाटायचं.

एके दिवशी डोळे न उघडताच त्यानं मांडीवर बसलेल्या त्या खोडकर मुलाचा हात धरला नि विचारलं

आता कुठे जाशील ?

मोठ्या चपळाईनं हात सोडवीत नि पळून जात मुलगा म्हणाला 'अनंतवनात' बिल्वमंगलनं त्याला ओळखलं होतं. पण आता बघायचंच असलं तर अनंत वनात ये असंच जणू तो बोलून गेला होता. जाणं भाग होतं पण दिशा माहीत नव्हती. रस्त्यानं चालता चालता एका घरातली गडबड ऐकून बिल्व-मंगल थबकला. आत आई मुलाला दम देत होती 'किती वेळ रडायचं ? चूप बैस आता नाहीतर देईन अनंतवनात टाकून.'

झालं त्यानं तावडतोब ते दारा ठोठावलं आणि त्या आईला अनंतवनाची दिशा विचारली.

असं बरंच चालत शेवटी तो अनंतवनात आला. हिंस्त्रप्राण्यांनी गजबज-लेलं, दिवसाही सूर्यदर्शन होऊ न देणारं असं घोर जंगल त्यानं बघितलं अन् तो तसाच आत घुसला. लांबवर त्याला बघून हंसत पळत जात असलेला एक मुलगा दिसला. बिल्वमंगल पागल होऊन त्याचा पाठलाग करायला लागला. एवढ्यात एक प्रचंड वृक्ष महाभयानक आवाज करीत धाडकन् उन्मळून पडला त्या मुलाचं काय झालं असेल ह्या चिंतेनं व्याकूळ होऊन बिल्वमंगल त्या झाडाजवळ गेला.

तिथं बघतो तो काय, तो वृक्ष अंतर्धान पावून त्याजागी सहा कोस पसर-लेली विराट शेषशय्या आणि त्याच्या सहस्त्रमुखी छत्राखाली शयनरत भगवंताची योगनिद्रा त्याला दिसली. निळ्या सागरासारख्या नऊ मैल पसर-लेल्या त्याच्या नीलाभ शरीराच्या नाभीतून ब्रह्मकमल आकाशात उठलं होतं

आणि भगवंताच्या दिव्य कांतीनं आसमंत झळाळत होता. बिल्वमंगलानं भगवंताची स्तुति करून त्यांना सीमित होण्याची, लहान होण्याची विनंती केली. तो देखावा नाहीसा झाला आणि बिल्वमंगलापुढे परत तो उन्मळलेला वृक्ष तेवढा राहिला.

त्यानं त्यालाच पद्मनाथ मानून त्या वृक्षातून पद्मनाथ स्वामींची मूर्ति घडवली आणि तिची स्थापना केली. म्हणून हे मूळपीठ दिवाकरा ब्राह्मणानं किंवा बिल्वमंगल स्वामींनी स्थापन केलं असं सांगितलं जातं. आज त्या गोष्टींचा खुलासा करणाऱ्या काही खुणा शिल्लक आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वात पहिला लाकडी पद्मनाथ स्वामी अजून एका बाजुला ठेवून दिला आहे.

बिल्वमंगल स्वामींना छळणारा आणि त्या पुलय स्त्रीच्या हृदयीचं अमृत पिणारा तो तान्हा कान्हा त्या छोट्याशा मंदिरात प्रथम पूजला जातो आणि नारळाच्या करवंटीमधून आजही पद्मनाभ स्वामींना महानैवेद्य दिला जातो. फरक इतकाच की त्या नरोटया सोन्याच्या असतात.

पूर्व कथेत म्हटल्याप्रमाणे, मूळ, १२ मैल पसरलेला तो खरा विग्रह आता केवळ अठरा फूटाइतकाच ‘ लहान ’ आकारात आहे. तरी मूळ बारा कोसाच्या त्या स्वरूपाच्या खुणाही आज दाखवल्या जातात. त्रिवेंद्रमच्या दक्षिणेला तीन मैलावर ‘तिरुत्तलम्’ नावाचं गाव आहे. त्याला ‘मत्स्य क्षेत्र’ असंही म्हणतात. तिथल्या मुख्य मंदिरात भगवंताचं खूप मोठं मुखमंडल भाविकांना दर्शन देतं तर त्रिवेंद्रमच्या उत्तरेला नऊ मैलावर कोळत्तूर नावाचं ठिकाण आहे, तिथं विशालकाय पद्मनाभाच्या केवळ प्रचंड पादपद्माचं दर्शन होतं. ही दोन्ही त्या जुन्या आख्यायिकांची स्मारक असून आजही भाविकांच्या दृष्टीनं महत्त्वाची क्षेत्रं आहेत दोन्ही ठिकाणी जाण्यासाठी मंदिरासमोरच बसेस मिळण्याची सोय आहे.

आजचं हे विशाल मंदिर त्या विशाल अनंत पद्मनाभाच्या नाभिस्थानी आहे. ती काष्ठप्रतिमा जुनी जीर्ण झाली त्यावेळी सर्वच गोष्टींचा जीर्णोद्धार करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. मोठा सभा मंडप, आजूबाजुच्या लांब रुंद ओवऱ्या त्याच्या कोनातले मंडप, आंतली छोटी मोठी मंदिरं आणि काळ्या, कसोटीच्या दगडाची पुरुषभर उंचीची वेदी तयार झाली. नंतर आगमोक्त

मंदिर निर्माण विधीप्रमाणे बारा हजार शालिग्राम नीला रचून त्यावर 'कटुशर्करयोग' नावाच्या एका विशिष्ट मिश्रणानं वज्रलेप होऊन आजच्या मुर्तिचा आकार तयार झाला आणि यातलंच उर्वरित साहित्य वापरून ती शिशूमूर्तिही बनवली गेली. मूर्तिभोवती गाभाऱ्याची रचनाही विशिष्ट पद्धतीनं तयार करण्यात आली. आणि त्याला हेमकूट विमान असं नाव देण्यात आलं त्रावणकोरच्याच महाराजानी हे सन १०४९ साली बनवलं असल्याची आणि इतर तपशिलाची नोंद असलेला शीलालेख मंदिरात दिसतो. आणि ११६५ इ. स. मधल्या काही किरकोळ दुरुस्त्या इत्यादिचाही उल्लेख आढळतो.

यमुनाचार्य आणि श्रीमत् रामानुजाचार्य या गुरुशिष्यांनी आपल्या वैष्णव-धर्माच्या प्रसारात या मंदिराची बरीच दखल घेतली आहे. अनेक प्रसिद्ध आळवार संतांनी आणि वैष्णवांनी निर्मिलेल्या प्रबंधामधे पद्मनाभाची स्तोत्रं गायली आहेत. आळ्वार शिरोमणी शठकोषानं 'मंगलाशासन' हे खास स्तोत्रं केलं आहे.

अठराव्या शतकाच्या काळात त्रावणकोर राज्य दुष्काळाच्या आणि पर-चक्राच्या भीषण आपत्तीत सापडलं. त्यावेळी राजा मार्तंडवर्माच्या हाती राजदंड होता. त्याच्या प्रयत्नानं हे सारं शमेना. त्याच्याने आपली असमर्थता बघवेना. प्रजेवर अपत्यवत प्रेम असलेला राजा त्या हालअपेष्टा पाहून कासावीस झाला. एका हाती राहदंड नि एका हाती राजमुकूट घेऊन तो पद्मनाभ स्वामी जवळ आला आणि अनन्य होऊन म्हणाला "देवा आता हे सारं तुझं प्रजा तुझी तसा हा तुच्छ मार्तंडवर्माही तुझाच हा मुकुट हा राजदंड सारं तुझच. तूच ते सांभाळ" त्वदीय वस्तु गोविंद तुभ्यमेव समर्प्ये ते ।"

देवानं मार्तंडवर्म्याची लाज राखली. त्याची प्रजाही राखली. पण तेव्हा-पासून त्रावणकोर संस्थानची अधिपतीची मोहोर कागजातीवर आणि आज्ञा पत्रावर उठू लागली ती " श्रीमदनंतपद्मनाभस्वामी" अशी. कारण राज्याचे स्वामी तेव्हापासून पद्मनाभस्वामी झाले.

आजही महाराज सूर्योदयाचोंच येतात. पण येतात ते केवळ प्रतिनिधी म्हणून 'राजे महाराजे' म्हणून नव्हे. आज राज्य संकोचले आहे. मंदिराच्या कोटातच उरले आंहे. पण महिमा असा आहे की त्या झोपाळू राजाच्या केवळ दृष्टीभेटीसाठी अद्याप सकाळ संध्याकाळ खूप गर्दी होते.

पद्मनाभाच्या निरोपाचं दर्शन आधीपेक्षा जरा आधिक नेटकं झालं. त्याचा एवढा सारा महिमा कळल्यानंतर त्याला साष्टांग दंडवत घालावा की वाकून त्रिवार मुजरा करावा अशी मनाची चलबिचल झाली. कारण जिथून त्याला बघता येतं तिथं दंडवत घालण्याची मनाई आहे. पण खरं मनातलं गुज सांगायचं तर बघणं. एकटक बघणं त्याला साठवणं, त्याला अनुभवणं यासारखं सुख नाही. यासारखी तृप्ति नाही. मी त्याला बघत राहिले. बघतच राहिले. भंवतीच्या अंधाराला दाद न देता त्याच्या त्य विराट कुतुहलाकडे अनिमिष बघत राहिले. गाथेंतला ज्ञानदेव कधीकाळीचा बोलून गेला.

अनंत अनंतापरी देखता तो अंतरी ।
हृदयांभीतरी मज निववितो माये ।।
चाळवी चक्रचाळ अलगट गोपाळ ।
याने केला सुकाळ सहज सुखाचा वो माये ।।
सांगावी ते सांगणी उमगुनी चक्रपाणी ।
त्या निगुर्णाचे रहाणी मी रिगाले वो माये ।।

---

## २०

# सावळे सानुले परब्रह्म

सकाळी त्रिवेंद्रमहून गाडी सुटली. प्रदक्षिणेचा आकार कमी कमी होत चालल्याचं ते चिन्ह होतं. घर अद्यापही दूर होतं. पण मनांत पोकळी निर्माण होऊ लागली. दक्षिण यात्रेच्या या कल्पतरूंच्या छायेत हवं ते मिळालं होतं. मिळालं ते यथेच्छ उपभोगून झालं होतं. आता मागणं आणि मिळवणं सरलं होतं. ' मनाचिया जोगे सिध्दि ' पावलं होतं. आता घरी जायचं. जावं लागणार होतं. संसाराचं ओझं परत पाठंगुळीला घ्यायला लागणार. नित्य व्यवहाराच्या चक्रात अनिच्छया फिरावं लागणार. त्या साऱ्या पसाऱ्यात हे वीस बावीस दिवस केवळ एक दिवास्वप्न ठरणार. दोन अडीच तासांच्या रंगीत सिनेमासारखं ठरणार. म्हणूनच ते आता लवकर संपणार याचा रास्त विषाद वाटत होता.

वाटेत कोचीन घ्यायचं होतं. अर्नाकुलम् लागणार होतं. एखादा दिवस परतीच्या व्यवस्थेच्या दृष्टीनं तिथं जाणार होता. तिथून मद्रासकडे जाणारी गाडी गाठायची नि त्रिचूरला उतरायचं. त्रिचूरहून सोळा मैलावरचं गुरुवायूर बघितलं की बावीस दिवसांची ही कहाणी गुरूपवनपुरी सुफळ संपूर्ण होणार.

मद्रासला ताटातूट झालेली बडी लाईन आता कोचीनला परत भेटली-- नि मुंबईला सुटलेला निळचा पाण्याच्या दरिया फिरून दिसू लागला.

कोचीनला केरळचं प्रमुख यातायात केंद्र समजलं जातं. ते मोठं बंदर आहे.-- अर्नाकुलम् हे एक बऱ्यापैकी शहर आहे. पूर्वीच्या जमान्यात केव्हातरी ते केरळची राजधानी म्हणून भूषवलं गेलं. कोचीनच्या अतिशय जवळच असल्या-मुळे अर्नाकुलम्ला अद्यापही बरंच महत्त्व आहे. त्याचा विस्तारही बराच मोठा. त्यासाठी अर्नाकुलम् जंक्शन आणि अर्नाकुलम् टाऊन अशी दोन स्टेशनं गाडीला घ्यावी लागतात.

अर्नाकुलम्हून गाडी निघाली त्या दिवशी महाएकादशीचा दिवस होता. मोठे जपजाप्य किंवा धार्मिक नेमनिष्ठा करण्याइतपत कर्मठपण नव्हते. पण आषाढी कार्तिकी म्हणजे किमान टाळमृदंगाच्या ध्वनीवर हेलावणारे 'ज्ञानोबा तुकाराम'चे गजर ऐकण्याची सवय असते. वारीला जावं ही इच्छा होण्या-इतपत आपुलकी असते. 'पंढरीचा वारकरी–वारी चुको न देहरी संतसंग, सर्वकाळ-अखंड प्रेमाचा कल्लोळ. चंद्रभागे स्नान' एवढं तुकोबा मागून गेले आणि पिढ्यान् पिढ्या हेच मागून घेण्याचं वळण ठेवून गेले. वाटलं एवढी मोठी यात्रा झाली. आज एकादशी आहे. पण कुठलंच दर्शन घडत नाही. सबंध प्रवास आणि प्रवासच होत होता. पण त्याला इलाज नव्हता.

संध्याकाळीं त्रिचूरला पोचलो. सकाळ होईपर्यंत थांबावं लागलं. कारण गुरुवायूरची त्याच दिवशी फार मोठी यात्रा होती. लवकर जाता आलं नसतं. शिवाय तुफान गर्दीत दर्शनसुद्धा मिळणं मुष्किलीचं झालं असतं. अन् मुख्य म्हणजे यात्रेच्या प्रचंड ओघामुळे राहाण्याची व्यवस्था झाली नसती. अनेकांनी अनेक परींनी सांगून त्या दिवशी गुरुवायूरला जायला रोखलं. अनोळखी प्रांतात जाणकारांच्या सल्ल्याला डावलून चालणार नव्हतं. म्हणून त्रिचूर सोडलं नाही.

त्रिचूरची संध्याकाळ तशी मजेत गेली. इंग्लिश त्रिचूरचं खरं नाव 'तृशूर' असं आहे. शहर खूप मोठं आहे. हे परशुरामक्षेत्र म्हणून क्षेत्रेतिहासात नावा-जलं आहे. परशुरामांनी समुद्रापासून ही भूमि मिळवली आणि ह्या वस्तीची रचना केली. आज त्रिचूर हे मोठं व्यापारी क्षेत्र आहे. केरळीय उत्पादनाची फार मोठ्या प्रमाणात इथे घेवदेव चालते. नारळ, सुपारी, केळी, मसाल्याच्या

पदार्थांची मोठमोठी ठोक दुकानं शहरात आहेत. त्रिचूरचे पापडही (अप्पळम्) फार प्रसिद्ध आहेत. शहरात एक मोठं महादेवाचं मंदिर आहे. त्याला 'वादुकुन्नाथ' असं म्हणतात. शिवरात्रीला मोठी यात्रा भरते आणि रात्री होणारं दारूकाम सबंध केरळमधे अद्यापही अभिमानाचा एक विषय आहे.

पहाटेच उठून गुरुवायूरची बस पकडली. या क्षेत्राविषयी आधी काही विशेष ऐकलं नव्हतं. पण वाटेत अनेक समानशील सज्जन भेटले. नि त्यांनी गुरुवायूरचं इतकं रसभरीत वर्णन केलं की वाकडी वाट करून गुरुवायूरचं दर्शन घेण्याची इच्छा दृढमूल झाली. आता ती इच्छा मूर्तरुपात यायला काही कोसांचा विलंबच राहिला होता.

यात्रा परतत होता. त्यामुळे जाणाऱ्या गाडीत विशेष गर्दी नव्हती. सगळी गर्दी टाळून देव आम्हाला निवांतपणे बोलवीत होता. आम्ही जणू त्याचे विशेष अतिथी होतो. बस पहाटवाऱ्यांना घेत पळत होती. प्रवास आरामात होत होता. केरळच्या सृष्टीचा श्रृंगार काही निराळाच होता. केरळच्या वनश्रीचं अनेकांनी अनेक परींनी वर्णन केलं आहे. दोन्ही बाजूला लांबरूंद पाण्याचे पट्टे, दृष्टी ठरत नाही अशी क्षितीजापर्यंत पोचलेली भातशेती, रस्त्यावरची तांबडी लाल माती नि वर हरितरंगाच्या छटाछटांनी नटलेलं वनस्पतीचं झाडाझुडपांचं जग, समृद्धीचं भांडार. कोकिळेला कुठल्याही क्षणी. फसवील अशी आपादमस्तक सजलेली वसंतश्री. केळी, नारळी, पोफळी म्हणजे अत्यंत सामान्य बाब इथली. एकही भरदार वृक्ष इथं असा नसेल की ज्याच्या आधारासाठी लवंगलतिकांनी त्याच्याकडे धाव घेतली नसेल. ज्यांनी तिन्ही पिढ्यांचा वंशविस्तार आणि नात्यागोत्याचं सुख बघितलं नसेल. केरळला दक्षिण काश्मीर म्हणतात ते अगदी सार्थ असावं असं वाटलं. गीत गोविंद लिहिणारे जयदेव केरळची सफर करून गेले होते का ? तसं नसतं तर त्यांच्या लेखणीतून–

"ललित लवंगलता परिशीलन कोमल मलयसमीरे ।
मधुकर निकर करम्बित कोकिल कूजत कुंजकुटिरे ।।

असं अद्भुत वसंत काव्य कसं झरलं असतं ? त्या झावळ्या जाळ्यातून बाल मुकुंदा लपून राहिला असेल. त्या समोरच्या पाणवठ्यावर 'जलभरन'

राधिका आली असेल. नि यानं अवचित जाऊन तिच्या माथ्यावरचा घट उचलला असेल. राधेला जणू हे ठाऊकच आहे. ती आपली पकड सोडीत नाही. कान्हा म्हणतो 'गीत म्हण एखादं, मग सोडीन' ती अनुनय करते. "सोड रे मुकुंदा, जाऊ दे रे गोविंदा" नि या खेचाखेचीत तो 'गीत–गीत' नि ती 'गोविन्द–गोविन्द' म्हणत असेल. त्या वेळी जयदेव इथं असतील. त्यांच्या कानी 'गीत–गोविन्द' एवढेच शब्द पडले असतील. लक्ष लक्ष तारांचा झंकार झाला असेल, प्रतिभेच्या समुद्रात शृंगार, करुण रसाचं लालित्य उचंबळून उठलं असेल आणि गीत गोविन्दाचं मधुर काव्य निर्माण झालं असेल.

एक कल्पनाच ती. खुळी भोळी. खऱ्याखोटयाचा आणि स्थळ काळाचा पोच तिला कुठून असणार ? पण म्हणतात ना 'वचने किं दरिद्रता !' वचने नको तर कल्पनेत तरी कशाला ? वाट आणि दृश्यच काव्यमय होतं.

तर गीत असं मनोमन उभं राहिलं. पण गीतातला गोविंद अद्याप थोडा दूर होता. त्याला बघण्यासाठी आता मैला, फर्लांगाना आणि तासा मिनिटांना लवकर सरा अशी विनंति मी आपल्याशीच करत होते.

एवढा वेळ निवांत वाटणारा रस्ता आता गर्दीचा वाटू लागला. गाडीला ब्रेकचे धक्के बसू लागले. भोंगा वारंवार वाजू लागला. गुरुवायूरची यात्रा परतत होती. जवळच्या खेडयापाडयात राहणारी वारकरी मंडळी पायी परतत होती. बहुतेकांची कपाळं केशरी गंधानी भरली होती. मुलांच्या हातात खेळणी खाऊ दिसत होता. बस वाट काढत कशीबशी सरकत होती. पण गर्दीपुढे गाडयांची वाहातूक विस्कळीत झाल्याचं दिसलं. ड्रायव्हरनं सर्वांना तिथंच उतरण्याची विनंती केली. तेव्हा उतरलो सारे. तरी बरं, मंदीर फारसं दूर नव्हतं.

गर्दीतून वाट काढीत आम्ही पूर्व गोपुराकडे सरकलो. प्रसादाची आणि यात्रेतली इतर दुकानं आपला अवाढव्य पसारा मांडून बसली होती. लोक परतत असताना मुलाबाळांना काही काही घेण्यासाठी दुकानांभोवती आधिक गर्दी करून उभे राहात होते. रस्ते त्या मानानं लहान, चिंचोळे असल्यामुळे जाणंयेणंसुद्धा अशक्य होत होतं.

पूर्व गोपुराजवळ आलो. समोर एक सुवर्णाचा स्तंभ वरचं खूप उंची त्रिकोणी छप्पर भेदून वर गेला होता. तिथं उभं राहिलं तर समोर अस्पष्ट का होईना पण देवाची दृष्टिभेट घेता येते असं सांगितलं गेलं. गोपूर ओलांडून प्रथम परिक्रमेत गेलं की समोर असाच उंच दीपस्तंभ दिसतो. डाव्या बाजूला एक छोटीशी पुष्करिणी दिसते. भंवतीची छोटी छोटी मंदिर बघितली. त्यांत एक दुर्गादेवीचं, एक विघ्नेश्वर विनायकाचं होतं. मुख्य मंडपात गर्दी होती म्हणून हे सारं एका दृष्टीत बघून घेतलं आणि नंतर मुख्य मंडपाकडे वळलो. त्या मंडपापुढे निजमंदिर किंवा छोटासा गाभारा होता. त्याला इथे ' श्री कॉईल ' म्हणतात.

मला जरा आश्चर्य वाटलं. एकूण मंदिर छोटसं असलं तर ते समजू शकतं. पण निजमंदिर इतकं छोटं इतकं बुटकं असलं तर त्यांत केवढासा देव बघायचा ? त्याची पूजा तरी एवढयाशा मंदिरात कशी होऊ शकणार ? एक लहानसा घोळका रांग लावल्यासारखा दिसला म्हणून सारे त्या पाठी-मागे उभे राहिलो. सगळं कुतुहल, सगळ्या शंका आता संपणार होत्या. श्री कॉईलचं दार समोर आलं आणि मी डोळे उचलून बघितलं.

वेंधळी दृष्टी तिथून हलेचना. काहीं विस्मय, काही कौतुक अस सारं मिळून आलं. एवढं बघितलं, इतकं न्याहाळलं. पण याच्यासारखं हेच. अनेक ठिकाणी बघता बघता दृष्टी हरवली होती. चालता चालता पाय थकले होते. पण इथं डोळ्याबरोबर चित्तही हरण्याची पाळी आली होती. हात नमस्कार करण्याचंही विसरत होते.

एका हाती लोणी घेऊन, दुसऱ्या हाती बासरी घेऊन रांगत जाणारे बाळ अचानक उभं रहावं असं रुपडं समोर उभं ठाकलं. माथ्यावर मोराची पिसं. खोवलेला फुगीर मुकुट, गोबरं तोंड, मोठमोठे लब्बाड डोळे, कपाळावर गंध छोटुकलं नाक, अन् एवढीशी जिवणी. मुकुटातून निघून कानाशी गुदगुल्या करणारं काळ कुरळं जावळ, कानात मोठ्ठे मोठ्ठे डूल, गळयात चमकत्या गोफाबरोबर वाघनखाचे पदक. हात तसाच पुढे पसरलेला, नि त्यावर खरा लोण्याचा गोळा, दुसरा हात खाली गुडघ्याजवळ त्याच्यात छोटीशी बासरी. कमरेला कुयऱ्यांची सोनसाखळी आणि तिच्यामधे नाजूक नाभीच्या खाली

लालचुटुक लंगोटीचा त्रिकोण. खाली पायात घुंघराचे चाळ. बाकी सारं अंग उघडं वागडं.

असा हा लावण्यसुंदर सगुण मेघश्याम छोटचा गोल कमल शिल्पावर उभा आहे. आणि ते कमल एका चकचकीत ओटचावर मधोमध वसवलं गेलं आहे. भोवताली प्रभावळ आहे नाना कुसरींच्या फुलांची. पांढऱ्या दंडांची, गुलाबी हिरव्या पेरांची. त्याच्याभोवती आणखी एक मोठी माळ आहे. गडद फुला-पानांची आणि वर त्याहीपेक्षा मोठी. रानगुलाबांच्या फुललेल्या फुलांची. दोन्ही अंगी चिमणे नंदादीप तेवत आहेत आणि त्यामधे हा चिमणाराजा हाती लोण्याचा कवळू घेऊन लडिवाळपणं उभा आहे.

कसं वर्णन करायचं याच्या स्वरुपाचं ? ‘ गुजगुजित रुप सांवळे सगुण ’ असं ज्ञानदेवांच्या भाषेत म्हणायचं की ‘ परब्रह्म सोज्वळ ’ असं चोखोबाच्या भाषेत म्हणायचं. ‘ येथे सुखाचिया राशी ’ असं सेना महाराजासारखं अनु-भवायचं की ‘ नागरे गोमटे रुप ते गोजिरे ’ असं नाथांच्या दृष्टीनं बघायचं. ‘ आनंदाचा कंद उभा परमानंद ’ असं म्हणायचं की ‘ मनमोहन मेघश्यामा ’ असं रामदासांच्या हाकेत बोलवायचं ? की रांगडचा तुकोबांच्या अभंगात ‘ राजस सुकुमार मदनाचा पुतळा ’ असं वर्णन करायचं आणि सकळही तुम्ही गे एकीसवा, ‘ तुका म्हणे जीवा धीर नाही ’ अशी त्याच्या रुपावर झडप घालायची ?

प्रत्यक्षापेक्षा लिखाण अतिशयोक्तीचं असतं म्हणतात. इथं अगदी उलट झालं आहे. प्रत्यक्ष बघितलेलं दृश्यच आज लेखणीला अवास्तव भासून राहिलं आहे.

तुलशीदासांना त्याची छवी ‘ नवनील नीरद सुंदर ’ अशी दिसते. तर ‘ मैं नही माखन खायो ’ असं चक्क खोटं बोलणारं हे मूल सूरदासांना दिसतं. मीराबाई त्या ‘ मोहनी मूरत–सावरी सुरत नन्दलालाला ’ आपल्या डोळचां-तच येऊन राहण्याला आळवते. आहेच तो तसा. त्यानं खोडचाही तशाच केल्या आहेत. दह्या दुधांच्या चोऱ्यांबरोबर दह्यादुधांचे घट मथुरेच्या बाजाराला नेणाऱ्या गौळणींना ‘दधिका नाम बिसरी गयो प्यारी । ले लेहुरी कोई श्याम सलौना ’ असं भ्रमिष्टही त्यानंच केलं आहे.

अकरा वाजले. श्री कॉईलचं घुंघराघंट्यांचं महाद्वार बंद झालं. गर्दी पांगली. मला मुळी हलावसं वाटेना. वाटलं, काय आहे बाहेर ? तीच गर्दी नि तेच व्यवहार ना ? प्रवास संपत आला आहे. आणखी दोन दिवसांनी ते सारे पहारेकरी भेटणारच आहेत.

मंदिराचं स्वरुप काही विशेष समाधानकारक दिसलं नाही. खूप जुनाट वास्तू वाटत होती. पण जुनं लेणं एकही नव्हतं तिथे. मंदिर पांड्य राजांनी बांधलं आहे असं म्हणतात. पण ते अशक्य वाटतं. पांड्य राजांच्या रुबाबाचा एवढासा नमुना औषधालाही इथे दिसत नाही. पूर्व गोपूर स. १७४७ मधे बांधलं गेल्याचा उल्लेख आहे. आणि बाकी सारी रचना सुमारे १८५५ ते १८९३ मधे बांधली गेली. किंवा एकूण मंदिराचा जीर्णोद्धार त्या काळात झाला असावा. तरी एकूण मंदिर त्या उत्सवाच्या वेळीही रंगहीन आणि जीर्ण वाटत होतं.

साडे अकराला श्रीकॉईल दर्शनासाठी परत मुक्त झालं. गर्दी आता विशेष नव्हती. दर्शन तसं लांबूनही होत होतं. पण यावेळचं दर्शन सकाळच्या स्वरुपापेक्षा काही अधिक वेगळं होतं. आकार तेवढाच अडीच फुटाचा. पण हातातलं लोणी जाऊन कमळाचं फूल आलं होतं. वेणूच्या जागी सोनेरी गदा. सकाळी लपून राहिलेले दोन हात शंखचक्र धारण करून दो बाजूला उभारले होते. ' कांसे सोनसळा, पांघरे पाटोळा, घननीळ सावळा ' असा चतुर्भुज-लावण्यराशी देव उभा होता. सकाळी तो नन्दनन्दन होता, यशोदेचा कान्हा होता. पण आता तो देवकीच्या आराध्यरुपांत उभा होता. कंसमामाच्या बंदिशाळेत याच रूपांत त्यानं आईला पहिला साक्षात्कार घडवला होता.

या मूर्तिचा इतिहासही असा विलक्षण आहे. विष्णुलोकात प्रत्यक्ष विष्णूच या लावण्यविग्रहाची आराधना करत होते. त्यांनी तो त्यानंतर ब्रह्मदेवाला दिला. सुतप नावाचा एक तपी ब्राह्मण आणि त्याची पतिपरायण स्त्री पृश्नी दोघंही ब्रह्मदेवाकडे गेले आणि आपल्या संतानहीनतेचं दुःख सांगू लागले. ब्रह्मदेवानं ती मूर्ति त्यांना दिली अन् सांगितलं, " याची उपासना करा म्हणजे तुमचे मनोरथ पूर्ण होतील."

त्यांनी ती मूर्ति घरी नेली आणि तिची सर्वतोभावे सेवा केली. श्रीहरी प्रसन्न झाले. ' वर माग, असं दोघांना म्हणाले पृश्नी म्हणाली, " नारायणा

तुझ्यासारख्या पुत्राची मी माता व्हावं असा वर दे. तुझ्या सारखं गोजिरं रुप माझ्या कुशीत खेळावं. तुझ्यासारखं बाळ मला व्हावं. 'श्रीहरी' हसले. "माझ्यासारखं ? कसं शक्य आहे ? मीच केवळ माझ्यासारखा. एकमेवाद्वितीयम् । तेव्हा मीच तुमच्या उदरी येईन. पृश्नीमाते एकच इच्छा तू तीन प्रकारे बोलून दाखवलीस म्हणून तीन वेळी मी तुझ्या उदरी येईन."

देव बोलून गेला नि यथाकाल पृश्नीनं एका लहानग्याला जन्म दिला. त्याचं नाव 'पृश्नी गर्भ'. पुढच्या काळात सुतप झाला काश्यप आणि पृश्नी अदिती झाली. त्याच मूर्तिची आराधना त्यांनी केली आणि देव वामनावतारात जन्मले. तिसऱ्या वेळी काश्यप झाला वसुदेव नि अदिती देवकी. योगायोगाने त्यांनी त्याच मूर्तिची आराधना केली आणि कंसाच्या बंदिशाळेत आपल्या गर्भिणी मातेपुढे देव हा असा उभा राहिला.



पुढे श्रीकृष्णाचं अवतारकार्य संपलं. 'महाभारत' पार पडलं आणि यादवांची यादवी द्वारकेला भोवली. सोन्याची द्वारका सागरात बुडून जाणार

होती. श्रीहरीनं घाईघाईने उद्धवाच्या हाती सुरगुरूंना निरोप पाठवला. "लवकर या. द्वारका बुडण्यापूर्वी ही मूर्ति घेऊन जा आणि उचित ठिकाणी हिचा प्रतिष्ठासंस्कार करा."

पण बृहस्पतीला यायला उशीर झाला. नि द्वारकेबरोबर ती मूर्ति पाण्यात गेली. गुरू चिंतेत पडले. त्यांनी वायुदेवतेला बरोबर घेऊन मूर्तिचा शोध घेतला आणि मूर्ति मिळवली. आता कुठे स्थापना करायची हा प्रश्न पडला. गुरू आणि वायू आकाशमार्गानं सगळीकडे बघून आले. अंग, वंग, कलिंग, मगध, कोशल, सौराष्ट्र, कोंकण आणि चौल पांड्यांची भूमि देखिल त्यांनी नजरेखालून घातली. पण कुठेही मूर्तिस्थापना करायला त्यांचं मन घेईना. शेवटी त्यांना–

केरालिकोमलतरं भुवः कोणे निवेशितम् ।
नामावशेषितक्षत्ररामबाहुपराक्रमम् ॥

अशी केरळभूमि दिसली. नारळ केळींनी दाटलेली. सद्वर्तनी ब्राह्मण ज्या ठिकाणी आहेत, जेथील रहिवासी, आदर्श स्वच्छतेचे, शुचितेचे, शीलचारीत्र्याचे आणि सत्याचे चालते हालते पुतळेच आहेत, जेथील गृहस्वामिनींची शालिनता वहुलोकी प्रशंसिली गेली आहे असा केरळदेश त्यांना दिसला.

श्रीगुरुवायूर माहात्म्य म्हणते. 'तेथे त्यांनी सरोवराच्या काठची जागा पसंत केली ते सरोवर –'

स्वच्छस्फटिकसोपानमत्यच्छजलनिर्मितः ।
नीलरक्तोत्पलाम्भोजकल्हारादिविराजितम् ॥
मधुपानमदोन्मत्तमधुपाराव घोषितम् ।
हंसकारण्डवक्रौंचसारसात्तसुखासिकम् ॥

असं नयनाभिराम रमणीय ठिकाण जे आधीच शिवपार्वतीचं क्रीडाक्षेत्र बनलेलं आहे. ते ठिकाण बघून गुरू आणि वायू ह्यांनी विश्वकर्म्याच्या दिग्दर्शनाखाली एक अप्रतिम मंदिर बांधून काढलं. आणि अत्यंत हर्षोल्हासानं प्रत्यक्ष पार्वती परमेश्वरानं भगवंताची ही ललितमधुर मूर्ति स्थापन केली. गुरू आणि वायूनं हे सगळं घडवून आणलं म्हणून हे क्षेत्र गुरुवायूर या नावानं प्रसिद्धीला आलं. गुरुपवनपूर किंवा गुरुवातपुरी ही नावही प्रसिद्ध आहेत.

महाभारतातील सर्पसत्रानंतर त्याची विकृत प्रतिक्रिया जनमेजयाच्या अंगावर उठली. त्याचं सगळं राजबिंड शरीर कुष्ठरोगानं बरबटून गेलं. महर्षि वैशंपायनाच्या सांगण्यावरून राजा गुरुसह गुरुवायूरला आला. त्यानं देवाची करुणा भाकली. त्याचं कुष्ठ गेलं. सर्व अंग सोन्यासारखं शुद्ध झालं आणि राजा परत गेला. गुरुवायूर क्षेत्राची अजूनही त्याविषयी अतिशय प्रसिद्धी आहे. कुष्ठ, चर्मरोग, वातादिविकारांनी गाजलेले रोगी इथं येतात आणि ठराविक दिवसांची स्नानदर्शनाची तपस्या करून निर्मळ होऊन परत जातात.

शरयूचे घाट अद्याप रामचरितमानसाचं पारायण करतात तर व्रजमंडळात सूरसागरातल्या प्रेमलहरी उसळतात. मेवाडचे घुंघट अजून मीरीके प्रभू गातात. महाप्रभूंचा अंग वंग कलिंग अजूनही बाहू उभारून मृत्तिकामृदंगाच्या तालावर चैतन्याची भक्तिरसना आळवतो. महाराष्ट्रातल्या आषाढी कार्तिकी तर ज्ञानोबापासून तुकोबापर्यंत सगळ्याच अभंगवाणीच्या पालख्या खांदी वाहतात. कर्नाटकात पुरंदर विठ्ठल तर तामिळनाडमधे त्यागराज गायला जातो. केरळमधेही सोळाव्या शतकात असाच एक कृष्णपिसा संत होऊन गेला. त्याची काव्यतरंगिणी केरळच्या भक्तांना भक्तीचे डोल आणते. खऱ्या काव्य रसिकांची मति गुंग करून टाकते.

हा भक्त होता. संत होता. आणि पंडित कवी होता. प्रख्यात वैश्याकरणीही होता. त्याचं नाव श्री नारायण भट्टाद्रिपाद. यांचा जीवनकाल सन १५५३ ते १६२३ असा मानला जातो. उत्तर केरळमधल्या पेरुमणम् गावाच्या 'मेप्पत्तूरइल्लम्' नावाच्या प्रसिद्ध पंडीत घराण्यात त्यांचा जन्म झाला. इतर भक्तकवींसारखा त्यांचा प्रारंभिक जीवनकाल थोडा ऐषाआराम व चैन यामधेच गेला. परंतु योग्य वेळी पाठीराखा गुरू भेटला आणि अल्पकाळातच नारायण भट्टाद्रि सर्व क्षेत्रात पंडितप्रवर म्हणून नावाजले जाऊ लागले.

नंतर कुणी म्हणत त्याचा अभिमान वाढला. ते गर्विष्ठ झाले. म्हणून देवाची त्यांच्यावर अवकृपा झाली. परंतु भगवंताच्या कृपाकार्याला काही कारण लागणारच होतं. पंडितराज संधिवातानं पछाडले गेले. त्या दुर्धर

वातरोगानं त्यांना स्वगृहीच बंदिवान केलं. ते तळमळू लागले. प्रारब्धाशी झगडू लागले. शेवटी त्यांना कुणीतरी गुरुवायूरचा मार्ग दाखवला.

ते गुरुवायूरला आले. आणि इथलं वेणुवादनशील, लोलकुंडल धारण करणारं, निळं सावळं गोड रूप पाहिलं नि त्यांचं दुःख विसरलं गेलं. त्यांच्या प्रतिभेला वसंताची पालवी फुटली. श्लोकाश्लोकानं तो काव्यतरू मोहरू लागला. प्रास अनुप्रासांनी फुलू लागला. शब्दालंकारांनी डंवरू लागला. दशका दशकाचे धुमारे त्याला फुटू लागले. अशा पानाफुलांनी नि शाखा-पल्लवांनी नारायणाद्रि यांचा तो भव्य काव्यतरू गुरुवायुपुरीच्या अंगणात झुलु डुलु लागला. अलंकापुरीच्या आजानुवृक्षासारखा फोफावला. त्याच्या छायेत अनेक अपंग, व्याधि ग्रस्त आणि विकलांग जीवांना सावली मिळाली. त्यांच्या आधिव्याधिपासून कायमची मुक्तता झाली.

पहिल्या दशकातल्या पहिल्या श्लोकात ते म्हणतात.

सान्द्रानन्दावबोधात्मकमनुपमितं कालदेशावधिभ्यां
निर्मुक्तनित्यमुक्तं निगमशतसहस्त्रेण निर्भास्यमानम् ।
अस्पष्टं दृष्टमात्रे पुनरुरुपुरुषार्थात्मकं ब्रह्मतत्वं
तत्तावद् भाति साक्षाद् गुरुपवनपुरे हन्त ! भाग्यं जनानाम् ॥

ते प्रत्यक्ष ब्रह्म, श्रीकृष्ण विग्रहाच्या स्वरूपात या गुरुपवनपुरात उभं राहिलं आहे. मानवमात्राच्या दृष्टीनं केवढं महद्भाग्य आहे हे. ते म्हणतात त्यात काय वावगं आहे ! हे त्याचं स्वरुप बघितलं की प्रत्येक जण मनात आपल्या भाग्याला खरोखर पार नाही असंच समजेल.

श्रीमद्भागवताच्या द्वादश स्कंधाचे हे काव्यमय स्वरुप अतिशय नादमधुर आहे. शब्दमधुर आहे. श्रुतिमधुर आहे. मधुराधिपतेरखिलं हा त्याचा वर्ण्य-विषय आहे. १३०४ श्लोकाच्या या महाकाव्यातल्या शेवटच्या दशकांत श्रीहरीच्या आपादमस्तक स्वरुपाचं इतकं हृदयंगम वर्णन आहे की ते प्रत्यक्ष अनुभवाचंच आहे असं वाचणाराला वाटेल.

द्वेधा नारायणीयं श्रुतिषु च जनुषा स्तुत्यता वर्णनेन ।
स्फीतं लीलावतारैरिदमिह कुरुतां आयुरारोग्यसौख्यम् ॥

असं पसायदानात मागत नारायणीय काव्य संपलं आहे.

त्रिवेंद्रमच्या मंदिरात ऐकलेल्या बिल्वमंगलीचीं येथे मंदिरातच समाधि आहे असं म्हटलं जातं. चहुबाजुंनी बंद असलेली खोलीं दाखवण्यात येते. ती उघडून बघण्याचं धारिष्टय अद्याप कुणालाही होत नाही. कुणी म्हणतं त्यांत श्रीहरीची मयुरपुच्छे सुरक्षित ठेवली आहेत. कुणी त्याचा अर्थ टिपूच्या दक्षिण स्वारीमधे लुटालुटीच्या भीतीनं देवाचा खजिना तिथं लपवून ठेवला आहे असाही लावतात. कुणी बिल्वमंगल स्वामींची ती जिवंत समाधी आहे असं समजतात.

'टिपूच्या स्वारीच्या' धामधुमीत ही मूर्ति हलवून अंबालपूजा या गावी नेली आणि त्रावणकोरच्या महाराजांनी तिथे पूजेअर्चेची व्यवस्था केली. परचक्राचं भय सरल्यानंतर आपल्या वास्तव्याची खूण अंबालपूजेला ठेवून 'गुरुवायूरप्पन्' परत आपल्या श्री कॉईलमधे येऊन उभे राहिले. पुढे टिपू सुलतानानंही देवाचा यथोचित आदर करून जहागिऱ्या इत्यादि मंदिराला बहाल केल्या.

पहाटे तीन वाजताच हा देव जागा होतो. आणि विविध प्रकारच्या पूजा, उपचार, खाद्यपदार्थांचे भोग घत घेत रात्री नऊ वाजता झोपतो. सकाळी त्याला उठायला ब्रह्मवृंदाचे 'सुप्रभातम्'चे स्वर लागतात. तर रात्री झोपताना स्त्रियांची अंगाईगीतं लागतात. ही सगळी पूजेअर्चेची व्यवस्था आणि त्यांचे आगमोक्त विधि श्रीआदिशंकराचार्यांच्या अनुशासनाप्रमाणे चालत आले आहेत. देवाचा सर्व प्रसाद कुणीही मिळवू शकतो. पण पहाटेचं त्याच्या हातातलं लोणी साखर मात्र गर्भिणी मातांना मिळतं. त्यानं त्यांची सुखरुप सुटका होऊन पृश्नीसारखं भाग्य त्याच्याही वाटेला येईल अशी समजूत असते. आणि म्हणतातना 'जैसी जारी भावना वो वैसा फल पावे' त्यांत अशक्य काय आहे ?

खरंच त्याची कृपा झाली तर अशक्य असं काय आहे. भुकेचा आकार विस्तार मुलापेक्षा आईला आधिक कळावा तसं नुसतं दक्षिणेकडचा प्रवास करायचा निश्चय त्याला कळल्यानंतर त्यानं माझ्या नजरेसमोर एवढा प्रपंच मांडला. पण आता त्याचा प्रपंच तो आवरून घेत होता. तिरुमालैच्या आनंद-निलयातला भव्य देव सुरवातीला पाहिला होता. आणि शेवटी श्री कॉईल-मधला चिमुकला छकुला देव दिसला होता. व्यंकटेशानं पुढच्या प्रवासाची शिदोरी दिली आणि या गोपालानं उरलासुरला गोपाळकाला केला.

ही प्रदक्षिणा आता पूर्ण झाली. घर समोर दिसू लागलं. दोन खिडक्यांमधला अप्रिय अंधार दिसू लागला. पण एवढं सगळं दृष्टिसुख घेऊन आता उंबरठा ओलांडायचा ही जाणीवही केवढी सुखद आहे. ही छोटी प्रदक्षिणा पूर्ण झाली. पण श्वास निश्वासाचं देणं घेणं संपेल, आयुष्याची महिन्या वर्षाची प्रदक्षिणा पूर्ण होईल आणि आपलं निजमंदिर समोर दिसू लागेल त्यावेळी त्या अंतिम क्षणी हृदयांत भरून उरेल, डोळ्यांना जडून राहिल असं हेच उघडं वाघडं नृत्य शालीन गोड गोजिरं रुप. मन त्याला हाक मारीत म्हणेल—

रुण झुण पायी वाजताती वाळे
दावी तीं पाऊले दयानिधी !

आणि ग्रंथ संपेल !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
क्रमांक ... दि. ...
वर्ग ... नोंद दि. ...